
ज्ञान प्रबोधिनीचे

# छात्र प्रबोधन

ज्ञान प्रबोधिनीचे
कुमारांसाठी
अभिनव मासिक !




## दीपावली विशेषांक

छात्र प्रबोधन-दीपावली विशेषांक
वर्ष ७ अंक ३, सौर आश्विन शके १९२०

## संवाद

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती,
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

*प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,*

*मला माहितीये, तुम्ही या दिवाळी अंकाची खूप आतुरतेने वाट पाहात असणार! आणि म्हणूनच अनेक मान्यवरांच्या साहित्यकृतींनी नटलेला अन् चित्रकारांच्या रंग-रेषांनी सजलेला हा दिवाळी अंक तुमच्यापर्यंत पोहोचवताना आम्हालाही आनंद होतोय. यातल्या कथा – कविता – ललित लेख – माहितीपर लेख – मोहिमांची चित्तवेधक वर्णने तुम्हाला भावतीलच. कृति-कौशल्यांमध्ये दिलेल्या विविध गोष्टी करण्यात तुमची दिवाळीची सुट्टी कशी गेली हे तुम्हाला कळणारसुद्धा नाही. दिवाळीअंकासोबतची 'तर्कतरंग' ही भेट तुम्हाला आवडली का? जरा डोकं वापरून अन् खेळ नीट समजावून घेऊन खेळलात तर खेळात नक्कीच मजा येईल. मी तुमच्या गावाला आलो की मलाही तुमच्याबरोबर हा खेळ खेळायला आवडेल बरं का!*

*दरवर्षीप्रमाणे याही वर्षी काही कर्तृत्ववान व्यक्तींचे अनुभव तुम्ही वाचणार आहात 'कर्तृत्वाशी जडले नाते' या लेखमालेत. या सगळ्या व्यक्ती वयाने तिशी-पस्तिशीच्या आतल्या आहेत अन् त्यांनी त्यांच्या क्षेत्रामध्ये स्वत:च्या मेहनतीनं कर्तृत्वाचा एक टप्पा पूर्ण केला आहे. सामान्य शाळेमध्ये शिक्षण घेतलेल्या, तशा सामान्य घरातल्या या युवक-युवतींनी स्वत:तलं असामान्यत्व ओळखून, स्वत:ला आपल्या आपल्या क्षेत्रांमध्ये झोकून प्रबोधनच्या वाचकांना, म्हणजेच तुम्हा सर्वांना, हे सर्व अनुभव खूप जवळचे अन् प्रेरक ठरतील असा विश्वास वाटतो. अजून २-५-१०-१५ वर्षांनी तुमच्यापैकी अनेकांचे अनुभव या सदराखाली आम्हाला लिहिता यायला हवेत, अशा अपेक्षा बाळगून आहोत. त्याचं बीज, त्याची ठिणगी, त्याचा दिवा या दिवाळीच्या निमित्ताने तुमच्या मनात रुजावा यासाठी आम्हा सर्वांच्या खूप शुभेच्छा!*

*आपणही असं कर्तृत्व फुलवावं असं ज्यांना वाटतंय त्या सर्वांशी मैत्री वाढवायला आम्हाला नक्कीच आवडेल. खरं तर या मासिकाचा प्रारंभच त्यासाठी झालाय. तुमच्यासारख्या धडपडणाऱ्या मुलामुलींना आयुष्यात काही भव्यदिव्य करण्याची प्रेरणा मिळावी, त्यासाठी आजपासून स्वत:च्या व्यक्तिमत्त्वामध्ये काय बदल करायला हवेत याची दिशा कळावी, विविध आव्हाने पेलण्याची संधी अन् अनुभव मिळावेत, स्वत:ला मिळालेली संधी इतर अनेकांना कशी मिळवून देता येईल असा विचार मनात अन् कृतीत रुजावा, निंदनीय गोष्टींबद्दलची चीड निर्माण व्हावी, त्या थांबवण्याचे अन् चांगल्या गोष्टींचा आग्रह धरण्याचे धैर्य वाढावे, यासाठी हे मासिक व ज्ञान प्रबोधिनीची शैक्षणिक चळवळ महाराष्ट्र अन् देशभर पोहोचविण्याचा खटाटोप आपण करतो आहोत. त्यामध्ये तुम्हीही अगदी धुंद होऊन सहभागी व्हा! अनेकांना सहभागी करून घ्या.*

*तुम्ही स्वत: तयार केलेल्या शुभेच्छापत्रावर या दिवाळीअंकाबाबतच्या प्रतिक्रिया न विसरता कळवणार ना! आम्ही त्या वाचायला उत्सुक आहोत.*

*ही दिवाळी अन् येणारे विक्रम संवत्सर तुम्हाला, तुमच्या कुटुंबियांना, मित्रमैत्रिणींना अन् शिक्षकांना उत्साहाचे, आरोग्याचे, पराक्रमाचे जावो. तुमच्यातील जिद्द, सामर्थ्य, अनेकांबद्दलचा स्नेहभाव अन् स्वदेशाबद्दलचा अभिमान वाढवणारे जावो व ते कृतीतून व्यक्त होवो, यासाठी आम्हा सर्वांच्या सस्नेह तुमचा खूप खूप, अगदी मनापासून शुभेच्छा !*

ज्योत चेतवू ज्योतीने अन् मन जिंकू या स्नेहाने, दीपावलीचा प्रकाश निर्मळ, उजळू दे अवघी सदने

**(महेंद्र सेठिया)**

# अंतरंग

## कथा


| | |
|---|---|
| ९ | **अजगराच्या जबर विळख्यात –** विजय देवधर |
| २३ | **बुलबुल –** चि. राहुल विद्वांस |
| २४ | **रनर –** लीला दीक्षित |
| ४९ | **उद्ध्वस्त** – संजय ढोले |
| ५९ | **लाल शर्ट निळा रुमाल –** सुहासिनी देशपांडे |
| १०१ | **काबुलीवाला –** मृणालिनी गडकरी |
| १२३ | **हसा आणि हसवा –** बाळ गाडगीळ |
| १३४ | **एकोशी –** हरिहर आठलेकर |
| १५७ | **हलाहल –** मुकुन्द जोगळेकर |
| १८७ | **एकदम गावरान –** शकुंतला फडणीस |
| १९१ | **वाढदिवस** – ज्योत्स्ना देवधर |


## ललित


| | |
|---|---|
| १४ | **प्रश्न –** संजीवनी बोकील |
| १९ | **शालेय सहलमंत्री मी आणि भ्रमंती –** रामचंद्र देखणे |
| २९ | **रनर –** लीला दीक्षित |
| ६३ | **उद्ध्वस्त** – संजय ढोले |
| ९६ | **लाल शर्ट निळा रुमाल –** सुहासिनी देशपांडे |
| १११ | **काबुलीवाला –** मृणालिनी गडकरी |
| १३३ | **हसा आणि हसवा –** बाळ गाडगीळ |
| १४५ | **एकोशी –** हरिहर आठलेकर |
| १५१ | **हलाहल –** मुकुन्द जोगळेकर |


## विशेष लेखमाला


६५ **कर्तृत्वाशी जडले नाते!**

***युवापिढीतील विविध क्षेत्रात विशेष कर्तृत्व गाजवणाऱ्या व्यक्तींची मनोगते***

चेतन बालवे सावनी शेंडे मेघना परांजपे सुमना नाथ

अभिजित कुंटे सुदेष्णा घारे संजय उपाध्ये समीर गोखले

सोनाली कुलकर्णीडॉ. आशिष लेले



**संपादक मंडळ**
महेन्द्र सेठिया B.E., M.Ed.
शैलजा देशमुख M.A. M.Ed.
अनघा लवळेकर M.A. , B.Ed.
शैलजा देशमुख M.A., M.Ed.

**संपादक, प्रकाशक :** महेन्द्र सेठिया

**संपादन साहाय्य :** वर्षा कुलकर्णी
दीपाली गोगटे
स्वाती ढेकणे
सुषमा निसळ

**मुखपृष्ठ :** गिरीश सहस्रबुद्धे
**रेखाचित्रे व सजावट :** गिरीश सहस्रबुद्धे
भास्कर सगर

**अक्षरजुळवणी :** प्रिंट लिंक, पुणे

***प्रकाशन दिनांक :*** *राष्ट्रीय सौर १० आश्विन, शके १९२०. १४ ऑक्टोबर १९९८.*

# छात्र प्रबोधन

## कृति–कौशल्य


| १५ | **काष्ठशिल्प** – उक्षाल गुर्जर |
| ३१ | **पाण्यावरील रांगोळी** – वसंत थिटे |
| ३९ | **दोऱ्याचा आकाशकंदील** – रेखा जोशी |
| ५५ | **तुडतुड्या** – वा. ना. दांडेकर |
| ५६ | **चला पेटी वाजवू या!** – कल्याणी केसकर |
| १४७ | **मीटर तयार करू या** – सी. के. देसाई |
| १५५ | **चिमणाळं** – विद्या नारळकर आणि इतर |


## ज्ञान–विज्ञान


| ३३ | **पर्णसाज** – कांचनगंगा गंधे |
| १०९ | **गुरुत्वीय भिंगे** – जयंत नारळीकर |
| १८१ | **आकाशातील देखणे प्रकाशनाट्य** – प्रकाश तुपे |


## कविता


| ४ | शांता शेळके, अंजली कुलकर्णी |
| ४१ | अरूणा ढेरे, इंद्रजित भालेराव, किशोर पाठक, दत्ता हलसगीकर, राजलक्ष्मी देशपांडे, गंगाधर महाम्बरे, रवीन्द्र भट, संजीवनी मराठे, सुरेश सावंत, संगीता बर्वे, आश्लेषा महाजन, कल्याण इनामदार, प्रवीण दवणे, वि. म. कुलकर्णी |


## चित्तथरारक मोहिमा – काल आणि आज


| ११३ | **आकांक्षापुढती गगन ठेंगणे** – आनंद पाळंदे |
| १७५ | **भारताच्या सागरी मार्गाचा शोध लावणारा व्हाश्कू द गाम** – निनाद बेडेकर |


## विशेष लेख


| ४ | **कथा तीन व्यथा एक** – वि. गो. कुलकर्णी |
| १२७ | **देवाची लिपी वाचणारा अनुभवसंपन्न लेखक – गो. नी. दाण्डेकर** – शैलजा देशमुख |
| १९५ | **ज्ञानदेवे रचिला पाया** – व. दि. कुलकर्णी |



**संपर्क पत्ता**
**'छात्र प्रबोधन'**
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे – 411030
 ०२१२–४७७६९१, ४७८०९५

**वर्गणी**
**भारतात**
**वार्षिक :** रु.१२५/–**द्वैवार्षिक :** रू.२४०/–
**त्रैवार्षिक :** रु.३५०/–**आजीवन :** रु.२०००/–
**भारताबाहेर – वार्षिक –** ३० डॉलर


**जागे अभावी... क्षमस्व !**

डॉ. बाळ फोंडके, डॉ. ल. ना. गोडबोले प्रा. रेणु दांडेकर, श्री. सुहास महाजनी, प्रा. नीलिमा करमरकर, सौ. अनुराधा वैद्य यांचे व अनेक मुलामुलींचे लेख जागेअभावी या अंकात घेऊ शकलो नाही, त्याबद्दल क्षमस्व! ते लेख पुढील अंकांमध्ये प्रसिद्ध होतील.

## साद घाली रानवारा

हात घालून गळ्यात लावितसे लळा
साद घाली रानवारा, 'सहलीला चला!'

कोंडलेली हवा आणि बंदिस्त हे घर
अडविती चार भिंती, वरचे छप्पर
ओलांडून उंबरठा पाऊल उचला
साद घाली रानवारा, 'सहलीला चला!'

निळ्या आभाळाची ओढ वाऱ्याचा सोसाटा
पायतळी फुटतील नव्या नव्या वाटा
एक उंच सूर लावा खुलवून गळा
साद घाली रानवारा, 'सहलीला चला!'

हिरव्या या धरतीची उबदार माया
गर्द झाडी निळ्याकाळ्या लडिवाळ छाया
पहा तरी निसर्गाचा साजरा सोहळा
साद घाली रानवारा, 'सहलीला चला!'

झुळझुळ झरा कुठे, डोह कुठे खोल
शेवाळल्या गोट्यांवर सावरा रे तोल
पाया वेटाळून पाणी वाहे खळखळा
साद घाली रानवारा, 'सहलीला चला!'

माथा मोरपीस आणि गुंजमाळा गळा
संगे गोपाळांचा मेळा, गोह दहीकाला
सहलीला नित्य जाई श्रीकृष्ण सावळा
साद घाली रानवारा, 'सहलीला चला!'

**शान्ता ज. शेळके**, प्लॉट नं. १९, आदर्शनगर,
पुणे-सातारा रस्ता, पुणे ३७.

## नदी

ही चपलगामिनी गिरीकन्या मोहिनी
ही प्रसन्नमुद्रा सुहास्यवदन दामिनी

ही स्नेहमयी ही निरंजनातील वात
ही चैतन्याची लखलखणारी ज्योत

ही सरिता सुखदा मधुरामिलिंद कामा
ही भाग्यवती ही गुणवंती ही वामा

ही अशीच वाहो मधुगुंजत मंजिरी
हे असेच गाणे फुलो तिच्या अंतरी

**अंजली कुलकर्णी**, बी/२० झाला कॉम्प्लेक्स,
मार्केट यार्ड, पुणे ३७.

गंध भरल्या शेतात, कोण वाजविते पावा, हिरवाईच्या कुशीत, मन झाले जसे रावा।

# कथा तीन व्यथा एक

**डॉ. वि. गो. कुलकर्णी**

***'मी' या स्वार्थी पायरीपासून 'राष्ट्र' या उदात्त पायरीपर्यंत आमचा प्रवास होत नाही, ही आपल्या मनातली व्यथा व्यक्त करताना निस्सीम राष्ट्रप्रेमाच्या तीन आगळ्या कथा वि.गो. कुलकर्णी यांनी आपल्याला सांगितल्या आहेत. तरुण, उत्साही नव्या पिढीविषयी ते खूप आशा बाळगून आहेत. म्हणूनच आपल्या मनातील व्यथा त्यांनी तुमच्याजवळ प्रकट केली आहे, तीन कथांमधून...***

**ही** छत्रपती शिवाजीमहाराजांची एक प्रख्यात कथा. शिवाजीमहाराज हे आपणा सर्वांचे दैवत. म्हणूनच ही कथा विशेष श्रवणीय आणि लक्षणीय आहे. महाराजांना राज्याभिषेक झाला तेव्हाची ही कथा. राज्याभिषेकाचा सोहळा अगदी डामडौलाने झाला. देशातले अनेक राजे किंवा त्यांचे प्रतिनिधी, परदेशी वखारीतील प्रमुख अशी सर्व मंडळी जातीने हजर होती. या सर्वांनी महाराजांना देण्यासाठी मौल्यवान नजराणे आणले होते. इतर सर्वांप्रमाणेच टोपीकर इंग्रजही खूप मोठा नजराण्यात इतर मौल्यवान चिजांबरोबरच इंग्लंडमधील टांकसाळीत पाडलेली सुंदर, सुबक, हातात घेऊन न्याहाळली आणि खूप




कौतुक केले. अतिशय सुखावलेले टोपीकर छत्रपतींना म्हणाले, ''महाराज! आपल्या कौतुकाने आमच्या अंगावर मूठभर मांस चढले आहे. महाराजांची इच्छा असेल तर आम्ही आपल्यालाही अशीच सुंदर सुबक नाणी पाडून देऊ !''

छत्रपती शिवाजीमहाराज हे एक श्रेष्ठ मुत्सद्दी होते. त्यांच्या चेहऱ्यावर नेहमीच मंदस्मित झळकत असे. त्यांच्या मनात काय आहे याचा मात्र कुणालाही थांगपत्ता लागत नसे. अगदी जवळच्या माणसांनासुद्धा! आताही महाराजांनी एका हातात सुबक इंग्रजी नाणी आणि दुसऱ्या हातात नुकतीच पाडलेली स्वत:ची नाणी घेतली. पळभर दोन्ही नाण्यांची तुलना केली. शांतपणे त्यांनी टोपीकरांना विचारले, ''आपण किती वर्षांपासून नाणी पाडत आहात?'' खूष झालेल्या इंग्रजांना वाटले, 'महाराज अनुभवाची चौकशी करीत आहेत.' काहीशा गर्वाने छाती पुढे काढून त्यांनी आपल्या प्रदीर्घ अनुभवाची कहाणी पेश केली. इतर कोणते देश आपल्याकडून नाणी पाडून घेतात त्याची यादीही सादर केली. छत्रपतींनी सारे काही ऐकून घेऊन शांतपणे उत्तर दिले, ''माझे कारागीर आज नवखे आहेत; त्यांना इतका अनुभव मिळेल तेव्हा ते तुमच्यापेक्षाही अधिक सुबक नाणी पाडतील!''

***

महाराजांचीच दुसरी एक कथा. त्यांनी सुरत शहर लुटल्याची कथा सुप्रसिद्ध आहे. स्वराज्याच्या उभारणीसाठी पैसा हवा होता. सुरतेत दौलत भरपूर होती. त्या काळच्या रिवाजाप्रमाणे छापा घालून शिवाजीमहाराजांनी सुरत शहर लुटले. सुरत हे एक मोठे बंदर होते. कितीतरी माल बंदरात यायचा आणि निर्यात व्हायचा, त्यामुळे सुरत शहराला मोठे व्यापारी वैभव होते. असे भरभराटीला आलेले शहर लुटल्यास खूप पैका मिळेल, अशी महाराजांची रास्त अटकळ होती.

महाराजांचे ठीक आहे. पण औरंगजेब बादशहाचे काय? सुरत हे मुघल साम्राज्यातले प्रमुख आणि अत्यंत श्रीमंत बंदर. त्याच्या

**दिगंत कीर्ती इतिहासाच्या, पानोपानी याची गाजे, एक हृदय अन् एकच स्पंदन, पदी याचिया नुपूर वाजे।**

संरक्षणाची काहीच व्यवस्था औरंगजेबाने कशी केली नाही? कर्तव्यदक्ष, डोळ्यांत तेल घालून दक्षतेने राज्यकारभार करणारा बादशहा अशी त्याची कीर्ती होती. अशा औरंगजेबाने सुरत बंदराच्या रक्षणाची काहीच तरतूद कशी केली नव्हती? केली होती. इनायतखान नावाच्या सरदाराला भरपूर सैन्य ठेवले होते; इतरांचा पगार तो स्वत:च हडप करीत असे. शिवरायांचे सुप्रसिद्ध गुप्तहेर बहिर्जी नाईक यांनी ही सर्व बित्तंबातमी महाराजांना पुरवलेली असल्याने शिवाजीला सुरत लुटता आले.

प्रत्यक्ष लुटीच्या वेळी इनायतखान आपले मूठभर सैन्य घेऊन पळून गेला आणि किल्ल्यात लपून बसला. महाराजांनी त्याच्याकडे लक्षही न देता शांतपणे सुरत लुटले. इंग्रजांनी मात्र मोठ्या धीराने आणि शौर्याने आपल्या वखारीचे संरक्षण केले. औरंगजेबाने इनायतखानाची प्रचंड निर्भत्सना केली आणि अतिशय खूष होऊन इंग्रज सरदाराला खूप मौल्यवान नजराणे देऊ केले. औरंगजेब बादशहा इतका प्रसन्न होण्याचे प्रसंग विरळाच ! त्या दिवशी तो खूषच नव्हे तर उदाहरी झाला होता, परंतु वखारीच्या प्रमुखाने ते नजराणे मोठ्या नम्रपणे नाकारले. ''जहापन्हा! आपण खरेच खूष झाला असाल तर आमच्या मालावरची जकात माफ करावी,'' अशी अर्जी पेश करून इंग्रजी मालावरची जकात माफ करून घेतली!

***

तिसरी कथा विलायतेतली, म्हणजे इंग्लंडमधली. वाइझमान या शास्त्रज्ञाची. हा मूळचा रशियन, पण ज्यू विद्यार्थ्यांना विद्यापीठात प्रवेश देण्यावर खूपच निर्बंध असल्याने, प्रथम स्वित्झर्लंडमध्ये आणि नंतर इंग्लंडमध्ये असा प्रवास करून वाइझमान अखेर इंग्लंडमध्ये स्थिरावले. अल्पावधीतच त्यांच्या बुद्धिमत्तेची आणि योजकतेची कीर्ती सर्वत्र पसरली. तो काळ पहिल्या महायुद्धाचा (१९१४-१९१८). त्या काळात लॉइड जॉर्ज यांच्याकडे, लष्कराला लागणारा दारूगोळा





बनवण्याचे खाते होते. हा दारूगोळा विशेषत: ड्रेडनॉट या प्रकारच्या जहाजांवरील तोफांना लागणारा दारूगोळा बनवण्यासाठी ॲसिटोन या द्रव्याची फार गरज भासे.

त्या काळात लाकडाचे ऊर्ध्वपातन करून ॲसिटोन तयार करण्यात येई. पण या पद्धतीने तयार केलेले ॲसिटोन गरजेच्या मानाने अगदीच अपुरे होते. अशा वेळी मँचेस्टर गार्डियन या वृत्तपत्राचे संपादक श्री. स्कॉट यांनी लॉइड जॉर्ज यांना एक अभिनव सूचना केली. ''मंत्रिमहोदय! आपण मँचेस्टर विद्यापीठातील प्रख्यात रसायनशास्त्रज्ञ प्रा. वाइझमान यांना विनंती करून पाहा. तेच या पेचप्रसंगावर तोडगा काढू शकतील. पण एक सावधगिरीचा इशारा! वाइझमान मूळचे इंग्रज नव्हेत. ते रशियन आहेत.'' कथा अशी की, लॉइड जॉर्ज यांच्या विनंतीवरून वाइझमान यांनी या प्रश्नात लक्ष घातले.

प्रा. वाइझमान यांना लुई पाश्चरचा एक शोध ठाऊक होता. यीस्ट आणि साखर यांचे मिश्रण आंबते (किण्वन क्रिया) आणि अल्कोहोल तयार होते. तशाच प्रकारे मका आणि कडधान्यातील स्टार्चवर क्रिया करून ॲसिटोन तयार करणारा सूक्ष्म जीव असेल का? काही महिन्यांच्या अथक परिश्रमानंतर वाइझमान यांना तसा सूक्ष्म जंतू सापडला. आश्चर्य म्हणजे या प्रक्रियेत केवळ ॲसिटोनच नव्हे तर ब्यूटाइल अल्कोहोल या दुसऱ्या मौल्यवान रसायनाची निर्मिती होते, असे आढळून आले. एका दगडात दोन पक्षी ठार! या सूक्ष्मजंतूचे बारसे करून त्याचे नाव ठेवण्यात आले 'क्लॉस्ट्रिडियम ॲसिटोब्युटिलिकम' (चित्र पाहा.) या नवीन जंतूंची मोठ्या प्रमाणात पैदास करण्यात आली आणि त्यांच्या मदतीने स्टार्चवर प्रक्रिया करून ॲसिटोन आणि ब्यूटाइल अल्कोहोल यांची मोठ्या प्रमाणावर निर्मिती करण्यात आली. इंग्लंडचा मोठा प्रश्न सुटला.

प्रा. वाइझमान यांच्या अपूर्व शोधाबद्दल त्यांना अनेक दुर्लभ सन्मान देऊ करण्यात आले, परंतु प्रा.



वाइझमान यांनी ते नम्रतापूर्वक नाकारले. उलट लॉईड जॉर्ज यांना अशी गळ घातली की, ''हे पाहा मी ज्यू आहे. माझे धर्मबांधव पृथ्वीच्या पाठीवर ठिकठिकाणी विखुरलेले आहेत. त्यांच्यासाठी, त्यांचे एक राष्ट्र निर्माण करता येईल काय? निदान तसा ठराव तरी करा!''

प्रा. वाइझमान यांच्या कळकळीच्या आग्रहामुळे ६ नोव्हेंबर १९१७ रोजी सुप्रसिद्ध बाल्फोअर जाहीरनामा काढण्यात आला. त्यानंतर तीस वर्षांनी इस्त्रायल या ज्यू राष्ट्राची निर्मिती झाली. शास्त्रीय जगतात आजही 'क्लॉस्ट्रिडियम ॲसिटोब्युटिलिकम' या सूक्ष्मजंतूला, काहीशा विनोदाने 'इस्त्राइलचा जनक' असे संबोधण्यात येते. पुढे वाइझमान इस्त्राइलचे पहिले राष्ट्राध्यक्ष झाले. इस्त्राइलमध्ये रिहोवोथ इथे त्यांच्या नावे एक संशोधनशाळा उभारण्यात आली. नालंदा आणि तक्षशिला यांची आठवर व्हावी अशी ही संस्था. जगाच्या कानाकोपऱ्यातून हुषार आणि प्रतिभासंपन्न शास्त्रज्ञ इथे संशोधन करायला येतात.

*अशा या तीन कथा. दोन इथल्या, स्वदेशातल्या; एक विलायतेतली. पण या तिन्ही कथांचा आशय एकच आहे. अपार, निस्सीम राष्ट्रभक्ती. आता स्वातंत्र्य आले. इंग्रज गेले. आता त्यांच्याशी लढण्याचा प्रश्न नाही, पण शिवरायांना आपल्या कारागीरांबद्दल अभिमान वायत होता, तसा मला वाटतो काय? स्वदेशीव्रताचा हा पाया आहे. स्वदेी म्हणजे पूर्णपणे माझ्या देशात तयार झालेला माल एवढा मर्यादित अर्थ आता उरला नाही. ज्या देशबांधवांनी माल तयार केला. त्यांच्याबद्दल प्रेम आणि अभिमान वाटायला हवा. हातमागावर तयार झालेल्या वस्तू श्रीमंत पाश्चिमात्य देशात हातोहात खपतात, पण आम्हाला त्या विणकरांची माहितीही नाही; अभिमान दूरच. गेल्या पन्नास वर्षांत आपली लोकसंख्या तिपटीने वाढली, पण आमच्या किसानांनी आणि त्यांच्यामागे खंबीरपणे उभे राहणाऱ्या शास्त्रज्ञांनी प्रयत्नांची शिकस्त केली. अन्नधान्याची विक्रमी पैदास केली, दुधाचा महापूर आणला; म्हणून आपण ताठ मानेने जगतो आहोत. शिवरायांचे स्मरण म्हणजे माझ्या देशात तयार झालेला माल आणि त्याचे उत्पादन करणारे देशबांधव या दोघांबद्दल अभिमान वाटणे. हेच खरे स्वदेशीचे व्रत!*

*इंग्रजी वखारीवरचा सरदार तसेच वाइझमान यांना वैयक्तिक सन्मानांचा, नजराण्यांचा मोह पडला नाही. मागायचे ते त्यांनी राष्ट्रासाठी, स्वदेशासाठी मागितले. वाइझमान यांनी तर अजून अस्तित्वात नसलेल्या स्वदेशासाठी मागितले. आपली पुण्याई आपल्या देशाच्या मागे उभी केली. अशा राष्ट्रभक्तीचे शिक्षण कुठे मिळते? उत्तर एकच. घरी आणि शाळेत. हे माझे एकट्याचे नाही, हे सर्व कुटुंबाचे आहे. माझी भावंडे, आई–वडील*

**एकवाणी, एक मनाने, आई तुझा जयजयकार करू, सर्व मिळूनी याच मंदिरी, स्वदेशीचा मंत्र म्हणू.**

*या सर्वांनी हे वाटून घ्यायचे आहे, हा संस्कार घरी व्हायला हवा, गावातले नगरवाचनालय, दवाखाना अशा सुविधा सर्व गावासाठी आहेत, माझ्या एकट्यासाठी नाहीत हे उमगले पाहिजे. माझा संपूर्ण वर्ग स्वच्छ ठेवायला हवा, शाळेचे पटांगण सर्व शाळेचे आहे वगैरे संस्कार वेळीच व्हावे लागतात.*

*खरी व्यथा ही, मी माझे कुटुंब, माझा परिसर, माझा गाव, माझा जिल्हा, माझा देश या पायऱ्या; तसेच मी माझा वर्ग, माझी शाळा, माझे विद्यापीठ या पायऱ्या ओलांडायला आम्ही शिकत नाही. 'मी' या स्वार्थी पायरीपासून 'राष्ट्र' या उदात्त पायरीपर्यंत आमचा प्रवास होत नाही. आशा आहे ती तुमच्यासारख्या तारुण्याने मुसमुसलेल्या नव्या पिढीची!*


**डॉ. वि. गो. कुलकर्णी**
२, शिरीष, मकरंद सोसा., २६ सेनापती बापट मार्ग, दादर, मुंबई – ४०००२८

---

(करून तर पहा)

# चमचमता चेंडू






**ग**णेशोत्सव, दीपावली किंवा वाढदिवस यांसारख्या विशेष सणसमारंभांना आपण सजावटीसाठी रंगीबेरंगी चमचमत्या झिरमिळ्या व चेंडू विकत आणतो. हे चेंडू जर आपण स्वत: बनवू शकलो तर? खरंच! हे तर अगदी सोपे आहे. ह्या दीपावलीसाठी आपण चेंडू तयार करू या.

**साहित्य –** २/३ रंगांचे मेटल पेपर्स, भूमितीची साधने, कात्री, सुई, नायलॉन दोरा, फेव्हिकॉल, (डिंक नको) २ मणी.

**कृती –** प्रथम मेटल पेपरवर ६ सेंमी. व्यासाचे एक वर्तुळ काढा. त्याच्या आत केंद्रबिंदूपाशी १ सेंमी. व्यासाचे एक वर्तुळ काढा. आकृती १ प्रमाणे मोठ्या वर्तुळाचे ३ समान भाग पाडा. (१२०°), अ, ब, क. आता अ ते अ१, ब ते ब१, क ते क१ अशा सरळ रेषांवर कापावे. अ१, ब१, क१ यांच्या दोन्ही बाजूला छोट्या वर्तुळाच्या परीघावर ड ड१, ई ई१, व म म१ हे भागही कापावेत व उरलेला भाग जोडलेला राहील असे पाहावे. अव ब, ब व क, क व अ हे बिंदू अशा तऱ्हेन बाणांच्या दिशेने जुळवावेत की आकृती २ मध्ये दाखविल्याप्रमाणे कोन तयार होईल. नंतर फेव्हिकॉलने चिकटवावेत.

अशा तऱ्हेने एका वर्तुळाच्या, ३ कोनांचा म्हणजेच पुंगळ्यांचा १ संच तयार होईल. मधल्या वर्तुळापासून तीन कोन सुटे होणार नाहीत याची काळजी घ्यावी. अशा १० वर्तुळांचे १० संच तयार करावेत. आता सुईत नायलॉन दोरा घेऊन प्रथम १ संच असे दहाही संच रंगसंगती साधून केंद्रबिंदूतून माळेत मणी ओवतात त्याप्रमाणे ओवणे. मात्र ओवताना एक आड एक पुंगळ्या एकावर एक येतील अशी रचना करणे.

सर्व संच ओवून झाल्यावर सर्वात शेवटी पुन्हा एक मणी घाला. दोऱ्याची दोन्ही टोके जुळवून घट्ट गाठ मारा. त्यामुळे सर्व पुंगळ्यांचा मिळून एक सुंदर चेंडू तयार होईल. असे टांगते चमचमते चेंडू समारंभाच्या वेळी घराची शोभा नक्कीच वाढवतील.

**घरदार प्रकाशाने भरी काठोकाठ, दारी आल्यांची सोपी करू पायवाट.**

# अजगराच्या जबर विळख्यात...!

**विजय वि. देवधर**



***तासातासानं ती रात्र चढू लागली. पण बगळे शांत होते. नऊ वाजले... दहा वाजले... तरीही काही घडले नाही... आणि रात्री साडेदहाच्या सुमारास बगळ्यांचा कलकलाट एकदम सुरू झाला. शॉटगनच्या नळीवर बसवलेल्या विजेरीच्या झोतात सगळे पक्षी भेदरल्यासारखे उड्या मारत होते... दुसऱ्या दिवशीही असंच घडलं आणि जिमीच्या लाडक्या 'रॉली' कुत्र्याचा मृतदेह सापडला. तिसऱ्या दिवशी याहूनही भयंकर घडले. वाचूया विजय देवधर यांच्या 'अजगराच्या जबर विळख्यात' या कथेत–***

**त्या**वेळी दक्षिण आफ्रिकेमध्ये दर्बान येथे आमच्या कंपनीचं प्रमुख कार्यालय होतं. तिथे नोकरीला असताना एकदा काही दिवस रजा घेऊन मी माझा एक मित्र जिमी मॅकडोनाल्ड याच्या शेतावर जायचं ठरवलं. हा माझा मित्र मला बऱ्याच दिवसांपासून त्याच्याकडे बोलावत होता आणि मलाही थोडा बदल आणि विश्रांती हवी होती. जिमी मॅकडोनाल्डशी माझी फार जुनी मैत्री होती. दर्बानपासून सुमारे तीस मैल अंतरावर, गोल्ड कोस्टमध्ये, समुद्रकिनाऱ्यानजीक त्याची ती शेतवाडी होती.

ठरवलेल्या बेताप्रमाणे सुट्टी घेऊन मी गोल्ड कोस्टला पोहोचलो. जिमीच्या वाडीवर माझ्या जीपने प्रवेश केला, तेव्हा त्याच्या सुबक अशा बैठ्या कॉटेजवजा घरासमोरील बागेमध्ये सुमारे दहा–बारा वर्षांचा एक झुलु आफ्रिकन पोरगा काम करत होता. मी जीपमधून खाली उतरलो तेव्हा तो पोरगा कॉटेजमध्ये धावला आणि आपल्या मालकाला घेऊन बाहेर आला. माझ्याकडे बोट दाखवत तो जिमीला म्हणाला, ''मास्टर, आपल्याकडे कोणीतरी पाव्हणा आला आहे.'' ''अरे! हा माझा खास मित्र मॅक्स हंट आहे.'' सस्मित मुद्रेनं पुढे होऊन माझ्याशी हस्तांदोलन करत जिमी त्याला म्हणाला. मग माझ्या पाठीवर थाप मारून तो म्हणाला, ''काय मॅक्स! तुला तुझ्या कामातून फुरसत मिळालेली दिसतेय आणि दोस्ताची आठवण आलेली दिसतेय, हो ना?''

''होय दोस्त!'' मी जिमीला म्हणालो, ''ऑफिसमध्ये भरपूर काम करून माझ्या शरीराला आणि मनालाही थकवा आला होता, तेव्हा सुट्टी घेऊन तुझ्या वाडीवर काही दिवस मजेत घालवावे या हेतूनं मी तुझ्याकडे आलोय.''


''मग तर तू अगदी योग्य ठिकाणी आला आहेस.'' जिमी मला म्हणाला. ''हा बघ! माझ्या वाडीसमोरच सुंदर समुद्रकिनारा आहे. समुद्रावर जाऊन तुला मनसोक्त मासे पकडता येतील. वाडीच्या मागच्या बाजूला दाट नि हिरवंगार जंगल आहे. तिथं हरणं, ससे, रानकोंबडे असे विविध पशु–पक्षी विपुल प्रमाणात आहेत. त्यामुळे जंगलात तुला शिकारीची हौस भागवता येईल. शिवाय आपल्या दिमतीला माझा हा नोकर मॅक्कन झिमायमा आहे. त्याला मी मॅक म्हणतो.''

आम्ही दोघं बोलत बोलत जिमीच्या कॉटेजमध्ये गेलो. त्याच्या नोकरानं–मॅकनं–झकासपैकी कॉफी बनवली. तिचा आस्वाद घेत आमच्या गप्पा रंगल्या.

जिमीने आपल्या शेतवाडीवर मक्याचे पीक घेतले होते. त्याशिवाय त्यानं तिथं काही डुकरं, बदकं, कोंबड्या आणि एका विशिष्ट जातीचे बगळेही पाळलेले होते. सुटी घालवण्याच्या व विश्रांतीच्या दृष्टीनं ते ठिकाण खरोखरच मोठं रम्य आणि आल्हाददायक होतं.

माझ्या तिथल्या वास्तव्यामधला पहिला आठवडा मी वाडीच्या पिछाडीला असलेल्या जंगलामध्ये मुक्तपणे भटकण्यात आणि नव्यानंच घेतलेल्या माझ्या ३०३ बंदुकीने नेमबाजी करण्याचा सराव करण्यात घालवला. जिमी त्यावेळी आपल्या डुकरांकरिता नवीन कुंपण घालून एक मोठं खुराडं तयार करण्याच्या कामात

**झाडे झाली हिरवीशी, शीळ घुमते रानात, ओळ जांभळ्या मेघांची, वाहे नदीच्या पाण्यात.**



गुंतलेला होता. त्याचं ते काम संपल्यानंतर रानजाळ्यांमध्ये रानडुकरांची शिकार करण्याकरिता जायचा बेत आम्ही आखला होता.

एक दिवस संध्याकाळी आम्ही दोघं जिमीच्या घरासमोरच्या बागेमध्ये खुर्च्या टाकून गप्पा मारत बसलो होतो. तिन्हीसांजा टळून अंधार पडण्यास सुरुवात झाली होती. चोहीकडे नीरव शांतता पसरली होती. आमच्या गप्पा चालू होत्या, त्याच वेळी अकस्मात उडालेल्या बगळ्यांच्या कर्कश्श किलबिलाटानं त्या शांततेचा भंग झाला. जिमीच्या शेताच्या पार दुसऱ्या टोकाकडून बगळ्यांचा तो किलबिलाट ऐकू येत होता. तो किलबिलाट ऐकताच जिमी एकदम ताड्कन उठला. भर्रकन घरात जाऊन तो एक प्रखर टॉर्च घेऊन आला आणि बगळ्यांचा कोलाहल चालू होता त्या दिशेनं धावत सुटला. त्याच्यापाठी मी आणि त्याचा झुलु नोकर मॅक् – आम्ही दोघं पण धावत निघालो. शंभर एकरांच्या त्या शेतवाडीतून धावत धावत आम्ही तिघं तिच्या पार दुसऱ्या टोकाशी पोहोचलो. जिमीनं आपल्या हातातल्या टॉर्चचा प्रखर प्रकाशझोत समोर फेकला. त्या उजेडात मला समोर एका हाताला पाणी अडवण्यासाठी बांधलेला एक छोटासा बंधारा दिसला. त्या बंधाऱ्यानं अडवलेल्या पाण्याच्या पृष्ठभागावर करड्या रंगाचे बरेचसे बगळे मोंयानं किलबिलाट करत खालीवर उडत असलेले आम्हाला दिसले. ते कशानं तरी अस्वस्थ झाल्यासारखे दिसत होते व त्यांच्या ओरडण्यामुळे तिथे एकच गोंगाट माजला होता. जराशानं त्यांचा किलबिलाट थांबला आणि बंधाऱ्याअलीकडच्या उथळ पाण्यामध्ये उतरून ते इकडून तिकडे फिरू लागले. जिमीनं आपल्या हातातल्या टॉर्चचा आपल्या हातातल्या टॉर्चचा प्रकाशझोत चौफेर फिरवला. समोर असलेल्या बंधाऱ्याच्या पलिकडे ताडवृक्षाचं एक दाट बन होतं. तिकडेही त्यानं उजेड टाकून पाहिलं. पण आम्हाला कुठेही काही आक्षेपार्ह गोष्ट दिसली नाही. ते बगळे कशामुळे अस्वस्थ झाले होते? काय होतं? कुणास ठाऊक! आम्हाला त्यावेळी तरी काही ते कळू शकलं नाही.

''कदाचित माझ्या खोड्याळ कुत्र्यांनी त्यांना बहुतेक घाबरवलेलं दिसतंय.'' जिमी म्हणाला. त्या ठिकाणावरून आम्ही परत फिरलो. जिमीजवळ रिज्बॅक जातीच्या कुत्र्यांची एक देखणी जोडी होती. ही कुत्री त्यानं मुद्दाम पाळली होती. कारण ती त्याच्या शेतवाडीची उत्तम राखण करत असत.

आम्ही तिघंही जिमीच्या कॉटेजवर परतलो. त्या रात्री बगळ्यांचं ओरडणं, त्यांचा किलबिलाट आम्हाला नंतर पुन्हा काही ऐकू आला नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी जिमीकडे काम करणारा तो झुलु छोकरा–मॅक्कन झिमायमा– जो वाडीवर देखरेख करण्याकरिता गेला होता– धावतच कॉटेजवर आला. आम्हाला दोघांना त्यानं त्या पाणबंधाऱ्याजवळ नेलं आणि तिथे असलेल्या बगळ्यांकडे बोट दाखवत तो जिमीला म्हणाला, ''मास्टर, आपल्या बगळ्यांमध्ये करड्या रंगाच्या मोठ्या बगळ्यांची जी जोडी होती त्यातला एक बगळा नाहीसा झाला आहे.''

जिमिला थोडं आश्चर्य वाटलं. पण तो म्हणाला, ''अरे! इथंच कुठेतरी आसपास भरकटला असेल. संध्याकाळ झाली की येईल आपसूक परत.''

त्या दिवशी संध्याकाळीही आदल्या दिवशीच्या प्रकाराची पुनरावृत्ती झाली. बगळ्यांचा अस्वस्थपणे चालू झालेला कलकलाट आम्हाला ऐकू आला. आमच्या विजेऱ्या घेऊन आम्ही त्या बंधाऱ्याकडे धावलो. पण चौफेर प्रकाशझोत फेकूनही आम्हाला कुठेच काहीही दिसलं नाही. थोडा वेळ तिथे थांबून आम्ही परतलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी जिमीने पाळलेल्या बगळ्यांपैकी आणखी एक बगळा नाहीसा झाला असल्याचं त्याच्या झुलु छोकऱ्यानं आमच्या निदर्शनास आणून दिलं. तो प्रकार पाहून मात्र जिमी वैतागला. ''या बगळ्यांना चांगली किंमत येते म्हणून

**दिशा दिशांतुन पसरे ओली शांती, वृक्षलता या तृप्त मनाने डोलति वाऱ्यावरती**

मी ते मुद्दाम पाळलेले आहेत. चांगल्या पोसलेल्या बगळ्याचे बाजारात ३ पौंड्स मिळतात.'' जिमीनं मला सांगितलं, ''हे बहुधा एखाद्या रानमांजराचं काम दिसतं आहे. बंधाऱ्यापलीकडल्या जंगलातून येऊन तेच बहुतेक बगळ्यांची शिकार करत असावं.'' त्यानं तर्क केला.

त्या दिवशी रात्री त्या जागी पहारा करून नेमका काय प्रकार आहे त्याचा शोध घ्यायचं आम्ही ठरवलं. त्याप्रमाणे संध्याकाळचं जेवण लवकर उरकून आपापल्या बंदुका घेऊन आम्ही बंधाऱ्याकडे गेलो. जिमीनं आपल्या दोन्ही कुत्र्यांना – त्यांची नावं रॉली आणि पीटर अशी होती– आपल्या घरातच बांधून ठेवलं होतं.

''जंगलातल्या रानमांजराशी त्यांची झटापट होऊ नये म्हणून मुद्दामच मी त्यांना आणलं नाही. कारण रानमांजराच्या पंजाच्या नुसत्या ओरखड्यानेसुद्धा रक्त दूषित होऊन विषबाधा होऊ शकते.'' त्यानं मला सांगितलं.

त्या बगळ्यांपासून वीस यार्डांवर सोयीस्कर अशी जागा पाहून आम्ही दोघं दबा धरून बसलो. त्या जागेवरून बंधारा आणि त्याच्या लगतचा सगळा परिसर आमच्या नजरेच्या टप्प्यामध्ये येत होता. थोड्या वेळानं तर चांगलाच अंधार पडला. तासातासानं ती रात्र चढू लागली. पण बगळे शांत होते. आठ वाजून गेले... नऊ वाजले... दहा वाजले... तरी काहीही घडलं नाही. एकाच जागी बसून बसून आम्हाला रग लागली. आणखी एखादा तासभर तिथे घालवून परतायचं, असं आम्ही ठरवलं. वेळ घालवण्याकरिता आम्ही




सिगार शिलगावले व ते ओढत मुकाट्यानं वाट पाहू लागलो. आणि – आणि रात्री १० ।। च्या सुमारास काही अंतरावर एकदम सुरू झाला! त्याबरोबर मी माझ्या शॉटगनच्या नळीवर बसवलेली विजेरी पेटवली व तिचा झोत समोर फिरवू लागलो. त्या उजेडात सगळे पक्षी भेदरल्यासारखे, खालीवर खालीवर उड्या मारत असलेले मला दिसले. त्यांच्यात कशानं तरी खळबळ माजली होती व ते मोठ्यानं गोंगाट करत होते. शॉटगनच्या नळीवर बसवलेल्या विजेरीचा झोत मी सर्वत्र फिरवला. बगळ्यांवर हल्ला करणारा तो हल्लेखोर प्राणी दिसताक्षणीच त्याला गोळी घालायची, असं मी ठरवलं होतं. माझ्या बाजूला बसलेला जिमीपण तेच करत होता. विजेऱ्यांच्या प्रखर प्रकाशझोतांमध्ये आम्ही तो बंधारा आणि त्याच्यालगतच्या बगळ्यांच्या वास्तव्याचा सगळा पाणथळ भाग बारकाईनं चाळून काढला, पण आम्हाला कुठेही काही दिसलं नाही. थोड्या वेळानंतर ते सगळे पक्षी शांत झाले आणि पाणथळ जागेवर पुन्हा पूर्ववत बसले. त्यांनी आकस्मिकपणे केलेल्या कलकलाटामागचं कारण काही आम्हाला समजू शकलं नाही.

''आपल्या विजेऱ्यांच्या प्रखर प्रकाशामुळे पलिकडल्या बनातून आलेल्या त्या रानमांजरानं बहुधा पलायन केलेलं दिसतंय.'' जिमी मला म्हणाला, ''चल! परत जाऊ या. आता काही ते पुन्हा येणार नाही.'' आम्ही कॉटेजवर परतलो. बिछान्यांवर आडवं होताच आम्हाला झोप लागली.

दुसऱ्या दिवशी सकाळी जिमीचा नोकर– तो झुलु पोरगा– मॅक्कन झिमायमा बंधाऱ्यापाशी जाऊन बगळे मोजून आला. सुदैवानं त्या दिवशी एकही पक्षी कमी झालेला त्याला आढळला नाही. घरी येऊन ती गोष्ट त्यानं आम्हाला सांगितली. त्यामुळे जिमी थोडा स्वस्थचित्त झाला, पण त्या दिवशी रात्री एक भलताच भयंकर नि विलक्षण प्रकार घडला!

त्या रात्री दहाच्या सुमारास आम्ही बिछान्यामध्ये नुकतेच आडवे झालो होतो, तेव्हा शिकार करतानाच्या वेळी रिज्बॅक कुत्री ज्या एका विशिष्ट आवाजात भुंकतात तसा जिमीच्या एका कुत्र्याचा आवाज रात्रीच्या नीरव शांततेत आम्हाला ऐकू आला. जराशानं ते कुत्रं विव्हळल्यासारखं ओरडू लागलं. काही मिनिटांनी त्याचं

ते भेसूर विव्हळणं थांबलं, पण त्या पाठोपाठ एकदम बगळ्यांच्या कर्कश्श किलबिलाटाचा कोलाहल आम्हाला ऐकू येऊ लागला. जिमी एकदम ताडकन् उठला आणि त्यानं दिवा लावला. त्याची मुद्रा चिंताक्रांत दिसत होती. काही मिनिटं बगळ्यांचा तो कलकलाट चालू राहिला आणि मग थांबला. पुन्हा चोहीकडे नीरव शांतता पसरली. ''काहीतरी विचित्र प्रकार घडतो आहे. आता मात्र मला काळजी वाटू लागली आहे.'' जिमी मला म्हणाला.

घराबाहेर जाऊन त्यानं आपल्या कुत्र्यांना साद घातली, ''पीटरऽऽ!... रॉलीऽऽ... चल! इकडे या. कम बॅक!'' त्याबरोबर त्या कुत्र्यांच्या जोडीमधलं एक कुत्रं धावत आपल्या मालकाकडे आलं. तो पीटर होता. वाडीलगत असलेल्या समुद्रकिनाऱ्यावर तो बहुधा हुंदडत होता. कारण त्याच्या पंजांना वाळू लागलेली दिसत होती.

''अरे तू! एकटाच आलास! तुझा जोडीदार रॉली कुठे आहे? चल जा! त्याला शोधून आण.'' त्याच्या डोक्यावर थोपटत जिमी त्याला म्हणाला. जिमीचं बोलणं त्या हुषार कुत्र्याला बहुधा समजलं असावं! कारण त्यानं मान वळवून इकडे तिकडे पाहिलं. आपले पंजे उचलत जमिनीवर इकडे तिकडे हुंगल्यासारखं केलं आणि मग एकदम वळून तो घराच्या कुंपणाबाहेर पडला आणि त्या पाणबंधाऱ्याच्या दिशेला धावत सुटला.

''चल रे, मॅक्स! तो कुठे जातोय हे पाहू.'' जिमी मला म्हणाला. आम्ही दोघांनी विजेऱ्या घेतल्या. पायात बूट घातले आणि पीटर गेला होता त्या दिशेनं झपझप चालू लागलो. शेत ओलांडून आम्ही त्याच्या टोकाशी पोहोचतो न पोहोचतो तोच पाणबंधाऱ्याच्या दिशेनं पीटरच्या रडण्याच्या एक विशिष्ट स्वरातला आवाज आम्हाला ऐकू आला. तो भेसूर आवाज ऐकताच विजेऱ्यांचे झोत फेकत आम्ही दोघंही एकदम धावत सुटलो. आम्ही त्या पाणबंधाऱ्याच्या निकट पोहोचलो आणि विजेऱ्यांच्या प्रकाशात जे दृश्य दिसलं ते पाहून आम्हाला इतका जबर धक्का बसला की खिळल्यासारखं आम्ही दोघंही जागच्या जागी स्तंभित होऊन उभे राहिलो.

समोर पीटर आपल्या जोडीदाराच्या मृतदेहापाशी बसून भेसूर आवाजात रडत होता. रॉलीच्या देहाचा पार ओळखू न येण्याइतका चेंदामेंदा झालेला होता. पुढे होऊन विजेरीच्या प्रकाशात जिमीनं आपल्या दुर्दैवी कुत्र्याच्या देहाच्या अवशेषांचं निरीक्षण केलं. तेव्हा त्याचा देह चिकट नि निसरड्या चिखलानं माखलेला आहे, असं त्याला आढळून आलं आणि काय घडलं असावं हे आम्हा दोघांच्याही एकदम लक्षात आलं. आपल्या आवडत्या कुत्र्याचा असा भीषण अंत झालेला पाहून त्याला मनस्वी दुःख झालं. व्यथित स्वरात तो म्हणाला, ''हे एखाद्या अजगराचंच काम आहे. बंधाऱ्यापलीकडे असलेल्या माडांच्या बनातून तो आला असावा. रॉलीची अशी दुर्दशा करून त्यानं आपला मोर्चा बगळ्यांकडे वळवला असावा आणि एखादा बगळा फस्त करून तो पसार झाला असावा. आता मी त्या अजगराला सोडणार नाही. उद्या सकाळी पलीकडल्या जंगलात त्याचा शोध घेऊन मी त्याला ठार मारणार!'' जिमीच्या स्वरातून सूडाचा आवेश प्रकट होत होता. ''माझाही तोच तर्क आहे. मात्र हा अजगर आकाराने भलताच मोठा असला पाहिजे! आपण उद्या सकाळी त्याचा समाचार घेऊ'' मी त्याला म्हणालो.

पीटरला बरोबर घेऊन आम्ही दोघंही कॉटेजवर परतलो. दररोज रात्री मोकळ्या सोडलेल्या आपल्या कुत्र्यांना जिमी हाका मारून बोलावत असे आणि त्यांना घरासमोरच्या कुंपणाच्या आत साखळीनं बांधून ठेवत असे. तोवर ती कुत्री– त्यांचं संध्याकाळचं खाणंपिणं उरकलेले असल्यामुळे– शेतवाडीवर किंवा समुद्रकिनाऱ्यावर हुंदडत असत. त्या दिवशी रॉली कसा कोण जाणे पण शेताच्या पलीकडे असलेल्या त्या पाणबंधाऱ्याकडे गेला होता आणि त्याचा हकनाक बळी गेला होता...!

दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळीच आम्ही त्या अजगराची शिकार करण्याकरिता बाहेर पडलो. जिमीनं १२ बोअरची आपली डबल शॉटगन ताकदवान काडतुसं भरून जय्यत तयारीनं घेतली. मी पण एक डबल शॉटगन ताकदवान काडतुसं भरून जय्यत तयारीनं घेतली. मी पण एक डबल शॉटगन घेतली. झुलू छोकरा मॅक्कन झिमायमा यानं एक लांब काठी घेतली. जिमीच्या शेतालगत असलेल्या जंगलाची त्याला चांगली माहिती होती. तो आमच्याबरोबर वाटाड्या म्हणून आला. आम्ही त्या

**वरती लाल निळी तेजाळ सृष्टि, इथे पसरली, हिरवी पिवळी खुलास सृष्टी.**

पाणबंधाऱ्याच्या परिसरात पोहोचलो. जिमीच्या कुत्र्याचे– रॉलीच्या मृतदेहाचे अवशेष अजूनही तिथेच पडलेले होते. जिमीच्या नोकरानं 'मॅकनं' त्यांचं निरीक्षण केलं आणि तो म्हणाला, ''हा साधासुधा अजगर नाही, बॉस. हा चांगलाच ताकदवान आणि भयंकर जातीचा असला पाहिजे! हे कृत्य नक्की अजगराचं आहे. पाणबंधाऱ्यापलीकडे असलेल्या माडाच्या बनातल्या दलदलीत तो आपल्याला निश्चितपणे कुठेतरी सापडेल. तिथल्या झाडीमध्ये तो दडून बसला असेल. चला! त्याला शोधून काढू आणि त्याचा निकाल लावू.''

त्या ठिकाणापासून हलण्यापूर्वी त्या झुलु पोरानं वाटेच्या कडेला असलेल्या जमिनीत कमालीच्या वेगानं एक खड्डा खणला आणि 'रॉलीच्या' मृतदेहाचे अवशेष त्यात पुरून टाकले.

नंतर मग आम्ही तिघं त्या पाणबंधाऱ्याच्या भिंतीवरून चालत– ती ओलांडून पलीकडे असलेल्या जंगलात पोहोचलो. तिथे आरंभी दलदलीचा ओलसर भाग होता नि त्यात माडांच्या झाडांची दाट गर्दी होती. माडांच्या त्या बनापलीकडे घनदाट झाडं असलेलं विस्तीर्ण अरण्य होतं. माडांच्या त्या बनात शिरताच तिथल्या जास्त क्षेत्राचा शोध घेता यावा या हेतूनं आम्ही तिघांनी तीन दिशांना जायचं ठरवलं.

''एकमेकांचा ठावठिकाणा आपल्याला कळावा म्हणून आपण तिघांनीही अधूनमधून हाका मारण्याचा क्रम जारी ठेवायचा! म्हणजे आपण एकमेकांच्या सतत संपर्कात राहू'' जिमीनं मोलाची सूचना दिली.

त्या बनाच्या मध्यभागापर्यंत मॅक्कन झिमायमानं आम्हाला वाट दाखवत मार्गदर्शन केलं. झाडाझुडपांमधून आणि रानवेलींच्या जाळ्यांमधून वाट काढण्यात ते आफ्रिकन पोरगं अतिशय पटाईत होतं. हातामधल्या लांब काठीनं वाटेत येणारी झाडंझुडपं नि वेली झोडपत, त्या बाजूला करत तो भरभर पुढे जात होता. काही मिनिटांमध्येच आम्ही त्या बनाच्या मध्यभागी पोहोचलो आणि तेथून तीन दिशांना पांगलो. एकमेकांना हाका मारण्याचा क्रम आम्ही चालू केला.

दाट वृक्षराजीतून, झुडुपावेलींच्या जाळ्यांमधून सावधगिरीनं वाट काढत मी पुढेपुढे सरकू लागलो. तो दलदलीचा प्रदेश असल्यानं, वृक्षांच्या ओलसर मुळांवरून, निसरड्या गवतावरून सांभाळून जावं लागत होतं. त्या जंगलामध्ये पूर्वी न पाहिलेले बरेचसे छोटे छोटे प्राणी माझ्या दृष्टीस पडले. खालच्या ओल्याशार गवतामधून, जमिनीवरून ते माझ्या समोरून वेगानं सर्रदिशी धावत होते, त्यांच्या पळण्यामुळे, होणाऱ्या सरसर आवाजामुळे मधूनच मी दचकत होतो. उंच झाडांवर आणि दोऱ्यासारख्या रानवेलींवर करड्या रंगाचे वानर लोंबकळत होते. माकडिणींच्या पोटांशी त्यांची लहानलहान पिल्लं घट्ट चिकटलेली दिसत होती. निरनिराळ्या पक्ष्यांचे आवाज मधूनच ऐकू येत होते. निसरड्या जमिनीवरून काळजीपूर्वक पावलं टाकत मी त्या जंगलातून सावधगिरीनं हळूहळू पुढे चाललो होतो. वाटेत एका बुटक्या झाडाच्या हिरव्यागार नि मोठ्या पानांचा दाट पडदा माझ्यासमोर आला. त्या जाडसर पानांचा पडदा मी हळूच दूर करून पलीकडे पाहिलं आणि क्षणभर माझा श्वास वरच्यावर अडकल्यासारखा झाला!

समोर काही फुटांवर एका मोठ्या वृक्षाच्या बुंध्याच्या मुळाशी एका भल्या मोठ्या रानडुकराचं तोंड मला दिसलं! त्याच्या तोंडावरचे पांढरेशुभ्र असे दोन सुळे वर्तुळाकार वळलेले, मोठे आणि अतिशय तीक्ष्ण टोकं असलेले होते. त्या वृक्षाच्या बुंध्याच्या मुळाशी असलेल्या जमिनीत एक लहानसे विवर खणून त्यात त्या रानडुकराने स्वत:ला उलटं कोंबून घेतलेलं होतं. जमिनीच्या सपाटीवर त्याचं भलंथोरलं तोंडच काय ते दिसत होतं. सुदैवानं ते रानडुक्कर झोपलेलं होतं. अशा रानडुकरांची मुसंडी म्हणजे काय चीज असते हे मला चांगलंच माहिती असल्यानं त्याच्या झोपेत व्यत्यय न आणता मी बाजूनं हळूच पुढे सटकलो...

जंगल तुडवत आजूबाजूला दृष्टी टाकत तो अजगर कुठे दिसतो का याचा शोध घेत मी पुढेपुढे चाललो होतो. त्याच वेळी अकस्मात जिमीच्या त्या झुलु पोराच्या – मॅक्कन झिमायमाच्या– ओरडण्याचा आवाज माझ्या कानांवर पडला.

''बॉऽऽस, बॉऽऽस धावाऽऽ! अजगरऽग... अजगरऽऽ त्यानं मला धरलंयऽऽ! धावाऽऽ! धावाऽऽ! मला सोडवाऽऽ''

त्याच्या त्या आरोळ्या ऐकू येताच मी वळून त्या दिशेनं एकदम धावत सुटलो. दलदलीच्या तिथल्या

**वसुधेच्या अंगावर, खेळ खेळती निर्झर, घार जीवनाला घेई, सौभाग्याचा हा बहर.**

निसरड्या जमिनीवरून, गवतांमधून धावणं म्हणजे सोपी का गोष्ट होती. धावता धावता झाडांच्या ओलसर मुळांवरून पाय घसरल्यामुळे अनेकदा माझा तोल जात होता. मी हेलपटत होतो, भेलकांडत होतो; पण तरीसुद्धा मी त्या दलदलीतून शक्य तितक्या वेगानं धावत निघालो. 'मॅक' सुटकेसाठी मोठमोठ्यानं ओरडत होता. जंगलात कुठेतरी असलेला जिमीसुद्धा त्याच्या आवाजाच्या अनुरोधानं एव्हाना धावत सुटला असणार याची मला खात्री होती. आमच्या दोघांपैकी कुणीतरी एकानं तिथं पोहोचणं फार जरुरीचं होतं. कारण तसं घडलं नाही तर त्या पोराच्या जिवाला धोका आहे याची मला जाणीव होती. अजगराचा विळखा म्हणजे केवढा भयंकर प्रकार असतो याचा मला अनुभव होता. पूर्वी एकदा एका भल्या मोठ्या नि लांबलचक अजगरानं एका हरणाला आपल्या विळख्यात अवघ्या ७ मिनिटांमध्ये चिरडून ठार केल्याचं नि नंतर त्याला सावकाशपणे गिळल्याचं मी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलं होतं...! आणि आतासुद्धा धावत असताना त्या असहाय हरणाचे डोळे आणि त्याची भयार्त नजर माझ्या डोळ्यांसमोर येत होती. दलदलीमधून घसरत, निसरड्या गवतामधून धावत, हेलपाटत अवघ्या काही क्षणांतच माडांच्या त्या बनामधल्या एका मोकळ्या जागेत मी पोहोचलो. आणि– आणि समोर मला जे दृश्य दिसलं ते बघून माझ्या अंगावर सरसरून काटाच उभा राहिला!

समोर जमिनीवर मॅक्कन झिमायमा आडवा पडला होता आणि त्या लांबलचक नि भल्या मोठ्या अजगरानं त्याच्या देहाभोवती एक वेढा घातलेला!

ते दृश्य पाहून मी क्षणभर थरारलो. तो अजगर मॅकच्या शरीराभोवती आणखी वेटोळी घालण्याचा प्रयत्न करत होता आणि एकीकडे तो आपल्या चपट्या तोंडानं त्या झुलु पोराच्या चेहऱ्यावर अधूनमधून आघात करत होता. मॅकचा चेहरा रक्तबंबाळ झाला होता आणि सुटकेसाठी तो मोठमोठ्याने किंकाळ्या फोडत होता.

हातामधल्या शॉटगनचा पट्टा खांद्यावर अडकवत ती खांद्यावर लटकवून मी त्वरेने 'मॅक'च्या मदतीसाठी पुढे झालो. त्याबरोबर त्या अजगरानं चपळाईनं आपलं चपटं डोकं झटकन बाजूला करत खाली नेलं आणि त्याच वेळी मॅकच्या देहाभोवती आणखी एक वेटोळं घातलं. तो आपल्या तोंडानं पुन्हा मॅकच्या तोंडावर प्रहार करण्याचा प्रयत्न करू लागला. अशा परिस्थितीत मला त्या अजगरावर शॉटगनने गोळ्या झाडणं अशक्यच होतं. पण तो अजगर आपल्या तोंडानं मॅकवर प्रहार करू शकणार नाही याकरिता काहीतरी प्रतिबंधात्मक



**कधी पिरावे खडकामधुनी शोधित हिरवळीच्या वाटा, थकवा येता होऊन अडवे उशास घ्यावा डोंगरमाथा.**

हालचाल करणं फार जरुरीचं होतं. पटकन एका बाजूला सरकत मी त्या अजगराच्या पिछाडीला गेलो आणि खाली वाकून पाठीमागून चपळाईनं त्याची मानगूट दोन्ही हातांमध्ये गच्च पकडून मी त्याला मागे खेचलं. त्या अजगराच्या तोंडातून गिळगिळीत लाळ ओघळून त्याच्या मानेवर आली होती नि त्यामुळे त्याची मान गुळगुळीत बनली होती. त्याच्या गिळगिळीत मानेवर माझ्या दोन्ही हातांच्या पंजांची घट्ट पकड घेत मी त्याचं डोकं वर उचलून ताठ उभा राहिलो. तशी माझ्या पकडीतून सुटण्यासाठी तो धडपडू लागला. त्याच्या अंगातली ताकद भयप्रदच होती. त्याचं डोकं मी वर उचलून धरलेलं असल्यानं त्याच्या बटणांसारख्या डोळ्यांमध्ये असलेली हिरवट पिवळट चमक मला स्पष्ट दिसत होती. त्याच्या वेढ्यांमध्ये सापडलेला मॅक भयानं किंचाळतच होता. त्याला धीर देण्यासाठी मी मोठ्यानं ओरडलो, ''मॅक घाबरू नकोस. जिमि इतक्यात इथे येईलच. आम्ही तुझी सुटका करू. तोवर धीर धर!''

अजगर त्या पोराभोवतालची वेटोळी आता आवळत होता. वाढत चाललेल्या त्या दाबानं मॅक घुसमटत्या किंकाळ्या फोडत होता. मी त्या अजगराची मान जोरानं आवळण्याचा आटोकाट प्रयत्न करू लागलो. पण त्याच्या तोंडामधून गळणाऱ्या लाळेमधून त्याच्या मानेची कातडी इतकी गिळगिळीत नि निसरडी बनलेली होती की त्याचा गळा आवळणं मला शक्य होत नव्हतं. अचानक अजगरानं आपल्या मानेला असा काही जबरदस्त झटका दिला की ती माझ्या हातातून निसटली आणि त्याचं डोकं परत मोकळं झालं. त्या झटक्यामुळं तोल जाऊन मी एकदम मागे पडलो. पण त्वरेनं चटकन उठून उभा राहात मी चपळाईनं परत त्या अजगराची मान पकडून त्याला मागे ओढलं. तो अजगर आता चिडला होता. मॅकच्या देहाभोवतालची वेटोळी तो आता अधिक आवळू लागला. त्याच्या विळख्यात अडकलेल्या त्या झुलु पोराचे डोळे भयानं इतके विस्फारले गेले होते की ते खोबण्यांमधून बाहेर पडतात की काय असंच भासत होतं. मी माझ्या अंगातली सगळी ताकद पणाला लावून त्या अजगराची मान आवळण्याचा प्रयत्न करू लागलो. पण त्या अजगराच्या अंगात असलेली ताकदही जबर होती! तेवढ्यात आणीबाणीच्या त्या क्षणांमध्ये झाडाझुडुपांमधून धावत जिमी त्या ठिकाणी येऊन पोहोचला. एकूण संकटाचा त्यानं एका क्षणात अंदाज घेतला आणि मोठ्यानं ओरडून तो मला म्हणाला, ''अजगरावरली पकड सेकंदभर तशीच ठेव! त्याला हलू देऊ नकोस!''

मी अजगराच्या मानेवरली पकड त्वेषानं आणखी जोरात आवळली. त्यामुळे त्याच्या मानेतला एखादा नाजूक स्नायू किंवा एखादी शीर बहुधा जोरात दुखावली गेली असावी. कारण एकदम त्यानं आपला जबडा मोठ्यानं वासला. त्याबरोबर एक क्षण देखील वाया न घालवता जिमीनं आपल्या शॉटगनची डबलबॅरल नळी सरळ त्याच्या जबड्यात खोल खुपसली आणि एकदमच तिचे दोन्ही चाप ओढले. शॉटगनची दोन काडतुसं उडाल्यामुळं एक धडाका झाला. त्या अजगराचं तोंड क्षणार्धात पार छिन्नविच्छिन्न झालं आणि त्याच्या रक्ताळलेल्या मांसाचे तुकडे एकदम अंगावर उडाले. त्या अजगराचं सबंध लांबलचक शरीर झटके देत काही क्षण थरथरलं आणि मग एकदम त्याची वेटोळी सैल होत एकदम ढिली पडली.

मी आणि जिमीनं पटकन पुढे होऊन त्याच्या वेटोळ्यांमधून मॅकची सुटका केली. त्या पोराच्या शरीराची एव्हाना पार दामटीच वळली होती जवळजवळ! पण सुदैवानं तो त्या प्राणघातक संकटातून बचावला होता! आमच्याकडे कृतज्ञतेनं बघत तो धापा टाकत श्वास घेऊ लागला.

अजगराच्या विळख्यात सापडलेलं कुठलंही सावज सहसा जिवंत सुटत नाही. पण आफ्रिकन झुलु जातीच्या त्या पोरामध्ये भरपूर जीवनशक्ती असल्यामुळे नि चिवटपणाचा अनुवंशिक गुण असल्यामुळे तो त्या भयंकर संकटाला तोंड देऊन बचावला आणि जिवंत राहिला!... काही दिवसांमध्येच जिमीचा तो सुदैवी नोकर मॅक्कन झिमायमा पुन्हा पहिल्यासारखाच तंदुरुस्त झाला. त्याच्यासारखे अजगराच्या तावडीतून सुटलेले नशिबवंत फार थोडे असतात...!

त्या अजगराला ठार मारल्यानंतर आम्ही त्याची सबंध कातडी सोलली. तिची एकूण लांबी तब्बल अठरा फूट भरली !...!!

●●

**विजय देवधर**
७/१००, 'कामदा', चिंचवड, पुणे - ३३

**पांघरता ओले पंख भरल्या रानात, डोळ्यांतले निळे पक्षी गेले अनंतात**




# प्रश्न

**संजीवनी बोकील**

**उ**किडवे गावात कुणालाही विचारा, आळशी मोहन्या कुठे राहतो? कोणीही तुम्हाला त्याचं घर दाखवील. गावातलं सगळ्यात घाणेरडं घर! कधी न सारवलेलं, कधी न शाकारलेलं, अंगणात झाडं-झुडपं वाढलेली तशीच मोहन्याच्या गालफडावर दाढी; घरात जळमटं लोंबताहेत तसेच अंगावर मळके कपडे! लग्न-बिग्न करायच्या भानगडीत पडलाच नाही मोहन्या. एकटा जीव सदाशिव!

मनात आलं तर काही काम करील, मनात आलं तर पडून राहील. जेवायच्या वेळी धूमकेतूसारखं कुठं उगवायचं ते त्याला बरोबर माहिती! लंब्या-लंब्या गप्पा मारून लोकांना चकमा कसा द्यायचा, ते मोहन्याला विचारा.

उकिडवे गावाजवळून सावित्री नदी वाहायची. पावसाळ्यात खूप भरभरून वाहायची. दुथडी भरून वाहणाऱ्या त्या पात्रात कधीकधी गुरं-ढोरंसुद्धा वाहून जायची. कधी एखादं माणूससुद्धा.

आतासुद्धा पाऊस, जरा उतरायला तयार नव्हता. आकाश फुटावं तसा धोऽ धो कोसळत होता. सावित्री नदीचं पात्र लालभडक पाण्यानं खवळून उसळत होतं. नदीच्या पलिकडे असणारं उमरठ गाव जोडणाऱ्या कच्च्या पुलावरूनही पाणी थोडं थोडं वाहू लागलं होतं. काही वेळाने पाऊस थोडाथोडा कमी झाला. मग पाणी बघायला काठावर बरीच माणसं जमली, त्यात मोहन्या पण होता. आपला मळका पायजमा वर खोचून तोही पाण्याची गंमत बघत उभा होता. बरीच गर्दी होती. इतक्यात कालवा झाला, काहीतरी वाहात येतंय... कायतरी दिसतंय्, माणूस हाय का जनावर? माणसं वाकून वाकून बघू लागली. इतक्यात निसरड्या काठावरून बाळूचा पाय घसरला. लोकांना काही कळायच्या आत बाळूला पाण्यानं ओढलं नि तो धारेला लागला. बाळू... बाळू, लोक ओरडू लागले नि आपल्या डोळ्यांनी बाळूला गटांगळ्या खाताना बघून पार गारठून गेले. पण त्या खवळलेल्या भयंकर पात्रात उडी घेणं म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूच्याच जबड्यात उडी घेणं! ते करणार कोण?

एवढ्यात धाडकन् आवाज आला. बाळूच्या पाठोपाठ मोहन्या गटांगळ्या खाताना लोकांना दिसला. बाळूच्या जवळ तो पोहोचताच बाळूने त्याला घट्ट मिठी मारली.

'संपला मोहन्याचा अवतार! लोक म्हणाले.

पण दोघंही कसंबसं एकमेकांना धरत-बुडत काठापर्यंत आली. गावातल्या धडपड्या तरुणांनी एव्हाना दोर आणले होते. दोर टाकले. कसेबसे त्याला लटकून मोहन नि बाळू काठापर्यंत आले. लोकांनी त्यांना ओढून वर घेतले.

एव्हाना पाऊस थांबला होता. जणू काही झाल्या प्रसंगानं तोही भांबावला होता. बाळू सरपंचांचा मुलगा. त्याच्या घरची सारी माणसं धावतपळत आली. त्याच्या आईनं तर बाळूला साऱ्यांनी मोहन्याला उचलून घेतले आणि मोठी मिरवणूकच निघाली. स्वत: सरपंच सामील झाले त्यात. काही तरुण म्हणाले, ''आपण सरकारला कळवू. सव्वीस जानेवारीला दिल्लीला धाडसी माणसांचा सत्कार होतो म्हनत्यात-मोहनला नक्कीच बोलावतील.''

सरपंच गदगदलेल्या आवाजात म्हणाले, ''मोहन्यानं गावाचं नाव मोठं केलं! काय धाडसानं उडी ठोकली पठ्ठ्यानं!''

एवढ्यात आतापर्यंत कुणीही बोलू न दिलेला मोहन्या आबा पैलवानाच्या खांद्यावरून मोठ्यानं ओरडला, 'पैलं हे सांगा की, मला पान्यात ढकललं कोनी? आई शप्पथ चांगला बुकलून काडतो त्याला- धाडसी म्हनं-! बाळू होता म्हनून बरं - न्हाईतर...!!'

●●

**संजीवनी बोकील**
विजयालक्ष्मी अपार्टमेंट,
रामबाग कॉलनी, पौड रोड,
पुणे ३८.

**झुलता. आकाशदीप लावला, दिशा तेजोमय झाल्या, लक्ष्मीच्या पाऊलखुणा, घराघरांत उमटल्या.**

# काष्ठशिल्प – एक कला


– उक्षाल गुर्जर

*प्रत्येकाने एखादा तरी छंद जोपासावाच, असं जाणकार सांगतात. आपल्या मागील अंकात आपण, छंद कसे जोपासावेत? याविषयी एक छोटा लेखही वाचला असेल. सध्याच्या धकाधकीच्या जीवनात, अशा छंदांमुळे आपण मनाची प्रसन्नता टिकवून ठेऊ शकतो, तसेच आपली अभ्यासू, शोधक वृत्तीही जागृत ठेऊ शकतो. 'काष्ठशिल्प' हा असाच कौशल्यपूर्ण, संग्रहात्मक अन् कलात्मक छंदाचा प्रकार. हा छंद ज्यांनी जोपासला अन् कलाकाराच्या नजरेतून अनेकविध काष्ठशिल्पे विविध जंगलांतून ज्यांनी संकलित केली ते श्री. उक्षाल गुर्जर या छंदाविषयी व तो कसा जोपासता येईल याविषयी सांगताहेत.*

**मि**त्रांनो, काष्ठशिल्पासंदर्भात तुमच्याशी संवाद साधायला मिळणार या कल्पनेनेच माझ्यात उत्साह संचारला. या ठिकाणी एका महत्त्वाच्या मुद्याचा उल्लेख करणे मला निकडीचे वाटते, तो मुद्दा म्हणजे आपण आपल्या आयुष्यात छंद कशाला म्हणतो आणि मग त्याला नेमकी काय भूमिका देतो याचा विचार! सर्वसामान्यत: छंदाकडे बघण्याचा आपला दृष्टिकोन हा 'जाणारा वेळ घालविण्याचे एक साधन' असा असतो. याउलट माझा अनुभव असा आहे की ज्याला आपण छंद असं सर्वमान्य नाव देतो ती आपली आवड ही आपल्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेण्याचा एक प्रभावी मार्ग असतो यासाठी असे छंद आपण जाणीवपूर्वक जपले आणि जोपासले पाहिजेत. आपल्या स्वत:मधल्या सुप्त जाणिवांना आणि गुणांना या छंदांमुळे वाट मोकळी करून दिली जाते. मग आपण आपल्या या गुणांचा वापर आयुष्यात इतर ठिकाणी करून घेऊ शकतो.

काष्ठशिल्पांचा विचार करताना आपल्याला असं लक्षात येईल की काष्ठ किंवा लाकूड हे दोन प्रकार म्हणजे लाकडाला प्रयत्नपूर्वक आकार देणे. ज्यामध्ये आपण लाकडाचा कुठल्याही इतर माध्यमासारखा उदाहरणार्थ – धातू, दगड इत्यादीसारखा वापर करून शिल्प घडवू शकतो. दुसऱ्या प्रकारात नैसर्गिकरित्या सापडणाऱ्या लाकडाच्या अंगीभूत आकारांचा कुशलतेने वापर करून केवळ जुळवणी (composition) तंत्राचा अवलंब करून शिल्प घडवता येऊ शकते. मी आजवर केलेले प्रयोग हे या दुसऱ्या प्रकारात मोडतात.

ही माझी काष्ठशिल्पांची आवड हळूहळू विकसित होत गेली. कुठलाही छंद किंवा आवड ही माणसाचा मूळ कल आणि त्याला मिळालेली तशी पोषक परिस्थिती यावर अवलंबून असते. मला अगदी लहानपणापासून (म्हणजे मला आठवतंय तेव्हापासून) जंगलांचं खूपच आकर्षण वाटायचं. जंगलात फिरायची एकही संधी मी वाया जाऊ देत नसे. शेजारी-पाजारी कुणीही जंगलात सहलीला जाणार हे कळलं की मी तयार होऊन त्यांच्या घरी हजर! पुढे थोडा मोठा झाल्यावर स्वतंत्रपणे जंगल सफरींना सुरुवात केली, आणि मग वने आणि वन्यजीवन याबद्दलच्या आवडीतून हळूहळू काष्ठशिल्पामध्ये रस वाटायला लागला. पुढे मग जंगलात फिरताना सापडलेले वेड्यावाकड्या आकारांचे लाकडांचे तुकडे मी हळूहळू जमा करायला लागलो. त्या वेळेला त्या लाकडांच्या विचित्र आकारांचंच आकर्षण अधिक वाटायचं. फावल्या वेळात, जमा केलेली सगळी लाकडं मी पुढ्यात घेऊन बसायचो आणि त्या वेड्यावाकड्या तुकड्यांमधून काही



*१) विजय भरारी :– उत्साहाने आणि ताकदीने आकाशात झेपावणारा पक्षी. यात डोके आणि इतर शरीर असे दोन तुकडे जोडलेले आहेत, त्यातला डोक्याचा भाग एका मोठ्या ओंडक्यातून कापून काढला होता आणि त्याला योग्य तो दुसरा भाग (इतर शरीर) मिळायला मला जवळपास दोन वर्षांचा कालावधी उलटला.*

**हिरव्या रानात, पिवळ्या उन्हात, जीव उधळून भुलून जा, आतून आतून फुलत फुलत, विश्वासानं चालत राहा.**

नवीन आकार किंवा जुळवणी साकारता येईल का याचा शोध घ्यायचो. या प्रयत्नांतून माझ्या सुरुवातीच्या काही रचना साकार झाल्या. उत्साहाच्या भरात मी त्या माझे शेजारी आणि प्रसिद्ध व्यंगचित्रकार मनोहर सप्रे यांना दाखवल्या. त्यांनी त्या रचनांमधील काही उणीवा निदर्शनाला आणून दिल्या, त्याचबरोबर भरपूर प्रोत्साहनही दिले. त्यामुळे माझा उत्साह द्विगुणित झाला. हळूहळू मी या छंदानं झपाटल्यासारखा झालो आणि मग मी बराचसा मोकळा वेळ माझ्या या नव्या छंदासाठी वापरू लागलो.

मित्रांनो, मी चंद्रपूर या गावी लहानाचा मोठा झालो आणि सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे माझ्या छंदाला आवश्यक ती पोषक परिस्थिती उदाहरणार्थ – आजूबाजूला असलेली जंगलांची उपलब्धता, आणि घरच्यांचा पाठिंबा हे घटक जोडीला होते. पण बारावीनंतर पुढच्या शिक्षणासाठी मी पुण्यासारख्या मोठ्या शहरात आलो आणि माझा छंद संपुष्टात येईल की काय अशी भीती निर्माण झाली. पण याच वेळेस मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. मी पूर्णपणे अनोळखी प्रांतात आलो होतो. इथे मला माझी अशी एक ओळख (Identity) निर्माण करण्याची गरज भासत होती. अशा वेळी स्वत:च्या कलागुणांचा वापर करणे याखेरीज दुसरा उत्तम पर्याय माझ्याजवळ नव्हता, आणि मग दरवर्षी मिळणाऱ्या दोन दीर्घ



*१) फोफावणारा अंकुर :– हे काष्ठशिल्प केवळ एक रचना म्हणूनही पाहिले जाऊ शकते, पण यात नव्याने अंकुर फुटलेल्या झाडाची (नारळ) उत्साही आणि जीवनाने ओतप्रोत भरलेली वाढ पकडण्याचा प्रयत्न केला आहे.*


सुट्ट्यांचा पुरेपूर वापर मी करून घेतला.

सुट्टीतला माझा कार्यक्रम ठरलेला असायचा. काही दिवस जंगलात भटकणे, लाकूड–फाटा गोळा करून आणणे – या सगळ्या कार्यक्रमात मला माझ्या मित्रांची आणि धाकट्या भावाची मदत फार मोलाची ठरली, कारण स्वभाव वैशिष्ट्यांच्या साधर्म्यामुळे आम्ही सुरुवातीपासूनच जंगलामध्ये एकत्र फिरायचो (आणि आता त्याच्या जोडीला माझ्या छंदाची भर पडली) – मग गोळा करून आणलेल्या लाकडांतून नवनवीन रचना साकारणे, त्यांना मूर्त स्वरूप देणे हा माझ्या दिनचर्येचा अविभाज्य घटक होऊन बसला. तुम्हाला आश्चर्य वाटेल. पण या काळात दिवसाला १७–१८ तास काम करणे हा माझा नित्यनियम झाला होता. झपाटल्यागत फिरणे – झपाटल्यागत काम करणे यात माझा वेळ वाया जात नव्हता तर उलट माझ्यापुरतं आयुष्याचं समीकरण उलगडण्याला, माझ्या व्यक्तित्वाचा वेध घ्यायला माझा छंद कारणीभूत ठरला.


काष्ठशिल्पांसाठी जो लाकडांचा साठा मी जमविला त्यात विविध जातींच्या लाकडांचा समावेश आहे. साग, खैर, बीणा यांना मी प्राधान्य दिले. त्याचप्रमाणे बांबू–विशेषत: बांबूच्या बेटामध्ये मोकळी जागा शोधत वेडावाकडा वाढलेला वळसेदार बांबू हा सुद्धा काष्ठशिल्पांसाठी अतिशय प्रभावीपणे वापरता येऊ शकतो. बांबूच्या मुळांना देखील अतिशय वेधक आकार असतात. फक्त बांबूच्या बाबतीत एकच कालजी घ्यावी लागते आणि ती म्हणजे बांबू किंवा त्याची मुळे ही सडलेली नसावीत. वाळलेला बांबू किंवा मुळं पाण्याच्या संपर्कात आल्यावर फार लवकर सडतात. त्यामुळे बांबू गोळा करताना तो सडलेला किंवा त्याची साल काळपट झालेली नाही याची खात्री करून घेणे आवश्यक असते. लाकडांमध्ये सापडणारे वेगवेगळे आकार हे एक तर नैसर्गिकरित्या आलेले असतात किंवा मग लाकूड प्रदीर्घ काळ वाळवीच्या संपर्कात राहिल्यामुळे आणि वाळवीने लाकडाचा बराचसा मऊ भाग खाऊन टाकल्यामुळे लाकडाला आकार

मिळतो. या प्रकारचे लाकूड काष्ठशिल्पाला उत्तम. अनोळखी किंवा निकृष्ट दर्जाचं लाकूड कितीही आकर्षक वाटलं शक्यतो गोळा करू नये, काण मग पुढे लाकडावर कराव्या लागणाऱ्या प्रक्रियांमध्ये अडचणी येतात किंवा अशा लाकडांपासून तयार केलेलं शिल्प हे मजबुती आणि टिकाऊपणाबाबत अल्पजीवी ठरते. काष्ठशिल्पामध्ये दुसराही एक प्रकार आढळतो, या प्रकारात नदीच्या प्रवाहातून वाहून आणलेल्या लाकडाचा उपयोग शिल्प निर्मितीसाठी करतात. ह्या प्रकारचे लाकूड हे हिमालयात उगम पावणाऱ्या नद्यांच्या पात्रात अधिक प्रमाणात सापडते. आपल्याकडच्या सखल भागात वाहणाऱ्या नद्यांमध्ये अशा पद्धतीचे लाकूड सापडण्याची शक्यता तशी कमीच, आणि अशा प्रकारे सापडलेले लाकूड हे अनेकदा ठिसूळ, सडलेले आणि निकृष्ट दर्जाचे असते.

लाकडाच्या विविध जाती आणि




*४) बसलेले म्हातारबुवा :- हे माझं अगदी सुरुवातीच्या शिल्पांपैकी एक, पण मला व्यक्तिशः आवडणारं! यात बांबूच्या एका वळसेदार काडीला फक्त एक पाय आणि डोकं याची जोड दिली आहे. या आकृतीत एक पोकळपणा असूनही आकृती अपूर्ण वाटत नाही.*



*३) नर्तकांची जोडी :- बांबूपासून बनविलेल्या या शिल्पात भारतीय नृत्यमुद्रेचा वापर केलेला आहे. यात फक्त दोन बांबूंचे वळसेदार तुकडे जुळवून प्रत्येक तुकड्याला योग्य जागी डोके चिकटविले आहे.*

काष्ठशिल्पासाठी उपयोगी असे त्यांचे अंगीभूत गुणधर्म याची ओळख आपल्याला हळूहळू होऊ शकते किंवा छंद जोपासताना ती जाणीवपूर्वक करून घेणे अधिक इष्ट. लाकडं गोळा करायला हिंडताना आपल्याला फार ओझं होणार नाही पण आवश्यक ठरतील अशी काही औजारं जवळ बाळगणं गरजेचं ठरतं. या औजारांमध्ये लहान आकाराची आणि अरूंद पात्याची करवत, छोटी कुऱ्हाड किंवा पटाशी आणि हातोडी, जमीन उकरायला आवश्यक असे एखादे टोकदार औजार अशा गोष्टी अधिक सोईच्या पडतात. अनेकदा निवडलेल्या लाकडाचा काही भाग जमिनीत गाडला गेलेला असतो किंवा लाकडाचा आवडलेला विशिष्ट तुकडा हा मोठ्या ओंडक्याचा अविभाज्य भाग असतो किंवा बांबूच्या बेटातून एखादाच बांबू निवडून वेगळा काढायचा असतो, अशा वेळी आपल्याला अवजारांची विशेष गरज भासते. जमवलेल्या लाकडांवर पुढचे सोपस्कार लगेच करणे गरजेचे आणि सोईचे असते, कारण आपण दररोज लाकडं गोळा करायला जाऊ शकत नसलो तरी संग्रहात असलेल्या लाकडावर जुळवणीचे प्रयोग मात्र फावल्या वेळेत आपल्या सोईने करू शकतो. अशा वेळी संग्रहातील लाकूड स्वच्छ आणि योग्य स्थितीत असणे सोईचे ठरते.

लाकडाच्या सफाईसाठी कॉस्टिक सोडा आणि पाणी यांचे मिश्रण वापरावे. वेगवेगळ्या प्रकारचे ब्रशेस, अगदी जुने वापरलेले टूथब्रशेससुद्धा सफाईच्या कामासाठी वापरता येऊ शकतात. लाकडाच्या फटींमध्ये, खोलगट भागांमध्ये साठवलेली माती, कचरा, लाकडाचा मऊ किंवा ठिसूळ आणि सडलेला भाग हे सफाई करताना काळजीपूर्वक काढून टाकावे. यासाठी पटाशी, नखखे, कानशी इत्यादी औजारांचा वापर करता येऊ



*५) संरक्षक*

**झाडे राने उंच उडविती पर्णांतून पताका, शाखा शाखांतून टाकिती सुख संतोष शलाका.**

शकतो. साफसफाईचे काम झाल्यावर लाकडांना उन्हात वाळवून घ्यावे आणि वाळल्यावर वेगवेगळ्या ग्रेडचा सँडपेपर, कानशी इत्यादींच्या साहाय्याने लाकडाचा पृष्ठभाग घासून त्याला अधिक सफाई आणावी. गरज पडल्यास लाकडाच्या नैसर्गिक खाच-खळग्यांचा किंवा रेषांचा आणि भेगांचा खोलगटपणा कमी-अधिक करून लाकडाच्या सौंदर्यात आपण भर घालू शकतो. अनेकदा अशा प्रकारे साफ करून वापरायोग्य बनविलेल्या लाकडाच्या तुकड्यांना योग्य ते पॉलिश किंवा सरफेस ट्रीटमेंट देणे सोईचे ठरते. या कामासाठी शक्यतो भडक रंगांच्या वुड पॉलिशचा वापर करू नये. उलट पारदर्शक पॉलिशचे एक किंवा दोन पातळ थर, एक थर सुकल्यावर दुसरा या प्रकारे द्यावेत. यासाठी बाजारात उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या पॉलिशचा प्रयोग आपण करून पाहू शकतो.

सगळ्यात महत्त्वाचा भाग असा की ज्याला आपण काष्ठशिल्पाचा आत्मा म्हणून शकू हा यानंतर येतो, तो म्हणजे जुळवणी (कंपोझिशन). यात लाकडाच्या एक किंवा अधिक तुकड्यांचा वापर करून नवीन शिल्परचना साकारणे हा एक अवघड पण आव्हानात्मक भाग आहे. यासाठी व्यक्तीची नजर सूक्ष्म आणि चौफेर असणे आवश्यक आहे, त्याचबरोबर कल्पकता आणि गोष्टी मनोमन नजरेसमोर आणणे याची जोड आवश्यक आहे. रचना साकारताना पशू, पक्षी, मानवी आकार, परस्पर संबंध, भावना या घटकांचा वापर



***६) बसलेले युगुल :- पायऱ्यांच्या उतरंडीवर एकाखाली एक असे बसलेले युगुल.***

आपण आपल्या अनुभवानुसार कल्पकतेची जोड देऊन करायचा असतो. या गोष्टी केवळ शिकवून किंवा दुसऱ्याचे अनुकरण करून येत नाहीत, तर त्याला आपली अनुभवसमृद्धता वाढवणे आणि प्रत्येक प्रयोगागणिक आपली समज आणि जाणीव अधिक प्रगल्भ करत नेणे हाच मार्ग आहे. यासाठी इतर



***७) प्रार्थना करणारी जोडी :- जोडीपैकी एक जण हात वर करून सर्वसाक्षी ईश्वराला मदतीचे आवाहन करीत आहे.***

कलाविष्कारांचा, माध्यमांचा, शैलींचा व्यासंग आपण आपल्या परीने वाढवणे फायद्याचे आहे.

हळूहळू स्वनिर्मित जसा आपण कलासंग्रह वाढवत जातो तसा आपला आत्मविश्वास वाढायला लागतो, आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांकडे आपण अधिक समंजसपणे बघू लागतो, आणि सर्वात महत्त्वाचे म्हरजे निर्मिती प्रक्रियेतून जो आनंद आणि समाधान आपण मिळवत असतो त्याचं आपल्या आयुष्यातलं स्थान फार मोठं आहे. आनंद आणि समाधान या गोष्टींसाठी बाह्य जगावर अवलंबून राहण्याची आपली गरज कमी होते. उलट इतरांना या प्रक्रियेत समाविष्ट घेून त्यांनाही या आनंद आणि समाधानाचा लाभ आपण करून देऊ शकतो. हे सगळं करत असताना आपल्याला काही गोष्टींचं भान ठेवणं आणि काही स्वघोषित नियमांचं पालन करणं आवश्यक आहे, ते म्हणजे. अनावश्यक नासधूस न करणं, कुठल्याही जिवंत झाडाला हानी न पोहोचवता आपला काष्ठसंग्रह वाढवणं. या गोष्टीचं निग्रहानं पालन करणं आवश्यक आहे. तसं लक्षात ठेवून तुम्ही तुमचा काष्ठसंग्रह आणि काष्ठशिल्पाचा छंद निसर्गसान्निध्यात मनसोक्त अन् डोळसपणे हिंडावं. या सगळ्यासाठी माझ्या शुभेच्छा !

●●

**श्री. उक्षाल किशोर गुर्जर**
३२/१, प्लॉट क्र. १०,
एरंडवणे, पुणे.

**आकारातुनी वृक्षांच्या गवसे, मज सौंदर्याची खाण अशी सृष टीच्या रंगात रंगता, गंमत होते अशी कशी?**

**मा**झ्या लहानपणीची गोष्ट. एका लहानशा खेडेगावात माझे प्राथमिक शिक्षण झाले. घरची अत्यंत गरिबी. तुटपुंजी शेती. वडील खेडेगावात भिक्षुकी करायचे. मी वडिलांच्या बरोबर पेंडी-काडीसाठी आजूबाजूच्या गावोगावी जायचो. डोक्यावर पेंड्या वाहून घरी आणायचो. गावात सत्यनारायणाची पूजा असली, कुणाचे लग्न असले की, वडिलांबरोबर त्यांना पौरोहित्यासाठी मदत करायला जायचो. श्रावण महिन्यात पूजा-पाठ असायचे, त्यामुळे थोडे गोडधोड खायला मिळायचे. श्रावण महिना बरा जायचा. एरवी मी दररोज सकाळी घरचीच गुरे वळायचो आणि मग शाळेत जायचो.

गावाच्या बाहेर उंच माळावर आमची शाळा होती. जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा. शाळेचे नांव होते 'जीवन शिक्षण मंदिर'. खरोखरीच जीवनशिक्षणाचे धडे देणारे ते पवित्र आणि प्रासादिक ज्ञानमंदिर होते. शाळेसाठी बांधलेले वर्ग तीनच होते. आणि इयत्ता मात्र सात होत्या. त्यामुळे पाचवीपर्यंत मला कधीच वर्गात बसायला मिळाले नाही. कधी या पडवीत, तर कधी त्या पडवीत; कधी चावडीत, तर कधी मारुतीच्या देवळात आमचे वर्ग भरायचे. प्रार्थना मात्र शाळेच्या पटांगणात सर्व वर्गांची सामुदायिकपणे व्हायची. त्या काळी शाळेमध्ये कोणत्याही कामाला शिपाई नसायचा. मुलांनीच वर्ग झाडून काढायचे. शाळेपुढचे पटांगण आणि परिसर मुलांनीच स्वच्छ करायचा.

***सगळी मुले जमली आणि मुलांची गणना झाली, तेव्हा गुरुजींच्या लक्षात आले की, 'सहलमंत्री राम' आलेला नाही. राम का बरं सहलीला गेला नाही? शाळेचा सहलमंत्री पण सहलीला मात्र अनुपस्थित - असं का घडलं? प्रौढ वयात भ्रमंतीचा आनंद भरभरून मिळाला. तरीही या भ्रमंतीच्या संदर्भातील बालपणची आठवण मनाच्या कोपऱ्यात दडून बसलेली होती. त्या हृदयस्पर्शी आठवणीला शब्दरूप देत आहेत. डॉ. रामचंद्र देखणे!***

शाळेच्या वर्गांना रोज पाना-फुलांची माळ घालायची. कधी कोरांटीची, कधी गुलबक्षीची तर कधी कावळीचीसुद्धा फुले माळेसाठी असायची. आजूबाजूलाच फुलणाऱ्या रानफुलांची माळ वर्गाला शोभून दिसायची. व्हरांड्याच्या भिंतीवरील फळ्यावर दररोज मुलांनीच सुविचार लिहायचा. शनिवारी सकाळची शाळा असायची. मुलांनी गोठ्यातून शेण गोळा करून आणायचे आणि मुलींनी सारे वर्ग, पडवी शेणाने सारवून घ्यायची. गुरुजींनी सांगितलेले काम करण्यासाठी मुलांची चढाओढ

# शालेय सहलमंत्री मी आणि भ्रमंती

**डॉ. रामचंद्र देखणे**



**विद्युत दीपातुन अनोखी रंगांची दुनिया फुलते, परि समईच्या स्निग्ध ज्योतीशी जडलेले माझे नाते.**

लागायची. रोज सकाळी 'हजेरी' झाल्यावर गैरहजर मुलांच्या घरी दोन–तीन मुलांनी जायचे आणि गैरहजेरीचे कारण योग्य नसेल तर उचलबांगडी करून त्याला वर्गात घेऊन यायचे. गुरुजींच्या कडक शिस्तीला पालकांचाही पूर्ण पाठिंबा असायचा. म्हणूनच 'गुरुजी' या व्यक्तिमत्त्वाचा गावात दरारा आणि दबदबा असायचा. संपूर्ण गावाच्या सांस्कृतिक जीवनात गुरुजींना एक महत्त्वपूर्ण स्थान असायचे.

शाळेच्या कामकाजामध्ये सूत्रपद्धत असावी आणि कामाची विभागणी व्हावी यासाठी 'शालेय मंत्रिमंडळ' निवडले जायचे. त्यात एक मुख्यमंत्री असायचा, तर एक आरोग्यमंत्री, एक सफाईमंत्री, एक प्रार्थनामंत्री; तर एक सहलमंत्री असायचा. मुलांनी दिलेला गृहपाठ केला की नाही हे शिक्षणमंत्र्याने पाहायचे तर शाळेच्या आणि परिसराच्या स्वच्छतेची जबाबदारी स्वच्छतामंत्र्यावर असायची. रोजची सामुदायिक प्रार्थना ही प्रार्थनामंत्री घ्यायचा. वर्षात जी सहल निघत असे त्याच्या आयोजनात सहलमंत्री असायचा. साधारणपणे हुशार मुलांना अभ्यासमंत्री हे पद मिळायचे. मंत्रिमंडळात घेतलेले सर्व विद्यार्थी हे वक्तशीर असत. शालेय कामांत त्यामुळे सुसूत्रता यायची आणि शालेय जीवनातून सामूहिक कार्यात सहभाग घेण्याची गोडी लागायची. तसेच सामूहिक नेतृत्वाची अप्रत्यक्षपणे जाणीव व्हायची. मी अनेक वर्षे शाळेचा अभ्यासमंत्री होतो. मी पाचवीत असताना एकदा गुरुजी मला म्हणाले,

''या वर्षी तू अभ्यासमंत्री न होता सहलमंत्री हो?''

मला, गुरुजींना नाही म्हणता येईना. पण आत्तापर्यंत माझ्या आर्थिक हलाखीमुळे मला कोणत्याही मोठ्या सहलीची फी भरता आली नव्हती. आताही तसेच घडले तर...? सहलमंत्रीच सहलीला नाही असे व्हायचे.'

'सहलमंत्र्याला तसे काम कमी असते... कधीतरी वर्षातून एकदा सहल निघते... त्यामुळे तुला अभ्यासाला वेळही भरपूर मिळेल...'

असे गुरुजींनीच सांगितले आणि नेहमीप्रमाणे या वर्षीची सहल आमच्या गावापासून जवळच असलेल्या इनामगावचे ऐतिहासिक उत्खनन आणि चिंचणी गावचे धोरण पाहायला जायची ठरली. ही दोन्ही ठिकाणे प्रेक्षणीय होती. त्याबद्दल कुतुहल होते. सहलीची फी फक्त अडीच रुपये ठरली होती.

मी घरी आल्यावर माझ्या वडिलांना सांगितले, 'इनामगावला आणि चिंचणीला सहल जाणार आहे. सहल एस.टी.च्या गाडीने जाणार आहे. सहलीची वर्गणी अडीच रुपये आहे.' आम्ही वडिलांना काका म्हणायचो. काका म्हणाले,

''अजून अवकाश आहे ना... बघू त्या वेळी...''

बाजरीची पहिली पिके गेल्यामुळे या वर्षीही दुष्काळच जाणवत होता. वडिलांनी याच आठवड्यात आर्थिक अडचणीमुळे आमच्या शेळीच्या खांडातील एक करडू तालुक्याच्या गावी फक्त पंधरा रुपयाला विकून कशीतरी भागवाभागव केली होती. माझ्या सहलीची वर्गणी भरली जाईल की नाही याबद्दल मला शंकाच वाटत होती. गुरुजी रोज प्रार्थनेच्या वेळी सहलीचे निवेदन करायचे. दिलेल्या मुदतीत पैसे आणावेत. अशी सूचना द्यायचे. सहलीची सूचना ऐकली की मला अस्वस्थ वाटायचे. मी घरी आल्यावर पुन्हा सहलीच्या वर्गणीबद्दल विचारायचो. काका, मग आमच्या आईला कुणाच्या तरी घरी पाठवायचे. कुणाची तरी सत्यनारायणाची पूजा श्रावणातच झालेली असायची. त्याची दक्षिणा मिळालेली नसायची. आई त्यांच्या घरी जायची आणि म्हणायची,

''श्रावणातला एक बोभाट राहिलाय... असली सवड तर बघा...'' दक्षिणेच्या पैशाला सक्ती कशी करता येणार... तो शेतकरी म्हणायचा,

''काकूबाई – पूजेची दक्षिणा राहिलीय... बोभाट बाकी हाये पर आत्ता तुम्ही तर पाहाताय कशी वढाताण चाललीय... आता खळ्याच्या टाईमालाच बघू...''

मग आई दुसऱ्या कोणाकडे जायची.

''बापू... अभिषेकाची दक्षिणा राहिलीय वाटतं... जमलं का काही...? आमच्या रामला शाळेच्या सहलीला जायचंय... त्याची वर्गणी भरायचीय...''

''काकूबाई सारं खरं हाये. दक्षिणा बी बाजूला काढून ठेवली व्हती. पर

**अनंत जन्मांचे शुभ संचित, क्षणी याच गे होवो कुसुमित.**

तेवढ्यात पाव्हण्याची पोर तापली. तिला सुई मारायला तालुक्याला नेलं... पैसं खलास झालं... सवड झाली की मी आणून देईन...'' लोकांचे हे सांगणे ऐकून आईदेखील अत्यंत अस्वस्थ व्हायची आणि परत यायची... उधार-उसनवार, मागणं हे तर आमच्या वडिलांच्या स्वभावात कधीच बसणारं नव्हतं... मात्र त्यांचाही नाईलाज होता. शेवटी सहलीचा दिवस ठरला. मुलांचे पैसे जमले. सहलमंत्री असूनही मला सहलीला जाता येत नाही, याबद्दल मलाच अपराध्यासारखे वाटत होते. दोन-तीन दिवस अगोदर शाळेतील सर्व मुलांत फक्त एकच सहलीचा विषय चर्चिला जात होता. सहलीचा विषय निघाला की मी अस्वस्थ व्हायचो.

सहलीच्या दिवशी सकाळीच शाळेच्या पटांगणात दोन बसगाड्या उभ्या होत्या. त्या पाहताच मला रडू कोसळले. फक्त आईला रडवलेल्या स्वरात मी सांगितले, ''मी आज सकाळीच रानात जातोय... मी शाळेला आज जाणार नाही. पार संध्याकाळी घरी येईन;'' ''अरे पण आज शाळा का बुडवणार?'' असं आई म्हणेपर्यंत मी धूम ठोकली आणि पळतच रानात निघालो. जाता जाता पाहात होतो, घोळक्या-घोळक्याने सारी मुले जेवणाचा डबा घेऊन सहलीसाठी शाळेकडे जात होती... मला रडू कोसळलेच होते. त्यांच्याकडे पाहाताच मी एका हाताने अश्रु पुसत होतो 'तुमची सहल चांगली होवो' असे मनाशी पुटपुटत होतो.

सगळी मुले जमली आणि मुलांची गणना झाली, तेव्हा गुरुजींच्या लक्षात आले की, 'सहलमंत्री राम' आलेला नाही. गुरुजी घरी आले आणि वडिलांना म्हणाले,

''राम कुठंय... सहल निघालीय'

''शेवटच्या दिवसापर्यंत आम्ही सहलीचे पैसे भरू शकलो नाही... तो खूप हिरमुसला आणि रानात निघून गेला...''

''अहो काका... नसते पैसे भरले तरी त्याला नेता आले असते... एवढ्या मुलांत एक मुलगा काय जड होता. तो उत्तम गाणी म्हणतो, गोष्टही सांगतो. भारुड करतो... त्यानं मनोरंजन केलं असतं आणि सहलीत रंग भरला असता... शिवाय तो आमचा सहलमंत्री...''

''तो कालपासूनच रडवेला झाला होता. दुपारी बोलत नव्हता... आम्ही त्याला सहलीला पाठवू शकलो नाही, याचं आम्हालाही खूप वाईट वाटतंय... तुम्ही त्याला 'फी' न भरता नेणार हे जर अगोदर माहीत झालं असतं तर आनंदाने खुलून गेला असता... जाऊ द्या... त्याला नाही जायला मिळाले तरी सहलीला जाणारी सारी मुले आमचीच आहेत. त्यांना जपून न्या... अगदी आनंदात सहल होऊ द्या...''

वडिलांच्याही डोळ्यांतून अश्रू गळत होते...

लहानपणी मला सहलीला जायला मिळाले नाही त्याची उतराई म्हणून की काय मला पुढे परमेश्वराने खूप भ्रमंती घडविली. मी महाराष्ट्रभर आणि महाराष्ट्राच्या बाहेरही व्याख्यानाच्या निमित्ताने, प्रवचनाच्या निमित्ताने अजूनही भ्रमंती करतो आहे. माझ्या व्याख्यानांसाठी लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो आहे. प्रत्येक ठिकाणी माझी उत्तम व्यवस्था होते आहे. लोकशिक्षणाचे आणि लोकजागृतीचे काम परमेश्वर माझ्याकडून करवून घेतो आहे. ठिकठिकाणचे प्रदेश, तिथली माणसं, वैशिष्ट्य साऱ्यामुळे मला त्यांचे आदरातिथ्य, माणुसकीचे धडे अनुभवायला मिळत आहेत. परमेश्वराने निर्माण केलेले डोंगर, दऱ्या, वृक्षवल्ली, नदी, अरण्ये, पशुपक्षी, झरे, धबधबे, मंदिरे, गुहा आणि ह्या साऱ्यांना चैतन्यरूप देणारी माणसे हे परमेश्वराचे आनंदरूपी सौंदर्य मी पाहतो आहे. लहानपणी सहलीला जायला मिळालं नाही याचं दु:ख केव्हाच भरून निघालं आहे. कारण आता माझ्या भ्रमंतीतून वर्गणी द्यावा लागणाऱ्या सहलीला न जाताही मी परमेश्वराची 'सह-लीला' अनुभवतो आहे. मला या प्रसंगी तुकाराममहाराजांचा एक अभंग आठवतो,

**'न देखोनि काही ।**
**म्या पाहिले सकळही ।।**
**झालो अवघिया परी**
**मी हे माझे ठेले ऊरी ।।'**

एकदा तुला लहानपणी लहानशा सहलीसाठी जाता आले नाही. आम्हाला खूप वाईट वाटले, पण तुझ्या नशिबात परमेश्वराने मोठी सहल लिहिली आहे...''

●●

**डॉ. रामचंद्र देखणे**
५१३ शनिवार पेठ, पुणे ३०

ज्याच्या जवळ जे जे असेल सुंदर, स्वये वाटणी कराया व्हा तत्पर

**त्या** दिवशी शाळेतून येताना बुलबुल पक्ष्याची मंजुळ शीळ ऐकू आली. साहजिकच सगळ्यांच्या नजरा तिकडे वळल्या तसा तो पक्षी भर्रऽऽकन् उडून गेला, पण इतरांचं लक्ष तिथेच होतं. त्या पक्ष्याने आपल्या शीळेने जणू काही आपलं घरटं आणि छोटी छोटी गोजिरवाणी पिल्लंच दाखवून दिली.

मुलांनी घरट्याकडे धाव घेतली. मी ओरडलो, ''अरे थांबा, नका त्रास देऊ त्यांना!''

पिल्लं बाहेरच्या फांदीवर येऊन आईच्या वाटेकडे डोळे लावून बसली होती, पण एकदम त्यांना आनंदाने घट्ट पकडलं. पिल्लं केविलवाणी चिवचिव करू लागली. सुटण्यासाठी धडपडू लागली, पण आनंद आणि सुबोधने त्यांना चांगलंच दाबून धरलं होतं. विशालने वर चढून घरटं काढून घेतलं आणि विलासकडे दिलं. त्या पिल्लांच्या केविलवाण्या ओरडण्याकडे कुणीच लक्ष दिलं नाही. मी सांगत होतो,

''अरे, सोडून द्या त्यांना, तुम्ही घरी गेला नाहीत तर तुमच्या आईला कसं वाटतं? का त्यांचं सुखी घरटं मोडता?''

पण माझ्या सांगण्याकडे कोणाचं लक्षच नव्हतं. पिल्लांना आनंदकडे ठेवण्याचं एकमताने ठरलं.

पिल्लं पावसात भिजली होती. त्यांना व्यवस्थित पुसलं गेलं. अळ्या खायला दिल्या गेल्या. पिल्लं जरा शांत झाली.

घरट्यात फडकं टाकून पिल्लांना ठेवलं आणि वरतून आणखी एक फडकं टाकलं. लगेच बारसं झालं,




सोन्या-मोन्या नावं ठेवली गेली.

पण इकडे त्यांच्या आईचं काय? ती बिचारी आपल्या पिल्लांना नेताना बघून ढसाढसा रडत होती. वेड्यासारखी एकसारखी ओरडत होती. आजच उडायला शिकण्याचा बेत ठरला होता त्यांचा.

इकडे पिल्लंसुद्धा सारखी आई आई करायची, पण या दुष्ट मुलांच्या तोंडून,

''बरं झालं आपण आणलं, नाहीतर पिल्लं पावसात भिजून मेली असती.'' असे उद्गार निघत होते.

पण अरे, आई काय इतकी बेजबाबदार असते? त्या आईने आपली पिल्लं पावसात भिजून मरू नयेत म्हणून काळजी नसेल घेतली?

इकडे पिल्लं रमू लागली. रोज खायला प्यायला मिळत होतं, उबदार अंथरुण होतं. पण दुःख एकाच गोष्टीचं, उडता येत नव्हतं. बाहेर पडायचीसुद्धा बंदी! एक दिवस घरात राहिलो, तर आपण कुरकुर करतो. ती पिल्लं तर सततच घरात!

दुसरी रात्र मजेत गेली, पिल्लं शांत झोपली. तिसरी रात्रही सुंदर गेली. पण चौथ्या रात्री...

चौथ्या रात्री पिल्लं सारखी ओरडत होती. पण आनंदला त्याचा काहीच पत्ता नव्हता. तीन ते चारच्या सुमारास पिल्लांचं ओरडणं बंद झालं, ते कायमचंच!!!

सकाळी उठून बघतो तो काय? पिल्लांचं घरटं रक्ताने माखलेलं! रात्रीतून मांजराने पिल्लांना खाल्लं होतं. सोन्याचं अर्ध धड खाल्लं होतं. तो पंख पसरून निपचित पडला होता. मोन्याची अवस्था फारच वाईट होती. त्याच्या शरीराच्या चिंधड्या झाल्या होत्या आणि मांजराने मुंडकं खाऊन टाकलं होतं.

सगळं संपलं...

अजूनही रोज ती पिल्लांची आई त्या झाडावर बसून रडत असते, ओरडत असते, विनवत असते,

''माझी पिल्लं मला परत द्या, माझं सुंदर, सुखी घरटं मला परत द्या.''

माझं पिल्लं मला परत द्या, माझं सुंदर, सुखी घरटं मला परत द्या.''

माझं मन उदास होतं.

पण, पण आणखी एका बुलबुल पक्ष्याच्या शीळेने माझं लक्ष वेधलं, दोन पक्षी आपल्या तशाच गोजिरवाण्या गोंडस पिल्लांना उडायला शिकवलं होते. पिल्लं धडपडत उडत होती आणि हळूहळू त्यांना उडता येऊ लागलं. जणू सोन्या-मोन्याच उडत होते. त्यांनी आकाशात उंच भरारी घेतली आणि ते दिसेनासे झाले.

सोन्या-मोन्या असते तर तेही असेच उडाले असते.

उंच, उंच. दूर, दूर...

(सत्य घटनेवर आधारित) ●●

**चि. राहुल विद्वांस**
४९/अ, 'यशोस्मृती' भांगरवाडी,
लोणावळा.

**सुस्वर गाणी, अश्रू आणतात मरणाच्या दारी आवर्जून येतात**

**सु**ट्टी सुरू झाली होती. खेळ अगदी रंगात आला होता. दुपारचे बारा वाजून गेले होते. तरी कुणाचे घरी परतायचे लक्षण नव्हते. सुदेश, ध्वजद, रमेश, माधव, बल्लू, प्रथमेश, रणधीर आळीतील सारी मुले सकाळी आठ वाजल्यापासून खेळात अगदी दंग होती. सध्या क्रिकेटचे दिवस होते. मॅचेस नुकत्याच संपल्या होत्या. भारताने यंदा वर्ल्ड कप जिंकल्याने मुले खुशीत होती. अजून दहा वर्षांनी जणू आपण कसोटी सामन्यात खेळायचे आहे या चुरशीने सारा बालचमू खेळण्यात, सरावात दंग झाला होता.

सुशीलाकाकींच्या घराच्या समोरच्या व्हरांड्यात त्यांचा मुलगा अमित एका खुर्चीवर बसून हा खेळ पाहत रहायचा. त्याच्या पायाला लहानपणीच पोलिओ झाला होता. तो उभा राहू शकत असे, चालत असे, परंतु त्याला जोरात पळता यायचं नाही. त्याला वाटायचं आपणही खेळावे. निदान उभे राहून टोले लगवावे. परंतु सुदेश आणि त्याचे मित्र त्याला अशी संधी मुळीच द्यायचे नाहीत. सुशीलाकाकी व्हरांड्यात आल्या. अमित डोळे रोखून क्रिकेट पाहण्यात दंग होता. अमितच्या पायात ताकद नसली तरी त्याच्यात इतर अनेक उत्तम गुण होते. शाळेत तर तो नेहमी पहिला असायचा. चित्रे उत्तम काढायचा. अमितला तसे बसलेले पाहून सुशीलाकाकींना खूप वाईट वाटले. त्या पुढे झाल्या आणि म्हणाल्या, ''अरे रमेशऽ''

त्यांनी मुद्दामच रमेशला हाक मारली. सुदेश हाकेला ओ पण देणार नाही हे त्यांना माहीत होते. तोच या साऱ्यांचा म्होरक्या होता. तो म्हणेल ती पूर्वदिशा. सुदेश खरं म्हणजे शेजारच्याच बंगल्यात रहात होता. रमेश मात्र शांत होता. लाघवी होता. तो कॅच घेण्याच्या तयारीत होता. त्याने काकींना थांबा म्हणून हात केला व चेंडू खेळून संपताच तो धावत पुढे आला. म्हणाला,

''काय काकीऽ?''

''खेळ संपतच आला कारे तुमचा?''

''हो! ही ओव्हर झाली की आम्ही थांबूच. जेवायला जाणार आहोत सारी.''

''मग खेळ संपल्यावर दोन चार बॉल टाकशील अमितसाठी?''

''हो, टाकीन की काकीऽ''.

''खरंच? अमितला किती इच्छा आहे रे खेळायची. तो नुसतं उभे राहून टोले लगावील.''

इतक्यात सुदेश मित्रांना घेऊन पुढे आला व म्हणाला –

''कोण टोले लगावील?''

''अरे आपला अमित खेळणारेस जरा.'' रमेश म्हणाला

''तो लंगडा? तो काय खेळणार?'' सुदेशने कुर्‍यात उत्तर दिले. ''आणि तो पळणार कसा?''

''पण आपण खेळ तर संपवलाय ना? नुसते दोन तीन बॉल टाकायला काय हरकत आहे. पळायचा प्रश्नच नाही येत.'' रमेश म्हणाला.

रमेशच्या हातातील बॉल सुदेशने खसकन् ओढून घेतला अन् फसकन् हसला. साऱ्या मुलांनी त्याचीच री ओढली. रमेशला मात्र राग आला. पण त्याने तो व्यक्त केला नाही. कारण सुदेश साऱ्यांचाच म्होरक्या होता. त्याच्या मनाविरूद्ध वागलं तो आपल्यालाही नाही खेळायला घ्यायचा. रमेशने मान खाली घातली व तोही निघून गेला. अमितच्या डोळ्यात पाणी आले.
सुशीलाकाकींनी अमितच्या पाठीवर हात फिरवला आणि सांगितले,

''अमितऽ, मी उद्या सुदेशच्या घरी जाते आणि काकांच्या कानावर घालते



**ओलावरती माझ्या मुखी तुझे प्रकाशाचे शब्द, लख्ख आतल्या विजेने माझे उजळे प्रारब्ध.**

सुदेशचे मुजोर वागणे.''
''काही नको आईऽ. मला जुलमाचा रामराम नकोय. मी चित्र काढीत बसेन. मला शंकर्स विकलीसाठी चित्रे काढायचीच आहेत.''

किती समंजस होता अमित आणि रोज मुलं खेळू लागली की, अमित व्हरांड्यात बसून चित्रे काढायचा. त्या दिवशी असाच खेळ रंगात आला होता. सुदेश फिल्डिंग करीत होता. रमेशने टोला असा लगावला की चेंडू थेट व्हरांड्यात अमितच्या मागे पडला. सुशीलाकाकी धावत आल्या,

''काय रेऽ. आत्ता अमितला लागले असते म्हणजे?''

''पण लागलंय का?''

त्याने कुर्‍यात उत्तर दिले. त्याच्याशी वाद घालण्यात अर्थच नव्हता. काकी आपल्या कामासाठी आत वळल्या. सुदेश अमितच्या मागे चेंडू घ्यायला गेला आणि त्याचे लक्ष सहज अमित काढीत असलेल्या चित्राकडे गेले आणि तो तेथेच थबकला. कारण अमितने काढलेले चित्र अप्रतिम होते. तो थक्क झाला. अमितने क्रिकेट खेळणाऱ्या मुलांचेच चित्र काढले होते. दोन बॅट्समन आणि अकरा खेळाडू त्याने मैदानावर रेखाटले होते. टोले लगावणाऱ्या बल्लेबाजाच्या चेहऱ्यावरील आवेश, त्याची पोज त्याने उत्कृष्ट रेखाटली होती. यष्टीरक्षकाच्या चेहऱ्यावरील उत्सुकता आणि ताण याचे सूक्ष्म चित्रण पाहण्यासारखे होते. प्रत्येक खेळाडूची आकर्षक पोज. त्यांची विशिष्ट स्थाने सारं कसे नेटके होते. चित्रामध्ये एकच फरक होता आणि तो म्हणजे खाली छान हिरवळ काढली होती. प्रेक्षकांची गॅलरी खचाखच भरली होती. हे सारे त्याने कल्पनेने रेखाटले होते. सुदेशही चित्र काढायचा. पण त्यात ही सफाई नव्हती.

सुदेशच्या डोक्यात एक शक्कल आली. कुटुंबात तो एकुलता एक होता. श्रीमंतीने लाडावलेला तर होताच. उद्धटही होता. खोटं तर बेमालूम बोलायचा. त्याची बुद्धी चांगली होती. परंतु तिचा दुरुपयोग करण्यातच तो पटाईत होता. त्यामुळे अशा काही युक्त्याही त्याला सुचत. त्याच्या डोक्यात एक अशीच युक्ती आली. तो मनाशी म्हणाला. पाहावा तर खडा टाकून. तो म्हणाला,

''अमित, चित्र तर तू छानच काढलंयस रे.''

अमित साधा, भोळा, सरळ होता. आदल्या दिवशी आपल्याला लंगडा म्हणून सुदेशने आपली हेटाळणी केली हेही तो विसरला. तो म्हणाला,

''चांगलं आलंय का रे? शंकर्स विकलीसाठी मी पाठविणार आहे ते.''

''अमित, तुला क्रिकेट खेळायला खूप आवडते का रे?'' सुदेशने परत खडा टाकला.

''आवडतं. खूप आवडतं. पण मला कोण घेतंय खेळायला?''

''मी घेईन.''

''खरंच?''

अमितचे डोळे आनंदाने चमकले.

''पण त्याला एक अट आहे.''

''अट? कोणती अट?''

''हे चित्र तू मला द्यायचंस.''

''छे! नाही बुवा देता येणार. मी स्पर्धेसाठी पाठवणार आहे ते.''

''मी पाठवीन ते स्पर्धेसाठी. माझ्या नावावर.''

''बाप रे! म्हणजे तू खोटं करणार?''

''मग त्यात काय झालं? खोटं कुणाला कळलं नाही म्हणजे झालं!''

''पण ते कळणारच की.''

''कसं कळेल? तू हे चित्र काढलंस हे कुणाला दाखवलंस?''

''नाही.''

''तुझ्या आईलासुद्धा?''

''तिला पण माहीत नाही. चित्र पुरं झाल्यावरच मी तिला दाखवणार होतो.''

''मग झालं तर, म्हणजे तुला व

---

**किती समंजस होता अमित ! रोज मुलं खेळू लागली की अमित व्हरांड्यात बसून चित्रे काढायचा. अनेक उत्तम गुण अंगात असूनही अमित इतरांबरोबर खेळायला मात्र जायचा नाही. इतर मुले क्रिकेट खेळायची, पण अमित नुसताच पाहायचा. अमित इतरांबरोबर का खेळत नव्हता? खेळायला घेण्यासाठी सुदेशने अमितपुढे कोणता पर्याय ठेवला? अमितने तो पर्याय स्वीकारला का? आदि प्रश्नांची उत्तरे वाचू या लीला दीक्षित यांच्या 'रनर' या कथेत.**

# रनर

**डॉ. लीला दीक्षित**

वाटते की कधीतरी असे धावणे संपावे, मनातल्या मातीला निळे आळाळ दिसावे ।

मला एवढ्या दोघांनाच हे चित्र माहीत आहे.''

''हो!''

''मग तू हे कुणालाही सांगायचं नाही हीच माझी अट!''

''पण सुदेश, असं खोटं म्हणजे...

''खोटं मी करतोय ना? माझं मी पाहून घेईन.''

''मग मी चित्र कुठलं पाठवणार रे? आता फार दिवस पण नाहीत उरले चित्र पाठवायला.''

''तू नवीन चित्र काढ आणि हो! तू क्रिकेटचे चित्र नाही काढायचं.''

''मग?''

''दुसरं चित्र काढ. वाटलं तर निसर्गचित्र काढ.''

अमितला काय करावे ते सुचेना. सुदेशच्या कंपूत त्याला यामुळे जायची संधी होती. खेळायला मिळणार होते. ते काय काय जमाडी जम्मत करतात त्यात सहभागी होता येणार होते. परंतु आपले अप्रतिम चित्र त्यासाठी द्यावे लागत होते. शेवटी त्याने ठरवले, द्यायचे चित्र. आपण दोन दिवसात एक छानसं निसर्गचित्र काढू. तो सुदेशला म्हणाला,

''देईन मी चित्र. आज रात्रीपर्यंत पुरं करून उद्या देईन. मग उद्या येऊ ना मी खेळायला?''

''उद्या? उद्या नको. चित्राला बक्षीस मिळालं की मगच ये तू.'' सुदेश चलाख होता.

''आणि नाही बक्षीस मिळालं तर?''

''तरचे मग पाहू.''

अमितच्या मनाचा परत गोंधळ. पण त्याने निर्णय घेतला पाहू या तरी आपले नशीब. त्याने चित्र द्यायचे कबूल केले. दुसऱ्या दिवशी सकाळी सुशीलाकाकी भाजी आणायला बाहेर पडल्याचे पाहून सुदेश अमितकडे गेला आणि चित्र घेऊन घरी आला. त्याने मुद्दामच आईबाबांना दाखवलंच नाही. त्या दोघांनी उगाच प्रश्न विचारले असते. हे चित्र तू काढलेस केव्हा? कल्पना कशी सुचली? कुणी मार्गदर्शन केले? एक ना दोन. या मोठ्या माणसांना नुसते प्रश्न विचारायची फार वाईट सवय असते. चित्र त्याने स्पर्धेसाठी पाठवून दिले.

आणि काय आश्चर्य! बरोबर महिन्याने सुदेशच्या घरी तारच आली. शंकर्स विकलीच्या स्पर्धेत तो भारतात प्रथम आला होता. अमितने दुसरे चित्र काढून पाठवले होते. तेही घाईगर्दीने. त्याला बक्षीस मिळालेच नाही. सुदेशच्या आईबाबांना तर खूप आनंद झाला. त्यांनी सुदेशच्या मित्रांना जंगी पार्टी दिली. त्यादिवशी अमितच्या मावसबहिणीचे लग्न होते. तो गावाला जाणार होता. सुशीलाकाकी आईशी बोलताना त्याने ते ऐकले हेते. अमित यायला नको म्हणून सुदेशने तो दिवस मुद्दाम ठरवला. सुदेशची आई म्हणालीसुद्धा ''अमित आल्यावर बोलावू साऱ्यांना.'' त्यावर सुदेशने मखलाशीने उत्तर देऊन टाकले.

''अगं आई, मी साऱ्यांना निमंत्रण दिले सुद्धा. आता नको बदलायला.''

झकास पार्टी झाली. अमित अर्थात नव्हता. आल्यावर त्याला कळले. वाईट वाटले. रविवार उजाडला. तेव्हा परत ग्राऊंडवर मुलांचा खेळ रंगात आला. अमितला सुदेशने बोलावलेच नाही. त्याला वाटले तो विसरला असेल. तो आपणहून ग्राऊंडवर गेला. नाईलाजाने सुदेशने त्याला चार बॉल टाकले व तो म्हणाला,

''अमित, आता खेळ संपला की परत चार बॉल टाकू हं.''

''म्हणजे तू मला खेळायला नाहीच घेणार?''

''तुझ्या खेळानं रंगाचा बेरंग होतो त्याचं काय?''

रमेश पुढे आला. ''कसला बेरंग रे! पहिलाच टोला अमितने छान मारला की. चेंडू बाऊंडरीवर गेला होता.''

''तुला कुणी सांगितलंय बोलायला. चोंबडा कुठला?''

रमेशने ठरवले. हे फार झाले! आता नाही माघार घ्यायची. तीन चार टोल्यांत अमितने आपल्या खेळाची चुणूक दाखवलीय. तो परत म्हणाला,

''सुदेश, घ्यायचंच अमितला आता. मी होईन रनर त्याचा.'' सुदेशने रमेशला धमकावले,

''तूच येऊ नको. बसा दोघेही!''

मग मात्र रमेश बोलला नाही. अमितला वाटले सांगून टाकावे चित्राचे गुपित! पण आपण कबूल केलंय ना बोलणार नाही म्हणून. दिलेला शब्द पाळावा. त्याच्यात माणुसकी असते, असं आई कितीवेळा सांगत असते. काय करावे बरे! आईलाच खरी परिस्थिती सांगावी. तो परत व्हरांड्यात येऊन बसला. आपला मुलगा सर्वांच्या बरोबर खेळायला गेलाय याच खुशीत सुशीलाकाकी होत्या. अमित लगेच परत आलेला पाहून त्या म्हणाल्या,

''का रे, परत का आलास?''

अमितचा चेहरा रडवेला होता. तो काहीच बोलला नाही. सुशीलाकाकी त्याची समजूत घालीत होत्या.

''आपण बुद्धीबळ खेळू या का?''

आता मात्र अमितचा बांध फुटला. तो म्हणाला, ''आई, तुझ्यापासून मी एक गोष्ट लपवून ठेवलीय.''

''काय ती?''

''शंकर्स विकलीमध्ये सुदेशला बक्षीस मिळाले...''

''मग काय झालं? तुला आनंदच व्हायला हवा. तुला नाही मिळालं म्हणून काय झालं? दुसऱ्याच्या

**वठलेल्या वृक्षांसही ध्यास एक फुलण्याचा आठवीत सुख-वैभव ऋतु वसंत येण्याचा.**

आनंदात आनंद घ्यायला हवा. पूस पाहू डोळे.''

''अगं आई... ते चित्र...''

''त्याचं काय?''

''ते मी काढले होते.'' अमितने एका श्वासात सांगून टाकले.

''काय सुशीलाकाकींचा आवाज नकळत चढला. ''म्हणतोस काय तू अमित? आणि चित्र त्याला कुणी दिलं?''

''मीच दिलं.''

''ते काय म्हणून?''

''त्यानं मला खेळायला घेईन असं कबूल केलं. म्हणून दिलं.'' अमित गहिवरत म्हणाला.

सुशीलाकाकींचे मन भरून आले. आपला मुलगा एवढा गुणी. पण मुले त्याला एकटा पाडतात. खेळायला घेत नाहीत. त्याची मैत्री टाळतात. पण त्यांनी स्वत:ला सावरले. हीच वेळ आहे अमितला समज देण्याची. एकदा खोटेपणा पचला की मुलांना त्याचीच चव लागते. त्या कठोर स्वरात म्हणाल्या,

''अमित, म्हणजे तू खोटेपणा केलास.''

''पण आई, खोटेपणा मी कुठं केला? सुदेशनं केला.''

''म्हणजे तेच! खोटेपणाला तू मदत केलीसच ना? तुझं बक्षीस गेलं दुसऱ्याला, त्याचं मला मुळीच वाईट नाही वाटत. पण माझ्या मुलानं असा खोटेपणा केलेला मला बिलकुल चालणार नाही.''

अमित चक्रावला. आईला सांगितले तर आई आपल्यासाठी हळहळेल तर आईचा वेगळाच पवित्रा. दोन मिनिटे कोणीच कुणाशी बोलले नाही. अमित म्हणाला,

''आईऽ भूक लागली. मला वाढतेस ना?''

''अमित, आज जेवण बंद, तुझ्या खोटेपणाची शिक्षा आणि मी पण जेवणार नाही. माझ्या मुलानं केला त्याची शिक्षा मला पण हवीच की.''

अमितचे मन भरून आले. आपली आई शिस्तप्रिय आहे. बाबा गेल्यापासून तर ती जास्तच कडक वागते. आज बाबा असते तर! पण या तरला अर्थच नाही म्हणा! आपण कितीही रडलो तरी आज जेवण मिळणार नाही हे त्याला ठाऊक होते. तो उशीत डोकं खुपसून झोपी गेला.

सायंकाळी पाच वाजता त्याला जाग आली. आई त्याला उठवीत होती.

''ऊठ अमित, चहा झालाय माझा. दूध प्यायला चल.'' आई किती प्रेमळ आहे. दुपारचा राग तिच्या चेहऱ्यावर नव्हताच. उलट डोळे सुजले होते.

आई पण आपल्यासाठी रडली असावी. तो चटकन् उठला. आईच्या कुशीत शिरत म्हणाला,

''आईऽ चुकलं माझं. मी नाही असा खोटेपणा करणार कधी.''

''चल. समजलं ना तुला? पोहे करते मटार घालून. भूक लागलीय ना तुला?''

आईने पोहे केले. बशीभरून पोहे वर भरपूर खोबरे आणि लाडू अमितच्या पुढे ठेवला आणि म्हणाली,

''अमित, तू खाऊन घे. तू आपल्या तोंडानं कुणालाही काहीही सांगू नकोस चित्र माझं म्हणून. सुदेशची छी: थू झाली तर मला पण वाईटच वाटेल. पण असा खोटेपणा करता कामा नये हे कळावं म्हणून मी गोष्ट त्याच्या वडिलांच्या कानावर मी घालणार आहे.''

सुशीलाकाकी शेजारी सुदेशच्या घरी गेल्या. रविवार असल्याने सुदेशचे बाबा घरीच होते. सुशीलाकाकींबद्दल त्यांच्या मनात आदर होता. अमितचे बाबा गेल्यावर शाळेत नोकरी करून त्यांनी आपला संसार सावरला होता. अमितलाही उत्तम वळण लावले होते. सुदेशचे बाबा म्हणाले,

''या काकी, काही नवल विशेष?''

सुशीलाकाकी आपल्या घरी आलेल्या पाहताच सुदेश मुद्दामच हॉलमध्ये येऊन बसला. काकी चित्राचे सांगणार की काय? त्याच्या मनात भिती दाटली. पाप नेहमीच भित्रे असते. त्याला पाहून काकी म्हणाल्या.

''सुदेशची आई आहे ना घरात?''

''हो! आताच चहा झाला ना. आवरत्येय स्वयंपाक घरात.''

''त्यांना बोलवता जरा? आणि सुदेशला सांगा जरा बाहेर खेळायला जायला.''

सुशीलाकाकींनी सुदेशसंबंधी कधीच कागाळी केली नव्हती. विशेष गंभीर गोष्ट असल्यावाचून त्या आलेल्या नाहीत. सुदेश कसा आहे याची त्याच्या वडिलांना कल्पना होती. त्याचे वागणे त्यांना मुळीच आवडायचे नाही. तो उद्धट होता. आईने काही सांगितले की उलट उत्तरे द्यायचा. फिरतीच्या कारणाने ते सारखे बाहेर असायचे. त्यामुळे बाबांना मात्र भिऊन असायचा. सुदेशच्या आई बाहेर आल्या तसे बाबा सुदेशला म्हणाले,

''सुदेश, तू पळ जरा खेळायला बाहेर. सुदेश आत गेला आणि पडद्यामागे उभा राहिला. कोचावर बसलेल्या बाबांना पडद्याआडून त्याची पावले दिसली. ते पुढे झाले तसा मात्र सुदेश अंगणातून शेजारी बल्लूकडे गेला. त्याचे धाबे दणाणले होते.

सुदेश गेल्यावर काकी म्हणाल्या,

''हे सारं तुम्हाला सांगताना मला दु:ख होतंय. कारण त्यामध्ये माझा

**माझे भांडण न्यायाचे मी तेथे मांडीन, स्वराज्य आहे जन्मसिद्ध हे.... तेही मी मिळवीन.**

मुलगाही सामील आहे.''
'असं कोड्यात नका बोलू. काय ते सांगा पाहू.'' सुदेशच्या आई म्हणाल्या.
''सुदेशला चित्राचं बक्षीस मिळालं ना...''
''त्याचं काय? त्याला पंधरा दिवस होऊन गेले.''
''तेच सांगायला आलेय मी. ते चित्र अमितनं काढलं होतं.''
सुदेशच्या आई जरा संतापी होत्या. आपल्या मुलाचे फाजील लाड तर त्या करायच्याच पण सुदेशवर त्यांचा अनाठायी विश्वास होता. त्या म्हणाल्या,
''कुणी सांगितलं तसं?''
''अमितनं.''
''तो खोटं कशावरून बोलत नसेल?''
''त्याचीच शहानिशा करायला हवी. एकदा मुलांना खोटं करायची सवय लागली की...''
सुदेशच्या आईला वाटलं आपल्या मुलाला बक्षीस मिळालं म्हणून त्यांच्या पोटात दुखत असावं. त्या जरा रागावून म्हणाल्या,
''करू आम्ही शहानिशा. या तुम्ही.''
सुदेशच्या बाबांना राग आला. सुशीलाकाकींचा असा अपमान करावा हे त्यांना मुळीच रुचले नाही. ते म्हणाले,
''काकी, तुम्ही अमितला बोलावून आणा. मी सुदेशला हाक मारतो.''
अमित आणि सुदेश दोघेही आले. बक्षीस मिळालेले चित्र वृत्तपत्रात छापून आलेले होतेच. त्यांनी बाहेर काम करीत असलेल्या राघवला सांगून दोन ड्रॉईंग पेपर आणायला सांगितले. दोघांना रंगपेट्या व कागद दिले. दोन दिशेला बसवले आणि चित्र काढायला सांगितले.
''अहोऽ तेव्हा काढलेले चित्र तसेच्या तसे कसे येईल आता?'' सुदेशची आई तणतणली.
दोघेही चित्र काढू लागले. दीड तास वेळ दिलेला होता. सुशीलाकाकी मुद्दामच घरी गेल्या. सुदेशने चित्र काढलेले नसल्याने त्याला काहीच आठवत नव्हते. अमितने मात्र चित्र हुबेहूब तसे काढले. खेळणाऱ्या मुलांची स्थाने, गॅलरी, जवळची झाडे, सारे त्याच्या डोक्यात होते. दोन्ही चित्र तयार झाली. अमितनेच ते चित्र काढले याची साक्ष पटली. अमितला जवळ घेऊन बाबांनी विचारले,
''तू चित्र का दिलंस अमित?''
''मला खेळायला मिळावं म्हणून.''
अमितकडून सुदेशचे बाबा भडकलेच. मात्र ते विचारी होते. त्यांनी सुदेशला त्याची बाजू मांडायची संधी दिली. पण सुदेशचे तुणतुणे चालूच होते.
''बाबा, अमित खोटं बोलतोय. चित्र मीच काढलंय. आठ दहा दिवसातलं चित्र दीड तासात कसं येणार मला?''
खोटेपणाच्या युक्त्या आणि उत्तरं त्याला पाठ असतच, आता मात्र बाबा संतापले. ते उठले आणि त्यांनी खाड्कन सुदेशच्या श्रीमुखात दिली. सुदेशची आई पुढे झाली. तशी ते गरजले,
''तुम्ही नका मध्ये पडू. तुमच्या लाडाने असा बिघडलाय तो.'' बाबांचा रुद्रावतार पाहून सुदेश काय ते मनात समजला. आता खरं सांगायलाच पाहिजे. त्याचे चित्र स्वत: काढले नाही हे कबूल केले...
...शाळेची वार्षिक परीक्षा जवळ आल्याने मुलांचे क्रीडांगणावरचे क्रिकेट हल्ली थंडावले होते. अमित जोरात अभ्यासाला लागला. त्याला पहिला नंबर टिकवायला हवाच होता. तरच पुढील वर्षी फी माफ झाली असती. तो हुशार होता. परिस्थितीची जाणीव त्याला होती. बल्लू, रणधीर, रमेश, जाधव, प्रथमेश आळीतील सारीच मुले अभ्यासात गर्क होती. नव्हता फक्त सुदेश. तो सारखा उनाडत असायचा. अमितने आपल्या चित्रासंबंधी कुणाला सांगितले तर? एक सतत टांगती तलवार त्याच्या मनावर होती. पण तीन-चार महिने होऊन गेले तरी अमित ही गोष्ट कुणाशीही बोलला नव्हता. त्याने तसे वचन सुदेशला दिले होते. पण स्वत: नेहमीच खोटेपणा करणाऱ्या सुदेशला अमितचे असे मौन अद्‌भुत वाटत होते. अलीकडे तो थोडा विचार करू लागला होता. व्हरांड्यात हातात गलोल घेऊन पटांगणातील फुलपाखरांवर तो नेम धरत होता.
शेजारच्या सुशीलाकाकींनी हे पाहिले. त्यांच्यावर पण सुदेशचा फार राग होता. परंतु एक गोष्ट परवाच्या चित्राच्या प्रसंगाने घडली होती. सुदेश उद्धटपणाने बोलायचा कमी झाला होता. सुशीलाकाकी पुढे आल्या व म्हणाल्या,
''सुदेश, अरे इतक्या छान सुंदर फुलपाखरावर असे गलोलीनं दगड कशाला मारायचे? त्यापेक्षा ती पाहून सुंदर चित्रं काढ.''
सुदेशच्या मनात झट्कन विचार आला. आपल्यादेखत आपली आई आता क्लबमध्ये गेली. तिने हे का सांगितले नाही? पण फुलपाखरांची चित्रे काढण्याची कल्पना छान आहे. तो हसून म्हणाला,
''खरंच काकी, छान आहे कल्पना. मी चित्रंच काढतो.''
सुदेशच्या मनात विचार आला.

**खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे**

सुशीलाकाकींबद्दल, अमितबद्दल आपल्या मनात राग असूनही ही दोघे माझ्याशी नेहमी चांगले का वागतात? चित्राची गोष्ट साऱ्यांना सांगून माझी फजिती त्यांना सहज करता येत होती. ती त्यांनी का केली नाही? परवा तर मला गणिते सोडवायला ये म्हणाल्या, असे का? आपलंच काही चुकतंय का?

खरंच! मुलांच्या मनात असा शोध निर्माण झाला की तो नक्की सुधारण्याच्या मार्गावर पावले टाकू लागणार. सुशीलाकाकी हेच करीत होत्या. अमित व सुदेश एका वर्गात होते. अभ्यास एकच होता. सुदेश सुधारावा, चांगला व्हावा अशी त्यांनाही तळमल होती. सुदेशच्या मनात प्रश्न निर्माण होत होते. पण अहंकार सोडून न दिल्याने त्याची उत्तरे त्याला मिळत नव्हती. बदल निश्चितच होत होता.

आणि अचानक एक घटना घडली. घरापासून शाळा लांब होती. कारण ही बंगल्याची वसाहत गावाच्या बाहेरच होती. सारी मुले सायकलने जात असत. अमित मात्र रिक्षाने जायचा. एक दिवस शाळा सुटली. मुलांचा चमू सायकलवरून घरी निघाला होता. सुदेश आणि रणधीर दोघे सायकल चालवता चालवता गप्पा मारीत होते. रणधीरच्या पुढे डबलसीट म्हणून बल्लू बसत होता. गप्पांच्या नादात एकदम कर्रकन गाडीचा ब्रेक दाबला गेला. त्या अचानक आवाजाने सुदेश गांगरला आणि थेट गाडीवर आदळून रस्त्यावर खाली पडला. रणधीर, बल्लू होते तेही उतरले. तो गाडीवाला साहेब थांबला आणि सुदेशच्या अंगावर ओरडला,

''काय रे, माळ करून रस्त्यात गप्पा मारत जाता? लाजा नाही का तुम्हाला?''

त्याने गाडी बाजूला घेतली व तो निघून गेला. गावाच्या बाहेरच्या वळणावर गाडी वळताना हे घडले होते. रणधीर व बल्लू सुदेशला उठवू लागले. पण त्याला उभेच राहता येईना. पायात भयंकर कळ आली. आता काय करावे? रणधीरने बल्लूला सुदेशच्या घरी पिटाळले. इतक्यात अमितची रिक्षा आली. अमितने रिक्षा थांबवली. सुदेशला गुडघ्याच्या खाली थोडे खरचटले होते. रक्त येत होते. अमितने आपला रुमाल चटकन् तेथे बांधला. रिक्षावाल्याच्या मदतीने सुदेश नको नको म्हणत असताना त्याला रिक्षात घातले. त्याचे दप्तर हातात घेतले आणि तो रणधीरला म्हणाला,

''रणधीर, तू प्लीज सुदेशची सायकल घेऊन मागाहून ये. मी पुढे जातो.''

बल्लूला घेऊन सुदेशची आई बंगल्याच्या पायऱ्या उतरतेय तो अमितची रिक्षा सुदेशला घेऊन फाटकाशी थांबली. आई घाबरलीच होती. अमितने सुदेशला सांभाळून घरी आणले होते. त्यांचे मन भरून आले. इतक्यात काकी आल्या. सुदेशचा पाय जरासा सुजला होता. वेळेत डॉक्टरांकडे जाऊन येणे महत्त्वाचे होते. सुदेशच्या आईने राघवला सांगितले,

''गाडी काढ राघव, सुदेशला डॉक्टरांकडे न्यायला हवे.'' सुशीलाकाकींनी प्रसंगावधान राखून फोन नंबर विचारून सुदेशच्या बाबांना ऑफिसमध्ये फोन केला व त्याही गाडीत बसल्या. सुदेशच्या आईचे डोळे भरून आले. त्या म्हणाल्या,

''काकीऽ थँक्यूऽऽ...

''अं... असं नाही बोलायचं. सुदेशला काही झालेले नाही. नुसता पाय मुरगळलाय. दोन दिवसात बरा होईल तो.''

गाडी डॉ. पानसे यांच्या दवाखान्यापाशी उभी राहिली. डॉ. पानसे हाडाचे तज्ज्ञ होते. त्यांनी सुदेशला तपासले. गुडघ्याच्या खाली एका हाडाला हेअरक्रॅक होती. घाबरण्यासारखे काही नव्हते. पण तीन आठवडे प्लॅस्टर घालावे लागेल, असे डॉक्टर म्हणाले, इतक्यात बाबा आले. तशी सुशीलाकाकी म्हणाल्या,

''मी घरी जाते. अमित आणि मुले वाटत पाहात असतील.''

दोन तासांनी सुदेशला घेऊन आईबाबा आले. सारी मुलं भेटून गेली. वार्षिक परीक्षा असल्याने क्रिकेटचा खेळ मंदावला होता. परंतु रविवारची सकाळ खेळासाठी राखून ठेवलेली होती. सारी मुले पटांगणात जमली. आज नेहमीप्रमाणे व्हरांड्यात अमित बसला होता व शेजारच्या बंगल्यात सुदेशही व्हरांड्यात बसला होता. त्याला पायाला प्लॅस्टर घातले होते. डाव रंगात आला. मुलांचा जोष, ओरडणे, टाळ्या पिटणे चालू होते आणि व्हरांड्यात बसलेल्या सुदेशच्या मनात रिळाचा दोरा उलगडावा तशा आठवणी उलगडत होत्या.

'आज माझा पाय प्लॅस्टरमध्ये असल्यानं मी खेळू शकत नाही. परंतु त्याचं दु:ख किती मोठं असतं ते मी अनुभवतोय. अमितचा आपण किती अपमान केला. त्याला लंगडा म्हणून हिणवलं. छे! आपलं फारच चुकलं. किती वाईट वागलो आपण.' त्याने पलीकडच्या व्हरांड्यात अमितकडे पाहिले. तो निरागस हसला. एवढं रामायण होऊनही तो माझ्याशी मित्रासारखाच वागतोय. सुदेशचा अहंकार गळला. त्याने परत अमितकडे पाहात हाक मारली.

''अमितऽ इकडे येतोस? काय करतोयस?''

''गणिते सोडवतोय.''

**लख्ख हासता हासता झाले मनभर ऊन, मनजडीच्या उन्हाने गेले आभाळ भरून.**

''मग राहू दे.''

''येतो की! काय काम आहे?''

''काम काही नाही. एकटं बसून कंटाळा आलाय. गप्पा मारायला येतोस?''

अमित सुदेशच्या शेजारी जाऊन बसला. स्वयंपाक करीत असलेल्या काकींना खिडकीतून हे दृश्य दिसले. त्यांना आनंद झाला. सुदेश म्हणाला,

''अमित मला क्षमा कर.''

''चल, वेडा कुठला! क्षमा कसली मागतोस? मी मित्र ना तुझा?

''ती चित्राची गोष्ट...''

'कधीच कुणाला कळायची नाही. तू निर्धास्त अस.''

''मग तू माझी मैत्री स्वीकारलीस ना?''

अमितला वाटलं गम्मत करावी. तो गंभीर आवाजात म्हणाला,

''पण माझी एक अट आहे.''

अरे बाप रे! आपण अशा अटी घालतो. आता हा कोणती अट घालणार? सुदेश मनात विचार करू लागला. म्हणाला, ''सांग तुझी अट.''

''सुदेश, उद्यापासून रोज आमच्याघरी अभ्यासाला यायचं. आई मला शिकवते. तुलाही शिकवील.''

अमितच्या या उदार बोलण्याने सुदेश पुरता विरघळला. त्याच्या गळ्यात हात टाकून हसू लागला. क्रीडांगणावरच्या मुलांना अमित आणि सुदेश असे हसताना पाहून झटकाच बसला. ती पळतच पुढे आली. तशी नेहमीच्या जरबेच्या स्वरात सुदेश म्हणाला,

''मी काय सांगतो. मी बरा झालो की तुमच्याबरोबर संघात खेळणार नाही.''

साऱ्यांनी श्वास रोखले. हे काय भलतेच!

''कारण अमित क्रिकेटचे टोले मारणार त्यावेळी मी त्याचा रनर (पळणारा) म्हणून पळत असेन ना!''


''अस्सं होय?'' सारीच एकदम खिंकाळली.

साऱ्यांची एकच गिल्ला केला. ''ब्रेव्होऽ अमित! ब्रेव्हो सुदेश!''

●●

**डॉ. लीला दीक्षित**
'ध्रुव' ४९/२ सहजानंद सोसा.,
कोथरूड, पुणे २९

# 'स्ट्रॉ आणि मासे' खेळ



आपल्या घरात नको असलेले कागदाचे तुकडे असतातच ते तुकडे किंवा पाठकोरे कागद, मासिकं या सर्वांचा वापर आपण हा खेळ बनविण्यासाठी करू शकतो.

**साहित्य** – पाठकोरे किंवा मासिकाचे कागद, स्ट्रॉ, पाकीट बनविण्यासाठी कोणताही रंगीत कागद.

**आकृती** – पाठकोऱ्या किंवा मासिकाच्या कागदावर वेगवेगळ्या आकाराचे १५ ते २० मासे काढून रंगवून घ्या. रंगवलेले मासे आकर्षक दिसायला हवेत. नंतर ते मासे बाह्यरेषेवरून व्यवस्थित कापून घ्या. एका स्ट्रॉचे दोन तुकडे करून घ्या आणि या गोष्टी ठेवण्यासाठी एक पाकीट करून घेऊन त्या पाकीटावर दोन मासे चिकटवून छानसं चित्र तयार करा. हा खेळ दोघांमध्ये खेळता येतो (जास्त मुलांना खेळायचा असल्यास तितकेच जास्त मासे आणि स्ट्रॉ हवेत.) आणि घरी कमी वेळात आणि कमी खर्चात तयार करता येतो.



**हा खेळ कसा खेळाल** – एका टेबलावर हे सर्व मासे पसरून ठेवायचे. खेळणाऱ्या दोघांनी एक एक स्ट्रॉ घ्यायची आणि आपल्याला जो 'मासा' उचलायचा असेल त्या माशावर स्ट्रॉ ठेऊन स्ट्रॉमधून हवा आत ओढायची. हवा आत ओढल्यावर तो मासा स्ट्रॉच्या खालच्या टोकाला चिकटून राहील, तो उचलून आपल्याजवळ घ्यायचा. उचलताना खाली पडला तर पुन्हा प्रयत्न करायचा. ज्याच्याजवळ जास्त मासे जमतील तो जिंकला.

तुमच्या मित्रमैत्रिणींना भेट देण्यासाठीही हा खेळ छान आहे.

●●

**विद्या नारळकर**, एच ३+४ हिमाली सोसायटी, मेहेंदळे गॅरेजजवळ, एरंडवन, पुणे ४

प्रात:काळी गगनपुष्प की सूर्याचे फुलले? सुगंध मकरंदाचे रस हे चहुंकडे झुकले !

**का**र्तिकातली पहाट मोगऱ्याच्या टपोऱ्या कळीसारखी यायची. थंडीत हळूहळू उमलायची. आजी साखरेच्या गोड आवाजात हाक मारायची;

''सईऽऽ उठतेस ना?''

सई डोक्यावर पांघरूण घ्यायची. पांघरूणात स्वप्नं फुलवत राहायची. निळ्याभोर आकाशात परी होऊन फिरायची. फिरता-फिरता फुलांवर पडायची. पुन्हा उठायची. धडपडतच पुढे पुढे जायचे असते ना! रडत बसायचे नसते. जो रडला तो अडला. आजी सईचे पांघरूण हळूच काढायची नि एकदम दिवा लावायची. त्या दिव्याच्या प्रकाशात छोट्याशा गुब्ब्या सईचे डोळे किलकिले व्हायचे. ती डोळ्यांवर हात ठेवून म्हणायची;

''एऽऽ काय गंऽऽ झोपू देत नाहीस?''

आजी तिच्या केसांवरून प्रेमळ हात फिरवीत म्हणायची;

''वेडाबाईऽऽ ही काय झोपेची वेळ आहे? बघ! बघ! कार्तिकातली पहाट किती छान असते! पानांवर दव पडतं. फुलं फुलतात. आभाळ बघ. किती किती नव्या फ्रॉकसारखं छान वाटतं. बघ तर खरी-''

आजी सईला उठवायची. घराच्या मागच्या अंगणात न्यायची. सईला सांगायची.

''हे बघ. झाड वाचायचं असतं. फुलं - पानं वाचायची असतात. हसू नकोस. अगंऽऽ झाड वाचायचं म्हणजे नीट बघायचं. त्याच्या फांद्या कुरवाळायच्या. जो कोणी त्याला ओरबाडील त्याला ठोक द्यायचा. त्याला सांगायचं; तुला ओरबाडलं तर कसं होईल? मग झाडांना का ओरबाडतोस? पानांवर हळुवार हात फिरवायचा. पानांना हलकेच कान लाव. ती तुझ्याशीही कुजबुजतील. पानांना श्वास असतो. श्वासात शब्द असतो. शब्दात भाषा असते. आपले सारे कवी - लेखक अशी झाडं वाचतात नि सुंदर शब्द आपल्याला देतात. ते आपण साठवायचे. मनात आठवायचे नि त्यासारखे सुंदर सुंदर वेचीत - ते आपले करीत - झकास गोष्ट लिहायची.''

आजी सईला घेऊन विठ्ठल मंदिरात जायची. तिथे काकडआरती असायची. पहाटेला निरांजनाने देवाला ओवाळायचे. ओवाळता-ओवाळता आजी अभंग म्हणायची, पदे म्हणायची. आजीच्या पाठोपाठ सारे मंदिर म्हणायचे. साठ-सत्तर माणसे एका सुरात म्हणायची, त्यामुळे मंदिरात प्रसन्न वाटायचे. मंदिराभोवतीचा सारा परिसर आनंदित होत असे. पहाटे फुलांना जसा ताजा वास असतो ना; तसा ताजा वास मंदिराला असायचा. विठ्ठल-रुक्मिणी कमरेवर हात ठेवून शांतपणे निरांजनाच्या प्रकाशात उभे राहात. त्यांचे डोळे तेजस्वी होते. त्या डोळ्यांकडे आजी हात जोडून कितीतरी वेळ बघत उभी राही.

आजीच्या हाताला इवलासा गोड चिमटा घेत सई विचारी;

''आजीऽऽ - सारखी सारखी तिकडे काय बघतेस?''

''ते माझं पुस्तक आहे.'' आजी म्हणाली.

''पुस्तक तर दिसत नाही.'' सई म्हणाली.




उष:कालचे पहाट -पक्षी दवांत भिजुनी आले, पंखापंखातून भरारत क्षणात निघुनी गेले !

''ते फक्त मला दिसतं. त्या पुस्तकातनं भराभरा वाचता येतं नि म्हणायला लागलं की आठवतं?'' आजी म्हणाली.

''हे कसं काय आठवतं?'' सईने विचारले.

''विठोबांकडं बघितलं की आठवतं.'' आजी हसून म्हणाली.

''उद्यापासून मी बघितलं तर मला तुझ्यासारखं म्हणता येईल?'' सईने आजीला विचारले.

आजी म्हणाली; ''अवश्य येईल. त्यासाठी पहाटेशी आणि शब्दांशी मैत्री करायची.''

''ती कशी काय गं?'' सईचा प्रश्न.

''अगंऽऽ – तू ज्याच्याशी बोलशील त्याच्याकडून तुला नवेनवे शब्द किती मिळताहेत हे बघायचं. त्याचं सुंदर बोलणं आपल्या मनाच्या दैनंदिनीत नोंदवायचं. त्याचं सुंदर सांगणं आपल्या मनाच्या कुपीत पक्कं भरून ठेवायचं. मग बघ. तूसुद्धा अशी छान बोलायला लागशील की अरण्यात जशी वनराणी बोलते ना; तशी! वनराणी अरण्यात असते. ती तुझ्यासारखीच आठ वर्षांची असते. ती एकदा का बोलायला लागली की, सारं रान तिच्या बोलण्यावर डोलतं. रानाला असं वाटतं, तिनं बोलतच राहावं. नि आपण ऐकतच राहावं. यासाठी ती सुंदर कविता गुणगुणते.''

आजी मंदिरातून आली. सईच्या हातावर खडीसाखर दिली. सई खडीसाखर चघळायला लागली. आजीने तिला पक्षी दाखविले. जाता जाता तिला भारद्वाज पक्षी दिसला. आजीने तिला थांबवले. ती थांबली. आजीने तिला गप्प राहायला सांगितले. तो भारद्वाज या फांदीवरून त्या फांदीवर उडाला. मध्येच जमिनीवर आला. किंचितसा वाकला. पंख सैल केले. चोच मातीत टाकली. पुन्हा चोच वर केली. गुर्ररकट्... गुर्ररकट् असा आवाज केला नि उडाला. आजी म्हणाली;

''हे सारं तू बघितलं ना!''

सईने होकारार्थी मान डोलावली. आजी तिचा गालगुच्चा घेत म्हणाली;

''मग आता हे मला सांग!''

सई सांगायला लागली. सांगता सांगता तिला काही शब्द आठवले नाही की अं... इं... अम्... अम्... करायला लागली. आजी तिच्या प्रत्येक शब्दाला ''हं. हं. अस्सं. अस्सं.'' करीत दाद द्यायला लागली. तिला काही ठिकाणी शब्द सापडेनात. आजी तिला शब्द द्यायला लागली. आजी तिला योग्य शब्द द्यायची. तिला आनंद वाटायचा. परत ती अडायची. आजी तिला चांगला शब्द द्यायची. असे करीत करीत सईने सांगितले. सई म्हणाली;

''आजीऽऽ तू कोणत्या शाळेत गेली होतीस?''

''हीच माझी शाळा. हा आसपासचा निसर्ग. हे मंदिर, ही नदी, हीच माझी शाळा. खरे शब्द इथेच सापडले. या साऱ्यांशी बोलता बोलता शब्द आपलेसे झाले. शब्द खरं तर इथंच असतात. ते असे शोधावे लागतात. पहाटेच्या वेळी ते बरोब्बर सापडतात. पहाटेला आपलं मन कसं कोऱ्या पानासारखं सुगंधी नि ताजं असतं. त्यावेळी आपण जे वाचू ते ते सारं लक्षात राहातं. म्हणून निसर्गाशी मैत्री म्हणजे शब्दांशी मैत्री. यासाठी निसर्गाशी जितकं बोलाल तितकं तुम्ही निरोगी व्हाल.'' आजी हसत हसत म्हणाली.

तेव्हापासून सई आजीबरोबर रोज अरण्यात नेमाने हिंडायला जाऊ लागली. वनवासींशी मैत्री केली. काही फुलांना नावे होती, ती तिला समजली. ती सुंदर कविता गुणगुणू लागली. आजीची पदे, अभंग, आरत्या सहज म्हणू लागली. या साऱ्या मुळे तिच्या भाषेत लय आली. ती शब्दांशी खेळू लागली. शब्द बोलू लागली. तिच्या सांगण्यात निसर्गाचा गोडवा आपोआप आला. ती हळुवार बनली. जे सांगायचे ते नेमक्या शब्दात मांडू लागली.

एक दिवस – वर्गात सईचा निबंध पहिला आला. सरांनी तिला पुस्तक बक्षीस दिले. बक्षीस दाखवीत सई आजीला म्हणाली; ''आजीऽऽ हे बघ.'' आजी म्हणाली; ''शाब्बास! एक चांगलं पुस्तक म्हंजे सुंदर शब्दांचं रान!'' सई आजीच्या कुशीत शिरत म्हणाली; ''आजीशी मैत्री म्हंजे शब्दांशी मैत्री. म्हणून हे बक्षीस मिळालं.''

आजीने सईच्या तोंडात मलईपेढा घातला. तो सईने गट्ट करून टाकला.

---

●●

**यशवंत पाठक**
'मनोरथ' सप्तश्रृंग सोसायटी,
मु. पो. मनमाड ४२३ १०४.

**शांत स्तब्ध या जलाशयावर तरंगलहरी कुजबुजती, नीरवतेच्या वेलीवरती शब्द पाखरे किलबिलती !**

# पाण्यावरील रंगावली

**वसंत थिटे**

**दी**पावली अन् रंगावलीचे नाते अतूट आहे.

अनादिकालापासून पाण्यावरील रंगावली प्रसिद्ध आहे. महाभारतकाळात दुर्योधनला फसविण्यासाठी हौदातील पाण्यावर रंगावली काढली होती. त्या मयसभेची कथा सर्वश्रुत आहेच.

तशी रांगोळी आज अनेक हौशी कलावंत, विद्यार्थी, विद्यार्थिनी हौस म्हणून पाण्यावर काढण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी कोणी तेलाचा वापर करतात, तर कोणी कोळशाची बारीक भुकटी वापरतात. तो प्रयोग यशस्वी होतोच असे नाही. त्याला अनेक कारणे आहेत. कोळशामध्ये दोन प्रकार आहेत. एक म्हणजे दगडी कोळसा. हा पाण्यावर तरंगत नाही. दुसरा म्हणजे लाकडी कोळसा त्यातही अनेक प्रकार आहेत. आंबा, चिंच, बाभूळ, वड, पिंपळ या वृक्षांचे लाकूड जड असते. त्याचा कोळसाही तसाच जड पडतो. त्याची भुकटी करून वापरायचे म्हटले तर त्याचा फारसा उपयोग होत नाही. काही जंगली लाकडे एकदम हलकी असतात व ती लवकर जळून त्याचा हलका कोळसा तयार होतो. त्याला कांडी-कोळसा असे म्हणतात. फार-फार तर त्याचा उपयोग थोड्या-बहुत प्रमाणात पाण्यावर रांगोळी काढण्यासाठी होऊ शकतो. हे प्रयोग मी स्वत: करून पाहिलेले आहेत. कायमस्वरूपी पाण्यावरील रंगावली जी ८ ते १० दिवस राहू शकेल. ती कशी करायची ते पुढे पाहू.



देवघरातील छोटेसे ताम्हण आपण प्रयोगासाठी घेऊ. हे ताम्हण छोट्या टेबलावर ठेवू. ताम्हणात काठोकाठ (पाणी बाहेर सांडणार नाही याची काळजी घेऊन) पाणी भरूया. ताम्हणाच्या काठाचा काही भाग दिसावा व पाणी स्थिर होऊ द्यावे. त्याच्या आजूबाजूला पंख्याचा अथवा खिडकीतून येणारा वाराही त्याला लागणार नाही याची काळजी घ्यावी. पाण्यात दिसणारा जंतू, किडा किंवा कचरा असता कामा नये. पाणी स्थिर होऊ द्यावे. नंतर संगजिऱ्याची पांढरी पावडर (अगदी बारीक भुकटी) कापडाच्या एका बारीकशा तुकड्यात द्यावे. दोन्ही हाताच्या दोन बोटात कापडाची दोन्ही टोके धरून मधल्या भागात अंगठ्या शेजारील बोटाने ती संगजिरा पावडर अलगदपणे पाण्यावर ताम्हणाच्या काठापासून मध्यापर्यंत टाकावी. पहिला एक हात मारून झाल्यानंतर पाणी हलत तर नाही ना? पाण्याचा पृष्ठभाग कुठे दिसत तर नाही ना? याची पाहणी करून परत दुसरा व तिसरा हात पाण्यावर पावडर

**आनंदाने प्रभा उजळली दिव्य आकाशाची, घराघरांतुनी उमलुनी आली फुले प्रकाशाची.**

पसरवून करावा की, ज्यामुळे पाण्यावर बाहेरील वातावरणाचा कुठलाही परिणाम होणार नाही. हे झाल्यानंतर संगजिरा पावडरमध्ये अगदी हलके पण उठावदार रंग पाहिजे त्या प्रमाणात (पाण्याच्या पृष्ठभागाला पेलतील असे रंग तयार करून घेऊन) कापडाच्या तुकड्याच्या माध्यमातून अगदी हलक्या हाताने सोडावेत.

रंगसंगती हीही एक कला आहे. ती आपली आपल्यालाच विकसित करावी लागणार आहे. ते तुमच्या कल्पकतेवर, सौंदर्यसृष्टीवर अवलंबून राहील. हे झाल्यानंतर एका हलक्याशा कागदावर त्या ताम्हणाच्या आकारानुसार एक नक्षीदार कलाकृती तयार करून (त्याचे प्रात्यक्षिकही शेजारील चित्रात पाहण्यास मिळेल.) तो नक्षीदार कागद पाण्यावर ठेवताना त्या कलाकृतीच्या कागदाच्या बाजूचे चारही कोपरे किंचित दुमडून ठेवावेत. त्याची समोरासमोरील टोके धरूनच तो कलाकृतीचा कागद पाण्याला थोडा सुद्धा धक्का लागणार नाही अशा बेताने ठेवावा. ठेवल्यानंतर क्षणाचाही विलंब न लावता त्या नक्षीदार कलाकृतीवर विविध रंगांची पावडर पातळ कापडाच्या माध्यमातून अगदी हलकेपणाने सोडावी. कलाकृती भरून झाल्यावर कागद अगदी हलक्या हाताने दोन्ही टोके धरून उचलावा व बाजूला ठेवावा. नक्षीचा कागद पाण्यावर ठेवण्यापासून ते उचलण्यापर्यंत एका क्षणार्धात ही कृती होणे आवश्यक आहे. याची काळजी घ्यावी. ''रांगोळी'' हा प्रकार तसा पाहिला तर दगडच, त्याचा वापर कुठेही करू नये. कारण ती पाण्यावर तरंगत नाही.

हे सर्व झाल्यावर लांबूनच ती रंगावली पहावी. पहा किती छान दिसते ती. त्याचा आनंद काही वेगळाच असतो. आपणही प्रयोग करून पाहा व इतरांना सांगा. पाहा आपणाला किती आनंद होतो तो!

आता कागदावरील नक्षीकामाचे थोडक्यात पाहूया. ताम्हणाच्या आकारावर कागदाची कलाकृती बसेल या बेतानेच तो कागद हलकासा असावा. (पातळ ड्रॉईंग पेपर चालेल.)


ताम्हणाचा व्यास ६'' असेल. तर कागदही तेवढाच घ्या. त्याच्या चारही बाजूला एक एक इंच जागा सोडून मधल्या ५'' च्या भागातच कागदावर नक्षीकाम असावे.

६'' x ६'' च्या कागदासमोरील दोन्ही टोके एकमेकाला जोडून घडी घालावी. परत तशीच समोरील दोन्ही टोके धरून आणखी एक घडी घालावी. अशा एकूण ४ घड्या घालाव्यात. मग धार असलेल्या कात्रीने त्या चारही घड्यांवर आपल्या कल्पकतेनुसार आकार घेऊन एक सुंदर नक्षी तयार करावी. मग त्या घड्या उलगडून पाहावे म्हणजे सुंदर कलाकृती झालेली दिसेल. कागद कापताना विशेष काळजी घ्यावयाची आहे. घडीवरील नक्षी दुसऱ्या घडीवर कापली तर जात नाही ना? कलाकृती तयार झाल्यानंतर तो कागद व्यवस्थित (घड्याविरहित) सरळ सपाट असणे आवश्यक आहे. घडी घातलेल्या रुमालाला इस्त्री केल्यावर तो जसा दिसेल तसा नक्षीकामाचा कागद व्हावा. घड्या जर तशाच ठेवून आपण जर ती कलाकृती पाण्यावर ठेवली तर आपणाला पाहिजे तशी कलाकृती करता येणार नाही. हे सगळे अतिशय सोपे आहे. तर मग मित्रांनो, आपण हा प्रयोग करून पहा ना? इतरांनाही सांगा.

●●

**वसंत गंगाधर थिटे,** रंगावली चित्रकार,
'शिल्प वेद', वरदायिनी सोसा.
सुस रोड, पाषाण, पुणे २१.

**निशिगंधापरि भाव मनांतिल यावे उमलून, सुगंध-गीते वाऱ्यावरती द्यावी उधळून.**



# पर्णसाज


डॉ. कांचनगंगा गंधे

***वनस्पतींचा हिरवागार पर्णसंभार म्हणजे सूर्य ऊर्जेचं जैविक चैतन्यात रूपांतर करणारा पोषणकर्ता! पर्ण संभारामुळे कळत न कळत सर्वच सजीवांना दिलासा मिळतो. काही पक्षी पानांचा उपयोग घरटी करण्यासाठी करतात तर काही खाण्यासाठी. अशा या बहुपयोगी पानांकडे बघण्याचा वेगळाच दृष्टिकोन, तसेच त्यांची वैशिष्ट्यपूर्ण रचना आपल्या पुढे मांडताहेत, डॉ. कांचनगंगा गंधे- 'पर्णसाज' या लेखातून***

**सूर्य** पृथ्वीवरील सर्व चैतन्याचा मूलस्त्रोत आहे हे आपल्या सर्वांना ठाऊक आहे. सूर्यापासून निर्माण होणारी अपार ऊर्जा पृथ्वीवर अवतरते, पण या ऊर्जेचे जैविक चैतन्यात रूपांतर करण्याचे काम वनस्पती बिनबोभाटपणे करत असतात. पानांमधल्या हरितद्रव्याच्या साहाय्याने सूर्यऊर्जेचे रूपांतर वनस्पतींचे पोषण करणाऱ्या अन्नात होते. किडे, कीटक, ससे, हरणं इत्यादी प्राणी वनस्पतींवर जगतात. या प्राण्यांवर कोल्हे, लांडगे, वाघ, सिंह यांसारखे प्राणी आणि छोटे, मोठे पक्षी अवलंबून असतात. पृथ्वीवरचं जीवनचक्र, अन्नसाखळ्या, अन्नजाळ्या केवळ पानांमुळेच शक्य होतात.

जीवसृष्टीकडे बारकाईने पाहिलं तर सर्वात विस्मयकारक गोष्ट म्हणजे वैविध्य! हे वैविध्य जीवसृष्टीच्या अंगोपांगातही आढळतं! मुळांचे प्रकार अनंत, खोडांचे, पानांचे, फुलांचे, फळांचे प्रकार अनंत, रंग अनंत, आकार अनंत! त्यांच्या वैविध्याला बहुधा अंतच नसावा. पानांमधलं वैविध्य तर अक्षरश: स्तिमित करणारं आहे. फुलांच्या, फळांच्या आणि बियांच्या रंगांमुळे त्यांच्याकडं जास्त लवकर लक्ष जातं. त्यांच्यातल्या रंगांचं सौंदर्य खरोखरच भूल पाडणारं असतं. बहुतेक वनस्पतींची पानं रंगानं हिरवी असली, अन्न तयार करत असली आणि वनस्पतींचा श्वासोच्छवास त्यांच्यावर अवलंबून असला तरी त्यांच्या आकारात, दिसण्यात कितीतरी वैविध्य आढळून येतं. एवढंच नव्हे तर खोडावर एका विशिष्ट रचनेत, विशिष्ट अंतरावर, सर्व पानांना सूर्यप्रकाश मिळेल अशा वैशिष्ट्यपूर्ण रचनेत त्यांची मांडणी असते. या सर्वच दृष्टींनी पानं पाहिली तर खरोखर वनस्पतींची, खरं तर पानांची लीला अगाध आहे, असं म्हटलं तर वावगं न ठरावं!

वनस्पतींचं बीज जमिनीत रुजतं, बीजातून जमिनीवर अंकुर बाहेर बीजदल घेऊन येतं! बाहेरच्या जगात कसं वागावं, अन्न कुठून आणि कसं मिळवावं याचं त्याला अजून ज्ञान



पानांची रचना

पर्णसंपदा वृक्षवेलीची शिशिरगम होताच गळावी. वसंत येता पुन्हा फुटावी वृक्षांना नवनवी पालवी.

नव्हतं, अजून बराच मोठा पल्ला गाठायचा असल्यामुळे तहान-लाडू, भूक-लाडू बरोबर असावा म्हणून बीजदलाला जमिनीतून आपल्या बरोबरच घेऊन अंकुर आता जमिनीवर आला होता.
बीजदलातला अन्नसाठा आता संपायला लागला होता, पण एव्हाना अंकुरानं अन्न तयार करण्याचं ज्ञान आणि साधन कमावलं होतं. एव्हाना आता दोन-चार पानं फुटली होती, रोपं तयार झाली होती. रोपं वाढीला लागली होती. हळूहळू पूर्ण वाढ होऊन झाडेही तयार होती. त्यामुळे त्यांच्यात आता फरक ओळखूनही यायला लागला होता. पण जवळजवळ सगळ्यांचा रंग सारखा- हिरवा. अर्थात् हिरव्या रंगात अनेक छटा! वनस्पतींच्या प्रत्येक जातीतल्या पानांची मांडणी सारखी, पण प्रत्येक जातीबरोबर पानांची मांडणी, आकार, जडणघडण, पोत, त्यांचं दिसणं, सगळं वेगळं आणि शिस्तबद्ध! पानं स्वत:तल्या जातीच्या नियमानुसार वागणार! त्यांची मांडणी अगदी गणिती! गणिती असूनही क्लिष्ट नाही. एका पेरावर एक पान असेल तर संपूर्ण फांद्यांवर तेच गणित! काही जातीतल्या पानांना असं एका पेरावर एकटं राहायला आवडत नाही, ते आपल्याबरोबर एका पानाला घेऊन येतात. पण दोन्ही पानं एका पेरावर एका बाजूला राहात नाहीत, दोघं पेराच्या/खोडाच्या विरूद्ध बाजूला! पेरू, मधुमालती यांच्यातली शिस्त म्हणजे एकदम लष्करी! पेराच्या दोन बाजूला पानांच्या दोन शिस्तबद्ध रांगा! रुई, मांदार, सदाफुली यांना असला लष्करी खाक्या मान्य नव्हता! त्यांच्यात शिस्त होती. पण दोन जवळच्या, लगतच्या पेरावरची पानांची जोडी एकमेकांशी ९० अंशचा कोन करून उभी असलेली! गोल्ड फुशिया आणि सिलॅजिनेलाच्या खोडावरच्या पानांचं आणखीनच वेगळं! एका पेरावर दोन पानं, पण एक मोठ्ठं आणि दुसरं एकदम छोटं, कुणाला पटकन् न कळेल असं लपलेलं, पण मोठ्याला घाबरून राहिलेलं! कण्हेरीची तऱ्हा अजून वेगळी! एका पेरावर तीन पानं; दोन - एका बाजूला आणि एक बिचारं दुसऱ्या बाजूला! लगतच्या पेरावरच्या दोन पानांना त्या एकट्या पानाची दया आली असावी म्हणून ती एकट्याच्या साथीला आली होती. पण त्यांच्या हे लक्षात आलं नव्हतं की आपल्याच पेरावरचं पान दुसऱ्या बाजूला एकटं पडलंय! पण ते एकटं पाहून लगतच्या पेरावरच्या पानांनी त्याला साथ दिली होती. सगळं कसं बिनबोभाट पर शिस्तीत चाललेलं! काही जातींत तर अनेक आकारांची पानं एकमेकांत गुंतलेली, पण अगदी मुद्दाम बसवल्यासारखी असतात. अशी पानं वरून पाहिली तर सुंदर नक्षीकाम केलेली रांगोळीच वाटावी - अगदी 'मोझॅक'सारखी! प्रत्येक जातीच्या पानांचं ते जणू उघड गुपितच! दुर्वा, तांदुळाचं तिसऱ्या पेरावरचं पान पहिल्या पेरावरच्या पानाच्या बरोबर वर आलेलं! तर चौथ्या पेरावरचं दुसऱ्या पानाच्या वर आलेलं! दर्भाच्या (सायपेरस् रोटन्ड्स) बाबतीत पहिल्या आणि चौथ्या पेरावरच्या पानांची गट्टी जमलेली, ती एका बाजूला; पाचव्या आणि दुसऱ्या पेरावरच्या पानांचं सख्य, तर सहाव्या आणि तिसऱ्या पेरावरची पानं एकमेकांकडे बघत बसलेली! वडाच्या झाडाचं सहावं पान पहिल्या पानाच्या बरोबर वर आलेलं, तर सातवं पान दुसऱ्याच्या वर आलेलं! एवढा हा आटापिटा कशासाठी - तर जगण्यासाठी, प्रत्येक पानाला सूर्यप्रकाश मिळावा आणि प्रत्येक पानानं स्वत:च्या झाडासाठी आणि दुसऱ्यांसाठी अन्न तयार करावं म्हणून!

पूर्ण वाढ झालेल्या वनस्पतीत जवळजवळ सर्वच पानं सारख्या आकाराची दिसतात, पण सॅजिटारिया, रॅननक्युलस या पाणवनस्पतींना हे मान्य नव्हतं. पाण्यात बुडालेली पानं बारीक दोऱ्यासारखी, एका पेरावर पुष्कळ! पण पाण्याबाहेरच्या पेरावरच्या पानांनी त्यांची मांडणी, आकार सर्वच वेगळं करून टाकलं, इतकं की ही एकाच वनस्पतींची पानं आहेत का असा संभ्रम पडावा!

स्वत: ताठ राहून खोडाशी संपर्क साधण्यासाठी पानांनी विविध उपाय योजलेले, आपल्यात थोडे बदल केलेले! काही पानं देठाच्या माध्यमातून खोडाशी संपर्क ठेवून

**पिऊनिया पोसली जी नवे तुषार, अशी वनस्पती मी हो हिरवीगार.**

होती तर काहींना देठाचं माध्यम पसंत नव्हतं! त्यांनी खोडाशी थेट संपर्क साधला होता. देठांचा दिमाख प्रत्येक जातीत निराळा, पण ठरलेला! काहींच्या देठाचा खोडाजवळचा भाग फुगलेला तर काहींनी खोडाशी इतकी जवळीक साधली की त्याचा बराचसा भाग देठाच्या खालच्या भागाने व्यापून टाकलेला, नशीब एवढंच की खोडाला त्यांनी अगदी पातळ पांघरुण घातलं होतं! अशा कितीतरी प्रकारांनी खोडाशी संपर्क साधलेला!

पान आणि खोडाच्या बेचक्यात छोट्या कळ्यांतून नवीन फांद्या फुटतात. पण कळ्या कोवळ्या असताना त्यांच्या संरक्षणाचं काम देठाच्या खाली असलेल्या दोन छोट्या पहारेकऱ्यांकडे असतं! प्रत्येक जातीत ह्या पहारेकऱ्यांनी वेगवेगळं रूप धारण केलेलं! पानाच्या देठाचे तरी किती प्रकार! काही अगदी सरळ, काही पंखांसारखे, काही गारुड्याच्या पुंगीसारखे आणि आतून स्पंजासारखी छिद्र छिद्र असणारे, काही आतून पोकळ तर काही भरीव – असे अनेक प्रकार! सगळ्यांचं कार्य एकच – पानांना खालून आधार देणं, त्याला आपल्या टोकावर एखाद्या पताकेसारखं ठेवणं!

पानाला खरा ताठपणा, कडकपणा देतात त्या पानातल्या शिरा! कोळी जसं जाळं विणतो तसं गुंतागुंतीचं पण शिस्तबद्ध जाळं द्विदल वनस्पतींच्या पानात असतं, पण असली गुंतागुंत एकदल वनस्पतींच्या पानात असतं, पण असली गुंतागुंत एकदल वनस्पतींच्या पानांना मान्य नसते, एवढंच नव्हे तर पानातल्या शिरा एकमेकींना समांतर राहून भेटायचं टाळतात, त्या एकमेकांत न गुंतल्यामुळे पानांना मात्र त्याचा परिणाम भोगावा लागतो, जोराचा वारा आला की पानं बिचारी फाटून जातात! गवताच्या पात्यांना हे चांगलंच माहीत असावं म्हणून त्यांनी आपल्या पानांमध्ये 'सिलीका' लपवलं होतं! गुंतागुंतीच्या आणि समांतर शिरांना एका जाड शिरेनं मात्र 'अभयदान' दिलं होतं – पानातल्या सर्व शिरा त्या जाड शिरेशी संधान बांधून होत्या, कारण त्यातून त्यांना अन्नसामग्री मिळायची, पानात तयार झालेलं अन्न पानाच्या कडांपर्यंत पोहोचवायचं काम शिरांकडे होतं!

पानाच्या आकारातलं वैविध्य किती सांगितलं तरी ते अपुरंच! देवदार, पायनस, ऑरोकॅरियाची (हे फक्त अति थंड व बर्फाळ प्रदेशातले वृक्ष) पानं म्हणजे अगदी बारीक सुया! काही वनस्पतींची पानं लांब, गवताच्या पात्यासारखी, काहींची पानं दोन्ही बाजूला निमुळती, मध्यभागी फुगीर – एखाद्या भिंगासारखी, काहींचा आकार लांबट अंड्यासारखा, तर काहींचा आयताकृती, काही भाल्यासारखी निमुळती होत गेलेली, तर सॅजिटेरियाच्या पानांची खालची दोन टोकं वाढलेली – अगदी बाणासारखी त्रिकोणी! अळूच्या पानांना सॅजिटेरियाच्या पानांची




पानांचे निरनिराळे प्रकार

हलके हलके हसते गळते तरूचे पानन् पान, पानझडीत या ऐका आता शिशिर ऋतुचे गान.

नक्कल अगदी सही सही जमली नसली तरी थोडी फार जमलेली! ब्राह्मीच्या पानांचा आकार किडनीसारखा, टोकाच्या बाजूला अर्धगोलाकार आणि देठाच्या बाजूला खोल खाच असल्यासारखी हंसपदीची पानं म्हणजे जणू अर्धी चंद्रकोरच! कडू बदाम, फणस यांच्या पानांचा आकार म्हणजे जणू उलटं ठेवलेलं अंडं! आपट्याची कांचनांची पानं म्हणजे दोन पानं एकमेकात पूर्ण मिसळून न जाता टोकाकडे अलग झालेली! लिपीयाची पानं म्हणजे सपाट चमचेच, तर कमळाच्या काही प्रकारांतली पानं म्हणजे जेवणाचं गोल ताटच! पिस्टीयाची पानं म्हणजे जणू पाचर! काहींची पानं म्हणजे उघडलेला चुण्याचुण्याचा पंखा! एक ना दोन अनंत आकाराची पानं! पानांच्या कडाही नाना प्रकारच्या! काहींच्या कडा अखंड, काही लाटेसारख्या, वरखाली तरंगणाऱ्या लाटेसारख्या, काहींच्या कडा दंतुरी – त्यातही वेगळे प्रकार – दातांची टोकं वर उचललेली तर काहींची खाली वाकलेली, काहींचे दात काटकोनात आलेले, तर काहींचे दात वाटोळे, तर अननस, पिवळ्या धोत्र्याचे दात एकदम काटेरी, मुळ्याच्या दंतुराचे दात खूप मोठे, पण गोलाकार आणि त्यांना खोल खाचा पडलेल्या! काही प्रकारांत पानांच्या कडा नियमित तुटलेल्या तर काहींमध्ये अनियमित तुटलेल्या!

आंब्यासारख्या काही वनस्पतींची पानं गुळगुळीत; कमळ, रुईच्या पानांवर मेणासारखा पदार्थ पसरलेला त्यामुळे त्यांच्या पानांवर पाण्याचा थेंब टिकणं कठीणच! अळवाच्या पानांचंही तसंच – गुळगुळीत असल्यामुळे पाण्याचे थेंब थोडा वेळ सुद्धा टिकणार नाहीत. काही पानं खरबरीत, केसाळ किंवा लवयुक्त असतात. काहींचे केस मऊ लोकरीसारखे, तर काहींचे लांब, मऊ आणि घट्ट; रुई, मांदारसारख्या पानांवरचे केस आखूड असले तरी ते घट्ट आणि कापसासारखे असतात, तर माक्याचे केस पानावर सर्वत्र पसरलेले असले तरी अतिशय सुरेख असतात, वांगी, डोरली, काटेरिंगणी यांच्या पानांवर काटे असल्यामुळे त्यांच्या वाटेला कोणाला पटकन जाता येत नाही. पानांचा पोत प्रत्येक जातीत ठरलेला – काहींचा पोत पातळ, पापुद्र्यासारखा, काही घट्ट, चामड्यासारखी, काही रसाळ तर काहींवर तेलकट ठिपके, त्यामुळे तेलकट, मेंचट वाटणारी.



आंब्यासारख्या काही पानांची टोकं टोकदार, तर पिंपळाच्या पानाचं टोक लांब, चाबकासारखे – दोऱ्यासारखे, वडाच्या पानांचं टोक एकदम रुंद, अननस, केवडा यांच्या पानांचं टोक एकदम अणकुचीदार! शंकासूर, मेंदी, बाभूळ, गुलाब चिंच, बटाटा, शेंगदाणा, शेवगा, बडीशेप अशा कितीतरी वनस्पतींची पानं संयुक्त आहेत. त्या पानांना एकटं राहायला आवडत नसल्यामुळे आपल्या देठावर त्यांनी अनेक पर्णिकांना एकत्र राहण्याची परवानगी दिली. पर्णिका अनेक असल्या तरी सगळ्यांनी एकजुटीनेच राहायचं असा नियम घालून दिलेला!

पानांचा आकार, पोत, कडा यांच्यात विविधता असली तरी सर्वांचं कार्य एकच – सूर्यऊर्जेचं रूपांतर अन्नात करायचं ! काही वनस्पतींचे देठ इतके नाजूक आणि बारीक असतात की सर्व पानांना सूर्यप्रकाश मिळेल की नाही ही शंका! पण पानांनी ही समस्या

**उपवनी ऋतुराज येता, ये तरुंना पालवी रंग गंधांची अशी जादू मनाला मोहवी.**

स्वत:च सोडवून टाकलेली! रानजाईच्या पानाचा देठ तणाव्यासारखं होऊन पानाला खोडावर अशा ठिकाणी नेऊन ठेवतो की, प्रत्येक पानाला सूर्यप्रकाश मिळतोच. कळलावीच्या पानांची टोकं खोडाला गवसणी घालतात, पानांची टोकं आकड्यासारखी होतात आणि खोडाला विळखा घालतात, त्यामुळे खोडही ताठ आणि पानही ताठ, त्यांची पकड इतकी पक्की की खोडापासून अलग करायचं म्हटलं तरी लवकर सुटणार नाही. निवडुंगाच्या पानांचं तर काट्यातच रूपांतर झालेलं! निवडुंग कमी पाण्याच्या प्रदेशातच रूपांतर झालेलं! निवडुंग कमी पाण्याच्या प्रदेशात वाढणार, त्यांची पानं मोठी असली तर पर्णच्छिद्रातून पाणी बाहेर पडणार आणि निवडुंग सुकून जाणार – पण अस्तित्व टिकविण्यासाठी निवडुंगाने पानांचं रूपांतर काट्यात केलं – त्यामुळे त्याचा दुहेरी फायदा झाला! काही पानांत दंश करणारे केसही असतात. त्या पानांच्या वाटेला कुणी गेलं की, केसांनी दंश केला म्हणूनच समजा! काहींच्या मध्ये चिकट गोंदासारखा पदार्थही असतो. रुई, कण्हेर वड यांच्या पानांत पांढरा, दुधट, चिकट चीक असल्यामुळे त्यांच्या पानाला सहसा कुणी हातही लावत नाही, तर चरणारे प्राणी त्यांच्याकडे ढुंकूनही पाहात नाही. तंबाखू, कॉफी, वसाका चहा यासारख्या पानांमध्ये अल्कॅलॉईड असतं! अळूच्या पानातले सुईसारखे रॅफाईड्स आपल्याला घशाला टोचतच राहतात! नागफणीची काही पानं नागाच्या फण्यासारखं रूप धारण करून घाबरवण्याचं काम करतात! त्यासाठी त्यांना त्यांच्या रंगातही बदल करावा लागतो, काही जातींतल्या पानांच्या फण्या हिरव्यागार नागाच्या फण्यासारख्याच दिसतात.

पानांचं नेहमीचं काम अन्न तयार करणं हे असलं तरी कीटकभक्षक वनस्पतीत काही पानं घटासारखी होतात, त्या घटाचा रंग, आकार खूपच आकर्षक असल्यामुळे छोटे, मोठे कीडे, बेडकासारखे छोटे प्राणी त्यांच्याकडे आकर्षिले जातात आणि तिथेच ते फसतात. त्यांच्या शरीरातलं अन्न ही पानं काढून घेतात! ड्रॉसेरा! माशीचा सापळा यांची पानं दुसऱ्या पद्धतीनं कीटकांना गट्टम करतात. पाण्यात राहणाऱ्या काही वनस्पतींच्या बाबतीत तर आणखीच चमत्कृती पाहायला मिळते. लेम्ना, पिस्टीया, जलपर्णी या वनस्पती पाण्यात वाढत असल्या तरी त्यांच्या पानांचं पाण्याशी बऱ्यापैकी वैर! त्यांना मुद्दाम पाण्यात बुडवून वर काढलं तरी पाणी झटकून लगेच कोरड्या! पाण्यात राहून पाण्याचा आणि आपला काही संबंधच नाही असं दर्शवणाऱ्या! नेच्यांच्या पानांची तऱ्हा वेगळी! पानांच्या पाठीमागे बीजाणूंना रहायला जागा देणार आणि आपली जात टिकवायचा प्रयत्न करणार!

पर्णसंभारामुळे कळत, न कळत सर्वच सजीवांना दिलासा मिळतो. राखी वटवट्या, शिंपी यांसारखे छोटे पक्षी रुंद पानांचा उपयोग घरटी करण्यासाठी करतात, तर मऊ लुसलुशीत पानं घरटं आतून शाकारण्यासाठी करतात. मुनियासारखे पक्षी गवताच्या पात्यांचंच घरटं करतात! काही पानांवर अळ्या, कीडे, कीटक जगतात आणि त्यांना खायला छोटे, मोठे पक्षी येतात. खरोखरच वनस्पतींचा हिरवागार पर्णसंभार म्हणजे सूर्यऊर्जेचं जैविक चैतन्यात रूपांतर करणारा पोषणकर्ता!

●●

**डॉ. कांचनगंगा गंधे**
४१/६६७ लोकमान्यनगर,
पुणे ३०.

## चोरी

एका माणसाला पोलिसांनी पकडले आणि हातकड्या घालून पोलीस चौकीवर नेले. वाटेत त्याला त्याचा एक मित्र भेटला. त्याने विचारले,

''तुला कशासाठी पकडले?''

तो म्हणाला, ''एक दोरी चोरली म्हणून.''


''काय म्हणतोस– केवळ दोरीपायी हातकड्या!'' मित्रानं विचारले.

तो उत्तरला, ''नुसती दोरी नव्हती. कुणीतरी त्या दोरीला एक बैल पण बांधून ठेवला होता.''

**गंधभारल्या शेतात गेले भरारून पक्षी आणि सांडली डोळ्यात पाना फुलाचीच नक्षी.**


# दोऱ्याचा आकाशकंदील


**रेखा जोशी**



**द**रवर्षी दिवाळीत वेगवेगळ्या प्रकारचे आकाशकंदील आपण पाहतो. यावर्षी आपण असाच एक सोपा, वेगळ्या प्रकारचा आकाशकंदील करायला शिकूया. यासाठी लागणारे **साहित्य पुढीलप्रमाणे –** गोल आकाराचा लहान किंवा मोठा फुगा, पुडीच्या दोऱ्याचे रीळ, फेव्हिकॉल, ब्रश.

**कृती –** गोल आकाराचा फुगा घेऊन तो फुगवून दोऱ्याने त्याचे तोंड घट्ट बांधावे. त्यानंतर पुडीचा साधा दोरा घेऊन तो फुग्याभोवती गुंडाळावा. त्यानंतर तो फुगा टांगून ठेवावा व एका वाटीत फेव्हिकॉल घेऊन ब्रशच्या साहाय्याने ते फुग्यावरील दोऱ्याला सर्व बाजूंनी लावावे. तो फुगा तसाच दोन दिवस टांगून ठेवावा. त्यामुळे वरील फेव्हिकॉल सहजतेने सुकून जाईल. दोऱ्यावरील फेव्हिकॉल वाळल्यावर दोरा कडक होईल. त्यानंतर टाचणीच्या टोकाने फुगा फोडून टाकावा. फुगा फुटल्यावर दोऱ्याचा कडक गोल सांगाडा तयार होईल. त्याला वरच्या बाजूने हलक्या हाताने टांगण्यासाठी दोरा बांधा. बल्ब आत जाण्यासाठी जागा ठेवावी. दोऱ्यामुळे नाजूक रेघारेघांचा आकाशकंदील तयार होईल. अगदी लहान आकाराचे फुगे घेऊन त्यांच्यावर दोरे गुंडाळून छोटे छोटे कंदील तयार होतील. अशा छोट्या कंदिलांची माळ देखील फार सुरेख दिसते. मात्र एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी ती म्हणजे पुडीच्या दोऱ्याऐवजीचुकून सुद्धा साधा शिवणाचा दोरा वापरू नका. कारण तो खूप बारीक असतो व फुग्यावर गुंडाळताना त्या दोऱ्यामुळे फुगा आधीच फुटण्याची शक्यता असते. म्हणून नेहमी पुडीचा दोरा किंवा त्याच्याइतका जाड दुसरा कोणताही दोरा वापरावा. रंगीत दोरा वापरला तर रंगीत आकाशकंदील तयार होईल. दोरा गुंडाळताना आडवा–उभा भरगच्च गुंडाळावा. त्यामुळे जाळीचे डिझाईन छान दिसेल. फुगा टांगून त्याला फेव्हिकॉल लावताना त्याच्याखाली जमिनीवर वर्तमानपत्र पसरून ठेवावे. म्हणजे जास्त झालेले फेव्हिकॉल गळून खालची फरशी खराब होणार नाही. मग यंदाच्या दिवाळीत असा वेगळा आकाशकंदील तयार करणार ना?






●●

**रेखा जोशी**
अ/६ संगमश्री सोसा., संगम प्रेससमोर, कोथरूड, पुणे २९.

दीपांनी दिपल्या दिशा, सण असे हा आज दिवाळी, हर्षाने दुनिया प्रकाशित दिसे, आतुनि बाहेरूनि ।

# माझ्या आभाळीचा तारा



चंदनाचा वारा बाई चंदनाचा वारा
कुठे नेला त्याने माझ्या आभाळीचा तारा
तारा कुठे गेला बाई कुठे गं लपला
कुणाच्या गं ह्रदयात उजेड सांडला
उरामध्ये तारा त्याची नीज गेली कुठे
सदाचीच नवी जाग आत पहाटते
उरामध्ये तारा त्याला भय नाही काही
वाट नवी पावलाशी रोज येत जाई
इवलासा तारा त्याचे ठिणगीचे तेज
तेजाला त्या जोजवाया सुख येते रोज
सुख येते रोज जशी बाळासाठी आई
खुळ्या ताऱ्यासाठी गोड गाते ती अंगाई

**अरुणा ढेरे,** 'विदिशा' १०, अभिराम,
तुळशीबागवाले कॉलनी, सहकारनगर, पुणे ९.

# माझी बहीण



माझी बहीण राखिते रोज शेतामधी शेळ्या
माझी बहीण म्हशीच्या पाठीवर करी पाळ्या

माझी बहीण घासिते रोज भांडे घरातले
माझी बहीण झाडिते अंगणही दारातले

माझी बहीण झेलिते कशा पाऊसपागोळ्या
माझी बहीण शेंदिते रोज आडावर पाणी

माझी बहीण म्हणिते रोज जात्यावर गाणी
माझी बहीण लाटिते कशा पुरणाच्या पोळ्या

आता होणार लगीन माझी बहीण जाणार
राही रांजण रिकामा नाही जातंही गाणार
सोबतिनी बहिणीच्या झाल्या कशा येड्याखुळ्या

**इंद्रजित भालेराव,** एकनाथनगर, परभणी ४३१ ४०१.

**उपमा नि उत्प्रेक्षांची नाही देखणी आरास, भावनांनी ओथंबलेली शब्द फुलांची ही रास ।**

# चला

नवे मित्र एकमेका भेटवीत चला
नव्या उन्मेषांचे क्षण साठवीत चला।।


कोरड्या शब्दांचे नका भालदार होऊ
जिथे पुरुषार्थ नाही तिथे नका जाऊ
आदर्शांना जन्मभर आठवीत चला।।


जिथे झुंडशाही बोले इमान भंगले
तिथे मौन सौजन्याचे मुळी नाही भले
ज्याची त्याला योग्य जागा दाखवीत चला।।

व्हायचे आहे ना काही निर्धार हा पक्का
ह्याच्यासाठी किती कष्ट मागे सरू नका
अपयश आले त्याला दटावीत चला।।३।।

विश्वामध्ये बंधुत्व ही भरायचे आहे
दीन दुबळ्यांचे बंधुत्व ही भरायचे आहे
जगभर प्रेम, माया पाठवीत चला।।४।।

**किशोर पाठक,** विठ्ठल पार्क को-ऑप.हौ.सो.,
श्रीरंगनगर पंपिंग स्टेशन, गंगापूर रोड, नाशिक ४२२००५.





# इवल्याचे गाणे

क्षणाक्षणानेच होतसे दिवस
दिवसांनी वर्ष संपूर्णसे.
थेंब थेंब नदी... ओढा नदी वाहे
समुद्र हा आहे भव्य रूप.
कणकण माती तिचा हा पर्वत
उंच आणि ताठ उभा आहे.
फूल फूल गुंफा होई पुष्पहार
सावळा ईश्वर शोभीवंत.
एक एक एक मिळोनी अनेक
अल्पाचे कौतुक विस्तारले.
शब्द शब्द अर्थ याचा झाला वेद
चिंता आणि खेद मावळले.
श्वासाश्वासानेच उदंड जीवन
ऐसे महिमान इवल्याचे
छोटे साठविता मोठेपण मिळे
मधाचे हे पोळे बिंदु बिंदु
इवल्या बीजाचा होई तरुवर
फळेही मधुर रसपूर्ण.
ओठी असावे हे इवल्याचे गाणे
त्यायोगे जीवने फुलतील !


**दत्ता हलसगीकर,** २० अ, जवाहरनगर,
विजापूर रस्ता, सोलापूर ४१३ ००१.

**कवितेने शब्द दिला; शब्दाला अर्थ दिला, अर्थाच्या पाठीशी; प्रतिभेचा मंत्र दिला.**

# 'जय विज्ञान'

*अजातशत्रू देश आमुचा आणि शांतता आमुचा प्राण*
*किसान आणि जवानांसवे तरिही गर्जू 'जय विज्ञान'*
*अखिल धरा हे कुटुंब आमुचे हेच ऋषींचे इथल्या बोल*
*माणुसकी हा धर्म आमुचा, प्राण दुज्याचाही अनमोल*
*सत्य, अहिंसा जपण्यासाठी शौर्य लावते पणास प्राण*
*किसान आणि जवानांसवे तरिही गर्जू 'जय विज्ञान'*
*दुर्बलतेला जगी न किंमत, कोर तयाचे ऐकी बोल?*
*दुर्बल सज्जनही अपमानित, ज्ञान तयाचे जाई फोल*
*शस्त्र घेतले हाती केवळ राखाया आईचा मान*
*किसान आणि जवानांसवे म्हणुनी गर्जू 'जय विज्ञान'*
*आप्तसख्यांशी लढला अर्जुन जरिही नव्हते वैर उरी*
*फुलबागांना जपण्यासाठी शस्त्र लागते आज करी*
*बळकट आमुच्या बाहुंमध्ये विसावूनी घे शांती तान*
*किसान आणि जवानांसवे आता गर्जू 'जय विज्ञान'*

**सौ. राजलक्ष्मी देशपांडे,** ११ चिरानी, आम्रपाली अपार्टमेंट,
सर्व्हे नं. ६६८, बिबवेवाडी, पुणे ३७.





# आद्य विद्यानिधी

आणि उदो अस्ताचे नि प्रमाणे।
जैसे न चलता सूर्याचे चालणे।
तैसे नैष्कर्म्यत्व जाणे।
कर्मीची असता।

ज्ञानेश्वरी : ४.९

ज्ञानदेव प्रज्ञावंत।
थोर आद्य विद्यानिधी।।
गूढ सृष्टीचे तयांना।
ज्ञात शास्त्रज्ञांच्या आधी।।१।।

कोपर्निकस आपुले।
गॅलिलिओसी पदवी।।
तेचि सृष्टिज्ञान सांगे।
ज्ञानदेवांची ही ओवी।।२।।

अध्यात्म ते सांगताना।
पारमार्थिक सिद्धान्त।।
ज्ञानदेवांची ही दृष्टी
देई भाविका दृष्टान्त।।३।।

'सूर्य सिद्धान्त' सांगतो।
आर्यभट्ट निज ग्रंथी।।
शिष्यगण त्याचा सारा।
अनुसरे त्याच्या पंथी।।४।।

परि या सर्वांच्या आधी।
म्हणितले ज्ञानदेवे।।
'सूर्य चालतचि नाही'।
कसे तयांना हे ठावे?

**गंगाधर महाम्बरे,** 'शिवरंजनी', कलानिकेतन
पुणे-सातारा रस्ता, धनकवडी, पुणे ४३.

**कवितेने काय दिले? कवितेने प्राण दिले थकलेल्या श्वासांना जगण्याचे भान दिले.**

# नवे पर्व घडवू

चला गड्यांनो चला आपुले श्रममंदिर उभवू।
देवाजीच्या देण्यामधुनी नवे पर्व घडवू।।धृ।।


जे जे आहे अपुल्या जवळी ते हाती धरणे।
बिंदूमधुनी सिंधू सागर त्याचाही करणे।
कणाकणांतील चैतन्याला अधिकाधिक फुलवू।।१।।

सदा आळशी देवप्रसादा वाऱ्यावर उधळतो।
उद्योजक तो खरा प्रसादा ज्ञानामध्ये मिसळतो।
नवीन तंत्रे, नवीन यंत्रे विकासार्थ बनवू।।२।।

जुने सनातन कवळुन आता किती काळ चालणे।
नवीन ज्ञाना, नव विज्ञाना अखंड आचरिणे।
विश्वासाने चक्रगतीला आसातुन फिरवू।।३।।

एकामधुनी अधिक निर्मिणे ही सत्प्रवृत्ती।
विचारधारा अशी असावी कशास निवृत्ती।
फिरत्या सूर्यामधुनी अभिनव तारांगण भरवू।।४।।

**रवींद्र भट,** सी ४६, विजय कॉम्प्लेक्स,
शास्त्रीनगर, पुणे २९.





# कुणी ना कुणी

झाडांतळी राहतां रे कशाला
घ्या आपुल्या झोपड्या बांधुनी
उद्योग देण्यास पोटापुरेसा
येतील दाते कुणी ना कुणी... १
राबून अन्नविना कमविती जे
असे भेटती भोवताली अडाणी
झटुनी अशांना शहाणे कराया
जातात तेथे कुणी ना कुणी...२
जिथे रोगराई, किती दीन रोगी
व्यथा सोशिती औषधांवाचुनी
करामाजि सेवा, मनामाजि माया
असे साह्य देती कुणी ना कुणी...३
'जगी एकटा मी, कुणी साथ नाही'
घोकूं नको रे तुझ्या हें मनी,
सन्मित्र होण्यास, संगे फिरायास
असे जन्मलेला कुणी ना कुणी...४
बाळें तिची झुंजती आपसांत
माता बघे खिन्नशा लोचनीं
पुरुषार्थ करुनी तिज सौख्य देईल
असा पुत्र व्हावा कुणी ना कुणी...५

**संजीवनी मराठे,** १६ सुखनिवास, १०२/२ अ,
शिवाजीनगर, पुणे १६.

**कवितेने पंख दिले, व्यापकसे व्योम दिले, घरट्याच्या कौलांना स्वप्नांचे रंग दिले.**

# आंब्याची कोय - लावते सोय

एकदा संकेतने
गंमतच केली
आंबा खाऊन कोय
बागेत फेकून दिली.

आंब्याची कोय
पावसात भिजली
अनाहुतपणे
बागेत रुजली

रुजता रुजता
म्हणाली कोय,
'तुमची उद्याची
करीन सोय.

जर आज खतपाणी
तुम्ही पाजाल मला
सावली नि फळं
उद्या देईन तुम्हाला'

खत खाऊन पाणी पिऊन
झाड मोठं झालं
झाडाचं जीवनगाणं
आभाळावर गेलं

झाडावर पाखरं
गातात गाणी
त्यांचं गाणं
ऐकलंय का कुणी?

माणसा माणसा, आज
तू चिमूटभर देशील
तर उद्या झाडाकडून
भरभरून घेशील

**सुरेश सावंत,** 'मथुरेश' शाहूनगर, नांदेड ४३१६०२.

# निळ्या आभाळाच्या खाली...

निळ्या आभाळाच्या खाली हिरवे डोंगर ।।धृ ।।
लाल पायवाट त्यात नक्षीची सुंदर.

डोंगराच्या माथ्यावर गायींचा कळप
दरीभर पाखराचा घुमतो आलाप
खळाखळा वाहतो नि नाचतो निर्झर ।।१ ।।

रंगरंगुनिया गेली किती रानफुले
तालावर घेती जसे झुल्यावर झुले
किती बाई निसर्गाचे रूप मनोहर ।।२ ।।

पोर पळे घेऊनिया गवताचा भारा
गोल गोल फिरुनिया मागे धावे वारा
खट्याळ वाऱ्याने तिचा धरला पदर ।।३ ।।

सांजवेळ झाली चला घराकडे निघू
खाली पहा, आजूबाजू नका आता बघू
काळोख घालतो इथे मायेची पाखर ।।४ ।।

**डॉ. संगीता बर्वे,** ९१/अ स्नेहलबाग,
तुळशीबागवाले कॉलनी, पर्वती, पुणे ९.

**वसुंधरेच्या वनावनांत ऋतुरंग ओघळतो, आणि माझ्या मनात श्रावण बरसतो.**

# नीतीचा लावू दीप

मानव्यरूप बर्फाला काढूया पाण्यावरती
नीतीचा लावू दीप, मूल्यांची लावू ज्योती ।।धृ ।।
माणूस तुझे रे नाव
ही धरा आपुले गाव
राहू या आनंदाने, जोडूया नातीगोती... ।।१ ।।

हृदयीचे हृदयी द्यावे
संवादे प्रेम लुटावे
गाऊ या जीवनगाणे, गुंफूया हसरे मोती... ।।२ ।।


दया, क्षमा नि शांती
त्यागाची महती मोठी
त्यागूया क्षुद्रपणाची नि कठोरतेची वृत्ती... ।।३ ।।

जे सुंदर आणिक सत्य
ते सदैव असते नित्य
नेऊया मांगल्याची त्या दिगंतराला कीर्ती... ।।४ ।।

**आश्लेषा महाजन,** २३० चित्ररेखा सोसायटी,
सहकारनगर १, पुणे ९.




# झेप



चैतन्याच्या लाटेवरले पक्षी, आम्ही मुले
नव्या दिसाची पहाट आमुच्या पंखावरती फुले!
गगनभरारी घेत दिशांचे हात हाती घेऊ
उजेडवेड्या आकांक्षाचा सूर्य आम्ही पाहू
गिरवू काळोखात, रूपेरी काळाची पाऊले!
नजरा आमुच्या न्याहाळणाऱ्या पाऱ्यांची झाडे
खुशाल आम्हा म्हणोत कोणी अजाण, मनकवडे
बोटाच्या दोरीवर फिरते हवे कुणा बाहुले!
पोकळीतुनी घुमवू आम्ही यशोदुंदुभी गान
स्वच्छ मोकळ्या श्वासासाठी भले पाखडू प्राण
झेप आमुची आकारताना अवघे अंबर झुले!

**कल्याण इनामदार,** ३९/२/२, अर्चना सोसायटी
सी-२७, एरंडवणे, पुणे ३८.

**अशी असावी कविता, जिने माझ्याशी बोलावे, माझे सारे अंतरंग, पुरे प्यापून टाकावे.**



# खिडकीबाहेरचे पुस्तक

वर्गात बसलेलो असतो मी, पुस्तक समोर ठेवून!
बाई बघत असतात, चष्म्यामधून!
पण, ही खिडकी करते घोटाळा,
त्यातून दिसतंय आंब्याचं झाड;
जवळच्या गवतात एक गाय,
वासराचे करीत असते लाड!
हेही दिसत रहातं, डोळ्यांच्या कोपऱ्यातून
वर्गात बसलेलो असतो मी, पुस्तक समोर ठेवून!

वाट चुकून फुलपाखरू, बाग समजून येतं,
फांदी समजून हळूच, माझ्या खांद्यावरती बसतं!
हळूच उडून जातं! केव्हातरी मग,
मन माझं पंखांवरून, त्याच्या पुढं जातं!
डस्टर टेबलावर वाजतो, पहातो मी दचकून
वर्गात बसलेलो असतो मी, पुस्तक समोर ठेवून!

हिरव्या पानांमधून मधूर 'कुहूकुहू' येते,
इतके दिवस, माहीत नव्हतं, झाडसुद्धा गाते!
मध्येच बाई विचारताना, गणित माझे चुकते,
पुन्हा थांबून, लक्ष माझे, झाडाकडे जाते!
खिडकीबाहेर पुस्तक, ठेवावा अधूनमधून
बाई बघत असतात, चष्म्यामधून!

**प्रवीण दवणे,** ब/३०३, राजहंस,
लुईसवाडी, ठाणे ४.

# एक एक धागा विणावा

एक एक धागा विणावा
एक एक वस्त्र गुंफावे

एक एक सूर जुळवावा
गाणे गावे नवे नवे

फूल एक एक तोडावे
हारामध्ये गुंफावे... ॥१॥

...हातामध्ये हात गुंफूनी
एक एक मित्र जोडावा.

त्याच्यासंगे करीत हितगुज
मार्ग आपुला चालावा


माय–पित्यांची करिता सेवा
माथा चरणीं ठेवावा;

माया त्यांची घेऊन सोबत
दिवस सुखाने कंठावा! ॥२॥

एक 'कर्म' जे करी घेतले
अर्ध्यावर ते सोडु नये

सायंकाळी प्रभुच्या पायीं
वंदन करण्या विसरू नये! ॥३॥

**वि. म. कुलकर्णी,** 'कमळवेल' ६१/४८,
एरंडवणे, पुणे ४.



तुझे नितळ नाजूक, गीत आलं हे कुठून? परीप्रमाणे कोणत्या, फुलामधून उठून?

# उद्ध्वस्त

**डॉ. संजय ढोले**

***रसूल मितभाषी असल्याने स्वत: कुणाशी जास्त बोलत नसे. प्रा. कानडे हेच त्याचं श्रद्धास्थान, सर्वस्व होते. पहिल्या दिवसापासूनच तो झपाटल्यागत अभ्यासाला लागला होता. कोण होता रसूल? प्रा. कानडेंशी त्याचं काय नातं होतं? कसला अभ्यास तो करत होता? काय शोधायचं होतं रसूलला? या प्रश्नांची उत्तरे मिळवू या, संजय ढोले यांच्या 'उद्ध्वस्त' या कथेतून.***

पदार्थविज्ञान विभागप्रमुखांची केबीन, प्रा. कानडे कुठली तरी प्रशासकीय फाईल चाळत बसलेले. दारावर टक टक आवाज होतो. ''यस्!...'' प्रा. कानडे फाईल बघत, खाली मानेनेच उत्तरले. किर्र्रऽऽ... आवाज करत दार उघडलं. त्यातनं स्वर आला.


''मे आय् कम इन...''

''यस्... कम् इन...'' प्रा. कानडे जागेवरून न उठता उत्तरले.

परवानगी मिळताच ती व्यक्ती आत येऊन उभी राहते... काही क्षण शांततेत जातात.ी पुढे अजून काही वेळ प्रा. कानडे फाईल वाचण्यात मग्न असतात. लक्षात येताच जाड भिंग असलेल्या आपल्या चष्म्यातून ते समोर पाहतात. समोर पंचविशीतला एक तरुण. गोरटेला... किडकिडा... गंभीर... स्वत:तच हरवल्यासारखा. डोळ्यांत चमक, वेदना आणि विद्रोहही... प्रा. कानडे विचारतात.

''यस मिस्टर...''

''माय् नेम इज् रसूल... रसूल दर.'' त्यानं तात्काळ आपलं नाव सांगितलं.



''काय, हवंय् तुम्हाला...'' प्रा. कानडेंचा प्रश्न.

''सर! आय् वाँट टू जॉईन फॉर रिसर्च.'' रसूलचा आत्मविश्वासपूर्ण स्वर.

''कुठून आलात...''

''काश्मीर...''

''कोणती युनिव्हर्सिटी?''

''जम्मू''

''एम्. एस्सीला किती मार्क्स आहेत?...''

''डिस्टींक्शन... विद्यापीठात पहिला आलो.'' रसूलने अधिक माहिती दिली.

''नेट पात्रता परीक्षा पास आहात?''

''हो...''

''कधी?''

''जून १९९६''

''आता सप्टेंबर ९८. दोन वर्षांमध्ये काय केलं?''

प्रा. कानडेंनी शंकेनं विचारलं.

''भरकटत होतो... दिशाहीन...'' रसूलचा कोरडा स्वर. उत्तरानं प्रा. कानडे दचकले. पण त्याच वेळेस रसूलचा निर्विकार चेहरा पाहून त्यांनी स्वत:ला सावरलं. एव्हाना हा हुशार मुलगा आहे हे त्यांच्या लक्षात आलं होतं. त्याचं विक्षिप्त उत्तर मनावर न घेता ते पुढे विचारते झाले,

''ओ. के. तुझी सगळी

**थरथरत्या हृदयावर अजुनी, डंख मनाचा सलतो आहे अंधाऱ्या गर्भात लपूनी, उषा उद्याची हसत आहे.**

प्रमाणपत्रं दाखव.''

''आत्ता माझ्याजवळ नाहीत सर! आणि तशी शक्यताही नाही. फक्त अंगावरचे कपडे आहेत.'' रसूलचा पुन्हा विक्षिप्त वाटणारा खुलासा.

प्रा. कानडेंच्या चेहऱ्यावरचे भाव क्षणात बदलले. रागाची लकेर त्यांच्या चेहऱ्यावर ठेवीत त्यांच्या तोंडून शब्द बाहेर पडलेच.

''यू स्टुडंट्स आर व्हेरी केअरलेस... संशोधन करायचं तर, सिद्धता, पूर्ततेसाठी सर्व प्रमाणपत्रे जवळ असावी लागतात. एवढा साधा कॉमन सेन्स नाही का!''

''आय् डू हॅव कॉमन सेन्स सर! आय एम् व्हेरी सॉरी... माझ्याजवळ सर्व होतं... पण यापूर्वीच ते सारं उद्ध्वस्त झालं.'' रसूल शून्यात पाहत म्हणाला.

'उद्ध्वस्तऽऽऽ...'' प्रा. कानडेंच्या तोंडून नकळत उद्गार बाहेर पडले.

''होय... उद्ध्वस्त... माझं भावविश्व... माझं कुटुंब... माझं घर... सारंच आणि त्या बरोबरच माझी प्रमाणपत्रेही.'' रसूलचा कापणारा आवाज.

प्रा. कानडे त्याच्या हेलावून टाकणाऱ्या आवाजाने व्याकूळ झाले. आपण त्याची पार्श्वभूमी समजून न घेताच, त्याला बोललो म्हणून ते थोडे ओशाळले. समोर खुर्चीकडे निर्देश करीत प्रा. कानडे म्हणाले. ''रसूल... बैस... आणि मला सविस्तर सांग. तुझं घर, कुटुंब... उद्ध्वस्त कसं झालं? कुणी केलं?''

रसूल खुर्चीत बसला... त्यानं प्रा. कानडेंकडे पाहिलं. प्रथम त्याचे ओठ नुसतेच थरथरले व गोठणारे शब्द बाहेर पडले.

''अतिरेक्यांनी...''

''कायऽऽ...'' आश्चर्याने प्रा. कानडे उत्तरले.

''होय... आई-वडील, मोठी बहीण, लहान भाऊ सारे अतिरेक्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडले. मी त्याच वेळेस माझा निकाल घेण्यासाठी विद्यापीठात गेलो होतो. म्हणून वाचलो. पहिला आलेलो मी आनंदात, बेहोशीत घरी परतलो आणि समोरचं दृश्य पाहून पाषाणासारखा बघतच राहिलो. माझं आपलं, सजीव, निर्जीव सारंच उद्ध्वस्त झालं होतं. तेथूनच माझ्या आयुष्याला कलाटणी मिळाली. या आघाताने मी नुसताच भरकटत राहिलो. दिशाहीन. भानावर आलो तेव्हा दिशा शोधू लागलो. तुमच्यापुढे उभा आहे ते दिशा मिळावी म्हणूनच आणि तशी मला आशाही आहे.'' रसूल बोलत होता... कधी त्वेषाने, कधी हळव्याने, तर कधी अजीजीने. बोलताना त्याचे डोळे किंचितसे ओलावले होते. पण मनात तो अजूनही अनंत यातना सहन करीत असल्याचंच, त्याच्या चेहऱ्यावरून जाणवत होतं. विनंतीच्या स्वरात पुढे तो म्हणाला.

''सर! माझ्यावर तुम्हाला विश्वास ठेवावाच लागेल. मला काही दिवस मुदत द्या. मी त्या आतच सर्व काही मिळवीन.'' प्रा. कानडे रसूलवर ओढवलेल्या हृदयद्रावक प्रसंगानं सुन्न झाले होते. त्यांनी दीर्घ श्वास सोडला. रसूल हुशार, मेहनती व तेवढाच प्रामाणिक वाटला. त्याला कुठल्याही पातळीला जाऊन मदत करणं हे एक माणूस म्हणून आपलं कर्तव्यच आहे, असंच त्यांना वाटत होतं. मनाशी ठरवताच ते म्हणाले,

''ओ. के. रसूल... डोन्ट वरी... फर्गेट अबाऊट ऑल दी फॉर्म्यालीटीज... मीच तुझं पालकत्व स्वीकारतो.''

रसूल क्षणभर बावरला... अनपेक्षितपणे त्याला सर्व मिळालं होतं. समोर बसलेल्या प्रोफेसरांचाच तो पाल्य झाला होता. नकळत त्याचा कंठ दाटून आला.

''थँक्स सर! थँक यू व्हेरी मच्.'' आणि बांध फुटावा तसे त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. गेल्या काही वर्षात तो प्रथमच मोकळेपणानं रडत होता. सौम्य हुंदके त्याच्या तोंडून निघत होते. प्रा. कानडेंनी त्याला कुशीत घेऊन हलकेच थोपटलं. सांत्वन केलं आणि त्याच्या खांद्यावर हात ठेवत म्हणाले;

''रसूल... वुड यू लाईक टू वर्क वुईथ मी.''

''यस् सर!...''

''तुला कुठल्या विषयात संशोधन करायला आवडेल.''

''तुम्ही सांगाल तो...'' रसूल मोकळेपणानं बोलला.

''सध्या माझा ग्रुप वेगवेगळे मूलद्रव्य असलेल्या पदार्थांच्या 'दीपन' (Luminescence) या गुणधर्माच्या संशोधन प्रकल्पावर काम करीत आहे.'' प्रा. कानडे माहिती देत म्हणाले.

''मलाही त्यावरच काम करायला आवडेल सर!'' रसूल आनंदानं सहमत होत उत्तरला. प्रा. कानडेंनी त्याला पुन्हा थोपटलं. प्रोत्साहन देत, प्रयोगशाळेविषयी माहिती देत म्हणाले, ''कॅरी ऑन, रसूल... बेस्ट लक्...

फर्गेट पास्ट ॲण्ड थिंक अबाऊट फ्युचर...''

रसूल प्रा. कानडेंच्या सांगण्यानुसार बाहेर पडला होता. त्याची सर्व जबाबदारीच त्यांनी घेतल्याने... रसूलची सर्व व्यवस्था करण्यात आली होती. प्रा. कानडेंच्या रूपानं त्याला देवमाणूसच भेटला होता. अहोरात्र मेहनत घेण्याचं ठरवून रसूलने प्रा. कानडेंचं नाव उंचवायचं व त्यांचा विश्वास सार्थ ठरवायचा, असा निश्चय केला होता. प्रा. कानडेंच्या शेवटच्या वाक्यानं मात्र तो व्यथित झाला होता. फर्गेट पास्ट ॲण्ड थिंक अबाऊट फ्युचर... भूतकाळ आपण खरोखरच विसरणार होतो का? ते दृश्य, तो आकांत विसरणार होतो का? मनात असलेला विद्रोह दाबून टाकणार होतो का? या प्रश्नांचं उत्तर आज त्याच्याजवळ नव्हतं... पण भविष्याविषयी मात्र तो आता जागरूक झाला होता... आणि त्याच वळणावर तो आता वळलेला होता.

रसूल मितभाषी असल्याने तो स्वत: कुणाशी जास्त बोलत नसे. त्याला फारसं जवळचं असं कुणीच नव्हतं. प्रा. कानडे हेच त्याचं श्रद्धास्थान, सर्वस्व होतं. पहिल्या दिवसापासूनच तो झपाटल्यागत अभ्यासाला लागला होता. प्रथम त्या विषयातील सर्व संदर्भग्रंथ त्याने चाळून काढले व पूर्वी झालेल्या संशोधनाचा अभ्यास केला. आधीच शोधलेल्या काही पदार्थांचा 'दीपन' गुणधर्म तो पडताळून पाहू लागला. या विषयात आताशी त्याला चांगलाच रस वाटू लागला होता. प्रा. कानडेंच्या साहाय्याने त्याने काही मुलभूत प्रयोग करण्यास सुरुवात केली होती.

प्रामुख्याने काही प्रयोग तो स्वत: करून पाहू लागला. त्यात प्रतिदीप्ती, (Fluorescene), स्फूरदीप्ती (Phosphorescene), यांसारखे दीपन प्रकार झिंक सल्फाईड (ZnS), सोडीअम आयोडाईड, थॅलीअम (Nal, TI), झिंक आयोडाईड (ZnI), कॅडनीअम सल्फाईड (CdS), पदार्थांमुळे निर्माण होऊ लागले. झिंक सल्फाईड या पदार्थांवर प्रवेगकामधून ऋण कणांचा झोत टाकला असता त्यातून निळा प्रकाश बाहेर टाकताना पाहूल रसूल हर्षभराने उद्गारला ''वंडरफूलऽऽ...''

त्याच्या अन्य सहकाऱ्यांनाही त्यानं त्या पदार्थाचा आविष्कार दाखवला होता. अदृश्य किरणांच्या माऱ्यानं, दृश्य प्रकाश निर्माण झाला होता. झिंक सल्फाईड हा पदार्थ अदृश्यरूपी ऋण कणांच्या माऱ्यानं स्वत:चं शारीरिक अस्तित्व विसरून, गर्द-निळसर पेहराव घातल्यासारखा दिसत होता. निळा प्रकाश परावर्तित करताच तो स्वत:चा गुणधर्म विसरून जात होता. या अशा प्रयोगांच्या यशस्वितेनं तो स्वत: विविध पदार्थांचं एकीकरण करून, प्रयोग करू लागला. प्रतिदीप्ती या पदार्थापासून त्यानं असाच हिरवा रंग मिळवला होता. पण या प्रक्रियांसासठी मात्र त्याला इलेक्ट्रॉन प्रवेगकाचा (Electron Accelerator), उपयोग करावा लागत होता. ऋण कणांसारखे भारांकित कणच त्यासाठी त्याला लागत होते.

फोटॉन्सपासून (photos), प्रकाश मिळवण्यासाठीही काही पदार्थांवर त्याला प्रयोग करायचे होते. त्यासाठी प्रा. कानडेंशी चर्चा करून त्याने फॉस्फेट या गटातील पदार्थांवर प्रयोग करण्याची इच्छा प्रदर्शित करताच प्रा. कानडेंनी त्याला सहमती दर्शविली होती.

स्फूरदीप्ती गटातील पदार्थांवर (Phosphere, Radium, Alumina) सर्वसाधारण प्रकाशझोत टाकताच, विविध रंगी प्रकाश बाहेर पडताना रसूलचं भान हरपून जात असे. रात्रीच्या वेळी घाटात, वळणांवर यासारख्याच पदार्थांचा समावेश असल्याचं त्याच्या लक्षात आलं होतं. पण त्याला याहूनही काहीतरी वेगळं, एक्सायटींग करण्याची इच्छा होती. ते काय? तेही त्याला ठाऊक नव्हतं. स्वयंप्रकाश निर्माण करणारे पदार्थ त्याला शोधायचे होते. आजपर्यंत ज्या पदार्थांचा शोध लागला नाही, अशाच पदार्थांचा पाठपुरावा त्याला करायचा होता. त्यामुळे अहोरात्र तो प्रयोगशाळेतच काम करीत असे. संशोधनात एक वर्ष कसं उलटलं त्याचं त्यालाच कळालं नव्हतं. आपण भूतकाळ विसरून, खरंच भविष्याचा विचार करू लागल्याचं त्याला आश्चर्य वाटत होतं. पण कितीही असलं तरी भूतकाळातील त्या कळा त्याच्या हृदयात उमटतच होत्या.

●●

साधारण मध्यरात्रीचा एक वाजला होता. छातीवर प्रचंड दाब निर्माण व्हावा तसा, रसूल स्वप्नातून जागा झाला. अंगाला दरदरून घाम फुटला होता. अलीकडे हे भयावह स्वप्न त्याला नेहमीच पडायला लागले होते. अम्मी, अब्बाजान, सलमाबी, सलमान यांचे रक्ताच्या थारोळ्यात पडलेले देह,

**दुर्गम, पथ अति, कुणी न सांथी मीच एकटा जातो पुढती 'संकटसमयी कुणी न येती' बोल सत्य गमती.**

पिळवटून टाकणारा टाहो, उद्‌ध्वस्त घर. सारं त्याच्या डोळ्यांसमोर उभं होतं. रसूल बेचैन झाला. या स्वप्नानं तो असाच बेचैन होत असे. त्या क्षणी त्याला कुटुंबाची प्रकर्षानं आठवण झाली. कंठ दाटून आला. भावनांवर नियंत्रण ठेवण्याच्या निष्फळ प्रयत्नातच, तो मोठ्याने ओरडला,

''काऽऽ काऽऽ? मारलं माझ्या निष्पाप कुटुंबाला... काय केलं होतं त्यांनी!''

रसूल हुंदके देत रडत राहिला. स्वत:ला त्यानं सावरण्याचा प्रयत्न केला. तो प्रसंग त्याच्या हृदयात या स्वप्नाने नव्यानं कोरला गेला. भूतकाळ विसरू पाहणाऱ्या रसूलसमोर, स्वप्नांच्या माध्यमातून भूतकाळ पुन्हा ठळक होत गेला. त्यामुळे पुढे बरेच दिवस तो बेचैनीत राहत असे. अबोल होत असे.

रात्रीचे दोन वाजून गेले होते त्याचं मनच लागत नव्हतं. तो उठला व तोंडावर पाण्याचा शिपका मारला. झिणझिण्या येऊन, डोकं जड झालं होतं. टेबल लँम्प लावून रसूल पुस्तकांमध्ये मन गुंतवू लागला.

त्याच्या संशोधनासंबंधीचे विविध पेपर्स व पुस्तके चाळू लागला. तेवढ्यात एका संशोधन पेपरामध्ये, अनामिक पदार्थ मिश्रणाचा शेवटी नामोल्लेख केला होता. त्यानं तो आकर्षिला गेला. ज्याप्रमाणे काही पदार्थांवर इलेक्ट्रॉन्सचा मारा केला असता विशिष्ट रंगाचे अथवा दृष्य तरंगलांबीचे फोटॉन्स (Photons) बाहेर पडतात. त्यामुळे त्या ठराविक कालावधीसाठी पदार्थाचा शारीरिक रंगही त्याचप्रमाणे होतो. आतापर्यंतच्या संशोधनात इलेक्ट्रॉन्सच्या माऱ्यानं हिरवा, निळा रंग मिळू लागले होते. तसेच दृश्यकिरणांचा मारा केला असतानाही काही पदार्थ विविध रंगांची किरणे बाहेर टाकीत होते. मानवी डोळे हे विद्युत-चुंबकीय वर्णपटातील दृश्य किरणांचीच संवेदनक्षम असल्याने व शिवाय सूर्याच्या वर्णपटात दृश्य किरणांचीच प्रखरता जास्त असल्याने एकमेकांना पाहणे, वस्तूंची ओळख व रंगांची जाणीव होते... पण जर का एखाद्या पदार्थावर अथवा मिश्रणावर दृश्य किरणे पडून अदृश्य किरणे म्हणजेच उपारुण (infrared), जांबूपार (ultraviolet) सारखे किरण परावर्तित होत असतील... तर त्या पदार्थाचे अस्तित्व कुठे असेल? कारण त्या पदार्थापासून निघणारे अदृश्य किरण... मानवी डोळ्यांना संवेदन नसल्याने, पदार्थाचं अस्तित्वही मानवी डोळ्यास दिसणार नाही. अशा पदार्थांचा शोध घेणे आवश्यक असल्याचं संशोधन पेपरात नमूद केलं होतं... तशी शक्यताही त्यानं वर्तवली होती. शेवटचं वाक्य रसूल पुन्हा पुन्हा वाचत होता.

रसूलच्या डोक्यात आता वेगळीच चक्रे सुरू झाली होती. संशोधनाचाच भाग म्हणून, त्याला आता त्या पदार्थाचं मिश्रण शोधून काढायचं होतं. झपाटल्यासारखा त्या रात्री तो वाचत सुटला होता. सकाळचे सहा वाजून गेले तरी त्याला शुद्ध नव्हती. एका विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन, या संशोधनाची उंची त्याला गाठायची होती. त्याच वेळेस शून्यात बघून त्यानं एक निश्चय केला होता.

●●

आताशी त्याच्या डोक्यात सुचलेल्या प्रॉब्लेमनं त्याला झपाटलं होतं. त्या विषयाचा सर्वांगानं अभ्यास त्यानं सुरू केला. कुणाशीही जास्त बोलत नसल्याने तो पूर्वीपेक्षा जास्त आत्मकेंद्रित वाटत होता. मात्र त्याची पार्श्वभूमी माहिती असल्याने मध्ये मध्ये प्रा. कानडे त्याच्याशी सुसंवाद साधत असत.

त्या रात्री प्रा. कानडे प्रयोगशाळेत उशिराने आले होते. रसूलला अभ्यास करीत असताना पाहून त्यांना आश्चर्य वाटलं नव्हतं. पण तो काहीसा विक्षिप्त, आत्मकेंद्रित असल्याचं त्यांनाही जाणवलं होतं. म्हणून ते आज एवढ्या रात्री प्रयोगशाळेत आले होते. वाचण्यात गर्क असलेल्या रसूलच्या पाठीमागून, त्याच्या खांद्यावर हात ठेवीत प्रा. कानडे म्हणाले,

''रसूलऽऽ''

अनपेक्षित आलेल्या आवाजानं रसूल दचकला... प्रा. कानडेंना पाहाताच तो अदबीने उठत म्हणाला.

''यस् सर! आपण एवढ्या रात्री.''

''होऽ... सहजच... तू काय करतोयंस?''

सरांना आपण पाठपुरावा करीत असलेल्या संशोधनाबद्दल सांगावं की नाही या द्विधा मनस्थितीत असतानाच तो उत्तरला.

''वाचतोय्... फॉस्फरोसन्स या पदार्थांवरचा एक उत्कृष्ट संशोधन पेपर...''

त्याच्याकडे प्रा. कानडेंनी पाहिलं... टेबलावरील संदर्भग्रंथ पाहिले. त्याचा अभ्यास व आकलनाविषयी त्यांचय मनात दुमत नव्हतं. ते थोडं विचार करून

**किती सहज गाण्याने होते भवताल नवे, हृदयाच्या काठावर जुन्या कहाण्यांचे दिवे.**

समजावणीच्या स्वरात म्हणाले.

''नो डाऊट रसूल... यू आर डुईंग वेल. तुझी प्रगती मला माहितेय्. पण मला वाटतं सततच्या अभ्यासाऐवजी तू इतरत्रही फिरावं. विविध कार्यक्रमांमध्ये भाग घ्यावास. मित्र जोडावेस. त्यानं तुझं मन मोकळं राहील. असा नेहमीच विचार करणं बरं नव्हे. आपल्या शरीराला पुरेशी विश्रांती देणंही तेवढंच गरजेचं असतं...''

सर आपली काळजी करीत असलेले पाहून, रसूल ओशाळला. एका देवमाणसाला आपण त्रास देतोय, अशी विचित्र जाणीव त्याला झाली. तो म्हणाला,

''सॉरी, सर! यापुढे मी माझी पुरेशी काळजी घेईन.''

''गुडऽऽ रसूल, तुझ्याकडून मला खूप अपेक्षा आहेत. त्यामुळेच ती तुला सांगतोय.''

''होय, सर! मला जाणीव आहे. आपला अपेक्षाभंग मी कधीही करणार नाही.''

''आय नो, ओके रसूल, टेक केअर ॲण्ड रेस्ट. गुडनाईट.''

प्रा. कानडे रसूलला समजावून परतू लागले. तेव्हाच आपण पाठपुरावा करीत असलेल्या पदार्थाविषयी सरांशी बोलावे का? चर्चा करावी का? हे द्वंद्व त्याच्या मनात सुरू होतं. हे सर्व आपल्या मार्गदर्शकाला माहीत असणे आवश्यक असल्याच्या जाणिवेतून, त्यानं प्रा. कानडेंना हाक मारली.

''सर!''

''यस् रसूल,, बोल काय ते!''

''सर! मला सुचलेल्या एका प्रॉब्लेम व त्याच्या संशोधनाविषयी मला सांगायचं होतं.''

प्रा. कानडे आनंदाने उत्तरले,

''ओऽऽ शुअर सांग कुठला प्रॉब्लेम.''

रसूल सांगू लागला. तसे प्रा. कानडे ऐकत राहिले. तो पाठपुरावा करीत असलेला प्रॉब्लेम उत्कृष्ट होता. यश येवो अथवा न येवो ही अवघड कामगिरी असल्याचं प्रा. कानडेंना ठाऊक होतं. त्या अनुषंगाने रसूलला प्रा. कानडेंनी बरेच प्रश्न विचारले. त्याची उत्तरे त्याने स्पष्टीकरणासहित दिली होती. असा पदार्थ शोधून



**पोळलेला माळ येता थांब स्नेहाने जरा, स्वप्न पाचूचे तयाचे येऊ दे रे मोहरा.**

काढायचा त्याचा मानस पाहून प्रा. कानडेंनी मनापासून त्याचं कौतुक केलं होतं. त्याविषयीचा अभ्यास पाहून त्यांनाही आश्चर्य वाटलं. दोघं बराच वेळ बोलत राहिले. शेवटी प्रा. कानडे उत्स्फूर्तपणे म्हणाले,

''कॅरी ऑन, रसूल गो अहेड तुला निश्चितपणे यश येईल. हा माझा आत्मविश्वास आहे.''

''थँक्यू सर!'' रसूल नम्रपणे उत्तरला.

रसूलच्या विलक्षण बुद्धिमत्तेचा विचार करीत असतानाच प्रा. कानडे परतले होते.

●●●

रसूल आता प्रत्यक्ष पदार्थांवरच संशोधन करायला लागला होता. सैद्धांतिक पद्धतीने अगोदरच त्याने वेगवेगळ्या मूलद्रव्यांचे एकीकरण करून, मिश्रण केलं होतं. कॉम्प्युटरवर या मिश्रणाचं सिम्युलेशन करून, त्याचे परिणाम पडताळून पाहिले. त्यात तो यशस्वीही झाला. पण प्रयोग करूनच त्याला निष्कर्ष हवा होता. या प्रयोगात रसूलने विविध गटांतील मूलद्रव्यांचा वापर केला. प्रामुख्याने झिंक, सल्फाईड, सोडिअम, आयोडिन, पोटॅशियम, थॅलीअम, सिझीअम इत्यादी मूलद्रव्ये व अशुद्धि (Impurity) च्या साहाय्याने मिश्रण करून दृश्य-अदृश्य किरणांखाली त्यांचे गुणधर्म पडताळून पाहू लागला. अनेक प्रयोग, मिश्रण त्यासाठी त्याने केले. पण अजूनपर्यंत तरी त्याला पाहिजे ते परिणाम मिळत नव्हते. असे का व्हावे? याचाच तो विचार करीत होता. यात बरेच दिवस निघून गेले. नैराश्याने ग्रासण्याअगोदरच तो पुन्हा विशिष्ट प्रेरणेने उत्तेजित होऊन पुढच्या प्रयोगाला लागला. त्यासाठी रात्रीचे दिवस होत गेले. त्याचं त्यालाच भान नव्हतं.

एके दिवशी सकाळच्या प्रहरीच प्रयोगशाळेत कुणीही नसताना तो आला होता. रात्री खूप विचार केल्याने त्याला विविध मूलद्रव्यांचं एक मिश्रण सुचलं होतं. सकाळ कधी होते याचीच तो वाट पाहत असल्याने, भल्या सकाळी प्रयोगशाळेत हजर झाला. आल्याआल्याच पावडर फॉर्ममध्ये असणाऱ्या मूलद्रव्यांशी तो खेळायला लागला. त्यातच ते मिश्रण तयार होऊन, दिसेनासं झालं होतं. याचाच अर्थ प्रयोगशाळेतील प्रकाश त्यावर पडून त्यातनं अदृश्य किरणे (उपारुण, जांबुपार) बाहेर पडत असल्याने पदार्थ दिसेनासा झाला होता. तयार झालेलं मिश्रण तो आठवू लागला. पुन्हा त्यानं प्रयत्न केला. पूर्वीसारखंच वेगवेगळ्या मूलद्रव्यांचं मिश्रण त्याला दिसलं नव्हतं. असे बरेच प्रयोग करून त्यानं ते मिश्रण निश्चित केलं. आनंदानं काही क्षण तो तसाच पडून राहिला. पुढचा प्रयोग अतिमहत्त्वाचा असल्याने तो एका अनामिक बलाने उठला. प्रयोगशाळेतील वीज बंद केली. मूलद्रव्यांचं मिश्रण त्यानं आपल्या डाव्या हाताला लावलं. ठार अंधारातही ते मिश्रण दिसत नव्हतं. ते शक्यही नव्हतं. आता प्रकाश टाकल्यानंतरच त्याचे निष्कर्ष त्याला मिळणार होते.

थरथरत्या हाताने त्याने प्रयोगशाळेतील वीज चालू केली आणि तो पाहातच राहिला. त्याचा डाव्या हाताचा पंजा दिसेनासा झाला होता. कुणीतरी हात तोडून टाकल्यासारखा.



अत्यानंदानं तो बेहोष झाला. काही क्षण त्याचं शरीर शहारून उठलं. प्रयोग यशस्वी झाला होता. स्वत:शीच तो पुटपुटला.

''नाऊ, आय् वुईल विन दी बॅटल्''

...आणि त्या प्रकाशातही त्याच्या डोळ्यांपुढे काळाकुट्ट भूतकाळ गडद होत गेला.

●●●

नियमित वेळेवर येणारा रसूल आज न आलेला पाहून प्रा. कानडेंना आश्चर्य वाटलं होतं. कदाचित बरं नसेल म्हणून एका विद्यार्थ्याला त्याच्या हॉस्टेलवर पाठवलं. तेथेही तो रात्रीपासून नसल्याचं कळताच, प्रा. कानडे चिंतित झाले. कुठं बाहेर गेला असेल म्हणून त्यांनी स्वत:च्या मनाला समजावलं. गेल्या वर्षात तो कुठंही असा विचारल्याखेरीज गेल्याचं त्यांना आठवत नव्हतं. यातच आठवडा निघून गेला. प्रा. कानडेंची काळजी उत्तरोत्तर वाढतच गेली. स्थानिक व देशभरातील वर्तमानपत्रांखेरीज दूरदर्शनवरही रसूलच्या अचानक बेपत्ता होण्याचं निवेदन प्रा. कानडेंनी दिलं होतं. असे बरेच महिने निघून गेले. पण रसूल परत आला नाही, की सापडला नाही.

**अंधाराला आहे येथे प्रकाशाचे भान, प्रकाशामधून येथे विकसतो प्राण.**

●●●

काही दिवसांनंतर काश्मीर खोऱ्यात अतिरेक्यांचं शीतयुद्ध सुरू झालं ते कसं? अतिरेक्यांनाही ठाऊक नव्हतं. एक एक अतिरेक्याचा बिमोड होत असतानाच, सर्व अतिरेकी यंत्रणाच नेस्तनाबूत होत होती. अतिरेक्यांचे देहच जिकडे-तिकडे पडलेले दिसत होते. अतिरेकी संघटनांमध्ये खळबळ माजली. त्यांची सारी यंत्रणाच खिळखिळी होत गेल्याने, पूर्वीसारखा जोम त्यांच्यात उरला नव्हता. भारत सरकारही अचंबितपणे हे दृश्य पाहात होते. नेहमीच सतावणारा प्रश्न आपोआपच निकाली निघत होता. हा खेळ बरेच महिने चालला. हजारो अतिरेकी यमसदनी गेले. पाकमधील घुसखोरांचंही येणं बंद झालं. अतिरेकी कारवायाच ठप्प झाल्या. याविषयी वर्तमानपत्रांमध्ये ठळकपणे बातम्या येऊ लागल्या. यामागे कोण असावं? असे प्रश्नचिन्ह प्रत्येक सर्वच भारतीयांचा पाठिंबा, मिळाल्याचं जनमतात सिद्ध झालं होतं. तो जे काही करतोय ते योग्यच अशी प्रत्येकाचीच भावना होती.

●●●

सकाळच्या डाकेनं प्रा. कानडेंच्या हाती अतिमहत्त्वाचं म्हणून पत्र आलं होतं. थरथरत्या हाताने त्यांनी ते उघडलं व वाचण्यास सुरुवात केली.

*''**आदरणीय सर!***

*पत्र पाहून कदाचित तुम्हाला आश्चर्य वाटेल आणि हो, हे पत्र तुमच्या रसूलचंच आहे. त्यामुळे तुम्हाला आनंद होणं स्वाभाविक आहे, पण तो क्षणिक असेल. प्रथम मी तुमची क्षमा मागतो. तुम्हाला न सांगता परागंदा झाल्यामुळे तुम्हाला सोडताना खूप यातना झाल्या. सर! तुम्हीच तर मला आपुलकीनं आई-वडिलांचं प्रेम दिलंत म्हणून निघताना मी अक्षरश: रडलो. पण हे पाश मी क्षणात तोंडून टाकले व एका निश्चयाने मी युद्धावर निघालो एकटाच. कारण ते एकट्यालाच लढायचं होतं. सर, तुम्हाला आठवतंय मी तुमच्याशी एका नवीन पदार्थाच्या शोधाबद्दल बोललो होतो. त्याच्या विषयीचे अनंत उपयोग सांगितल्याने, तुम्ही मला प्रोत्साहन दिलंत, तोच पदार्थ शोधण्यात मी यशस्वी झालो. अगदी शंभर टक्के. पण त्याचा दुरुपयोगही तेवढाच होता. तो म्हणजे अदृश्य होण्याचा. प्रकाश पडल्यानंतर त्या पदार्थाचं अस्तित्वच नाहीसं झालं होतं. प्रथम त्याचा प्रयोग मी माझ्यावरच केला. ज्या हातावर मी तो पदार्थ लावला तो पूर्णत: अदृश्य-नाहीसा झाला. त्या वेळच्या माझ्या आनंदाला मोल नव्हतं. तुम्हाला ते सांगावं, अशी एक ऊर्मी मधेच उसळली, पण ती महत्प्रयासानं दाबली. कारण पुढच्या ध्येयापासून तुम्ही मला परावृत्त केलं असतं.*

*सर! तुम्ही सांगितलं होतं 'फर्गेट पास्ट अॅण्ड थिंक अबाऊट फ्युचर' पण मी हे करू शकलो नाही. भूतकाळच माझ्यासमोर नाचत राहिला. माझे आई-वडील, भावंडांचे चेहरे डोळ्यांसमोर येत राहिले. तिथेच सरशी झाली. शोधलेल्या पदार्थांचं मिश्रण मी माझ्या सर्वांगाला लावलं आणि अदृश्य झालो. दिवसा-रात्री कोणीही पाहण्याची शक्यता नव्हती. याचाच फायदा घेऊन, मी अतिरेक्यांचा बिमोड केला. सारं नेस्तनाबूत केलं. मी जे काही केलं त्याचा मुळीच पश्चात्ताप नाही सर! त्रिवार नाही. उलट अभिमानच आहे. निष्पापांचा बळी घेणाऱ्यांना हीच शिक्षा योग्य होती. मी पूर्ण समाधानी आहे. माझं काम संपलेलं आहे. आणि आता दृश्यरूपात येणंही शक्य नाही. कारण तो पदार्थ माझ्य अंगाला चिकटून बसलाय. तो कशानंही निघणार नाही. शिवाय मृत्यूनं... ते मला ठाऊक होतं. प्रथम प्रयोगातच ते मला कळालं होतं. कदाचित दृश्यरूपात येण्यासाठीची प्रक्रियाही मी शोधून काढली असती, पण तेवढा वेळ माझ्याजवळ नव्हता सर! शेवटचं सांगतो. ज्या मूलद्रव्याचं मिश्रण मी शोधून काढलं ते मी माझ्याबरोबरच नष्ट करणार आहे. कारण असं संशोधन जर का अतिरेक्यांच्या हाती पडलं तर काय होईल, याचा आपण अंदाज करू शकता. हाऽहाऽकार माजेल. दुष्ट प्रवृत्तींचाच विजय होईल. त्यासाठी मी स्वत:लाच नष्ट करतोय. आणि सोबत माझं संशोधनही. मी आपली अपेक्षा पूर्ण करू न शकल्याबद्दल क्षमस्व. गुडबाय.''*

*प्रा. कानडेंच्या डोळ्यांत नकळत अश्रू जमा झाले. भविष्याने गाठण्याअगोदर भूतकाळानेच या उदयोन्मुख महान शास्त्रज्ञावर हडप घातली होती.*

●●

**डॉ. संजय ढोले**
भौतिकशास्त्र विभाग,
पुणे विद्यापीठ, पुणे ७.

---

**आहे अमुचा वंश अनादी कल्पांतातुन वाहे, काळशिखरावर पाय ठेवुनी दिगंतराला बाहे.**

# तुडतुड्या

वा. ना. दाण्डेकर

बालमित्रांनो,

दिवाळीच्या सुट्टीत तुम्ही फटाक्यांची आतशबाजी करणार असाल. त्यासाठी फटाके, फुलबाज्या, ॲटमबॉम्ब, भुईनळे इत्यादींचा वापर तुम्हाला करावा लागेल. या आतशबाजीत भर घालण्यासाठी मेंदूला झिणझिण्या आणणाऱ्या खालील काही तुडतुड्यांचा उपयोग तर करून पाहा!

**१) सत्पाल खरं कधी बोलला?**



सत्पाल नावाचा एक बाताड्या सोमवार, बुधवार, गुरुवार आणि शुक्रवार या दिवशी खोटं बोलतो; इतर दिवशी तो सत्यवचनी असतो.

एके दिवशी तो म्हणाला, ''मी काल तुम्हाला जी घटना सांगितली ती खरी आहे.''

चौकशी करता त्याने सांगितलेली घटना खरी होती. तर वरील विधान त्याने कोणत्या दिवशी केले होते?


**२) फसाल बरं!**



'वेष असावा बावळा, परंतु अंतरी नाना कळा' अशा वर्णनाच्या तोलारीरामला मित्रांनी डिवचले, की एखादे कोडे घालून तो आपल्या मित्रांची वटवट थांबवीत असे. त्याने घातलेलं पुढील कोडं त्याचे मित्र अजून सोडवीतच आहेत. तुम्हाला जमते का ते पाहा बरं!

''टेबलावर ३६ गोळ्या ठेवल्या आहेत. त्यांची मांडणी अशी करा की प्रत्येक रेषेवर ७ गोळ्या येतील आणि ६ रेषा मिळतील.

**३) रोजचा व्यवहार कसा पूर्ण करणार?**



शेठ मगनलाल एका हॉटेलमध्ये उतरले. त्यांच्याजवळ फक्त एक सोन्याची साखळी होती. हॉटेलमधील रोजच्या भाड्यापोटी रोख पैशांऐवजी साखळीतील एक दुवा रोज देण्याचे शेठजींनी मान्य केले. या साखळीतील कमीत कमी दुवे कापून त्यांना हा व्यवहार रोज करावयाचा होता. साखळीमध्ये ७ दुवे होते. कमीत कमी किती ठिकाणी साखळी कापावी? त्यांनी कोणते दुवे कापले असतील?

४) नावीन्यपूर्ण पैज!

सुरजित आणि मनजीत यांनी नेमबाजीच्या एका खेळात पैज लावली. या खेळाचा नियम असा होता: ''नेम बरोबर लागला तर खेळाडू विजयी झाला. नेम मारण्यापूर्वी त्याच्याजवळ जेवढी रक्कम असेल तेवढी रक्कम दुसऱ्या भिडूने विजयी स्पर्धकाला द्यावयाची.''

१) प्रथम मनजितने सुरुवात केली. त्याचा नेम बरोबर लागला. त्याच्याजवळ असलेल्या रकमेएवढी रक्कम त्याला मनजितने दिली.

३) तिसऱ्या फेरीत मनजितचा नेम बरोबर लागला. या फेरीच्या सुरुवातीला त्याच्याजवळ असलेल्या रकमेएवढी रक्कम सुरजितकडून त्याला मिळाली.

या फेरीच्या शेवटी मनजितजवळ १६ रु. जमले तर सुरजितजवळ काहीच शिल्लक राहिली नाही. तर सुरुवातीला त्यांच्याजवळ प्रत्येकी किती रक्कम होती?

**५) चोरी कोणी केली?**

गोटू, पिंटू आणि छोटू या तीन मित्रांवर अंगठी चोरल्याचा आळ आला. शिक्षकांनी त्यांची जबानी घेतल्यावर पुढील उत्तरे त्यांनी दिली.



गोटू : 'पिंटूने अंगठी चोरली.'

पिंटू : 'होय, हे खरे आहे.'

छोटू : 'मी चोरी केलेली नाही.'

शिक्षकांना त्यांच्या या जबानीमध्ये संशय आला म्हणून त्यांनी जास्त चौकशी केली तेव्हा त्यांना असे आढळले की यापैकी किमान एकजण नक्की खोटं बोलत आहे आणि किमान एकजण नक्की खरं सांगत आहे.'

तर ओळखा पाहू अंगठी कोणी चोरली असली पाहिजे?

**६) गुंडाप्पांचा जन्म कोणत्या वर्षी झाला?**



आपल्या आजोबांच्या जन्मानंतर १४० वर्षांनी गुंडाप्पा हे गृहस्थ दिवंगत झाले. आजोबा व गुंडाप्पा या दोघांचे एकूण वय १२४ वर्षांचे होते. आजोबांचा मृत्यू १९२८ मध्ये झाला तर गुंडाप्पांचा जन्म कोणत्या वर्षी झाला?

••


**डॉ. वा. ना. दाण्डेकर**

B/२, परिमल, १२३९/A, आपटे रस्ता, पुणे ४.

**रविकिरणेही नाचत नाचत अंगणात आली जणू सोन्याचे मणी विखुरले तुझ्याच भवताली.**

# चला पेटी वाजवू या!

**सौ. कल्याणी केसकर**




**रो**जच्या अभ्यासात थोडा बदल हवा आहे किंवा कंटाळा आला आहे. अशा वेळेला आपला छंद, आपली कला आपल्याला उपयोगी पडते. बऱ्याच वेळा असा छंद जोपासायचा म्हटला की कोणतरी मार्गदर्शक शिक्षक लागतो. गायन – वादन – नृत्य – चित्रकला इ. साठी स्वतंत्र शिकवणी लावावी लागते अन् मग ते सगळंच बारगळतं. म्हणूनच प्रारंभी एखाद्या छंदाची सुरुवात स्वत:ला घरच्या घरी करता यावी या कल्पनेतून या लेखाचा जन्म झाला.

एखाद्या समारंभात किंवा कार्यक्रमात कोणाला पेटी वाजवताना पाहिले की असे वाटते हे आपल्यालाही जमेल का? लगेच शक्य नसते परंतु थोड्या, पण प्रामाणिक प्रयत्नातून आपल्यालाही हे जमू शकेल. तुम्हाला पेटी वाजवायला आवडेल? घरी पेटी नाही परंतु शेजारी, नातेवाईकांकडे, शाळेत, मित्रांकडे कुठेतरी पेटी आपल्याला मिळू शकेल. असे म्हणतात ना – इच्छा आहे तिथे मार्ग आहे.

नव्याने शिकू इच्छिणाऱ्यांना समजायला सोपं जावं व लगेच सरावाला प्रारंभ करता यावा म्हणून शास्त्रीय परिभाषेचा कमीत कमी वापर करत सोप्या भाषेमध्ये लिहायचा प्रयत्न केला आहे.

पेटीवरील शुद्ध स्वरस्थाने दाखविणारे चित्र वर दिले आहे. या चित्रात दाखविल्याप्रमाणे तुम्ही 'सा' हा स्वर काळ्या रंगाच्या चौथ्या पट्टीवर वाजवणार आहात. याचाच अर्थ तुम्ही काळी चार पट्टीतील स्वर वाजवायला शिकणार आहात. वरील चित्र समोर ठेवून पेटी वाजवायची आहे. ७ शुद्ध स्वरांची स्थाने पाठ करून घ्या. सा रे ग म प ध नी सां, सां नी ध प म ग रे सा असे वाजवून बघा. हे वाजवताना कुठल्या स्वराला कुठली बोटे वापरायची हे पाहू या. अंगठ्याला १ क्रमांक, पहिल्या बोटाला २ क्रमांक आणि दुसऱ्या बोटाला ३ क्रमांक याप्रमाणे क्रमांक दिल्यास

सा रे ग म प ध नी सां        सां नि ध प म ग रे सा
२ ३ १ २ ३ १ २ ३        ३ २ १ ३ २ १ ३ २

या प्रमाणे पेटी वाजवायची आहे. या पद्धतीने स्वर व बोटे यांची सांगड घातली तर पेटी वाजवणे सोपे जाईल. याचा व्यवस्थित सराव होणे आवश्यक आहे. तसेच स्वर दाबल्यावर भाता हलवणे आवश्यक आहे, नाहीतर स्वर वाजणार नाही. भाता हलवण्याची सवय देखील सरावामुळेच होईल.

स्वर वाजवताना एकाच लयीत वाजवा. म्हणजे प्रत्येक स्वरातील अंतर सारख्या कालावधीचे हवे. स्वर चढत्या क्रमाने तसेच उतरत्या क्रमाने वाजवायचे आहेत. शास्त्रीय भाषेत सा रे ग म प ध नी सां अशा स्वरांच्या चढत्या क्रमास **आरोह** तर सां नी ध प म ग रे सा अशा स्वरांच्या उतरत्या क्रमास **अवरोह** असे म्हणतात.

या स्वरांचा सराव झाल्यानंतर शुद्ध स्वरांच्या वेगवेगळ्या रचना वाजवायच्या आहेत. या रचनेला अलंकार असे म्हणतात. अलंकाराची रचना आरोह, अवरोह क्रम कायम ठेवून केलेली असते.


खाली काही अलंकार दिले आहेत त्याचाही सराव करा.

* सारेग, रेगम, गमप, मपध, पधनी, धनीसा
सानीध, नीधप, धपम, पमग, मगरे, गरेसा
*सारेगम, रेगमप, गमपध, मपधनी, पधनीसा
सानीधप, नीधपम, धपमग, पमगरे, मगरेसा
*साग, रेम, गप, मध, पनी, धसां
सांध, नीप, धम, पग, मरे, गसा

हे जमतंय ना! तुम्हालाही अशा काही रचना करता येतील

---

**साथ सुरांची घेऊन, कवितेने गीत व्हावे, रसिकांच्या ओठावर तिने चिरंतन व्हावे.**




का? आता पुढे जाऊ – ७ शुद्ध स्वरांच्या समुहास **सप्तक** असे म्हणतात. या ७ स्वरांमध्ये काही स्वर चल आणि काही स्वर अचल असतात. चल म्हणजे आपल्या जागेवरून हलणारे अचल म्हणजे आपल्या जागेवर स्थिर राहणारे. सा आणि प हे स्वर अचल आहेत आणि रे ग म ध नी हे स्वर चल आहेत. रे ग ध नी हे स्वर आपली जागा सोडून कमी उंचीचेही होतात. म्हणून त्यांना कोमल स्वर असे म्हणतात. तसेच म हा स्वर आपली जागा सोडून जास्त उंचीचा होतो म्हणून त्यास तीव्र स्वर असे म्हणतात. म्हणजे सा आणि प सोडून इतर स्वरांची दोन रूपे असतात. त्यामुळे शुद्ध + ४ कोमल + १ तीव्र स्वर असे सर्व मिळून एका सप्तकात १२ स्वर असतात. वरील चित्रात १२ स्वरांची स्थाने दाखविली आहेत.

आपण गाण्यात किंवा बोलण्यात ३ सप्तकांचा वापर करतो. आपले नेहमीचे बोलणे किंवा गाणे हे मध्य सप्तकात असते. खालच्या आवाजात बोलतो तेव्हा मंद सप्तकात बोलतो आणि चिडून वरच्या आवाजात बोलतो तेव्हा तार सप्तकात बोलतो, म्हणजे चंद्र, मध्य आणि तार अशी तीन सप्तके आहेत.

सप्तक कुठले, स्वर शुद्ध की कोमल, ताल कुठला हे सर्व कळण्यासाठी अनेक स्वरलिपी प्रचलीत आहेत. त्यापैकी शास्त्रीय संगीतात प्रसिद्ध असलेली पं. भातखंडे यांच्या स्वरलीपीचा परिचय करून घ्यायचा आहे.

शुद्ध स्वर – कोणतीही खूण नाही.

कोमल स्वर – स्वराखाली आडवी रेघ.

उदा – रे ग ध नी

तीव्र स्वर – स्वरावरती उभी रेघ. उदा. – म

मंद्र सप्तक – स्वराखाली टिंब उदा. – नी ध

मध्य सप्तक – कोणतीही खूण नाही

तार सप्तक – स्वरावरती टिंब उदा. रें गं

वरती स्वर आणि खाली शब्द असे स्वरलिपीचे स्वरूप असते. एखादे गीत लयीत किंवा तालात बसविण्यासाठी आकड्यांचा उपयोग करतात. ऽ याचा अर्थ आधीचाच स्वर किंवा शब्द लांबवणे.

कुठल्याही गीतात १२ स्वरांपैकी कुठले तरी स्वर वापरलेले असतात. आता एका गीताकडे/पद्याकडे वळू या. या गीताची चाल तुम्हाला पेटी वाजवतानाच कळणार आहे. पुढील पानावर दिलेले स्वर प्रथम वाचायचे, छोटाच स्वरसमूह वाचायचा, तो पेटीवर वाजवून बघायचा, स्वरस्थाने दोन्ही चित्राच्या साहाय्याने तुम्हाला बघायची आहेत. स्वरसमूह पेटीवर वाजवता आल्यावर त्या स्वरांप्रमाणे त्या चालीत शब्द म्हणून बघायचे. प्रथम त्या पद्धतीने धृवपद तयार करून घ्या. वाजवताना म्हणताना एकच लय ठेवणे आवश्यक आहे. स्वर पक्के करून मगच शब्द म्हणायचे आहेत. त्यानंतर पहिले कडवे स्वरांत बसवून घ्या. धृवपद व पहिले कडवे स्वरांत बसवले की पद्य झाले तयार. या पद्याला ३ कडवी आहेत. तीनही कडव्यांची चाल सारखीच आहे. पुन्हा मजा म्हणजे कडव्याला ४ ओळी आहेत, त्यात पहिल्या २ ओळींची चाल सारखीच आहे व नंतरच्या २ ओळींची चाल सारखी आहे. म्हणजे धृवपद व एका कडव्याच्या दोन ओळी एवढेच काम तुम्हाला पेटीवर मन लावून करायचे आहे. करणार ना? जमले का? तुमचा आनंद आम्हाला जरूर कळवा. ज्यांना पूर्ण पद्य हवे असेल त्यांनी छात्र प्रबोधनशी संपर्क साधावा. तसेच या गाण्याची ध्वनिफितही 'प्रबोधनगीते भाग–२' या नावाने विक्रीसाठी छात्र प्रबोधनच्या सर्व स्थानिक केंद्रांवर रु. ४०/– ला उपलब्ध आहे.

●●

**सौ. कल्याणी केसर,** ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे ३०

**या श्वासांच्या स्वरलहरीवर जीवन-संगीत वाजत आहे, सुखदुःखाच्या तालासंगे सप्त स्वरांना आळवित आहे.**

## क्षितिज नवे रे क्षितिज नवे

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सां | सां | नी | प | सां | ऽ | सा | ऽ | सां | सां | नी | प | सां | ऽ | ऽ | ऽ | सां | सां | नी | प | सां | ऽ | सां | सां | नी | नी | प | सां | ऽ | सां | सां | ऽ |
| क्षि | ति | ज | न | वे | ऽ | रे | ऽ | क्षि | ति | ज | न | वे | ऽ | ऽ | ऽ | क्षि | ति | ज | न | वे | ऽ | म | ज | स | त | त | बो | ऽ | ल | वी | ऽ |
| नी | ऽ | सां | ऽ | नी | ऽ | प | ऽ | ग | ऽ | प | ग | प | ऽ | ऽ | ऽ | ग | ऽ | ग | प | ऽ | प | प | ऽ | ग | ग | ग | ग | प | प | प | ऽ |
| सा | ऽ | थी | ऽ | ला | ऽ | स | ऽ | न्मि | ऽ | त्र | ह | वे | ऽ | ऽ | ऽ | आ | ऽ | ज | ए | ऽ | क | टा | ऽ | अ | न | घ | ड | ज | री | मी | ऽ |
| ग | ग | ऽ | प | नी | ऽ | नी | नी | प | ऽ | नी | रें | सां | ऽ | ऽ | ऽ | सां | सां | नी | प | सां | ऽ | सां | ऽ | सां | सां | नी | प | सां | ऽ | ऽ | ऽ |
| म | ना | ऽ | त | अं | ऽ | कु | र | हा | ऽ | उ | ग | वे | ऽ | ऽ | ऽ | क्षि | ति | ज | न | वे | ऽ | रे | ऽ | क्षि | ति | ज | न | वे | ऽ | ऽ | ऽ |
| सा | ऽ | सा | रे | ग | ग | ग | ऽ | रे | ऽ | ग | रे | सा | ऽ | सा | ऽ | सा | सा | ऽ | रे | ग | ऽ | ग | ग | रे | ऽ | ग | म | प | ऽ | ऽ | ऽ |
| नि | ऽ | द्रे | ऽ | म | धु | नी | ऽ | जा | ऽ | गा | ऽ | हो | ऽ | ता | ऽ | न | वा | ऽ | च | मी | ऽ | म | ज | ला | ऽ | दि | स | तो | ऽ | ऽ | ऽ |
| सा | सा | सा | रे | ग | ऽ | ग | ऽ | रे | रे | ग | रे | सा | सा | सा | ऽ | सा | ऽ | सा | रे | ग | ऽ | ग | ऽ | रे | ऽ | ग | म | प | ऽ | ऽ | ऽ |
| उ | ल | ग | ड | णा | ऽ | री | ऽ | दु | नि | या | ऽ | भ | व | ती | ऽ | मी | ऽ | म | ऽ | ध्ये | ऽ | मा | ऽ | झा | ऽ | न | स | तो | ऽ | ऽ | ऽ |
| ग | ऽ | प | प | नी | ऽ | नी | ऽ | प | प | नी | रें | सां | सां | सां | ऽ | नी | ऽ | सां | नी | ऽ | प | प | ऽ | ग | ग | प | ग | प | ऽ | ऽ | ऽ |
| सा | ऽ | ख | र | झो | ऽ | पे | ऽ | म | ध | ली | ऽ | ह | स | री | ऽ | स्व | ऽ | प्न | मा | ऽ | लि | का | ऽ | अ | व | त | र | ते | ऽ | ऽ | ऽ |
| ग | ग | ऽ | प | नी | नी | नी | नी | प | ऽ | नी | रें | सां | सां | सां | ऽ | नी | ऽ | सां | नी | ऽ | प | प | ऽ | ग | ऽ | प | ग | प | ऽ | ऽ | ऽ |
| क | ठो | ऽ | र | अ | व | ध | ड | सा | ऽ | रे | ऽ | स | रू | नी | ऽ | आ | ऽ | स | मं | ऽ | त | हो | ऽ | ती | ऽ | हि | र | वे | ऽ | ऽ | ऽ |
| ग | ऽ | प | नी | ऽ | ऽ | नी | ऽ | प | ऽ | नी | रें | सा | ऽ | ऽ | ऽ | सां | सां | नी | प | सां | ऽ | सां | ऽ | सां | सां | नी | प | सां | ऽ | ऽ | ऽ |
| आ | ऽ | मं | मं | ऽ | त | हो | ऽ | ती | ऽ | हि | र | वे | ऽ | ऽ | ऽ | क्षि | ति | ज | न | वे | ऽ | रे | ऽ | क्षि | ति | ज | न | वे | ऽ | ऽ | ऽ |

गाण्याचे शब्द : क्षितिज नवे मज सतत बोलवी, साथीला सन्मित्र हवे

आज एकटा अनघड जरी मी मनात अंकुर हा उगवे, क्षितिज नवे रे, क्षितिज नवे ।।धृ।।

निद्रेमधुनि जागा होता नवाच मी मजला दिसतो। उलगडणारी दुनिया भवती, मी मध्ये माझा नसतो

साखर झोपे मधली हसरी स्वप्नमालिका अवतरते। कठोर अवघड सारे सरूनी आसमंत होती हिरवे ।।१।।

आसमंत होती हिरवे... क्षितिज नवे रे... क्षितिज नवे...

**मौनाच्या संध्याकाळी आकाश स्वरांचे झाले, वितळले क्षितिज गंधात रंगातून रूप निथळले.**




**स**खारामनं डौलदार वळण घेऊन गाडी बंगल्याच्या आवारात आणली. मधल्या पुष्करिणीला वळसा घालून सफाईदारपणे मुख्य दरवाजासमोरील पोर्चमध्ये उभी केली. साहेबांना उतरण्यासाठी झटकन् दार उघडून तो अदबीनं उभा राहिला. साहेब उतरले, तशी सखानं नेहमीप्रमाणे गाडी गराजमध्ये उभी केली. मग अंगावरचा शुभ्र ऐटदार गणवेश बदलून, हँगरवर लटकवून, गराजच्याच भिंतीवर खिळ्याला अडकवला अन् भिंतीवरचा फुलाफुलांचा लाल शर्ट नि निळी पँट त्याने अंगावर चढवली. खिशातला निळा रुमाल कॉलरभोवती बांधून सखा घरी जाण्यास तयार झाला. गराजच्या कोपऱ्यात दिवसभर उभी असलेली आपली दीनवाणी सायकल त्यानं बाहेर काढली आणि आकाशाकडे बघत तो पुटपुटला..... 'देवाऽ घरी पोहोचेतो पाऊस पडू देऊ नको रेऽ'

'अरे सखाऽ...' – वहिनीसाहेब खिडकीतून डोकावत म्हणाल्या–

'फोन होता तुझा मघा!'

'फोन? आणि माझा?'

'हो. हॉस्पिटलमधून होता बघ...'

'काऽऽ य म्हणता बाईसाहेब?'

'हो. अरे, तुझ्या पोराला ॲडमिट केलंय म्हणे...'

वहिनीसाहेबांनी सखाला समजावलं. हॉस्पिटलचा पत्ता सांगितला आणि म्हणाल्या –

'हे बघ सखा, नीट जपून जा...' तोपर्यंत सखा बंगल्याच्या फाटकातनं बाहेर पडला देखील.

– सखानं जोरजोरानं पायडल मारायला सुरुवात केली आणि त्याचबरोबर एकेक टपोरा थेंब मातीवर पडायला लागला. सखानं सारी शक्ती एकवटून सायकल दामटायला सुरुवात केली आणि एकाएकी आभाळ काळ्याकुट्ट ढगांनी व्यापून हवा कुंद झाली, वादळ सुटलं नि पाहता पाहता पाऊस कोसळायला लागला.

सखा केविलवाणा झाला. – 'देवा, काय रे हे? – तू पण गरिबाच्याच मागं लागतोस होय? काय झालं असेल माझ्या संजूला? कशापायी दवाखान्यात ॲडमिट केलं असेल?'

रस्ता कटत होता तसा पावसाचा जोर वाढतच चालला होता. अगदीच सायकल चालवता येईना तसा सखा अगतिक होऊन झाडाच्या आडोशाला उभा राहिला... डोक्यात विचारांचं काहूर वाढत चाललेलं –

'काय झालं असेल संजूला? कसा असेल तो? कुठं मोटारीखाली?... की रिक्शाखाली? – का मारामारीत हातपाय मोठला असेल?... की काही बाही खाऊन वांत्यांनी...?' पाहता पाहता काळोख दाटून आला. तशातच सगळीकडचे लाईट गेले.

अगोदरच आज साहेबांची मीटिंग खूप लांबली होती. त्यामुळे सखाला गाडी घेऊन कितीतरी वेळ बाहेर ताटकळत बसावं लागलं होतं. तिथे बसल्या बसल्या सखा कितीतरी वेळा वैतागून पुटपुटला होता –

**कधी वाटते मीपण सोडून, शून्यामधुनी शांत फिरावे. चैतन्याच्या कुशीत शिरूनी, अस्तित्वाला विसरून जावे.**

‘छ्या! याड लागायचं आसं भूतावाणी बसून!’ – मग ट्रॅफिक जॅममध्ये कितीतरी वेळ पेट्रोलचा धूर सोडत मुंगीच्या पावलानं सरकावं लागलं होतं.



सखाचं घर तिकडं लांब आळंदी रोडला. रोज सकाळी न्याहारी करून, डबा घेऊन सायकल ताणत साहेबांच्या बाणेर रोडवरच्या बंगल्यावर अगदी नावाच्या ठोक्याला हजर राहावं लागायचं. मग एकदा का गाडीचं चाक हाती धरलं की, साहेबांना ऑफिसला घेऊन जाणं, मग छोट्या बच्चे कंपनीला शाळेत सोडणं, मग बाईसाहेबांना क्लबात नाहीतर मंडळात सोडणं... सखाचा दिवस कधी मावळत असे ते त्यालाही उमगत नसे.

आज मात्र उशिराचा कहर झाला. नि तशातच तो फोन! ‘संजाऽ काय रं झालं तुला?’... जीवाच्या आकांतानं सखानं पुन्हा भर पावसात सायकल दामटायला सुरुवात केली.

पण चिखल... पाणी... खड्डे आणि भरीस भर म्हणून रात्रीचा गुडूप अंधार...

– साहेबांनी दिली असती?

– का नसती दिली? – आपण विचारलं पण नाही!

– साहेब आपल्यावर तसे खूष असतात. ‘सख्या गाडी फस्सक्लास सांभाळतो.’ असं नेहमी म्हणत असतात. नक्कीच त्यांनी दिली असती गाडी!

– सखा पश्चातापानं आतून जळत होता तर वरून पावसाच्या धारांनी भिजत होता.

‘एऽऽ य...!’ जवळून एक मारुतीवाला वेगात गेला आणि त्यानं सखाला सायकलवरून खाली पाडलं.

सखा आता साऱ्या मोटारवाल्या श्रीमंतावर चिडला. त्याचा जीव लेकराकडे लागला होता आणि या मोटरवाल्यानं त्याला चक्क चिखलपाण्यात लोळवलं होतं. कसा-बसा सायकल हातात धरून तो उभा राहिला आणि नकळत येणाऱ्या गाड्यांना हात दाखवू लागला. विनवू लागला.

●●

रात्रीची वेळ. अकराचा सुमार. डॉक्टरांचा नुकताच डोळा लागत होता. तोच फोन खणाणला...

‘होय. मी डॉक्टर भिंगेच बोलतोय.’

‘डॉक्टर, मी सिस्टर मेने बोलतेय. मघाचा पेशंट... सर त्याची हालत गंभीर आहे. कसंतरी करतोय. नाडी हाताला लागत नाही. काय करू?’

– बाहेर पाऊस मी म्हणत होता. डॉक्टरांनी सिस्टरना तातडीनं सुरू करण्याची औषधं सांगितली. इंजेक्शन देण्यास सांगितलं आणि म्हणाले –

‘‘सिस्टर, सांगितलेली औषधं, इंजेक्शन त्वरित द्या. मी निघालोच पण पाऊस कोसळतोय, वीज गेलीय. वेळ लागेल पोहोचायला. पेशंटची काळजी घ्या.’’

– डॉक्टर अवघ्या काही मिनिटांत तयार होऊन निघाले, तोच त्यांच्या पत्नीनं गरम कॉफीचा कप पुढे केला.

**कुठले कुठले गतजन्मांचे लख्ख कवडसे हृदयात न कळे कुठल्या सुख-दुःखांनी तुडुंब डोळे भरतात.**

'अगऽ...' डॉक्टर काही बोलणार तोच पत्नी म्हणाली... 'पिऊन घ्या एवढी. तरतरी येईल. गारव्यातून ड्रायव्हिंग करायचंय.''

– एका दमात कॉफी संपवून डॉक्टर बाहेर पडले.

गाडीचे वायपर्स चालू होते. परंतु काचेवर कोसळणाऱ्या संततधारांमुळे गाडीला वेग घेता येत नव्हता. त्यातून रस्त्यातून वाहणारे पाणी आणि भरीसभर म्हणून खड्डे!

गाडी निर्जन रस्त्याला लागली तेव्हा कुठे थोडासा वेग घेता आला. तेवढ्यात हेडलाइट्सच्या प्रकाशात डॉक्टरांना दिसलं – एक लाल शर्टमधील माणूस, मानेभोवती निळा रुमाल बांधलेला, आणि हातात पिस्तुल.

गाडी अडवून तो उभा राहिला – डॉक्टर बाहेर मान काढून त्याला काही समजावून सांगण्याचा प्रयत्न करणार, तोच त्या माणसानं डॉक्टरांना दार उघडून खाली ओढलं. डॉक्टर चिखलात पडले, चष्मा कुठंतरी उडाला. तो माणूस गाडीत बसून सुसाट निघून गेला.

डॉक्टरांनी स्वत:ला सावरलं. चाचपडत चष्मा शोधला. पावसाच्या धारांमध्ये धरून धुतला अन् डोळ्यांवर चढवला. 'फार उशीर होऊन चालणार नाही' असं मनाशी म्हणत ते चालत निघाले... तोच वीज चमकली. तिच्या लख्ख उजेडात झाडाखाली उभी केलेली सायकल त्यांना क्षणभर दिसली.

डॉक्टरांनी देवाचे आभार मानतच सायकलवर टांग टाकली आणि ते हॉस्पिटलच्या दिशेने निघाले.

हॉस्पिटलच्या आवारात ते पोहोचले तो त्यांना दिसलं... कोणीतरी आक्रोश करतंय.

– 'बापरे! पेशंट दगावला की काय? मला फार उशीर झाला की काय?' गडबडीत डॉक्टर पेशंटकडे धावले.

पेशंट अखेरचे क्षण मोजत होता. डॉक्टरांनी परिस्थिती जाणून घेतली... सलाईन, रक्त, ऑक्सिजन सारं काही सुरू केलं.

रात्रीचे दोन वाजले... बाहेर आक्रोश वाढतच होता. पहाटे चार वाजता डॉक्टर स्वत: बाहेर आले. पेशंटच्या नातलगांजवळ जाऊन म्हणाले – ''काळजी करू नका, पोरगं धोक्याच्या बाहेर आलंय. परमेश्वराच्या कृपेनं सारं ठीक होईल.''

बोलता बोलता डॉक्टरांचं लक्ष लाल शर्ट–निळ्या रुमालाकडे गेलं. क्रुद्ध होऊन डॉक्टर पुढं सरसावले. नातेवाईकांना काही कळेना.

डॉक्टरांनी 'त्या' इसमाच्या तोंडात खाड्कन ठेवून दिली...

लाल शर्ट–निळा रुमाल वाकला आणि डॉक्टरांच्या पायांवर लोळण घेत रडू लागला.

'आणखी मारा डॉक्टर... आणखी मारा...'

''पण... पण तू असं केलंसच का? पोरगं हातचं गेलं असतं तर?'' डॉक्टर म्हणाले.

''डॉक्टर, कितीतरी मोटारींना हात दाखवला, लिफ्टसाठी विनंती केली पण सगळे तसेच पुढे गेले – उद्दामपणे... मग... मग नेमकी तुमची गाडी आली. मी मनाचा निर्धार केला होता. संजूबाळासाठी आजच खरेती केलेलं खेळातलं पिस्तुल पुढे करून तुमची गाडी घेतली हिसकावून आणि इथं आलो.''

''वेड्याऽ, ह्या तुझ्या भडक कपड्यांमुळे मीसुद्धा तुला लिफ्ट दिली नसती.

श्रीमंतांना गरिबांविषयी आणि गरिबांनी श्रीमंतांविषयी करून घेतलेला गैरसमज असा अनर्थकारी ठरतो बघ'' – डॉक्टर त्याच्या पाठीवर हात ठेवत म्हणाले आणि सखारामचा बांध पुरता कोसळला.

●●

**सुहासिनी देशपांडे,**
३ पुण्यश्री अपार्टमेंट,
डहाणूकर कॉलनी, रस्ता क्र. ७,
कोथरूड, पुणे २९.

## हाऽ हाऽ हाऽ

'तुम्ही दादरला खांडके चाळीत राहता?'

'नाही?'

तुम्ही मंत्रालयात नोकरी करता?'

'नाही.'

'तुमचं नाव वामनराव गोगटे हे आहे काय?'

'नाही.'

'मग ऐका– माझं नाव वामनराव गोगटे, नोकरी मंत्रालयात, राहणार दादर, खांडके चाळ आणि तुमच्या हातात जी छत्री आहे ती तिच्यावरील नावानुसार माझी आहे.'

**दारी असावी दीपमाळ सतत तेवणारी, धन्याच्या घरी स्निग्ध तेज पसरविणारी.**

# प्रश्नोपनिषद

**– मंगला गोडबोले**

बऱ्याच वर्षांनंतर माझ्या त्या काकू माझ्या घरी आल्या होत्या. मधल्या इतक्या वर्षांचं इतकं काही आम्हा दोघींना बोलायचं होतं की सांगता सोय नाही. पण पप्पांची गाडी पावलोपावली पंक्चर करायला त्यांचा नातू त्यांच्या सोबत होता. जेमतेम साडेतीन–चार वर्षांचा तो गोरा गप्प्या मुलगा फक्त दोन शब्दांची हत्यारं घेऊन आम्हा दोघी मजबूत बायकांना नेस्तनाबूत करत होता. कोणते ते दोन शब्द? पहिला, 'का?' आणि दुसरा, 'कशाला?' त्याचे उच्चार स्वारी 'ता' आणि 'तशाला' असे करत होती. अजून त्यांच्या शब्दलिपीत 'क' यायचा होता.

त्यामुळे एकूण संवाद येणेप्रमाणे चालू होता. ''फाटकाबाहेर जाऊ नको रे रॉबिन.''

''ता?''

''गाड्याबिड्या येतात.''

''तशाला?''

''रस्ता आहे म्हटल्यावर येणारच ना.''

''ता?''

''मग त्यांनी कुठून जावं? आपणच आपल्याला सांभाळायचं.''

''तशाला?''

''हात–पाय मोडला तर डॉक्टरांकडे पळत सुटावं लागेल?''.

''ता? पळायचं तशाला?''

''ते ती मेल्यावर सांगेन मेल्या. तू चूप बस बरं!!




''ता?''

''दोन वाक्यं काही बोलू देत नाहीस. मी गप्पा मारायला आले आहे ना इथे?''

''तशाला?''

''हे बघ, तू आता काही न विचारता हा खाऊ खा बरं.''

''खाऊ? तशाला?''

''पोट भरतं.''

''पोट तशाला भरायचं?''

या 'संतसदृश' प्रश्नानं मात्र आमच्या काकू खऱ्याच बिथरल्या. हात उगारत आवाज चढवत म्हणाल्या,

''आता प्रश्न थांबवतोस का दोन ठेवून देऊ?''

''तशाला?'' त्यानं मान वाकडी करत इतक्या गोजिरवाण्या पद्धतीनं प्रश्न विचारला की मला तरी त्याचा पापाच घ्यावासा वाटला. पण काकूंनी त्यामुळे चिडून त्याच्याऐवजी माझ्यावर हात उगारला असता, त्या भीतीनं मी गप्प राहिले.

''प्रश्नांनी नुसता भंडावून सोडतो कार्टा. मुलांचे प्रश्न बंद केले पाहिजेत काहीही करून'' काकू करवदल्या.

''काही गरज नाही. वयानं आपोआप बंद होतात ते.'' मी त्यांना शांत करत म्हटलं.

आदल्याच दिवशी एका पालकसभेत मी पाहुणी म्हणून गेले होते. तिथे दोन–तीन शिक्षक प्रतिनिधींनी सांगितलेला मुद्दा माझ्या स्मरणात होता. एकदा तिसरी–चौथीची पायरी ओलांडली की आजकाल मुलं काही प्रश्नच विचारत नाहीत, असं ती मंडळी सांगत होती. त्यांच्या मते मुलांना प्रश्न पडत नसतील. हे तर शक्य नव्हतं. प्रश्न पडत असणार, कुठूनतरी आपापसातून त्यांची उत्तरं मिळवायचा प्रयत्नही ते करत असणार. पण योग्य त्या अधिकारी व्यक्तीसमोर हात उंचावून, प्रश्न विचारून, बिनचूक उत्तर मिळवण्याचा प्रयत्न मुलं करत नाहीत, अशी त्यांची खंत होती.

असं का होत असेल? प्रश्न फारसे छळत नसतील? का शिक्षक उत्तरं देतील याची खात्री नसेल? का, कुठे प्रश्न विचारून सरांच्या जवळ जा आणि पुढचं संकट ओढवून घ्या अशी भीती वाटत असेल? का प्रश्न विचारण्याचा उद्धटपणा केल्याबद्दल सर रागावतील ही भीती असेल?

यातली काही काही कारणं कोणाकोणाबाबत खरी असली तरी एकूण मला यामध्ये आळसाची शक्यता सर्वात जास्त वाटते आणि तो आळसही शारीरिक नव्हे, बौद्धिक. प्रश्न पडायला मुळामध्ये विचार करावा लागतो. बुद्धी वापरावी

**कुठले कुठले गतजन्मांचे लख्ख कवडसे हृदयात न कळे कुठल्या सुख-दुःखांनी तुडुंब डोळे भरतात.**

लागते.

समोरची व्यक्ती जे काही उत्तरं देईल ते समजून घ्यायला पुन्हा बुद्धी वापरावी लागते. मन लावावं लागतं. नुसतंच मख्खासारखं बसून राहायला किंवा निराधार विधानं करायला यापैकी काही करावं लागत नाही. प्रश्नांशी खूपदा झुंज संभवते. पर्यायी उत्तरं शोधणं, मिळवणं, त्यातली योग्य ती उत्तरं स्वीकारणं, प्रश्नाचे उपप्रश्न समजून घेणं, वाद घालणं दुराग्रह सोडून नवी वाटणारी मतं किंवा माहिती ऐकून घेणं वगैरे वगैरे. थोडक्यात, म्हणजे ही एक प्रकारची प्रक्रियाच सुरू होते. मख्खपणा आणि मठ्ठपणा हा पूर्णविरामासारखा असतो. एकदा तो आरंभला की पुढचं काहीही करण्याची जबाबदारी अंगावर येत नाही. पण बाल–किशोर–कुमार वयात असला पळपुटेपणा काय कामाचा? मग माणसात आणि पोस्टाच्या पेटीत– सिमेंटच्या खांबात– रस्त्याकडेच्या बांधात फरकच काय उरला?

आपल्याकडे वर्षानुवर्षे 'गप्प बसा' संस्कृती होती, मुलांच्या चौकसपणाला प्रोत्साहन नव्हतं; मुलांनी फालतू प्रश्न विचारणं हा मोठ्यांचा अनादर समजला जात होता, असं मानतात. हे काही प्रमाणात खरं असलं तरी आज तरी ती नक्कीच बदलते आहे. मुलांचे आणि शिक्षकांचे, पालकांचे संबंध आता कमी औपचारिक आहेत. 'सरांचा पचका झाला', 'आजी तुझा अगदी पोपट केला बाबांनी' अशी वाक्यं बोललीही जातात आणि ऐकणारेही ती चालवून घेतात. मग प्रश्नांच्या बाबतीतच ही एवढी परीट घडी का? तिथेच एवढा आज्ञाधारकपणा कुठून आला?

सगळेच प्रश्न काही उद्धट नसतात. प्रश्न कसा विचारला, कधी विचारला, कशा भाषेत– कशा स्वरात– कोणासमोर विचारला यातूनही त्याचा पोत बदलतो. नरम होतो. खरी जिज्ञासा, कुतूहल, खरा बौद्धिक सामना व्यक्त करणारा होऊ शकतो. मग त्यातून नावड, नाराजी, मतभेद व्यक्त झाला तरी फार काही इजा पोहोचत नाही. कारण मुळात कोणाला इजा करण्यासाठी तो प्रश्न विचारलेला नसतो. नावडत्या गोष्टीबद्दल नावड, नाराजी दर्शवणारे तीक्ष्ण प्रश्न येतात हे तर खरं, पण नुसते नावड व्यक्त करणारे प्रश्न विचारावेत असं नाही. आवडत्या गोष्टींबद्दलही प्रश्न विचारावेत. जाणत्यांना विचारावेत तसेच स्वत:लाही विचारावेत. आपण सहसा असं करत नाही. विधानं करतो, फटाफट विधानं करत असतो; सहज मित्रमंडळीत सांगून टाकतो,

''अमुक सिनेमा आपल्याला आवडला.''

का आवडला? असं विचारलं तर आपल्याला काहीही उत्तर देता येत नाही. सिनेमा आवडला म्हणजे त्याची गोष्ट आवडली? नायक–नायिकेचं रंगरूप आवडलं? त्यांचा अभिनय आवडला? दिग्दर्शन आवडलं? गाणी आवडली? विनोदी भाग आवडला? करुण प्रसंग आवडले? काय आणि का आवडलं असं जरा खोलात शिरून बघायला गेलो तर आपणच गांगरून जातो. एखादे वेळेस चिडून किंवा त्रासून म्हणतो, ''आवडीचा असा 'पंचनामा' करायला मला नाही बुवा (किंवा बाई) आवडत.'' वास्तवात हा काही नुसता पंचनामा नसतो. बौद्धिक क्रीडा असते. जरूर करावी. मन रमतं, वेळ छान जातो, स्वत:पुरती स्वत:ला चिकित्सेची सवय लागते. भोंगळ, सरळधोपट विधानं करण्याचा मोह कमी व्हायला लागतो. एखादे तुकाराममहाराज यालाच 'आपुलाच वाद आपल्याशी' असं म्हणतात. कारण मुळात त्यामागे संवादाची इच्छा गृहीत धरलेली असते. 'यांच्याशी काही बोलण्यात अर्थ नाही' असं वाटण्यापेक्षा प्रश्न विचारून का होईना पण जरा देवघेव करू, ही भूमिका जास्त बरी. तरुण वयात तरी ती असायलाच हवी. 'कशात काही अर्थ नाही' म्हणून आढ्याकडे बघत बसण्याचं वय येईल तेव्हाचं तेव्हा बघता येईल. विद्यार्थ्यांनी तरी प्रश्नांकडे पाठ करणं कधीही हिताचं ठरणार नाही.

त्या दिवशी काकूंना असंच काहीतरी सांगून मी म्हटलं, ''याला खूप प्रश्न विचारू द्या हो, शोनू, विचार रे. सारखे प्रश्न विचारत राहा.''

''तशाला?'' तो म्हणाला. मी निरुत्तर झाले.

●●

**मंगला गोडबोले**
७ गीताली,
पी.वाय.सी., पुणे ४.

**क्षणोक्षणी मज देऊनि मोदे मंगल संदेश मम अंतरिचा कल्पवृक्ष हा नित्य फुलवितेस**




*माणसं कधी जन्मत:च मोठेपण घेऊन जन्माला येत नाहीत. पण ते विनासायासही प्राप्त होत नाही. त्यासाठी लागतो ध्येयप्राप्तीचा ध्यास आणि त्या दिशेने केलेला प्रयत्न. तेव्हाच कर्तृत्व आकाराला येतं. कर्तृत्वाशी खरं तर तरुण वयात नातं जोडणं, हे म्हटलं तर अवघड, म्हटलं तर कष्टाने सहजसाध्य. फक्त जीवनाच्या वाटचालीत आपल्याला कुठं जायचंय हा निर्णय योग्य वयात करता आला पाहिजे. आपल्या क्षमता ओळखता आल्या पाहिजेत. आपले ध्येय साध्य करण्यासाठी जीवापाड धडपडण्याची तयारी पाहिजे. संधीचा लाभ घेता आला पाहिजे.*

*'कर्तृत्वाशी जडले नाते' या लेखमालेत युवापिढीतील विविध क्षेत्रात कर्तृत्व गाजवणाऱ्या काही व्यक्तींच्या घडणीचा परिचय त्यांच्याच शब्दात आपण करून घेणार आहोत.*

*गणित ऑलिम्पियाडमध्ये सुवर्णपदक मिळविणारा जवळजवळ तुमच्याच वयाचा 'चेतन बालवे' आज गणितातील उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत गेला आहे, तर अमेरिकेत उच्च शिक्षण पुरे करून संशोधनक्षेत्रात आपला ठसा उमटविणारे 'डॉ. आशिष लेले' हे थोडे वरच्या वयोगटातील. तरीही अभ्यासाची ओढ, दोघांना स्वदेशाविषयी असणारं प्रेम हा समान धागा दिसतो.*

*'सुमना नाथ' ही चित्रकलेच्या साधनेत रमलेली चित्रकार. तर गानसाधनेत मग्न असलेली 'सावनी शेंडे' दोघींना कलेचा वारसा आपल्या पित्याकडून मिळाला असला, तरी त्यांची कलेच्या साधनेतील एकाग्रता, श्रद्धा त्यांना लहान वयातच खूप यश देऊन गेली आहे. जन्मजात अंधत्वावर मात करून व्हायोलिनच्या सुरांचा मागोवा घेणाऱ्या 'संजय उपाध्ये'च्या कर्तृत्वाला एक वेगळेच परिणाम खूप उंची देऊन जाते. 'क्रीडाक्षेत्र' ही तर तरुणांची मक्तेदारी! पण तेथेही चमकते यश मिळविणारे बुद्धिबळपटू 'अभिजित कुंटे' व जलतरणपटू 'मेघना परांजपे' यांच्या पराक्रमाचा परिचय तुम्हाला येथे होईल. स्वत:ची धडपड, प्रयोगशीलता, व्यासंग यात रमलेल्या 'समीर गोखले' ला औपचारिक शिक्षणात रस वाटला नाही. परंतु लहानपणापासून वडिलांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केलेल्या संशोधनातील धडपडीला 'पारखे पारितोषिका'च्या रूपाने मान्यता मिळाली. 'डॉ. आशिष लेले' व 'समीर गोखले' दोघांच्याही कर्तृत्वाचा आलेख पाहताना संशोधन आणि उद्योजकता यांची सांगड घालण्याविषयीची जागरुकता, संशोधनाची झेप घेतानाही वास्तवाचं भान ठेवणं किती आवश्यक आहे हे दाखवते.*

*घराला पारखी झालेल्या रस्त्यावरील छोट्या मुलांची अनवस्था पाहून कुणी एक 'सुदेष्ण घारे' अस्वस्थ होते; तिची समाजसेवेची ऊर्मी तिला स्वस्थ बसू देत नाही. त्यातून उभं राहतं तरुणाईला आव्हान देणारं एक निखळ समाजकार्य!*

*चित्रपटाच्या चमचमत्या दुनियेत पुरेशा गांभीर्याने आणि आत्मविश्वासाने वावरणारी 'सोनाली कुलकर्णी' अंगचे अभिनयगुण व प्रामाणिक प्रयत्न यामुळे आज स्वत:चे वेगळे स्थान निर्माण करू शकली हे तिच्या निवेदनातून जाणवते.*

*या लेखमालेतील व्यक्तींची निवड बरीचशी प्रातिनिधिक असली तरी काही अडचणींमुळे अनेक क्षेत्रे विचारात घेता आली नाहीत व वेळेअभावी पुण्याबाहेरील व्यक्तींचा परिचय देता आला नाही. या मर्यादा लक्षात घेऊनही या व्यक्तींचं कर्तृत्व नक्कीच प्रेरणादायी आहे. तुमच्या आसपासही अशी वेगळ्या क्षेत्रात मोठं काम करणारी, धडपडणारी तरुण मंडळी असतील. त्यांची माहिती स्वत: करून घ्या व 'छात्र प्रबोधन'च्या माध्यमातून इतरांना करून द्या. आपली वाट आपणच शोधताना हवी असलेली आश्वासक प्रेरणा तुम्हाला त्यात नक्कीच लाभेल.*

कोणि नसे जन्माने मोठा, कर्तृत्वाने जो तो होई, निज भाग्याचा जगी निर्माता

**कर्तृत्वाशी जडले नाते!**

# गणिताच्या सिद्धान्तामधील सौंदर्य खुणावतंय

**कु. चेतन बालवे**

***आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाडमध्ये एकदा रजत आणि यंदा तर सुवर्णपदक मिळविलेल्या चेतनने, खूप लहान वयात आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे प्रतिनिधित्व केले. आजतरी चेतन उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळवून परदेशी चाललाय, पण भारतात परत यायच्या ठाम निश्चयानेच...***

**१९** जुलै १९९८! माझ्या आतापर्यंतच्या विद्यार्थी दशेतील तो सर्वोच्च आनंदाचा दिवस होता. १५, १६ जुलै रोजी झालेल्या आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाड स्पर्धेसाठी आम्हा सहा जणांचा गट सर्व देशभरच्या विद्यार्थ्यांतून निवडला गेला होता. गेले कित्येक दिवस गणितातील विविध अवघड समस्या सोडविण्यात आम्ही दंग होतो. आमच्यातील तिघेजण गतवर्षीच्याच संघातील होते. १५ तारखेला स्पर्धा सुरू झाली. एकूण सहा प्रश्न सोडवायचे होते. प्रत्येक प्रश्न म्हणजे आमच्या बुद्धीला, तर्कशक्तीला, एकाग्रतेला आव्हान होते. एकामागून एक प्रश्न सोडवत होतो. तरीही एका प्रश्नाला गाडी थोडी अडलीच. उदाहरण खूपच अवघड होते. खूप विचार करायला लावणारे... काही क्षण मन निराश झाले. हातातोंडाशी आलेले यश यावेळीही थोडक्यात हुलकावणी देते की काय असं वाटलं, पण दुसऱ्या क्षणी स्वत:ला सावरून शांत मनाने सर्व उदाहरणे सोडवली. संध्याकाळी इतर देशातील सहस्पर्धकांशी गप्पा मारताना लक्षात आलं की आम्हाला सोपी वाटणारी उदाहरणेही खूपजणांना अवघड गेली होती.




आमचा आत्मविश्वास आणखीनच दुणावला. आता प्रतीक्षा होती. निर्णयाच्या क्षणाची! मधले तीन दिवस आम्ही नव्याने झालेल्या आमच्या मित्रांसमवेत वेगवेगळ्या संग्रहालयांना, प्रेक्षणीय स्थळांना भेटी देत होतो. पण सर्वांचं लक्ष होतं ते मात्र १९ तारखेला प्रसिद्ध होणाऱ्या निकालाकडे! अखेर गेल्या चार वर्षांच्या माझ्या परिश्रमांचं फळ मला मिळालं. मी स्वत: तर सुवर्णपदकाचा मानकरी ठरलो होतोच; पण माझ्यासह ३ सुवर्ण व ३ रौप्यपदके मिळवून ७६ संघांमध्ये भारतीय संघाने सातवा क्रमांक मिळविला होता. स्वत:च्या वैयक्तिक यशाचा आनंद तर होताच, पण त्याबरोबर आपल्या देशाचं नाव या स्पर्धेत झळकविण्यात आपला वाटा आहे या भावनेचा आनंदही खूप आगळा होता!

प्रथम ही स्पर्धा नेमकी कशी असते हे जाणून घ्यायला तुम्हाला नक्कीच आवडेल. जगभरातील हायस्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी गणित विषयातील ही स्पर्धा घेतली जाते. १९५९ साली रुमानियामध्ये या स्पर्धेची सुरुवात झाली. हळूहळू सहभागी होणाऱ्या देशांची संख्या वाढत गेली. या वर्षी तैवान येथे ७६ देशांचे संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्याला प्री-कॅलक्युलस गणितातील सहा आव्हानात्मक प्रश्न सोडवावे लागतात. प्रत्येक अचूक उत्तराला ७ गुण असतात. या गुणांच्या आधारे प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना पदके घेऊन गौरविण्यात येते. भारतात प्रादेशिक पातळीवर ३० विभागात 'प्रादेशिक ऑलिंपियाड' स्पर्धा घेतली जाते. प्रत्येक विभागातील ३० याप्रमाणे एकूण ९०० विद्यार्थी निवडले जातात. या ९०० विद्यार्थ्यांची राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा National Board of Higher Mathematics (NBHM) तर्फे

**घनतिमिरांतुनि पथ आक्रमीत असता, भीती न स्पर्शली मुळीच माझ्या चित्ता.**

घेतली जाते. त्यातून ३० विद्यार्थ्यांना निवडून एक महिन्याचे प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षण काळात ५ चाचण्या घेतल्या जातात व त्यातून ६ विद्यार्थ्यांचा संघ आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवडला जातो.

मी नववीत असताना पुण्यातील भास्कराचार्य प्रतिष्ठानतर्फे घेतल्या जाणाऱ्या गणित ऑलिम्पियाडच्या प्रशिक्षण वर्गाला जायला सुरुवात केली. त्यानंतर मी प्रादेशिक गणित ऑलिम्पियाड परीक्षेला बसलो. त्यात निवड होऊन राष्ट्रीय गणित ऑलिम्पियाडसाठी माझी निवड झाली. भास्कराचार्य प्रतिष्ठानमध्ये प्रा. एम.प्रकाश यांच्या मार्गदर्शनाखाली रोज संध्याकाळी ८-३० ते १०-३० या वेळात सराव चालू झाला. तेथे मिळणारी प्रेरणा, उदाहरणे सोडविण्याच्या काही मुलभूत युक्त्या शिकणं, विविध देशातून प्रकाशित होणाऱ्या गणितविषयक मासिकांचा अभ्यास करणं, यातील आनंद खूप वेगळाच! त्यावर्षी ही परीक्षा मी उत्तीर्ण होऊ शकलो नाही. परंतु या गोष्टीने निराश न होता पहिला अनुभव गाठीशी बांधून मी दहावीत असताना पुन्हा या सर्व स्पर्धांना बसलो व होमी भाभा संकुलात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाडच्या प्रशिक्षण शिबिरासाठी माझी निवड झाली. या शिबिरात देशभरातील उत्तम गणितज्ज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. मात्र अजूनही अंतिम भारतीय संघात स्थान मिळवण्याइतकी माझी तयारी झाली नव्हती. त्याच्या पुढील वर्षी म्हणजे १९९७ सालच्या स्पर्धेत मात्र माझी संघात निवड झाली व अर्जेंटिना येथे झालेल्या ३८ व्या I.M.O. स्पर्धेत मी रौप्यपदक मिळवले. या स्पर्धेत भारताला ८४ देशांत १५ वे स्थान मिळाले. पण अजूनही माझे अंतिम ध्येय (सुवर्णपदक) साध्य झाले



नव्हते. म्हणूनच यावर्षी बारावीचा अभ्यास असूनही मी पुन्हा प्रयत्न केला. एकीकडे बारावीचा अभ्यास, I.I.T. प्रवेशपरीक्षेची तयारी आणि वेळ मिळेल तसा गणित ऑलिम्पियाडचा अभ्यास अशी कसरत चालू होती. पण अभ्यासाचा आनंद वाटत होता. मनात जिद्द होती. आईवडिलांचे सहकार्य होते. अध्यापकांचे प्रोत्साहन होते. म्हणूनच या वर्षीच्या तैवान येथे झालेल्या गणित ऑलिम्पियाडमध्ये मी सुवर्णपदकाचा मानकरी ठरलो. बारावीच्या परीक्षेतील गुणांचा आग्रह न धरता मनमुक्त अभ्यास करण्याची संधी माझ्या पालकांनी दिली याविषयी मी अतिशय कृतज्ञ आहे आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे गेल्या चारपाच वर्षांत गणिताविषयी निर्माण झालेलं प्रेम या यशामागे आहे. तरीही स्पर्धेच्या इथे वावरताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवत होती ती म्हणजे इतर देशांतील स्पर्धक विद्यार्थ्यांना स्पर्धेतील यशानंतर शिकण्याच्या अनेक आकर्षक संधी उपलब्ध आहेत. आपले सरकार मात्र अशा कोणत्याही खास सवलती, संधी उपलब्ध करून देत नाही. जर असं घडलं तर आपल्या



**ऊठ वीरा, धाव घेई मोहपाशा सारुनी, मेळवि दुर्लंघ्य कीर्ती मायभू उद्धारूनी.**

देशातील स्पर्धकांची कामगिरी आणखीनच सुधारू शकेल. असं जरी वाटलं तरी गणितावरील प्रेम मला आता स्वस्थ बसू देणार नाही. बारावीतील उत्तम यश, I.I.T. प्रवेशपरीक्षेतील खूप वरचा क्रमांक असूनही अमेरिकेत मुलभूत गणिताचा अभ्यास करण्याची संधी न सोडण्याचा मी निर्णय घेतलाय. अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठात मी बी.एस.चा अभ्यासक्रम पूर्ण करणार आहे. पदवी शिक्षणासाठी हे विद्यापीठ क्वचितच शिष्यवृत्ती देते. पण मला ही संधी मिळते आहे. तिचा लाभ घेण्याचे मी ठरवले आहे. पदव्युत्तर शिक्षण, संशोधन नेमके कुठे करायचे हे अजून ठरवलेले नाही. कारण आपल्या देशातही टाटा मुलभूत संशोधन संस्था, चेन्नईची Indian Institute of Mathematics सारख्या उत्तम संस्थांमध्येही अनेक संधी उपलब्ध आहेत. संगणकशास्त्र व इतर विज्ञानशाखांच्या अभ्यासातही गणिताचा खूप उपयोग आहे. काहीही असलं तरी शिक्षण संपल्यावर आकर्षक, लठ्ठ पगाराच्या नोकरीच्या मागे न लागता मायदेशी परतायचंय एवढं मात्र नक्की!

मित्रांनो, हे सर्व सांगत असताना माझ्या यशाचं कौतुक तुमच्यापर्यंत पोहोचवणं एवढाच हेतू नाही. ज्यांना गणित विषयाचं खरं प्रेम आहे, त्यांना योग्य मार्गदर्शनाचा लाभ घेऊन या स्पर्धेत उतरणं अवघड नाही. हेही तुमच्यापर्यंत पोहोचवायचंय. तसेच ज्या गुरूंचं मार्गदर्शन लाभलं त्यांचं ऋण व्यक्त करण्याची इतकी छान संधी दुसरी कुठली मिळणार? पुण्याच्या भास्कराचार्य प्रतिष्ठानने सुनियोजित मार्गदर्शनाची सोय केलीय. गणित विषयावरही छान मासिकं असतात हे तुम्हाला माहीत आहे का? एकदा प्रादेशिक पातळीवर निवड झाली की, बंगलोरच्या Indian Institute of Science मधील गणितप्रेमी अध्यापकांचे मार्गदर्शन 'पत्राद्वारे संपर्क' साधून तुम्ही मिळवू शकता. गणितासारख्या मुलभूत विषयात संशोधन करण्यातही व्यावसायिक अभ्यासक्रमाइतकाच आनंद असेल हेही आजच्या स्पर्धेच्या युगात कुणीतरी सांगायला हवंच ना! मित्रांनो, तुम्हीही विचार करून, आपली आवड ओळखून आपली वाट निवडा. गणितातील मुलभूत प्रमेये, नवीन Theory, त्याचे उपयोजन या सगळ्यांतलं सौंदर्य मला खुणावतंय. त्याचा मागोवा घेत पुढील अभ्यासाला निघालोय. मनात विश्वास आहे, हवं ते श्रेयस् प्राप्त करूनच पुन्हा एकदा मायभूमीच्या वाटेवरून परत येईन.

●●

**कु. चेतन बालवे**
१०३, ज्ञानदीप, स्वानंद सोसा.,
सहकारनगर-२, पुणे ९.

---

# सुरांच्या सोबतीने अजून खूप प्रवास करायचाय!

**कु. चेतन बालवे**

***अतिशय लहानपणी आजीकडून आलेले शास्त्रीय संगीताचे संस्कार सावनीने पटकन आत्मसात केले आणि वयाच्या दहाव्या वर्षी दिल्लीत राष्ट्रपती भवनात झालेल्या कार्यक्रमानंतर तर सावनीने मागे वळून पाहिलेच नाही. पं. जसराज पारितोषिक, संगीतोन्मेष पुरस्कार सावनीने मिळविले आहेत. अशी ही स्वरयात्री, सुरांच्या साथीने केलेल्या आणि पुढेही चालू राहणाऱ्या तिच्या या प्रवासाबद्दल सांगते आहे...***

**मी** अगदी ५-६ वर्षांची असेन, माझी आजी क्लासमध्ये शिकवत असायची. मला त्यातलं किती समजायचं शंकाच आहे. पण ते स्वर तिथंच खिळवून ठेवायचे. मी शांतपणे तीन-तीन, चार-चार तास ऐकत बसायचे. कोणत्या क्षणी ते सगळं मनात साठलेलं गळ्यातून उतरलं, आठवत नाही. पण नंतर माझ्या आजीकडे माझा व्यवस्थित क्लास सुरू झाला...

त्यानंतर थोड्याच काळानंतर मला 'सुवर्णसंधी' वगैरे म्हणता येईल अशी संधी मिळाली. पं. विष्णू दिगंबर पलुसकर संगीत समारोह- राष्ट्रपती भवनात मोठा दिमाखदार सोहळा आयोजित होता आणि मी माझा पहिला परफॉर्मन्स देणार होते. पण भीती वगैरे वाटल्याचं आठवत नाही.

**गाणं गायला नवं, निळं मोकळं आभाळ हवं!**

कदाचित लहान असल्यामुळे आपण कुठेतरी मोठ्या शहरात, मोठ्या कार्यक्रमात गाणार आहोत अशी जाणीवच झाली नसावी. म्हणूनही भीती वाटली नसेल. पण हेही खरं की त्यानंतर कळायला लागल्यावरही अनेक कार्यक्रम केले, पण रंगमंचावरून कार्यक्रम सादर करताना गर्दीची भीती म्हणून जी म्हणतात, ती कधी वाटलीच नाही. कारण एक मनात पहिल्यापासून ठाम होतं की, जे आपल्याला येतं, आपल्याकडे जे आहे, ते मोकळेपणाने मांडायचं, त्याचं दडपण कसलं घ्यायचं?

आजीकडे शिकत होते. तेव्हाच माझ्या भाग्यानं मला वीणाताई सहस्रबुद्धे यांच्याकडे शिकायची संधी मिळाली. वीणाताईंकडे शिकण्याचा मुख्य फायदा असा झाला की गाणं शिकण्याबरोबर ते लोकांपुढे सादर कसं करायचं हे कळत गेलं. आज त्यांच्याकडे गाणं शिकणं हा एक आनंदाचा भाग असतो. आम्ही कधी कधी ३–४ तासही गात राहतो. अक्षरश: वेळेचं भानही उरत नाही. इतर कुणाचं ऐकलेलं गाणं, त्यांची शैली यावर आमच्या छान गप्पाही होतात. त्यांच्याकडे शिकणं मला खूपच आनंददायी वाटतं.

तसं वीणाताईंप्रमाणे मी आजी आणि बाबांकडेही शिकतेय. आमच्यातलं नातं एक नात आणि आजी, किंवा मुलगी – वडील असं कधीच नसतं. आम्ही तिघंही एकाच क्षेत्रातल्या तीन पिढ्या. पण गाणं शिकण्याचा, ऐकतानाचा अनुभव घेताना हे अंतर कधीच आड येत नाही. माझ्या संगीत साधनेत माझ्या

कर्तृत्वाशी जडले नाते!




आजीचा आणि वडिलांचा जितका वाटा आहे तितकाच माझ्या व्यक्तिमत्त्व विकसनात माझ्या आईचाही वाटा आहे.

एखाद्या रागाच्या रचनेबद्दल माझ्या आजीच्या, माझ्या बाबांच्या खूप गप्पा होतात. आजीचा, बाबांचा कायम आग्रह असतो – 'तू तुझी शैली बनवण्याचा प्रयत्न कर. स्वर तेच आहेत – तीच रचना आहे, त्यात तू तुझं असं काही ओतू शकतेस का?' – यातूनच काही वेगळं करण्याची प्रेरणा मिळत असते – शास्त्रीय संगीत हे मला याचसाठी खूप आवडतं आणि जवळचं वाटतं. सुगम संगीतातल्याप्रमाणे दुसऱ्यानं सांगणं आणि आपण म्हणणं हा भाग यात कधीच नसतो. यात मला 'मी' व्यक्त करण्याची संधी मिळते. माझ्या गाण्यात माझा स्वभाव, माझ्या आवडी सगळं उतरत असतं. म्हणूनच शास्त्रीय संगीतात प्रत्येक राग गाणाऱ्याची शैली, त्याची वैशिष्ट्ये, त्याचे गुण घेऊन उतरतो. म्हणूनच एकच राग प्रत्येकाने गायला तरी प्रत्येकाचा वेगळा होत असतो, ठरत असतो.

मी शास्त्रीय संगीताकडे वळले त्यामागे हे तर कारण आहेच पण खरं सांगायचं तर मी सुगम संगीतात फार काळ नाही रमू शकत. दुसरं माझा आवाजही शास्त्रीय संगीतालाच सोयीचा आहे, असं वाटतं. शास्त्रीय मध्येही कोणत्या घराचं बंधन नको वाटतं. अमुक एखाद्या घराण्याची गायकी स्वीकारणं म्हणजे आपल्याच गाण्याच्या स्वातंत्र्यावर, आवडीवर, क्षमतेवर आपणच मर्यादा घालून घेणं होईल असं वाटतं, म्हणून कोणतंच घराणं मी स्वीकारलेलं नाही आणि वीणाताईंनीही मला याबाबतीत पाठिंबाच दिला आहे.

कधी तरी अशी मजा होते की, शास्त्रीय संगीत सगळ्यांनाच समजतं असं नाही. मग माझ्या मैत्रिणी म्हणतात – 'अगं, हे असलं का तू गात बसतेस? तू सरळ भावगीत किंवा सुगम संगीत का नाही गात?' आज खरं तर या आधुनिक संगीताचाच जमाना आहे. कितीतरी लोक अल्बम्स् वगैरे काढून एकदम प्रसिद्धीच्या झोतात येत आहेत. आज याला खूपच ग्लॅमरसही आहे. पण तरी मला माझं क्षेत्र सोडावसं वाटत नाही. एक तर मला कधीच, अगदी लहानपणापासून प्रसिद्धीच्या झगमगाटाचं आकर्षण वाटलं नाही – आणि आता तर शास्त्रीय संगीतातून

**प्रशांत ओहळते स्वरातिल सुंदर मार्दव हे। गहन भावनांची गमे ही जान्हवीच वाहे।**



मिळणाऱ्या आनंदात आकंठ बुडले असताना बाहेर यावंसंच वाटत नाही. मी शास्त्रीय गाते म्हणून हे बोलतीये असं नाही; पण हे संगीत कळत नसूनही खूप ऐकावंसं वाटणारे लोक खूप आहेत. बऱ्याच जणांना यात गोडी वाटते. आपल्याकडेच नव्हे तर परदेशातही याबद्दलचं आकर्षण वाढतंय. मी आणि माझी बहीण बेला – नुकताच अमेरिकेचा दौरा करून आलो. तिथल्या भारतीयांचा तर चांगला प्रतिसाद होताच पण अनेक परदेशी माणसांनाही यात खूपच गोडी वाटत होती. तिथले अनुभव तर खूपच बोलके आहेत. या स्वरांची जी कंपने निर्माण होतात त्यामुळे खूपच वेगळा, सगळं विसरायला लावणारा अनुभव येतो – अर्थात ही प्रतिक्रिया केवळ तिकडच्यांचीच नाही तर आपल्यापैकीही बऱ्याच जणांनी हा अनुभव, हा आनंद घेतला असेल.

गाताना होणारा आनंद तर निव्वळ अवर्णनीय असतो. त्याक्षणी तर मी सगळं विसरतेच पण इतर वेळीही माझा मूड खूपच छान राहतो. दिवसभर उत्साही वाटत राहतं आणि मुख्य म्हणजे अभ्यास करताना खूप एकाग्रता साधली जाते – गाताना तुम्हाला जी अत्यावश्यक असते.

या आनंदाबरोबर कधी कधी असंही होतं – एखादी नवी मांडणी करायची असते. डोक्यात दिवस रात्र तेच घुमत असतं. रात्री झोपही लागत नाही. अशी मांडणी करावी तर ती या रागापेक्षा दुसऱ्याच रागाला जवळची होते. तशी करावी तरी ती तिसऱ्याच रागाला जवळची होते. काय करायचं काही कळत नाही. मग मी आजीशी – बाबांशी बोलते – ते फक्त 'तू योग्य मार्गावर आहेस' एवढंच सांगतात– आणि एखाद्या क्षणी, मी काहीतरी दुसरंच काम करत असताना ती मांडणी स्फुरते. हे एवढं सोप्पं होतं होय! अर्थात दोन दिवस याच सोप्प्या गोष्टीनं माझं डोकं खाल्लेलं असतं – पण एवढं मात्र खरं की, त्या क्षणीचा आनंद अक्षरश: प्रचंड असतो. दोन दिवस त्या अस्वस्थतेने झोपही मिळू दिलेली नसते तरी काहीतरी शोधल्याच्या, आपली आपण धडपड करून काही मिळवल्याच्या आनंदापुढं ते सगळं विसरून जातं.



गाण्यात रमायला खूप आवडतं, तेच माझं जीवन आहे. तरीही इतर गोष्टींकडे दुर्लक्ष करणं मला कधीच आवडलं नाही. आज मी द्वितीय वर्ष – वाणिज्य शाखेत शिकत आहे. पण विशेष योग्यता कधी चुकली नाही आणि पुढंही चुकणार नाही. माझ्यावर – शिक्षणाच्या बाबतीत – तुला अमुक इतके गुण मिळायलाच हवेत असं कोणतंही बंधन नाही, पण तरीही माझं मलाच वाटतं की, हेही तितकंच आवश्यक आहे, म्हणून माझं मीच माझ्यावर हे बंधन घालून घातलेलं आहे.


गाण्यात जे हरपलेपण अनुभवते तेच मला चित्र काढतानाही होतं. कविता करतानाही असंच सगळं विसरायला लावणारा अनुभव येतो. दिवसभरात ३–४ तासाचा रोजचा रियाज झाला की मी माझ्या इतर आवडीत रमते.

आज जेव्हा मी सगळं आठवते तेव्हा तीव्रतेने जाणवतं की यात मला मिळालेल्या या स्वर्गीय देणगीचा भाग आहेच, त्याचा वाटा तर नाकारणं शक्यच नाही. तसंच मला लोकांपुढं येण्यासाठी, रूढ अर्थानं ज्याला 'यश'

**शुभ वार्तेचा परिमल माझ्या सदनी दरवळला अन् हृदयीचा कल्पवृक्ष हा स्फूर्ति सुमे फुलला.**

म्हणावं त्यासाठीही झगडावं लागलं नाही – पण आज मी माझ्या दृष्टीने जो पल्ला गाठला आहे, तो गाठायला फार धडपडावं लागलं. खूप कष्ट घ्यावे लागले. लहानपणी रियाजाचं महत्त्व कळालेलं नव्हतं, तेव्हा मैत्रिणींबरोबर आपल्याला खेळता येत नाही, मनसोक्त मजा, दंगा करता येत नाही याचं वाईट वाटायचं. नंतर तर सगळे कार्यक्रम, सहली, समारंभ सगळ्याला काट द्यावी लागली. पण डोळ्यापुढं एकच दिसत होतं की आपल्याला हे मिळवायचंय. आत्ता पण कॉलेज जीवनातील छोटे छोटे आनंद माझ्या इतर मित्र–मैत्रिणींसमवेत अनुभवणं शक्य होत नाही. पण आता त्याची तितकीशी खंतही वाटत नाही.

मिळवायचं तर अजून खूप आहे. जेव्हा असं जाणवेल की मी सगळं मिळवलंय त्याक्षणी मी संपणार आहे. म्हणूनच अजून चांगलं करून दाखवण्यासाठी धडपड चालू आहे. प्रभाताई अत्रे कौतुक करतात –



'तुझ्याकडे आहे – ते जप. अजून मिळव' खूप बरं वाटतं अशावेळी. हुरूपही येतो. पं. जसराजजींनीही त्यांचं एक ॲवार्ड दिलेलं आहे. अमेरिकेच्या दौऱ्यावर होतो तेव्हा तेही तिकडच्याच दौऱ्यावर होते. आमचं फोनवर बोलणं झालं. ते म्हणाले – 'बेटी भारत की शान उंची रखना' तेव्हा एकाच वेळी खूप आनंदही झाला आणि जबाबदारीची जाणीवही झाली. – मी माझी म्हणून वागायला स्वतंत्र नाहीये – माझ्याकडे लोक भारताची प्रतिनिधी म्हणून पाहणार आहेत...

आजवर बरेच पुरस्कार मिळाले आहेत. सवाई गंधर्व महोत्सवात दत्तोपंत देशपांडे पुरस्कार मिळाला. जसराज गौरव पुरस्कार मिळाला. पं. भीमसेन जोशींच्या हस्ते 'संगीतोन्मेष' पुरस्कार मिळाला. पण हे सगळे पुरस्कार ओघानं आले. त्यामुळे आपण आपले काम तन्मयतेनं केलं की पुरस्कार आपोआप तुम्हाला शोधत येतात हा माझा अनुभव आहे.

हा असा सगळा प्रवास आहे. अजून खूपच प्रचंड अंतर कापायचं आहे, याची नक्कीच जाणीव आहे. लहान वयातच थोडं जास्त यश मिळाल्यानं जबाबदारी निश्चितच वाढली आहे. पण आई, बाबा, आजी, माझे सर्व गुरू, सगळ्यांच्याच शुभेच्छा पाठीशी आहेत. त्यामुळे पुढे अजून माझ्यातलं चांगलं शोधून, व्यक्त करू शकेन अशी आशा वाटते.

●●

**सावनी शेंडे**
'अलंकार' कॉलनी,
अलंकार पोलीस चौकीसमोर,
गल्ली नं. २, प्लॉट नं. २१, पुणे २९.

---

# ते पदक अजूनही स्मरणात आहे!

**मेघना परांजपे**

**ज**लतरणाच्या विविध क्रीडाप्रकारांमध्ये मी आजपर्यंत अनेक पदके मिळविली आहेत. पण नवी दिल्ली येथे १९९०–९१ च्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत मिळविलेली २ रौप्य व ३ ब्रॉन्झपदके आजही माझ्या स्मरणात आहेत. स्पर्धेपूर्वी दिल्ली येथेच मला मोठा अपघात झाला. या अपघातातून मी नशिबानेच वाचले. जखमा व दुखापतींना न जुमानता मी स्पर्धेत उतरले आणि पाच पदकांची कमाई केली.

१९९०–९१ हे वर्ष माझ्या दहावी इयत्तेचे असल्यामुळे किमान शैक्षणिक पात्रता पूर्ण करण्यासाठी महत्त्वाचे होते. त्या वर्षी जलतरण व डायव्हिंगमध्ये माझी एवढी तयारी झाली होती की, राज्यस्तरावरील सर्वच क्रीडाप्रकारात मी विक्रमी कामगिरी नोंदविली होती. त्यामुळे राष्ट्रीय स्पर्धेत माझ्याकडून सर्वांनाच मोठ्या अपेक्षा होत्या. अर्थात मलाही त्या स्पर्धेत चांगले यश मिळवून दाखवावे असे वाटत होते.

नवी दिल्ली येथे या स्पर्धेसाठी मी गेले. पहिल्या दिवशी सरावाचे वेळी मी खूपच चांगली वेळ नोंदविली होती. साहजिकच दुसऱ्या दिवशी मी अनेक राष्ट्रीय विक्रम मोडणार असे आमच्या मार्गदर्शकांना तसेच माझ्या कुटुंबियांना वाटत होते. पण नियतीला ही गोष्ट मान्य नसावी.

**प्रत्येकाने मला शिकविले एक आपुले गीत आळविता ते अपूर्व झरले वासांतुनी संगीत**

## कर्तृत्वाशी जडले नाते!



***यंदाच्या, क्रीडा क्षेत्रातील मानाचा 'छत्रपती पुरस्कार' मिळवलेली मेघना परांजपे! अनेक पदकं मिळविणाऱ्या मेघनाने, दिल्लीतील राष्ट्रीय स्पर्धेत, जखमी अवस्थेतही, कांस्य पदक मिळवून आपल्या असामान्य जिद्दींचे दर्शन घडविले. वाचूया मेघनाचे असे धाडसी अनुभव...***


मी तालकटोरा तलावावरून सराव आटोपून येत असताना एका मारुती मोटारने मला ठोकर दिली आणि मी फेकली गेले. मोटार चालविणारा सभ्य गृहस्थ असावा. त्यानेच मला राममनोहर लोहिया रुग्णालयात दाखल केले. कोणीही बरोबर नव्हते. कधी एकदा आईला पाहीन असे झाले. मला रुग्णालयात दाखल केले. कोणीही बरोबर नव्हते. कधी एकदा आईला पाहीन असे झाले. मला रुग्णालयात दाखल केले आहे, हे समजताच आमच्या संघाबरोबर आलेली माझी आई रुग्णालयात आली. मला खूप ठिकाणी मुका मार बसला होता. तोंडावर, गुडघ्याला, ढोपरांना जखमा झाल्या होत्या. आईने कुठून कुठून औषधे जमा केली. रात्रभर ती मला काही ना काही देत होती. डॉक्टरांनी तर मी पाण्यात उतरायचे नाही अशी सक्त ताकीद दिली होती. आता पदकांचे स्वप्न धुळीस मिळणार असे मला वाटू लागले. पण मी ठरवून टाकले होते की स्पर्धेत उतरायचेच. आईनेही धीर दिला. दुसऱ्या दिवशी मी आईला हातपाय हालवून दाखविले. आई, डॉक्टर, आमचे मार्गदर्शक, स्पर्धेचे तांत्रिक अधिकारी यांच्याकडून मला भाग घेण्यास कशीबशी परवानगी मिळाली. त्यावेळी ४०० मी. ची पाहिली. शर्यत मी सहजपणे पार केली. हाता-पायाला जखमा, तोंड सुजलेले अशी माझी अवस्था पाहून अनेकांनी माझ्याकडे पाहून डोळे विस्फारले. पोहताना त्रास होऊनही केवळ जिद्दीच्या जोरावर मी शर्यत पूर्ण केली ती ब्रॉन्झपदक मिळवीतच! या स्पर्धेत किमान सहा विक्रमांची अपेक्षा असताना मला २ रौप्य व ३ ब्रॉन्झपदकांवर समाधान मानावे लागले. आमच्या संघातील खेळाडू व संघाचे मार्गदर्शक यांनी मला उचलून घेतले आणि अभिनंदन केले. माझ्या जलतरण कारकिर्दीतील तो सर्वोच्च कामगिरीचा संस्मरणीय क्षण होता! दिल्लीहून पुण्यास परतल्यानंतर माझी हकीकत ऐकून अनेकांनी माझा गौरव केला.

जलतरणाची मुहूर्तमेढ माझ्या घरातच रोवली गेली. माझे प्राथमिक शिक्षण शिशुविहार शाळेत झाले. नंतर गरवारे प्रशालेत शिकत असताना टिळक तलाव आमच्या वाटेवरच होता. लक्ष्मणच्या सायकलवरून जाता-येता माझी नजर सतत तलावाकडे वळायची. आपणही पोहायला जावे असे मला मनोमन वाटत असे. माझा मोठा भाऊ केदार याला पोहण्यासाठी आई टिळक तलावावर घेऊन जात असे. घरी एकटीला ठेवायचे नाही म्हणून आई मलाही तलावावर नेत असे. फर्ग्युसन महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण प्रमुख प्रा. एस. एन. करंदीकर हे माझ्या दादाला शिकवीत असत. मला पाण्याबद्दल विलक्षण आकर्षण वाटत असे. एकदा आईची नजर चुकवून मी पाण्यात उडी मारली. अर्थात करंदीकर सर जवळ होतेच. माझे धाडस पाहून ते माझ्या आईला म्हणाले, आपण मेघनालाही पोहायला शिकवू. अशा तऱ्हेने माझ्या पोहण्याच्या प्राथमिक शिक्षणास प्रारंभ झाला.

साधारणपणे १९८०-८१ मध्ये मी जलतरणास प्रारंभ केला.

**पाण्यात पाहताना तनु अपुली तोल साधुनी न्यावी. बुद्धि विपत्तीत तशी स्थिर आणि विवेकपूर्ण राखावी.**

करंदीकरसरांनी फ्रीस्टाईल, बटरफ्लाय, ब्रेस्टस्ट्रोक व बॅकस्ट्रोक हे चारही प्रकार मला शिकविले. ठराविक अंतर पोहून गेल्यानंतर पैजेखातर सर मला एक रुपया बक्षीस द्यायचे. ही माझी सुरुवातीची कमाई. त्यानंतर मला छोटी मोठी अनेक बक्षिसे मिळाली. इयत्ता सहावीमध्ये आईने मला सनरॉक ते गेटवे ऑफ इंडिया या शर्यतीत भाग घेण्यास सांगितले. या स्पर्धेत कितीतरी मोठ्या मुली भाग घेत असतात, तिथे माझा काय निभाव लागणार असे मी आईला म्हटले. पण आईवडिलांनी मला प्रोत्साहन दिले. त्यामुळे जिद्दीच्या जोरावर मी द्वितीय क्रमांक पटकाविला. त्यावेळी जलतरणाबरोबरच जिम्नॅस्टिक्सही करीत होते. मोरेश्वर गुर्जर यांच्यासारख्या ज्येष्ठ मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली मी सराव करीत होते. जिम्नॅस्टिक्सप्रमाणेच आपण जलतरणातही उड्या मारल्या तर काय होईल असा विचार माझ्या मनात आला. त्यामुळे डायव्हिंग करायलाही मी सुरुवात केली. आई मला रोज खडकी येथील बॉम्बे इंजिनिअरींग ग्रुपच्या तलावावर घेऊन जायची. कारण त्याकाळी डायव्हिंगचे अद्ययावत बोर्ड्स फक्त त्याच ठिकाणी उपलब्ध होते. डायव्हिंग हा काही सोपा क्रीडाप्रकार नाही. जरासा तोल गेला तरी दुखापत होण्याची शक्यता असते. स्प्रिंग बोर्ड, हायबोर्ड प्रकार मी हळूहळू आत्मसात केले.



महाराष्ट्रात मी पहिला क्रमांक मिळवू लागले. राष्ट्रीय स्तरावरही मला खूप बक्षिसे मिळाली. हे करीत असताना मी पोहणे सोडले नाही. सकाळी ६ ते ८ डायव्हिंग, ९ ते १० जलतरण, पुन्हा शाळा सुटल्यानंतर सायंकाळी ५ ते ८ जलतरणाचा सराव अशी माझी दिनचर्या असायची. त्याखेरीज शाळेचा गृहपाठ वेगळाच! सर्व काही तारेवरची कसरत असे. शाळेत मी हुशार मुलींच्या वर्गात असल्यामुळे अन्य मैत्रिणींइतकेच चांगले गुण मिळविण्याबाबत मी प्रयत्न करीत असे.

१९८३ ते १९९१ या कालावधीत शालेय शिक्षण घेत असताना जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये भरघोस पदके मी मिळविली. १९९१ मध्येच वॉटरपोलोमधील पुण्याचे आंतरराष्ट्रीय खेळाडू शैलेश ताम्हनकर व संजय करंदीकर यांनी टिळक तलावावर वॉटरपोलोसाठी मुलींचा संघही तयार करण्याची योजना आखली. आम्हालाही वॉटरपोलो हा खेळ खूप आवडायचा. शैलेश व संजय यांनी आमचा संघ तयार केला. १९९२ पासून मी वॉटरपोलोत महाराष्ट्राचे नेतृत्व करीत असून आजपर्यंत हा संघ अभेद्य आहे. मला माझ्या सहकाऱ्यांची अतिशय मोलाची साथ मिळाली आहे. त्यामुळेच मला हे यश मिळाले आहे. पूर्वी आम्हाला केरळ, बंगाल, कर्नाटक संघांची भिती वाटायची. पण आता मात्र आम्ही निर्भिडपणे खेळतो. आता आमचा आत्मविश्वास वाढला आहे. राज्य शासनाने मला नुकताच शिवछत्रपती पुरस्कार जाहीर केला आहे. माझ्या आजपर्यंतच्या यशाचे श्रेय टिळक तलावावरील माझ्या मैत्रिणी तसेच संजय करंदीकर, शैलेश ताम्हनकर, आशिष साण्डू इत्यादींना द्यावे लागेल. मागे वळून विचार करता हा गौरव माझा नसून माझ्या आईचा, सुरुवातीला पोहण्याचे पाठ शिकविणारे करंदीकरसर आणि सर्व ज्येष्ठ सहकारी खेळाडू यांचा आहे.

जेव्हा आपल्याला थोडेसे काही मिळते, तेव्हा आपणही दुसऱ्याचे देणे लागतो. आज मी चॉईस हेल्थ क्लबवर लहान मुलांना पोहणे शिकविते. टिळक तलावावर वॉटरपोलोचा संघ तयार करण्यासाठी मी प्रयत्न करीत आहे. ज्ञान दिल्याने वाढते म्हणूनच मी हे प्रयत्न करीत आहे.

**मेघना मोहन परांजपे**
सुवर्णनगरी, कर्वे रोड, अलूरकर म्युझियम हाऊस जवळ, पुणे ४.

**पाण्यावरी तरंगे, वाटे कधी निळाई । जुळत्या मरुस्थळींची स्वप्नात बाग होई ॥**

## कर्तृत्वाशी जडले नाते!

# रेषांच्या रंगझुल्यातून हळूच स्पर्शीन सौंदर्याला!

**सुमना नाथ**

***वडिलांकडून मिळालेल्या चित्रकलेचा वारसा समर्थपणे पुढे चालवणाऱ्या सुमना नाथने जी.डी. आर्टच्या परीक्षेत अनेक विक्रम मोडले आहेत. रेषा आणि रंगांच्या माध्यमातून, तन-मन-धन अर्पून ती एकाग्रपणे चित्रकलेची साधना करत आहे. रंगांच्या अनोख्या प्रदेशातला तिचा मुक्त विहार, तिच्याच शब्दात...***

G.D. आर्टचे माझे शेवटचे वर्ष सुरू झालेले होते. या वर्षानंतर मला एक महत्त्वाची डिग्री मिळणार होती, जी कायम माझ्या नावाबरोबर जोडली जाणार होती. शैक्षणिक वर्षातलं शेवटचं वर्ष प्रत्येकाच्याच दृष्टीने महत्त्वाचं असतं. तसंच माझंही होतं. पोर्ट्रेट, कॉम्पोझिशन याबरोबरच यावर्षीचं अतिशय जिकीरीचं काम म्हणजे डेझर्टेशन-थिसिस. एका संपूर्णपणे नवीन विषयावर संशोधन करून स्वत: एक सिद्धांत मांडायचा



असतो. 'कालीघाट' चित्रशैली या कालबाह्य झालेल्या शैलीचा अभ्यास करून ती पुनरुज्जीवित करण्याचा माझा विचार होता. त्यासाठी ती ही चित्रशैली जिथे निर्माण झाली तो भाग पाहणे, तसेच त्यासाठी 'शांतीनिकेतन'चे प्रिन्सिपॉल श्री. जोगन चौधरी यांची भेट घेणे आवश्यक होते. त्यासाठी पुण्याहून कलकत्त्याला जायला लागणार होते. त्या दृष्टीने माझी आता सर्व तयारी पूर्ण झालेली होती. माझे थिसिसचे सर्व सामान - कागदपत्रे - चित्रकलेचे साहित्य एका वेगळ्याच बॅगेत ठेवले होते. कलकत्त्यात गेल्यावर काही प्रवास लोकलने करायचा होता. एका अगदी वेगळ्या विषयावरचा माझा थिसिस आता पूर्ण होणार. श्री. जोगन चौधरी यांची भेट होणार... आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा आपण गाठणार या आनंदात मी रेल्वेतून चाललेली होते. माझ्याबरोबर माझे बाबाही आलेले होते. लोकलच्या गर्दीतून कधी एकदा बाहेर पडते असे झाले होते. तेवढ्यात स्टेशन आले. माणसांच्या लोंढ्याबरोबरच मी स्टेशनवर उतरण्याची घाई करीत होते आणि इतक्यात हाताला एक झटका बसला. पाहते तर माझ्या हातातली बॅग कोणीतरी पळवली होती. क्षणभर माझ्या डोळ्यांपुढे अंधारीच आली. ज्या कामासाठी मी पुण्याहून एवढ्या दूरवर कलकत्त्याला आले होते त्याची नावनिशाणीही राहिली नव्हती. काय सांगणार आता जोगन चौधरींना? माझा थिसिस - माझी डिग्री - माझे करिअर - माझा धीर अगदी खचून गेला. पण लगेचच मी मला सावरले. झालेली सर्व घटना श्री. जोगन चौधरींना सांगायची असे ठरविले. त्यांची भेट घेतली. त्यांनी शांतपणे सर्व काही ऐकून घेतले व तिथेच पेन्सिलच्या साहाय्याने काही स्केचेस बनवायला सांगितले. माझी स्केचेस बघून त्यांनी मला मार्गदर्शन करायचे ठरविले. यामुळे माझ्यात खूपच उत्साह आला व मी पुन्हा उभारी धरली. ठरल्याप्रमाणे कलकत्त्यात राहून 'कालीघाट' शैलीचा अभ्यास पूर्ण केला. माझा थिसिस माझ्या अपेक्षेप्रमाणे पूर्ण झाला आणि G.D. आर्टच्या परीक्षेत मी अनेक वर्षांचे विक्रम मोडून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. मला ८१% मार्कस् मिळाले.


माझ्या चित्रकलेतील या यशाची सुरुवात वयाच्या तेराव्या वर्षी झाली. त्या वर्षी मी इंडो जॅपनीज असो. तर्फे झालेल्या स्पर्धेसाठी पाठविलेल्या चित्राला पहिले बक्षीस मिळाले. त्यानंतर जवळ जवळ प्रत्येक वर्षी माझ्या चित्राला स्पर्धेमध्ये बक्षीस

**सृष्टिसुषमा अनंत तिचा स्वर्गीय विस्तार माझ्या रेखांत आणू का एका छटेची बहार?**

मिळतच होते. बारावी सायन्स केल्यानंतर आजकाल सर्व मुलांना भेडसावणारा प्रश्न मलाही पडलाच होता. पुढे काय करायचे? चित्रकलेतील प्रगती खूपच समाधानकारक असल्यामुळे G.D. आर्टला प्रवेश घेण्याचे निश्चित केले.

कॉलेजमध्ये शिक्षण सुरू होतेच. घरातही मला त्यासाठी पोषक असे वातावरण मिळाले. कारण माझे वडील श्री. सचिन नाथ हे स्वत: बॉर्न आर्टिस्य आहेत – त्यांनी मला लहानपणापासून चित्रकलेतील बारकावे समजावून दिले आहेत.

G.D. आर्ट करीत असताना चित्रकलेतील अनेक बारीकसारीक वैशिष्ट्यांचा सखोल अभ्यास होत होता. स्केचिंग, चारकोल, स्केचिंग, ॲबस्ट्रॅक्ट पेंटींग, स्कल्पचर, पोर्ट्रेट या सर्व प्रकारचा माझा सतत अभ्यास आणि सराव चालू होता. या काळात जिथे जिथे प्रदर्शन भरत असे तिथे तिथे मी माझे चित्र पाठवीत असे. प्रत्येक ठिकाणी माझे चित्र प्रदर्शनात निवडले जात होते. स्पर्धेत भाग घेत राहिल्यामुळे मला इतरांची चित्रे बघायला मिळत असत. त्यातून आपल्यात कोणती सुधारणा व्हायला हवी याचा अंदाज येत असे. कलेमध्ये अधिक प्रगती होत असे. स्पर्धेबरोबरच कलाकाराला आवश्यक असते ते म्हणजे सूक्ष्म निरीक्षण – निरीक्षणातून कलेमधले बारकावे समजतात. ते सादर करता येतात. महाविद्यालयातील शिक्षणात 'शिकणे' फार महत्त्वाचे असते. 'शिकवत' कोणीच नसते – अभ्यासाची स्वत:ची अशी वेगळी



पद्धत ठेवली तरच आपली कला इतरांपेक्षा वेगळी होऊ शकते. प्रवास करण्याने, हिंडण्या फिरण्याने आपली याबाबतची दृष्टी अधिक व्यापक होत जाते. फिरण्याने विचार बदलतात, वृत्ती बदलते आणि त्याचा परिणाम म्हणजे आपण स्वत:ची वेगळी अशी निर्मिती करू शकतो.

कोणतीही कला अनुभव–संपन्नतेतूनच वाढत असते. तिला खतपाणी मिळत असते. कमीत कमी साधनसामुग्रीतूनही उच्च दर्जाची कला सादर करता आली पाहिजे. ब्रशच्या एका फटकाऱ्यातून तुमच्या कलेचा दर्जा समजला पाहिजे. सध्याचे युग फार गतिमान आहे. अतिशय थोड्या




**सुमना नाथनी काढलेले पोट्रेट**

वेळेत तुम्ही काय काय करून दाखवू शकता याला फार महत्त्व असते. अशा प्रकारची एक संधी माझ्यापुढे आव्हान म्हणूनच आली होती. राष्ट्रीय संरक्षण अकादमी (N.D.A.) खडकवासला इथे सर्व कॅडेट्सच्यासमोर लाइव्ह पोर्ट्रेट करण्यासाठी मला बोलाविले होते. पोर्ट्रेटमध्ये प्रामुख्याने व्यक्तीला समोर बसवून तिचे चित्र काढले जाते. त्यामध्ये व्यक्तीच्या चेहऱ्यावरील हावभाव, त्यातील सूक्ष्म छटा, त्याची ढब, त्वचेचा रंग व पोत हे सर्व व्यक्त व्हावे लागते. हे काम कमीत कमी स्ट्रोक्समध्ये व्हावे लागते. अतिशय एकाग्रतेने, समरसून हे काम करावे लागते. N.D.A. मधील 'पोर्ट्रेट' हे माझ्यासमोर एक फार मोठे आव्हानच होते. त्या दिवशी एन.डी.ए.तील सर्व कॅडेट्स, त्यांना शिकविणारा अधिकारी वर्ग, सर्वजण हॉलमध्ये जमले होते. संपूर्ण हॉलमध्ये 'पिनड्रॉप सायलेन्स' होता. स्टेजवर मी आणि पोर्ट्रेटचा विषय असलेली व्यक्ती. सगळ्यांचे डोळे माझ्या हातावर खिळलेले होते. परीक्षा देताना आपण पेपर फक्त लिहीत असतो. तो तपासून नंतर मिळणार असतो – रिझल्ट शेवटी हातात पडत असतो. इथे तर परीक्षा – उत्तर – आणि रिझल्ट सगळे बरोबरच होणार होते. माझी इतक्या वर्षांची कलेची तपश्चर्या पणाला लागली होती. कोणत्याही प्रकारचे दडपण वाटून चालणार नव्हते. मी देखील अतिशय शांतपणे माझा कुंचला फिरवायला सुरुवात केली. आता मला माझ्या अवतीभोवतीच्या वातावरणाचा विसर पडला. ती

**माझी झेप वेगवेडी तिला हवीत कवाडे। अगा, साहवेना आता व्यर्थ श्वासांचे गाठोडे**

व्यक्ती, माझा ब्रश आणि साकार होत असलेले पोर्ट्रेट एवढेच मला दिसत होते. मी एका वेगळ्याच विश्वात गेले होते. हात अत्यंत झपाट्याने आणि सफाईने चालत होता आणि एका तासाच्या आतच माझे पोर्ट्रेट पूर्ण झाले. टाळ्यांच्या कडकडाटाने मी भानावर आले. प्रश्नपत्रिका आता संपली होती. उत्तरपत्रिका आणि रिझल्ट मला मिळाला होता. N.D.A. च्या कॅडेट्स बरोबरच सर्व अधिकारी वर्गानेही मला शाबासकीची थाप दिली होती. मला आनंद तर झालाच होता पण माझ्या उच्च क्षमतेची जाणीव जास्त सुखावून गेली होती.

या कार्यक्रमाच्या दिवशी जाणवलेली एक विशेष गोष्ट म्हणजे कलाकाराला पटकन एकाग्रता साधता आली पाहिजे. एकाग्रता ही फार आवश्यक बाब आहे. कलेमधील तुमची गुंतवणूक जशी वाढत जाते, तशी तुमची एकाग्रता वाढत जाते.



तहानभूक विसरून, ध्यास घेऊन जेव्हा तुम्ही काम करता तेव्हा यश आपण होऊन तुमच्याकडे चालत येत असतं. कोणतीही पदवी घेऊन, एखादा अभ्यासक्रम पूर्ण करून कलाकाराने थांबायचे नसते. आणखी पुढे जात राहायचे असते. मला स्वत:ला यानंतर 'शांती निकेतन'मध्ये जाऊन पोस्ट ग्रॅज्युएशन करायचे आहे.

माझ्या आजपर्यंतच्या या कलाक्षेत्रातील प्रवासात मला नेहमीच चांगले गुरू लाभले आहेत. प्रा. भय्यासाहेब ओंकार यांचा उल्लेख करायला मला निश्चितच आवडेल. घरातून आईवडिलांचा तर पूर्ण पाठिंबा आहे. आजकाल सगळीकडे अधिकाधिक जास्त पगाराची नोकरी मिळवून देणारा अभ्यासक्रमच आपल्या पाल्याने निवडावा असे पालकांचे म्हणणे असते. पण 'आम्हाला एकवेळ उपाशी रहावे लागले तरी चालेल, पण तू कलाकार म्हणून नावारूपाला यायला हवंस. तुझी कला वाढली पाहिजे.' असे म्हणणारे आईवडील मला लाभले आहेत. मी स्वत:ला त्यासाठी फार भाग्यवान समजते. माझ्या आईवडिलांची इच्छा मला पूर्ण करायची आहे. त्यासाठी लागेल तेवढे कष्ट करण्याची, मेहनत करण्याची माझी तयारी आहे.

●●

**सुमना नाथ**
सर्व्हे नं. ५२, कलाशंकर नगर,
कवडे रोड, मुंढवा, पुणे ४३.

---

# बुद्धिबळात भारत महासत्ता बनू शकेल!

**अभिजित कुंटे**

***लहानपणापासून क्रिकेटपटू व्हायचं, असं स्वप्न बाळगणारा अभिजित, सध्या भारतातील उत्तम बुद्धिबळपटू म्हणून गाजतोय. बुद्धिबळातील मानाचा ग्रँडमास्टर किताब मिळवायच्या पायरीपर्यंत पोहोचलेला अभिजित, अचानक या खेळाकडे कसा वळला? क्रिकेटपटू होता होता बुद्धिबळपटू कसा झाला ते जाणून घेऊया त्याच्याच शब्दातून...***

**ख**रंतर बुद्धिबळ या खेळात मी आलो ते अपघातानंच. मी पण माझ्या लहानपणी सर्वांप्रमाणे क्रिकेटवेडाच होतो. पण माझ्या सर्वांत मोठ्या बहिणीने विभावरीताईने मला आणि मृणालताईला बुद्धिबळ शिकवलं. कारण म्हणजे एका जागेवर बसायची सवय व्हावी, एकाग्रता वाढावी आणि त्याची अभ्यासात मदत व्हावी यासाठी. एके वर्षी मृणालिनीताईनं आंतरशालेय बुद्धिबळ स्पर्धेत भाग घेतला आणि फडके सर आणि काकूंनी तिला क्लासला यायला सांगितलं. तिच्याबरोबर जायला कोणीतरी असावं म्हणून आईनं मलाही क्लासला पाठवायचं ठरवलं मला अजूनही आठवतं त्या दिवशी दुपारी माझी क्रिकेटची मॅच होती. त्यामुळं मला क्लासला जायचं नव्हतं.

---

**खरीच रंगाची तू राणी, रंगदेवता किंवा दोन्ही सप्तरंग रवि वरती उधळी, राबवशी तू त्यांना खाली.**

पण आईनं दोन धपाटे मारून मला क्लासला पाठवलं. मी रडत-रडतच क्लासला गेलो पण फडकेसरांकडे मी इतका रमलो की काही दिवसांनी मी त्यांच्याकडे रोजच खेळायला जाऊ लागलो. मी सुरुवातीला खूपच झटपट डाव उरकत असे. कधी मी डाव जिंकायचो तर कधी डाव गमवायचो. डाव जिंकण्यासाठी आवश्यक असणाऱ्या तंत्राबाबत मी तर अगदी नवखा होतो. 'बुद्धिबळात अव्वल दर्जाचे यश मिळविण्याची क्षमता माझ्यात आहे, त्यासाठी मी अधिकाधिक या खेळावर एकाग्रता दाखवावी', असे फडकेसरांनी मला सांगितले.

ताईबरोबर मी नियमितपणे डाव खेळू लागलो. तसेच बुद्धिबळाविषयी विविध पुस्तके आणि नियतकालिके मी वाचू लागलो. या सरावाचा आणि वाचनाचा मला खूप फायदा झाला. प्रत्येक डाव मी गांभीर्याने खेळू लागलो. माझ्या खेळातही खूप सुधारणा झाली. त्यावेळी मी जेमतेम आठ वर्षांचा होतो. खेळास सुरुवात केल्यानंतर प्रत्येक चालीचा मी बारकाईने अभ्यास करू लागलो. फडकेसरांनीच आयोजित केलेल्या स्थानिक स्तरावरील स्पर्धेत मला चांगले यश मिळाले. वृत्तपत्रातही माझे नाव चमकले, त्यामुळे मला खूपच आत्मविश्वास आला. त्यानंतर मी सतत पुढेच जात राहिलो. मला आईबाबांकडूनही याबाबतीत सतत प्रोत्साहन मिळत गेले.

वर्षभरातच मला सबज्युनिअर गटाच्या राज्य स्पर्धेत खेळण्याची संधी






मिळाली. सांगली येथील खुल्या स्पर्धेतील अनुभवामुळे या राज्य स्पर्धेत खेळताना मनावर फारसे दडपण आले नाही. शेवटच्या फेरीपर्यंत मी सातत्यपूर्ण कामगिरी केली. शेवटच्या फेरीतील डावातही सुरुवातीला माझी स्थिती मजबूत होती. मी विजयी होणार अशी खात्रीही लोकांना वाटू लागली. माझ्याबरोबर माझे बाबाही होते. सभागृहाच्या बाहेर लोकांनी त्यांचे अभिनंदन केले नाही तोच मी रडत रडत बाहेर पडलो. ऐन मोक्याच्या क्षणी मी चुकीची चाल करीत डाव गमावला आणि विजेतेपद मिळविण्याची संधीही गमावली. मला खूपच वाईट वाटले. परंतु बाबांनी मला परोपकारीने समजावले. 'राज्य स्पर्धेत पदार्पणातच उपविजेतेपद मी मिळविले ही तर चांगली सुरुवात आहे. अशा अनुभवातूनच मोठे यश मिळवायचे आहे, हे त्यांनी मला समजावून सांगितले.' मला थोडासा धीर आला.

विजेतेपद मिळविण्यासाठी मनाची एकाग्रता वाढविणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने मी सूर्यनमस्कार घालू लागलो. अभिनव प्रशालेच्या लंगडी व खोखो संघांचा मी कर्णधार होतो त्यामुळे सूर्यनमस्काराचा व्यायाम करताना मला फारशी अडचण आली नाही. सूर्यनमस्कारामुळे माझी एकाग्रता वाढली. लोकांना सामान्यत: वाटतं की, बुद्धिबळासारख्या बैठ्या खेळासाठी शारीरिक सक्षमतेची काय आवश्यकता आहे? पण मानसिक स्वस्थतेचा मार्ग हा शारीरिक सक्षमतेतूनच जातो. मी कधी कधी मूड लागला तर १०-१२ तासही खेळतो. पण अगदी नेहमीचा खेळही ७ तास होतो. त्यामुळे मनावर आणि शरीरावर ताण पडतो- थकायला होतं. त्यामुळे व्यायाम आणि मैदानी खेळांची प्रचंड गरज आहे- मैदानी खेळही मी उत्साहात खेळतो. त्याचाही क्षमता-एकाग्रता वाढवायला उपयोग होतो.

माझे बुद्धिबळातील कौशल्य वाढवण्यासाठी मी ताई आणि अन्य खेळाडूंबरोबर सराव करतानाही

**माझ्या मनात शलाका, विश्वगर्भ आकाशाची माझ्या प्रज्ञेतुनि उदे, भागीरथी प्रकाशाची.**

अधिक गांभीर्याने खेळू लागलो. माझ्या सुदैवाने शाळेची परीक्षा व स्पर्धांच्या तारखा एकाच वेळी आल्या नाहीत. त्यामुळे माझे शालेय शिक्षण पूर्ण होण्यात अडचण आली नाही.

शालेय शिक्षण सुरू असतानाच माझी बुद्धिबळाची कारकिर्दीही घडत गेली. १९८८ मध्ये १२ वर्षांखालील गटाची राष्ट्रीय स्पर्धा जिंकल्यानंतर माझा आत्मविश्वास वाढला. त्यानंतर १४ वर्षांखालील गटात मी दोन वेळा राष्ट्रीय विजेता झालो. त्यामुळे आता मी भारताचे प्रतिनिधित्व जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत–रुमानियात करणार होतो. पण अचानक मला कळवण्यात आले की त्या वर्षी भारताने संघ पाठविण्यास नकार दिला आहे. मी खूप निराश झालो. पण आईबाबांनी पुढच्या वर्षी प्रयत्न कर, मी जिंकत आलेला डाव नजरचुकीने घालविला आणि दुसऱ्या क्रमांकावर मला समाधान मानावे लागले. अर्थात त्यावर्षीही जागतिक स्पर्धेत भाग घेता आला नाही.

पण त्याच्या पुढच्या वर्षी मी १४ वर्षांखालील राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धा जिंकली आणि अमेरिका येथे जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत भाग घेऊन अठरावा क्रमांक मिळवला.

त्यानंतर मी अनेक राष्ट्रीय व राज्य स्पर्धेत विजेतेपद मिळवले पण माझे पहिले आंतरराष्ट्रीय यश मला व्हिएतनामला मिळाले. तिथे सोळा वर्षांखालील स्पर्धेत ब्राँझपदक मिळाले. तिथली एक आठवण म्हणजे तिथे जेवणाचे खूप हाल होते आणि तेव्हा गणपती चालू होते. तिकडे मुंबईचे मि. राणे UNO मध्ये काम करत होते. त्यांना जेव्हा कळले की, एक भारतीय स्पर्धक तिथे खेळत आहे तेव्हा ते भेटायला आले आणि त्यांनी मला मोदक खायला दिले. त्या मोदकांचा आनंद काही वेगळाच होता.



१९९७ चे वर्ष माझ्या दृष्टीने संस्मरणीय म्हणावे लागेल. त्या वर्षी झालेल्या राष्ट्रीय 'अ' श्रेणी स्पर्धेत मला विजेतेपद मिळाले. २० वर्षांखालील गटाच्या स्पर्धेत लागोपाठ तीन वर्षे विजेतेपद मिळविल्यामुळे मला कायमस्वरूपी चषक देण्यात आला. माझ्यापेक्षा अनुभवाने वरचढ असलेल्या डी. व्ही. प्रसाद, के. मुरुगन, पी. डी. गिरीनाथ, व्ही. सर्वानन, लंका रवि, कोंगुवेल यांच्याविरूद्धचे डाव बरोबरीत रोखण्यात मी यश मिळविले. माझ्या दृष्टीने ही खूपच समाधानाची कामगिरी होती. कारण १९९६ च्या राष्ट्रीय 'अ' श्रेणी स्पर्धेत मी खूपच खराब खेळलो होतो व मला सोळाव्या क्रमांकावर समाधान मानावे लागले होते. त्या स्पर्धेतील दारुण पराभवाची परतफेड १९९७ च्या स्पर्धेत करावयाची, असा निश्चय करूनच मी १९९७ च्या स्पर्धेत उतरलो. अनेक बलाढ्य खेळाडूंना बरोबरीत रोखल्यानंतर माझे मनोधैर्य उंचावले. सात वेळा राष्ट्रीय विजेता असलेल्या प्रवीण ठिपसे याच्यावर मी सनसनाटी विजय नोंदविला. याच

**यशस्वि होऊनि भारत भूषण झालास तू आज. अन् शोभति हे कीर्तीफुलांचे अमोल नव साज.**

स्पर्धेत टी. एस. रवि याच्यावर मात करीत मी जागतिक बुद्धिबळ संघटनेचा 'आंतरराष्ट्रीय मास्टर' किताब पटकाविला.

९७-९८ या कालावधीत आशियाई कनिष्ठ गट स्पर्धेतही मला विजेतेपद मिळाले आणि ग्रॅण्डमास्टरचा पहिला नॉर्महो मिळाला. त्यानंतर मला अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेण्याची संधी मिळाली. त्यामध्ये ग्रॅण्डमास्टर किताबाचा दुसरा नॉर्महो मी पूर्ण केला. दोन वेळा ग्रॅण्डमास्टर किताब मिळविण्याच्या जवळ जाऊन मला या किताबापासून वंचित व्हावे लागले. थोडासा निराश झालो. पण अन्य खेळाडूंकडे पाहिल्यानंतर आपण खूपच नशीबवान आहोत, असे वाटले. कारण ठिपसे याला ग्रॅण्डमास्टरचा दुसरा नॉर्म मिळाल्यानंतर प्रत्यक्ष किताब मिळविण्यासाठी दहा वर्षे वाट पाहावी लागली. लागोपाठ आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये खेळावे लागत असल्यामुळे कधी कधी कंटाळा आणि थकवा येतो. गेल्या दीड वर्षात मी फारच कमी दिवस घरी राहिलो आहे. त्यामुळे एकटेपणा वाटतो. तथापि ग्रॅण्डमास्टर किताब मिळेपर्यंत मला हा त्रास सहन करावा लागणार आहे. ग्रॅण्डमास्टर किताब मिळविल्यानंतर मात्र कोणत्या स्पर्धांमध्ये भाग घ्यावयाचा याबाबत मी निर्णय घेऊ शकेन.

त्यामुळे आता लक्ष्य आहे ग्रँडमास्टर किताबाकडे आणि ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या बुद्धिबळ



ऑलिम्पियाडकडे!

खेळाबरोबर माझे शिक्षणही त्याच्याच बरोबरीने चालू आहे. मी B.M.C.C. मधून विशेष योग्यता मिळवून B.Com झालो आणि D.B.M. आता 'इंडसर्च'मधून करीत आहे. खेळ आणि अभ्यास या दोन्ही आघाड्यांवर मी समाधानकारक प्रगती करीत आहे. पण जेव्हा इथली शिक्षणपद्धती आणि परदेशातील मित्रमैत्रिणींकडून कळलेली तिकडची शिक्षणपद्धती यांची मनात नकळत तुलना केली जाते तेव्हा एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. तिकडे मुलांना आपले करियर निवडण्यासाठी पुरेसा वेळ, मार्गदर्शन, संधी मिळते. बहुतांशी देशांमध्ये २० वर्षानंतर ते विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी जातात, तोपर्यंत पुरेशी समज आणि स्वतःच्या क्षमतांची जाण आलेली असते. त्यामुळे करियर निवडणे तुलनेने सोपे जाते. आपल्या इथे मात्र पंधराव्या वर्षीच दडपणाखाली, स्वतःची ओळख न पटताच करियर निवडावे लागते. यात कुठेतरी बदल व्हायला हवा असे वाटते.

आतापर्यंत जे यश मिळाले त्यात माझ्या आईवडिलांच्या प्रोत्साहनाचा आणि पाठिंब्याचा वाटा किती आहे हे ठरवण्याचे धाडस मी करूच शकत नाही. त्यांच्या शिवाय माझे मार्गदर्शक अरूण वैद्य, मोहन फडके, मृणालताई, विभावरीताई, शाळेतील शिक्षक, कॉलेजमधील मित्रमैत्रिणी, प्राध्यापक या सगळ्यांच्या सहभागाशिवाय हे स्थान गाठणेच अशक्य होते.

अर्थात जे स्थान मिळवले आहे त्यात समाधानी मात्र नक्कीच नाहीये. अजून खूप वर जायचंय. विश्वनाथ आनंद, गॅरी कास्पारॉव्ह हे माझे आदर्श आहेत. त्यांच्या तोडीचं मला काही करून दाखवायचंय.

तुम्हा सर्व मित्रमैत्रिणींना एकच सांगावंसं वाटतं, प्रत्येकाने आवर्जून बुद्धिबळाचे ज्ञान मिळविले पाहिजे. हा एक प्रकारचा बौद्धिक व्यायामच आहे. ज्यांना यात प्रावीण्य मिळवायचंय त्यांनी अधिकाधिक खेळलं पाहिजे. इतर कलांप्रमाणे या खेळाचाही नियमित रियाझ केला पाहिजे आणि पराभवाने निराश न होता जिद्दीने खेळ सुधारत राहिले पाहिजे.

मला खात्री आहे की, नजीकच्या काळात भारत बुद्धिबळ क्षेत्रात जगामध्ये एक महासत्ता बनू शकेल.

तुम्हा सर्वांना उज्ज्वल भविष्यासाठी खूप शुभेच्छा!

●●

**अभिजित कुंटे**
३२/१ प्लॉट क्र. ११,
गणेशनगर गणपती मंडळासमोर,
मेहेंदळे गॅरेजच्या मागे, एरंडवणे, पुणे ४.

**अभ्यासाशी नाते असू दे खेळावरही लोभ दिसू दे. व्यक्तित्वाची खोलून पाने तुम्ही गुलाबापरि उमलावे.**

कर्तृत्वाशी जडले नाते!

# मी मुक्त विहंगम पेरीन उज्ज्वल गाणी!

**सुदेष्णा घारे**

***आपण समाजाचं ऋण कसं फेडणार? आपली या समाजाप्रती काहीच जबाबदारी नाही का?... कॉलेजजीवनापासून या प्रश्नांची उत्तरे शोधत असताना सुदेष्णाने पत्रकारितेच्या निमित्ताने रेल्वे प्लॅटफॉर्मवरील अनाथ मुलांचे लाचारीचे जिणे बघितले. असहायपणे जगणाऱ्या मुलांमध्ये सुदेष्णाला आपल्या आयुष्याचे ध्येय सापडले. आपल्यालाही काही शिकवणारे, हेलावून टाकणारे अनुभव तिच्याच शब्दात –***

बरेच दिवस मी रोज प्लॅटफॉर्मवर येतेय, त्यांच्याशी बोलतेय याचा त्यांना आनंद होत होता, तसे आश्चर्यही वाटत असल्याचे त्यांच्या चेहऱ्यावरून दिसत होते. शेवटी त्यातल्या एकाने विचारायचे धाडस केलेच. 'दीदी, तुमकु मार्क्स मिलाने है क्या?'...'नहीं'...'तो तुम हमकु सुधारने आती क्या?'...'नहीं'. ती मुलं गोंधळात पडली. 'दीदी, फिर तुम यहाँ आती कायको है?' मी



त्यांना सांगायची– 'अरे बिघडलेल्यांना सुधरवतात तुम्ही तर चांगलीच मुलं आहात. तुम्हाला कशाला सुधारायचे? मी तुमच्याशी गप्पा मारायला येते. मला जे थोडं तुमच्यापेक्षा जास्त माहीत आहे ते सांगायला येते...' मी निम्मा गड इथेच सर केला होता. त्या मुलांच्या चेहऱ्यावर 'आपल्याशी कुणीतरी गप्पा मारायला आलंय' याचा आनंद पसरलेला होता, तो मला खूप काही देऊन गेला. आणि आता तर ही माझी मुलं मला भरभरून तृप्ती, समाधान देत आहेत.

लहानपणापासूनच मला घरात खूप छान वेगळं आणि मोकळं वातावरण लाभलं, तेव्हा मी शाळा-कॉलेजमध्ये अनेक उपक्रमांमध्ये भाग घेत होते. बऱ्याच ठिकाणी बक्षिसं मिळवत होते. घरी एकदा गप्पांमध्ये विषय निघाला, आपल्याला एकूण वेळ मिळतो किती आणि तो आपण घालवतो कसा? आणि बाबांनी आणि आईने एकद वेळेचा हिशेबच मांडायला सुरुवात केली. आणि मला म्हणाले, 'बघ, तुला आठवड्याचे इतके तास मिळतात– त्यातला काही वेळ, जास्त नाही पण फक्त दोन तासही तू इतरांना देऊ शकत नाहीस?' कुठेतरी मनात ते रुजलं आणि मग अशी कामं कुठं कशी चालली आहेत याचा शोध घेत बऱ्याच संस्थांमधून भटकले.

Child Development घेऊन B.Sc. केल्यावर पत्रकारितेचा अभ्यासक्रम पूर्ण केला आणि 'महाराष्ट्र हेराल्ड' मध्ये मी कामाला लागले. आमची मुलांवरची जी पुरवणी सुरू झाली त्याचं सगळं प्राथमिक काम पूर्ण केलं. रेल्वे विभाग माझ्याकडे असल्याने काही लेखांच्या संदर्भात वारंवार तिथल्या मुलांशी संपर्क येऊ लागला. आणि आयुष्यात पहिल्यांदा खूप अस्वस्थ झाले. रुटीन सुरूच होते. पण एकंदर माझी घरची पार्श्वभूमी आणि माझा अभ्यासाचा विषय यामुळे मी तो विषय पेपरातील लेखांपुरता मर्यादित ठेवू शकले नाही. आणि अशा बऱ्याच रात्रींच्या विचारानंतर 'स्पॅरोज्'चा जन्म झाला.

स्पॅरोज् काम करते रस्त्यावरच्या मुलांसाठी. या मध्येही बऱ्याच प्रकारची मुलं असतात. काही मुलं सगळ्या कुटुंबाबरोबरच रस्त्यावर राहात असतात. काही मुलं घर सोडून पळून आलेली असतात, तर काही मुलांची घरं दुसरीकडे असतात पण पोट भरण्यासाठी दिवसभर ती

रस्त्यावरच काही ना काही कामं करत असतात. ह्या सगळ्याच मुलांवर आपण एक शिक्का मारलेला असतो की ती बदमाष, लुच्ची, चोर असतात. पण एक गोष्ट आपल्याकडून सोयीस्करपणे विसरली जाते की, इतक्या लहान वयात त्या मुलांना आपले घर सोडावेसे वाटते अशी कोणती भयानक परिस्थिती त्यांनी पाहिली असेल! एखादी सावत्र आई नवऱ्याला सांगते – 'एक तर मी राहीन नाहीतर तुमचा मुलगा राहील' – तेव्हा त्या छोट्याशा मुलाचं काय होत असेल... पण असा काही विचार करण्याची गरजही आपल्याला वाटत नाही... मग त्यांच्यासाठी काही करणे वगैरे तर दूरच! जर आपणच त्यांच्याकडे अशा दृष्टीने पाहत असू तर त्यांनी तरी आपला विचार का करायचा? म्हणून या मुलांमध्ये इतर समाजाबद्दल एक प्रखर द्वेष असतो.



एकदा मी अशीच मुलांना समजावत होते. 'अच्छे बच्चे गाली नहीं देते' एक मुलगा म्हणाला, 'दीदी, तुमको आजतक किसीने गाली देकर बात नहीं की होगी... इसलिये तुम गाली नहीं देती। पर हमसे गाली के बिना कोई बातही नहीं करता, तो हम क्या करें?'

मला इतकं अस्वस्थ करून गेलं त्याचं बोलणं. खरंच आपल्याला काय हक्क आहे त्यांना 'असं बोलू नये आणि असं करू नये म्हणून सांगण्याचा.'

या मुलांचं logic असं प्रचंड असतं. आपण त्यांना पटकन उत्तर नाही देऊ शकत. पण त्यांना आपण भावनिक दृष्टीनं समजावलं तर मात्र त्याचा खूप उपयोग होतो.

असाच एक प्रसंग आठवतो. एका मुलानं एकदा मला येऊन सांगितलं 'दीदी, वो आदमी सोया था नं तो मैने उसका पचास का नोट हल्लूच चुराया और उसे पताभी नहीं चला।' चोरी– पेक्षाही त्याला काहीतरी धाडस–गंमत वाटत होती. आणि 'चोरी करू नये, ते वाईट असतं' असं समजावून भागलं नसतं. म्हणून मी त्याला म्हटलं 'देख तूने उस आदमी का पचास रुपया चुराया. शायद उसका छोटा बच्चा होगा और वो बहोत दिनोंसे कुछ मांगता होगा। आज जब पैसे है तो वो आदमी अपने बच्चे को वो खरीदके देनेवाला होगा। आज तुमने वो पैसे चुराये। तूने पैसे नहीं, उसम आदमी की, उसके बच्चे की खुशी चुराई है।' त्या क्षणी त्या मुलाला ती चोरी करण्यामागची तीव्रता समजली.

गेली ४–५ वर्षे मी त्यांच्यात काम करतेय. पहिल्यांदा तर सगळंच धुक्यात होतं, अनिश्चित होतं. पण त्यांच्याशी गप्पा मारतामारता आमच्यामध्ये हळूहळू संवाद होत होतं. काहीतरी नातं निर्माण होत होतं. माझ्या डोक्यात एक कच्चा आराखडा होता की त्यांना सकस अन्न हवंय, शिक्षण हवंय,... पण त्याच वेळी जाणवत होतं की रस्त्यावर राहण्याचा अनुभव घेतलाय त्यांनी. त्यामुळे संपन्न घरात राहिलेली मी केवळ पुस्तकं वाचून



**रंग, गंध सारं उधळून, प्रेम करावं फुलासारखं, शिशिरात झडून, ग्रिष्मात वाळून, छत्र द्यावं झाडासारखं.**

त्यांच्या गरजा नाही ठरवू शकत. मग कोण ठरवणार? त्यांनाच कळू शकतं की आपल्याला काय हवंय– काय नकोय? म्हणून मुलांपुढं जेव्हा मांडलं तेव्हा आश्चर्याचा धक्का बसला. म्हणजे त्यांना त्यांच्या गरजांची पूर्ण जाणीव होती. आपल्या गरजांची त्यांच्या तीव्रतेनुसार ते क्रमवारी लावू शकत होते. माझा पहिला हेतू सफल झाला. आपल्या मताला काही किंमत आहे. दीदीला आपलं मत विचारावंसं वाटतं, त्यामुळे त्यांच्यात प्रचंड विश्वास निर्माण होत होता.

आम्ही मुलांच्या गरजा ओळखून अन्न, आरोग्यसेवा, कपडे, शिक्षण पुरवत होतो. पण याची किंमत त्यांना कळावी म्हणूनच आम्ही खाऊ २ रु., शर्ट २ रु., पँट १ रु. अशी किंमत आकारायला लागलो. आणि हे जमलेले पैसे, त्याचा हिशेब त्यांनाच ठेवायला सांगू लागलो. मी त्यांना सांगायची ''कुणाच्या उपकाराखाली दोन वेळचं अन्न मिळवायचं की आयुष्यभर दोनवेळचं पोटभर खायला मिळेल असं संस्कार, असं शिक्षण हवंय, तुमचं तुम्ही ठरवा'

हे वेळच्या वेळी स्पष्ट केल्याचा फायदा नक्कीच झाला. दीदी, आपल्याला दोन वेळच्या खाण्यापेक्षा जास्त काहीतरी देणार आहे– एवढं त्यांना नक्कीच जाणवलं. स्पॅरोज्‌ला मुलांना स्वावलंबी बनवायचंय, त्यांच्यातलं स्वत्त्व जागं करायचंय. त्यांना स्वाभिमानी, सुसंस्कृत बनवायचंय.



मनात ठेवून असतात. 'ज्या समाजाने आम्हाला असं वागवलं तयंच्याशी आम्ही चांगले का वागू?' यातून मग त्यांना चोरी करावीशी वाटली; धाकधपटशा करावासा वाटला गुन्हेगारीकडे वळावंसं वाटलं तर आपण कोणत्या तोंडाने त्यांना जाब विचारणार आहोत? हे सगळं मनातून पटत होतं, पण त्या क्षणी त्या मुलांना समजावणंही आवश्यक होतं. म्हणून एक खेळ सुरू केला. गोलात बसून एकाने एखादी कृती करायची आणि ती सगळ्यांनी पुढे पुढे पास करायची... शेवटी मीच केलेली कृती परत माझ्यापर्यंत येते. त्यांना मी म्हटलं – बघा– मी रामला टाळी दिली... रामने मुन्नाला–मुन्नाने शुभमला... शेवटी पुन्हा ती टाळी माझ्यापर्यंत आली– मी जर कुणाशी चांगली वागले तर त्याच व्यक्तीकडून नाही पण तोच 'चांगुलपणा' परत माझ्याकडे नक्की येईल'... मला कळत नव्हतं मुलांना हे कितपत कळतंय. पण सगळीजण शांत होती. मग एकजण बोलला 'हाँ दीदी, एक आदमी इतना भला था की उसने ऐसे ऐसे किया' सगळ्यांना हळूहळू कंठ फुटले. समाजात चांगुलपणा निश्चित असतो. कुठेतरी त्यांना जाणवून गेलं.

पण हेही मनात खूप सलत होतं की याला जबाबदार आपण आहोत. आपण त्यांना कधी चांगलं मानलंच नाही. म्हणून मी बाहेर संधी मिळेल तिथे जाऊन लोकांना सांगायला सुरुवात केली. या वर्षीपासून असं आमच्या डोक्यात आहे की शाळेत जाऊन मुलांना हे सांगायचं. या मुलांचा आणि शाळेतल्या मुलांचा संवाद घडवून आणायचा... मला खूप आशा आहे. निदान पुढची पिढी तरी या मुलांकडे दूषित नजरेने पाहणार नाही, त्यांच्यावर विश्वास टाकेल.

अजून एक प्रसंग आठवतो. मला या मुलांबद्दल कधीच अविश्वास वाटला नाही. एकदा मी काही हजाराची पर्स मुलांकडे देऊन काही कामासाठी गेले. परतताच मुलांनी, 'दीदी, तुला वाटलं नाही आम्ही पैसे घेऊन पळून जाऊ म्हणून?' 'तुम्ही जालंच कां पण?' त्यांच्यावर मी विश्वास टाकला आणि ती मुले त्याला पुरेपूर उतरली. त्या एका घटनेने माझ्यातलं आणि त्यांच्यातलं अंतर एकदम संपलं.

आज मी खरंच तृप्त आहे. आमच्या दृष्टीने तर खूप काही व्हायचंय. आज या मुलांसाठी 'घर' सुरू केलंय. १२ मुले मिळून मिसळून, प्रेमाने राहात आहेत. पुन्हा समाजात यायचा प्रयत्न करताहेत,

यांच्यापैकी काहींना व्यावसायिक शिक्षणाच्या कोर्सना घातलंय, आता एक बेकरी सुरू करायचीय. पिंपरीला आणि शिवाजीनगरला Night Shelter सुरू केलंय. खूप योजना आहेत. त्या दृष्टीने कायम असमाधान राहणारच आहे. पण माझी मुलं मला भरभरून देत आहेत. एक मुलगा म्हणाला, 'दीदी, आप है तो लगता है की अगर मर गया तो कोई तो है रोनेवाला।' ही सगळीच माझी मुलं आहेत, पण शुभमने तर मला आई म्हणूनच दत्तक घेतलं आहे. सगळीकडे आज तो माझं नाव लावतो. शिवकुमार भेटला की, माझ्याशी कचकचा भांडतो... 'दीदी आपसे नही तो और किससे लडूंगा मै?...'

ही मुलं आधीही कसं ना कसं आपलं पोट भरत होतीच. पोटाची त्यांना काळजी नव्हती. त्यांचं दु:ख होतं, 'त्यांचं असं कुणी नव्हतं.' आज मी खूप समाधानी आहे, कारण मी त्यांना थोड्याफार प्रमाणात तरी ते देऊ शकलीये... देतीये... शेवटी माझाही यात स्वार्थ आहेच... याच्यापेक्षा सुख आणखी काय वेगळं असतं? ●●

**सुदेष्णा घारे**

८८५/३ भांडारकर रोड, पुणे ४.

---




# व्हायोलिनच्या सुरांनी जीवनातील अंधार दूर केला!

**संजय उपाध्ये**




***उपजतच थोडी संगीताची जाण असणाऱ्या संजयचे आठव्या वर्षापासूनच अंध शाळेत गायनाचे शिक्षण सुरू झाले. गाण्यानंतर, हार्मोनियम वादन आणि नंतर व्हायोलिन वादन असा त्याचा संगीत प्रवास झाला. आज संजय आकाशवाणीचा उच्च श्रेणीचा व्हायोलिन वादक आहे. अंधत्वावर मात करून केलेल्या त्याच्या धडपडीची कहाणी त्याच्याच शब्दात...***

**ख**रं तर संगीताशी माझा संबंध आधी आला आणि नंतर मी व्हायोलिनकडे वळलो. अर्थात गायक व्हायचे वगैरे स्वप्नांनी मी संगीताकडे वळलो नाही, तर आमच्या अंध शाळेत संगीत विषय हा अनिवार्य आहे. त्यामुळे तुमचा आवाज चांगला असो वा नसो तुम्हाला गाणं शिकावंच लागतं. अशारितीने पुणे अंधशाळेत माझं इतर शिक्षणाबरोबर संगीताचे शिक्षणही सुरू झालो. मात्र पुण्यात येण्याआधी अंधांसाठी शाळा असते, हेच माझ्या आई-वडिलांना माहीत नव्हते. कारण आम्ही सांगलीजवळ एका खेडेगावात राहायचो. तिथे मला इतर मुले अंधत्वावरून खूप चिडवायची. पण मोठ्या बहिणीबरोबर मी शाळेत जायचो आणि जे शिकवतात ते ऐकायचो. तेव्हा बहिणीने मला खूप सांभाळून घेतले. माझ्या आई-वडिलांनीही आलेल्या परिस्थितीला समर्थपणे तोंड देत दोन कलाकार घडविले आहेत. स्वत:च्या प्रयत्नांनी त्यांच्या व आमच्या आयुष्यातील अंधार दूर करून, संगीत क्षेत्राचे दालन आम्हाला खुले करून दिले आहे. माझा धाकटा भाऊसुद्धा अंध आहे, तरीही तो उत्तम तबला वाजवितो. आज जर मी डोळस असतो, तर एखादी डिग्री घेऊन कुठेतरी नोकरी करत असतो. पण आई-वडिलांनी मला हिंमत दिली. आम्ही समर्थ

**फिटे अंधाराचे जाळे झाले मोकळे आकाश दरीखोऱ्यातुन वाहे नवा प्रकाश.... प्रकाश....**

आहोत तोपर्यंत तुम्ही वेगळे काही करा, शिका. घरच्यांच्या अशा प्रेरणेनेच मी गायन, वादन अशा कलांकडे वळलो व वेगळ्या वाटेने यशस्वीपणे जाऊ शकलो. याच कलांनी आज मला नाव दिलं. प्रतिष्ठा दिली, परिस्थितीवर मात करण्याची शक्ती दिली, जिद्द दिली आणि मुख्य म्हणजे समाधान आणि आनंद दिला.

अशारितीने आधीच सांगितल्याप्रमाणे माझी संगीत साधना सुरू झाली. एखादी गोष्ट अनिवार्य, सक्तीची आहे म्हटली की मग नंतर आपोआप मन लावून केली जाते. माझा आवाजही तसा बरा आहे. त्यामुळे मी आवडीने संगीत शिकायला लागलो. माझ्या वडिलांचे मित्र श्री. बाळकृष्ण जोशी सर, यांनी मला खूप प्रोत्साहन दिले. त्यांच्यामुळेच मी अंधशाळेत जायला लागलो व त्यांनीच स्वत: फी भरून मला हार्मोनियम शिकायलाही पाठविले. माझे हार्मोनियमचे शिक्षण मेंढापूरकर सरांकडे झाले. हार्मोनियममधील माझे कौशल्य बघून व्हायोलिनवादक राजाराम मंत्री



यांनी मला व्हायोलिन शिकायला प्रवृत्त केले. असे तिसरीत म्हणजेच वयाच्या आठव्या वर्षापासून माझे व्हायोलिन शिक्षण सुरू झाले.

तोपर्यंत व्हायोलिन हे वाद्य कसे असते तेही मला माहीत नव्हते. त्यानंतर सतत चार वर्षे मी व्हायोलिन शिकलो. माझे शालेय शिक्षणही एकीकडे सुरूच होते. नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालयातून मी दहावी पास झालो. मधल्या काळात माझ्या व्हायोलिन शिक्षणात खंड पडला. त्यावेळी दहावीनंतर एखादा व्यवसाय करावासा वाटे. पण वडिलांनी शिक्षणालाच महत्त्व देऊन पुढे शिकायलाच लावले. सध्याही मी वादनात डॉक्टरेट करावे, अशी त्यांची इच्छा आहे. बघूया, काय जमते ते!




मला रेडिओ ऐकायला खूप आवडतो, कारण 'ऐकणे' व माझे कायमेचच नाते जुळलेले आहे. वेस्टर्न, अरेबिक भाषेतील संगीत, कर्नाटक संगीत, हेही मी आवर्जून ऐकतो. त्यातून नुसतेच ऐकण्यापेक्षा अनेक गोष्टी शिकायचाही मी प्रयत्न करतो. त्यामुळे मनावरचे ताण कमी होतात. आकाशवाणीवर प्रसिद्ध व्हायोलिन वादक श्री. अतुल उपाध्ये यांचे व्हायोलिन ऐकताना मलाही वाटायचं की मीही त्यांच्यासारखेच व्हायोलिन वाजवावे, आकाशवाणीवर माझे कार्यक्रम व्हावेत आणि काय योगायोग पाहा, संगीत विषयात मी बी.ए. करायचं ठरवलं आणि पुणे विद्यापीठाकडून उपाध्ये सरच मला गुरू म्हणून लाभले. एखादी कला तुम्ही एकदा शिकलात की ती तुम्हाला स्वस्थ बसू देत नाही, हे माझ्याही बाबतीत खरं झालं. मध्ये ४-५ वर्षे गॅप पडूनही मी पुन्हा व्हायोलिनकडे वळलो. हार्मोनियम, गायन व इतर संगीत प्रकारही मला आवडतात, पण आपल्याला जे येतं किंवा जे मांडायचे आहे ते व्हायोलिनच्या माध्यमातून चांगल्या प्रकारे सांगता येईल, असे वाटल्याने मी व्हायोलिनची निवड केली.

उपाध्ये सरांकडे माझे व्हायोलिन शिक्षण सुरू झाल्यावर, त्यांचाही मी पहिलाच अंध विद्यार्थी असल्यामुळे थोड्या अडचणी आल्या. प्रामुख्याने व्हायोलिनमधील बारकावे समजावून घेताना व त्यातील तांत्रिक बाजू शिकताना मला दिसत नाही, याची खूप अडचण वाटायची. पण हळूहळू आम्हा दोघांनाही ते जमत गेलं. फक्त गुरू कसे वाजवतात, त्याप्रमाणे त्यांच्या बोटांच्या हालचाली बघून आपण शिकावे, असे माझ्या बाबतीत

**निजध्येयाचे शीड घेऊनी, धैर्यरज्जुने त्यास बांधुनी दो हातांनी वल्ही करूनी, वल्हवीत ने नाव पुढे**

झाले नाही. गुरूंबद्दल योग्य तो आदर ठेऊन, हस्त स्पर्शाने, ते वाजवत असताना मी त्यांच्या बोटांच्या हालचालींचा अंदाज घ्यायचो. त्यांचे वादन ऐकूनही मी खूप शिकत गेलो. विशेषत: जेव्हा मला तांत्रिक अडचणी येत तेव्हा त्यांचे इतर शिष्यही मला मदत करत. मला व्हायोलिन शिकायला नॉर्मल, डोळस विद्यार्थ्यांइतकाच वेळ लागला, हे माझ्या मेहनतीचे व सरांच्या प्रयत्नांचे फळ. त्यामुळेच माझ्यापुढे माझे सर हे तर आदर्श आहेतच, पण दक्षिणेतील प्रसिद्ध व्हायोलिन वादक एम. एस. गोपालकृष्णन, एन. राजम्, एल. शंकर, एल. सुब्रमण्यम हे माझे आदर्श आहेत. त्यांच्यासारखी 'तांत्रिक अचूकता' मला आत्मसात करायची आहे. व्हायोलिन वाजवताना बोटाच्या पेरापासून ते खांद्यापर्यंत, शरीरातील प्रत्येक भाग कार्यान्वित होणे, प्रत्येक अवयवातून भाव व्यक्त होणे महत्त्वाचे असते, आणि हेच मला मिळवायचंय. व्हायोलिनमधील हे अष्टपैलूत्व मला मिळवायचंय. याची सुरुवात मी शारीरिक प्रभुत्व मिळवण्यापासूनच करतोय. सुरुवातीला मी जेवढं शिकवतील तेवढंच वाजवायचो. पण आता संगीताची जाण आली आहे. त्यामुळे मी वेगळा विचार करायला लागलोय.

माझ्या गुरूंची उत्तर हिंदुस्थानी गायकी आहे. दक्षिणेत स्वर न तुटता सलगतेने पण तितक्याच गोडव्याने व्हायोलिन वाजविले जाते. एम. एस. गोपालकृष्णन यांचे याच पद्धतीने वादन आहे. आपल्या



वादनातही हा गोडवा यायला हवा असे मला वाटे. पण जेव्हा खूप प्रयत्न करूनही ते अवघड जायचे तेव्हा हे वाद्य नकोच, आपण दुसरेच काही करूया, असे वाटायचे. पण त्यातून मी सरांमुळे बाहेर पडलो. पुढेही एकदा अशीच वेळ आली. पाश्चात्य वादन हे तांत्रिक अचूकतेमुळे अत्यंत प्रभावी वाटते. ते ऐकणाऱ्याला मंत्रमुग्ध करते. त्यामुळेच त्याचा जास्त मोह वाटतो. आपणही तितक्याच वेगाने, ठेका पकडून वाजविले पाहिजे, असे सतत वाटायचे. पण तसेच जर का जमले नाही तर भयंकर नैराश्य येते. मीही हा अनुभव घेतला आहेच. आपलं वादन साधं आहे व प्रसिद्धीसाठी पाश्चात्य वादनच आपल्याला जमलं पाहिजे, असे वाटतं होते. हा अनुभव हा अनुभव इतका भयंकर होता की व्हायोलिन सोडून द्यावे, असे मला वाटायचे. पण यातूनही मी सरांच्या मार्गदर्शनामुळे बाहेर पडलो. आपली संस्कृती, कला ही आंतरिक समाधान देणारी आहे. तिच्यातून मन:शांती मिळते, त्यामुळे आपल्याकडे तांत्रिकता कमी असली तरी गोडवा जास्त असतो, असे सर्व सांगून, त्या नैराश्यातून सरांनी मला बाहेर काढले.

असे सगळे अनुभव घेत केलेल्या धडपडीचे फळ म्हणून मला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. बरेच कार्यक्रमांशिवाय मी अनेकांना साथही केली आहे. १९९३ मध्ये मी आकाशवाणीवर पहिला कार्यक्रम केला व सध्या मी आकाशवाणीचा उच्च श्रेणीचा वादक आहे. १९९२ साली मला आकाशवाणीचे व्हायोलिनमधील राष्ट्रीय पारितोषिक




**कलेने साद दिली, रसिकांनी दाद दिली एकाकी वाटेवर छायेसम साथ दिली.**

मिळाले. हा पारितोषिक वितरण समारंभ इंदौरला झाला. त्यावेळचा माझा कार्यक्रम इतका रंगला की, कार्यक्रम संपल्यावर तिथले प्रेक्षक रेस्ट हाऊसपर्यंत पाठलाग करत आले. मला वाटते की, जाणकार प्रेक्षकांकडून अशा प्रतिक्रिया, हेच माझ्या वादनाचे खरे बक्षीस आहे.

सूर सिंगार संस्थेतर्फे संगीतात चांगली कामगिरी करणाऱ्यांसाठी 'सूरमणी पुरस्कार' दिला जातो. इतरांना जेव्हा हा पुरस्कार मिळायचा तेव्हा आपल्याला हा पुरस्कार मिळेल की नाही असे वाटायचे. पण माझ्या सरांमुळे व घरच्यांच्या प्रोत्साहनामुळे ९४ साली मी हा पुरस्कार मिळवू शकलो. म्हैसूरमधील माझ्या कार्यक्रमांनाही प्रेक्षकांनी चांगली दाद दिली.

व्हायोलिन हे असे वाद्य आहे की, जे साथीलाही वाजविले जाते. पण तरीही मला सोलो वादनातूनच जास्त आनंद, समाधान मिळते. सोलोमध्ये तुम्ही आपल्या विचाराने, स्वत: राग निवडून वाजवता. आलापी, संथ वादन अशा वादनातून तुम्ही श्रोत्यांना मोहवून टाकता आणि अतिद्रुत लयीतून तुम्ही श्रोत्यांना चमत्कृतीचा आनंद देता. लोकांना हे वादन खूप आवडतं. मला स्वत:ला मात्र संथ वादन आवडते. एखादी गोष्ट तुम्हाला एकदा अपील झाली की मग दुसऱ्यांना तुम्ही त्याचा जास्त आनंद देऊ शकता. माझ्याही वादनातून सध्या मी हाच आनंद सगळ्यांना देण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र त्याबाबत अजून मी



तितका संतुष्ट नाही. त्यादृष्टीने सध्या माझी विचारशील, चिंतनशील व अभ्यासू वाटचाल सुरू आहे. जेव्हा कुणाला साथ करायची असते तेव्हा गायकाप्रमाणे व त्याच्या गायनाची माहिती मिळवून तुम्हाला वाजवावे लागते. तेही एक आव्हानच असते. अर्थात हे आपण पेलू शकतो. असे समाधानही आपल्याला मिळते. आयत्या वेळेस गायकाने जर राग बदलला तर तुमची खरी कसोटी असते. सराव न करता तुम्हाला साथ करायची असते. पण थोडा अंदाज घेऊन तुम्हाला ती वेळ निभावून नेता येते. आतापर्यंत मी गजानन वाटवेंसारख्या ज्येष्ठ व श्रेष्ठ गायकालाही साथ केली आहे. एकदा सुप्रसिद्ध गायक सुधीर फडके, अंधमित्रच्या कार्यक्रमाला आले होते. त्यावेळी त्यांनी संगीतबद्ध केलेले 'ज्योती कलश झलके...' हे गाणे मी व्हायोलिनवर वाजविले होते. त्यावेळी ते इतके खूष झाले की अजूनही कधी भेटले की ती आठवण सांगतात.

मी आज एवढे यश मिळवू शकलो ते खूप प्रयत्नांनी आणि रियाजामुळे. मी सकाळी २ ते ३ तास व सायंकाळी १ तास असा रोज रियाज करतो. गळ्यातून निघणाऱ्या जागा, हरकती, अलंकार असे सर्व वाजविण्याचा प्रयत्न करतो. तसेच संथ लयीत वादनाचाही मी मुद्दाम रियाज करतो. याशिवाय स्वत: एखादा नवीन अलंकार, हरकत बनवून त्याचाही रियाज करतो. गळ्यातील एखादी न जमणारी हरकत व्हायोलिनवर वाजविणे शक्य असते. पण त्यासाठी तशी मानसिकता व अधिक श्रम लागतात.

संगीत-वादनाने मला खूप आत्मविश्वास दिला, लोकांचे प्रेम दिले, समाजात एक स्थान दिले. पण यात मुख्य वाटा मी आधी सांगितल्याप्रमाणे, माझ्या आई-वडिलांचा व सरांचा आहे. सध्या अनेक कार्यक्रम चालू आहे. शिवाय मी गायन वादनाचे क्लासही घेतो. हेही आनंद देणारे असते. तुम्ही अंध असलात तरी त्यावर मात करून खूप काही मिळवू शकता. तुमच्यात धडाडी पाहिजे. आपणहून तुम्ही इतरांमध्ये मिसळायला पाहिजे. बोलायला पाहिजे. जेव्हा एकटा असतो तेव्हा व्हायोलिनसाठी उपयोगी असे हाताचे व्यायाम करतो. अर्थात मी शिक्षक झालो तरी अजूनही माझे शिकणे चालूच आहे. पण अजून खूप मिळवायचंय, खूप काही करायचंय. संगीताची अशीच सेवा हातून घडत राहावी, एवढंच शेवटी सांगावंसं वाटतंय!

●●

**संजय उपाध्ये**
C/o बालमित्र मधुबन सोसा. गल्ली नं. १, घर नं. ७, सांगवी, पुणे २७.

कर्तृत्वाशी जडले नाते!

# व्यासंग आणि प्रयोगशीलता हेच माझे खरे व्यासपीठ!

**समीर गोखले**



**मा**झ्या वडिलांप्रमाणेच यंदा मलाही 'पारखे पारितोषिक' मिळाल्यावर मला खरोखरच खूप आनंद झाला. वडिलांचा वारसा मी पुढे योग्यरितीने चालवू शकेन, असा विश्वास मला या पारितोषिकाने नक्कीच दिला. शस्त्रक्रियेसाठी लागणारी उपकरणे आमच्या 'मन्मन' या संस्थेतर्फे आम्ही बनवतो. ही उपकरणे बनविण्याच्या खऱ्या अर्थाने वारसा मला वडिलांकडूनच मिळाला. सतत नव–नवीन प्रयोग करण्याची माझ्या वडिलांना आवड होती. मीही त्यांचा हा गुण उचलला. मलाही लहानपणापासून नव–नवीन प्रयोग करायची आवड आहे.

***वयाच्या आठव्या वर्षी पतंगासाठी लागणारा मांजा तयार करण्याचे यंत्र समीरने तयार केले. आपल्या मुलातील हा कल्पकतेचा अंकुर त्याच्या वडिलांनी प्रयत्नपूर्वक फुलविला, जोपासला. आज 'पारखे पारितोषिकाचा' मानकरी ठरलेला समीर, आपल्या इथपर्यंतच्या वाटचालीविषयी सांगत आहे...***

लहानपणी मी मातीपासून काही आकार, छोट्या वस्तू बनवायचो, तेव्हा सगळे मला, 'काय, मातीत खेळतो' म्हणून चिडवायचे. पण मी त्याकडे दुर्लक्ष करून माझे प्रयोग करतच राहिलो. घरचेच गुरू, असं काहीसं माझं आणि वडिलांचं नातं होतं, आहे ही! वडिलांनी आपलं कौशल्य नोकरीपुरतंच मर्यादित न ठेवता, घरातही ते अनेक प्रयोग करायचे. घरात सर्व मशीनरीही उपलब्ध होती. त्यामुळे घरची सर्व दुरुस्तीही वडील स्वत:च करत. मी थोडा मोठा झाल्यावर, वडील त्यांच्याबरोबर मला मदतीला घेऊ लागले. अशारितीने घरच्याच वर्कशॉप मध्ये माझं ट्रेनिंग सुरू झालं. त्यामुळे पुढचे माझे प्रयोग मी मातीऐवजी वेगवेगळ्या मशीन टूल्सवर करायला लागलो. वडिलांच्या सततच्या मार्गदर्शनामुळे, सहवासामुळे मला अनेक नवीन कल्पना सुचत गेल्या व मुख्य म्हणजे त्या कल्पनांवर प्रयोग करण्याची मला परवानगीही होती. घरून कधीही मला 'तू हे करू नकोस, याला हात लावू नकोस' असं सांगितलं जायचं नाही. मात्र या माझ्या प्रयोगांमुळे माझं अभ्यासाकडे थोडं दुर्लक्ष व्हायचं. सुरुवातीला माझे प्रयोग बघून सगळे म्हणायचे की, 'हा मोठेपणी इंजिनिअर होणार.' पण इंजिनिअरिंगला दिलं जाणार शिक्षण मला खूप लहानवयातच वडिलांकडून मिळालं होतं. त्यामुळे शाळा–कॉलेजमधून मी वेगळं काय शिकणार होतो? मला जे पाहिजे, मला जे मिळवायचंय, जे शिकायचंय त्याचे सर्व प्रॅक्टिकल अनुभव मला घरीच मिळत होते. त्यामुळे शाळेपेक्षा मला आमच्या घरच्या वर्कशॉपचीच अधिक ओढ होती. पुढे मी इंजिनिअरिंगला प्रवेश घेऊनही ते शिक्षण अधर्वटच सोडले. अर्थात याच विषयातील काहीतरी मी घरी करत होतो व घरीच नवीन शिकत होतो. त्यामुळे घरूनही माझ्या निर्णयाला विरोध झाला नाही. घरी नुसताच बसलो असतो तर कदाचित घरच्यांनी मला विरोध केलाही असता, पण तसे झाले नाही. लहानपणी घरची परिस्थिती खूप चांगली नसतानाही वडिलांनी अनेक प्रकारची मशिनरी विविध प्रयोगांसाठी आणली होती. मीही ती वापरायचो. त्यामुळे 'मला मित्रांसारखी खेळणी पाहिजेत.' असा हट्ट मी केला वडील माझी समजूत घालायचे, 'आपल्याकडे आहे तशी

लेथ मशीन, ड्रिलिंग मशीन, कुणाकडे आहे का? मग त्यांच्यासारखी खेळणी आपल्याकडे नसली तर काय झालं?'' मग मलाही ते पटायचं. आशा वातावरणात माझं लहानपण गेलं.

त्यावेळी मला पतंग उडवायला खूप आवडायचे. पण मांजाचा दोरा करायला खूप वेळही लागायचा आणि श्रमही असायचे. मग मी त्यावेळी हा दोरा बनवायचेच मशीन बनविले. एका बाजूने दोरा आत सोडायचा. मध्ये डबा असे, त्यात दोऱ्याला लागणारा काचेचा चुरा, रंग आणि सरस असे साहित्य असे. त्या डब्यातून दोरा गेला की दुसऱ्या बाजूने तयार मांजाच बाहेर येत असे. माझ्या अशा उद्योगांना वडील नेहमीच प्रोत्साहन देत.

पुढे पुढे वडिलांनी नोकरी सोडून, पूर्ण वेळ वर्कशॉप चालवायचे ठरविले व यातूनच आमच्या 'मन्मन' या संस्थेने आकार घेतला. माझे काका सर्जन आहेत. विविध शस्त्रक्रियेसंदर्भात, त्यातील अडचणींविषयी ते वडिलांशी चर्चा करत. यावर विचार आणि अभ्यास करून वडिलांनी, अशा शस्त्रक्रियांसाठी आवश्यक अशी उपकरणे तयार केली. हाडं कापण्याची (बोनकटिंग), हाडांना भोक पाडण्याची (ड्रिलिंग) सिस्टिम त्यांनी तयार केली. हृदयाच्या शस्त्रक्रियेसाठी आवश्यक अशी उपकरणांची सिस्टिमही वडिलांनी विकसित केली. संपूर्ण भारतीय बनावटीची ही उपकरणे आज हजारो डॉक्टर्स तर वापरत आहेतच, पण परदेशातही त्याला भरपूर मागणी आहे. माझ्या वडिलांनाही दोनदा पारखे पारितोषिक मिळाले आहे. ही सर्व उपकरणे करताना मीही वडिलांबरोबर असायचो. त्यामुळे त्या उपकरणांबरोबरच शरीरशास्त्राचाही माझा सखोल अभ्यास झाला. अर्थात शस्त्रक्रियेसाठी उपकरणे तयार करायची तर हाडांची, शरीररचनेची तुम्हाला माहिती असायलाच पाहिजे.

माझे वडीलही याच क्षेत्रात असल्यामुळे अडचणींच्या वेळेला मी कायम वडिलांचीच मदत घेतली आहे. तरीही शक्यतो या अडचणी



सोडवायचा मी स्वत:च प्रयत्न करायचो. कारण त्यातून शिकायलाही मिळायचे. मात्र मी मेडिकलचा विद्यार्थी नसल्यामुळे अनेक अडचणी यायच्या. पण प्रत्येक वेळी वडिलांना त्रास देणे योग्य नव्हते व या अडचणींमधूनच नवीन प्रयोग करायलाही मिळत होते. मध्ये माझ्या वडिलांना हृदयविकाराचा त्रास होऊ लागल्यामुळे 'मन्मन'ची सगळी जबाबदारी माझ्यावर आली. आतापर्यंतच्या वडिलांच्या हाताखाली असलेला सर्व व्यवसाय सांभाळायची माझ्यावर जबाबदारी आली. मुख्य म्हणजे डॉक्टर्स, सर्जन्स यांच्याशी आता माझा थेट संवाद होऊ लागला. आमच्या उत्पादनाची विक्री आम्ही स्वत:च करतो. यात मध्ये कोणी एजंट नाही. त्यामुळे डॉक्टर्स व सर्जन्स यांना नेमक्या कोणत्या गोष्टींची अडचण येते, आमचे उपकरण वापरल्यामुळे फायदो होतो का? यात कशी सुधारणा करायला पाहिजे? हे प्रत्यक्ष त्यांच्याकडूनच कळते. सर्जन्सबरोबरच्या अशाच चर्चेतून मला त्यांना, मेंदूच्या अवघड शस्त्रक्रियेत येणाऱ्या अडचणी समजल्या. या शस्त्रक्रियेसाठी मेंदूला अजिबात धक्का न लावता कमीत कमी वेळात, कवटीला छेद घ्यावा लागतो. हे काम खूपच कौशल्याने व अचूकतेने करताना डॉक्टरांना फारच श्रम पडायचे. कारण आधीच मेंदूच्या शस्त्रक्रिया नाजूक असतात. या सगळ्याचा मी खोलात जाऊन

अभ्यास केला. यासाठी आधी मी मेंदूच्या रचनेचा व्यवस्थित अभ्यास केला. तसेच Ergonomics या शास्त्राचाही सखोल अभ्यास केला. त्यामुळे मशीन जास्तीत जास्त सुलभतेने कसे वापरता येईल, हे मला कळले. रात्रं-दिवस जागून मी सर्जन्सची ही अडचण कशी सोडवता येईल? याचा विचार केला. जवळजवळ सात वर्षे मी या प्रोजेक्टवर काम करत होतो. कितीही वेळ लागला तरी प्रयत्न सोडायचे नाहीत, असं मी मनाशी पक्कं ठरवलं होतं. शेवटी अथक परिश्रमानंतर 'सेल्फ रिटेनिंग ब्रेन रिट्रॅक्टर' हे मशीन मी बनविले. याच मशीनला यंदाचे 'पारखे पारितोषिक' मिळाले आहे. इतके दिवस सर्जनना अवघड वाटणारे काम या मशीनच्या साहाय्याने सोपे झाले आहे. अर्थात सध्याचे वापरात असणारे हे मशीन यात बऱ्याच सुधारणा झालेल्या आहेत. वेळोवेळी ते मशीन डॉक्टरांना दाखवून त्यांच्या सल्ल्याने मी त्यात सुधारणा घडवून आणल्या आहेत. सुरुवातीला या मशीनचे महत्त्व डॉक्टरांना पटवून द्यावे लागले. कारण मेंदूसारख्या अतिनाजूक अवयवाच्या बाबतीत कोणताही धोका पत्करण्याची डॉक्टरांची तयारी नव्हती. पण नारळाच्या करवंटीवर मी माझ्या मशीनचे प्रयोग त्यांना करून दाखविले. या मशीनचे वैशिष्ट्य म्हणजे जिथे छेद संपतो तिथे हे मशीन आपोआप थांबते. म्हणूनच त्याला 'सेल्फ रिटेनिंग' असे म्हटले आहे. माझ्या मशीनपासून रुग्णाला काही धोका पोहोचणार नाही उलट मशीनच्या वापराने छेद घेणे एकदम सोपे झाले आहे, याची खात्री पटल्यावरच डॉक्टरांनी ते वापरायची तयारी दाखविली आणि पूर्णपणे भारतीय बनावटीचे असे हे मशीन सध्या लोकप्रिय झाले आहे. पूर्वी हे परदेशातून आयात करावे लागे. आता ती गरज उरलेली नाही.

अर्थात हा माझ्या आयुष्यातला एक टप्पा झाला. फक्त संशोधक वृत्ती, जिज्ञासू वृत्ती जागी ठेवून पुढे जाण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला. वडिलांच्या मार्गदर्शनामुळे व कुटुंबातील इतरांच्या सहकार्यामुळे मी इथपर्यंत आलो. 'प्राप्ते तु षोडशे वर्षे, पुत्रे मित्र वदाचरेत।' हे संस्कृत वचन तर माझ्या वडिलांच्या बाबतीत पूर्णपणे लागू होते. माझ्यामधला उद्योजक त्यांच्याच प्रेरणेने पुढे आला. त्यांनी माझ्यात जोपासलेल्या रोपट्याचा 'वृक्ष' मलाच बनवायचा आहे. यासाठी खूप मेहनत प्रयत्न आणि श्रम करायला लागतील. अजून खूप मिळवायचंय. 'इंडिया इज सिंबॉल ऑफ क्वालिटी' हेच माझे ध्येय आहे. भारतात तयार होणारी प्रत्येक वस्तू ही उच्च दर्जाची असली पाहिजे, असाच माझा प्रयत्न असेल व त्याकडेच माझी वाटचाल सुरू आहे!

●●

**समीर गोखले**
११५७, सदाशिव पेठ,
भावे स्कूल समोर, पेरूगेट, पुणे ३०.

---

कर्तृत्वाशी जडले नाते!

# नऊ रसांचे करूनी सिंचन अभिनयाची करते गुंफण

**सोनाली कुलकर्णी**


***''आपण या क्षेत्राच्या झगमगाटाने भारावून जातो, पण नुसत्या सौंदर्यापेक्षा कामातला प्रामाणिकपणा, गुण महत्त्वाचे! चित्रपटसृष्टीत दीर्घकाळ टिकून राहायचं असेल तर हे लक्षात ठेवायला हवं!'' चंदेरी दुनियेतील आपल्या अनुभवांविषयी सांगत आहे, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी!***

**फ्रा**न्स चित्रपट महोत्सवाचा शानदार समारोप समारंभ, अनोळखी प्रदेशात, अनोळखी लोकांमध्ये, परक्या भाषेतील लोकांमध्ये मी बसले होते. बहुधा मी विचारात गुंग होते त्यामुळेच फ्रेंच संयोजकाने माझे नाव पुकारलेले मला ऐकू आले नाही. त्याने पुन्हा प्रत्येक अक्षरावर जोर देत माझे नाव पुकारले, 'सो-ना-ली कु-ल-कर्णी' आजूबाजूला बसलेले लोक एकदा माझ्याकडे आणि एकदा स्टेजकडे असे

हातवारे करत, ओरडत होते. त्यांच्या आवाजांनी माझ्या लक्षात आले की माझे नाव स्टेजवर पुकारले जात होते, नुकत्याच प्रदर्शित झालेल्या व गाजलेल्या 'दायरा' या चित्रपटासाठी या महोत्सवात सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मला मिळाला. एका वेगळ्याच विषयावरील या चित्रपटाने परदेशात खूप पुरस्कार व व्यावसायिक यश मिळविले.

लंडन, टोरॅन्टो व कार्लोव्ही व्हेरी अशा तिन्ही महोत्सवांमध्ये हा चित्रपट खूप गाजला. खूप छान अनुभव आम्ही घेतला. खरं तर आम्ही या महोत्सवातील स्पर्धेत भाग घेणार आहोत हे आम्हाला माहीतच नव्हतं, पण बक्षीस व कौतुक हे मिळायचंच होतं! हा चित्रपट म्हणजे मला माझ्या करिअरमधला अतिशय महत्त्वाचा टप्पा वाटतो. मेहनतीनं भूमिका साकार केल्यावर हवं असणारं समाधान मला या चित्रपटाने दिलं.

ही झाली माझी चित्रपटाची बाजू. पण खऱ्या अर्थाने माझी अभिनयाची सुरुवात मी साडेतीन वर्षांची असताना कॉलनीतल्या गणपतीपुढे, सांस्कृतिक कार्यक्रमातून झाली. त्यानंतर शाळेत विविध नाटकांमध्ये मी कामे केली. पण महाविद्यालयात आल्यावर माझ्या अभिनयाला विचार आणि गांभीर्याची जोड मिळाली. पुण्यात गाजणाऱ्या पुरुषोत्तम करंडक महाविद्यालयीन स्पर्धेत तर माझा अभिनय खऱ्या अर्थाने खुलला, वाढला. या स्पर्धेत अभिनयाबरोबर मी लेखन, दिग्दर्शनही केले. महाविद्यालयीन आयुष्याचा जोश





मला या स्पर्धेमुळेच अनुभवता आला. या स्पर्धेसाठी मला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. या वयात तुमच्या कलेला, विचारांना वाव मिळणे खूप महत्त्वाचे व गरजेचे असते, यातूनच उद्याचे कलाकार घडत असतात आणि हे वाव देण्याचे काम, ही स्पर्धा निश्चितच करते. नवीन कलाकारांसाठी हे उत्तम व्यासपीठ आहे; हे मला मुद्दाम सांगावंसं वाटतंय. मात्र याच वयात तुम्ही स्वतःची आवड, रस, कल ओळखणं हे फार महत्त्वाचं असतं. मला नृत्य, संगीत, खेळ या सगळ्यातच रस होता. पण १५-१६ वर्षांपर्यंत आणि त्यापुढेही, आपल्याला अभिनयाची, नाटकांची आवड जास्त आहे हे जाणवत गेलं. एखाद्या क्षेत्रात आपल्याला नुसताच रस वाटणं हा एक भाग असतो आणि त्यातून आपल्याला कामाचं समाधान मिळू शकतं का? हा दुसरा भाग असतो. त्यावेळी हा सगळा विचार करून, कामाचं समाधान आपल्याला अभिनयातून मिळेल. याची खात्री झाल्यावरच मी या क्षेत्रात पूर्ण तयारीने उतरले.

साधारण याच काळात मी पंडित सत्यदेव दुबेंच्या शिबिरात सहभागी झाले होते. तिथेच मी अभिनयाचे धडे शिकले. अभिनयातील बारकावे, सर्व अवयवांद्वारे अभिनय दाखविणे, हालचाली, शब्दफेक, पॉजेस्, मूकाभिनय आदी अनेक गोष्टी मला या शिबिरात शिकायला मिळाल्या. मला नृत्याची व गायनाचीही आवड आहे. माझे भरतनाट्यमचे अरंगेत्रम् पूर्ण झाले आहे.

त्याच दिवसांमध्ये प्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक गिरीश कर्नाड हे त्यांच्या 'चेलुवी' या चित्रपटासाठी नवा चेहरा शोधत होते. नव्या चेहऱ्याच्या शोधातच ते पुण्यात आले असताना पं. सत्यदेव दुबेजींनी माझे नाव त्यांना सुचविले. त्यावेळी मी २० वर्षांची होते. स्क्रीन टेस्ट, फोटो सेशन वगैरे झाल्यावर 'चेलुवी' या मुलीच्या भूमिकेसाठी माझी निवड झाल्याचे मला कळविण्यात आले. 'चेलुवी' हा एका लोककथेवर आधारित चित्रपट असून सुरुवातीला घर चालविण्यासाठी म्हणून सुवासिक फुलांचे झाड बनणारी चेलुवी नंतर पतीसाठी, छोट्या नणंदेसाठी झाड बनते आणि शेवटी तर अर्धेझाड व

**वाटते कधी कधी अभिनेत्री मी व्हावे, रससिद्ध अभिनये प्रेक्षक गण जिंकावे,**

अर्धे मानवी शरीर अशा अवस्थेत तिला जगावे लागते. अत्यंत परिणामकारक अशा या चित्रपटात भारतीय संस्कृतीच्या उत्तम छटा दाखविण्यात आल्या आहेत. पर्यावरणवादी अशा या चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत.

प्रसिद्ध दिग्दर्शक बाल कृष्णमूर्ती यांच्या 'मे मादाम' चित्रपटातील भूमिका मिळेपर्यंत तरी माझ्या डोक्यात पुढच्या काहीच योजना नव्हत्या. पण हा चित्रपट मिळाला आणि मी याच क्षेत्रात पुढे काही करायचे ठरविले. गेल्या काही वर्षांत मी वेगवेगळ्या भाषेतील भूमिकांचे, विषयांचे वैविध्य असलेल्या चित्रपटांमध्ये काम केले आहे.

भूमिकांमधील थोडंफार साम्य आणि सामान्य मुलीचा चेहरा यामुळे कदाचित अनेकजणं माझी तुलना ज्येष्ठ अभिनेत्री स्मिता पाटील यांच्याबरोबर करतात. पण मला स्वत:ला तसे वाटत नाही. कारण मी जरी त्यांच्या अभिनयाची नक्कल करायचा प्रयत्न केला तरी मला ते जमणार नाही आणि प्रेक्षकांनाही ते आवडणार नाही. कारण त्या खूपच चांगल्या अभिनेत्री होत्या. माझी तर ही सुरुवात आहे, अजून मी शिकतेय, मला खूप काही मिळवायचंय, आत्मसात करायचंय. जर मी पण स्वत:ला दुसरी स्मिता पाटील समजायला लागले तर ती माझ्या कारकीर्दीतील सर्वात मोठी चूक असेल. पण त्यांच्यासारख्या अभिनय करणाऱ्यांची जर गरज असेल तर



लोकांची ही अपेक्षा पूर्ण करणे हे माझ्या दृष्टीने आव्हानच ठरेल.

'मे मादाम' या तामिळ चित्रपटाच्यावेळी मला भाषेची सर्वात मोठी अडचण आली. पण तुमच्यात एखादी गोष्ट करायची जिद्द असेल तर ती गोष्ट तुम्ही मिळवताच. तामिळ भाषा शिकण्यासाठी मी खूप प्रयत्न केले आणि त्याचे फळ हा चित्रपट प्रदर्शित झाल्यावर मला मिळाले. माझा हा चित्रपट दक्षिणेत खूप लोकप्रिय ठरला. मणीरत्नम, माझे सहकलाकार, तंत्रज्ञ, आदी सगळ्यांनीही मला खूप मदत केली.

त्यानंतर एन. एफ. डी. सी. चे 'मुक्ता' व 'दोघी' हे दोन चित्रपट मी केले. अनेक मोठ्या कलाकारांबरोबर



आणि जब्बार पटेल व सुनिल सुकथनकर आणि सुमित्रा भावे यांच्या हाताखाली मी हे दोन चित्रपट केले. भारतातील समाजव्यवस्था व आपल्याकडची परिस्थिती लक्षात घेता 'मुक्ता'मधली भूमिका खूप आव्हानात्मक होती. मुक्तानं माझ्या काही चुकीच्या मतांना, दृष्टिकोनांना नवी वाट दाखविली. कारण ती एक वास्तव व्यक्तिरेखा होती. याही चित्रपटाला अनेक राज्य व राष्ट्रीय पुरस्कार मिळाले पण त्यापेक्षा महत्त्वाची अशी जगण्यातली सजगता मुक्तानं मला दिली. 'दोघी' ही दोन बहिणींची कथा. परिस्थितीच्या आघाताने एका कुटुंबाची झालेली वाताहत व त्या अनुषंगाने येणारे अनेक सामाजिक संदर्भ यामुळे हा चित्रपट गाजला. याही चित्रपटाला व मला राज्य पुरस्कार मिळाले. राजस्थानी कथेवर आधारित 'गुलाबडी' ही टेलीफिल्म मी केली. त्यासाठी मी कुंभारकाम करायलाही शिकले. या माझ्या टेलीफिल्मला स्थानिक प्रेक्षकांकडून, विशेषत: तिथल्या स्त्रियांकडून खूप चांगला प्रतिसाद मिळाला.

इटालियन दिग्दर्शक लॅम्ब्रेटो लंबार्तिनी यांच्याबरोबर मी 'द वृंदावन फिल्म स्टुडिओ' हा इंग्रजी चित्रपट केला. या चित्रपटातील राधाच्या भूमिकेनेही मला खूप काही शिकविले. या चित्रपटाच्यावेळी मी इटालियन भाषा शिकले.

माझ्या सर्व भूमिकांनी मला नवे विचार दिलेत, माझ्या जगण्याला अर्थ

**आकांक्षांच्या लाटांवरती घेऊनि हिंदोळे क्षितिजालाही जाऊनिया मी कितीदा तरी भिडले.**

दिला आहे, संपन्न अनुभव दिलेत तसेच आयुष्य पेलण्याची ताकदही दिली आहे. एखाद्या चित्रपटाला मी होकार दिला की त्या भूमिकेतील व्यक्तिरेखेचा खोलात जाऊन शोध घेते, अभ्यास करते. त्यामुळेच भूमिकेची, त्या व्यक्तिरेखेची मागणी काय आहे हे ओळखून, ती भूमिका नीट समजावून घेऊनच मी ती साकारते. वास्तवतेचे भान ठेवून त्या भूमिकेलाही वास्तवतेच्या जवळ आणण्यातच खरे आव्हान आहे असे मला वाटते. त्यामुळेच शबाना आझमी, रेवती, ऑड्री हेपबर्न, रेखा अशा वास्तव अभिनय करणाऱ्या अभिनेत्री मला आवडतात.

आपण या क्षेत्राच्या झगमगाटाने भारावून जातो. पण नुसत्या सौंदर्यापेक्षा कामातला प्रामाणिकपणा, गुण महत्त्वाचे. जे यात जिंकतात ते पुढे 'लंबी रेसके घोडे' ठरतात. बाकीचे क्षणभर चमकून लुप्त होता. या क्षेत्रातील झगमगाटाचं, सौंदर्याचं, लोकप्रिय गाण्यांचं मला काहीच आकर्षण नाही. अशा नगण्य भूमिका मला करायच्या नाहीत. सध्या मी व्यावसायिक चित्रपटांविषयी बराच विचार करतेय. पण स्त्रीला समोर ठेवून आपल्याकडे खूप कमी चित्रपट काढले जातात. पण एखादी भूमिका जर मला आवडली तर तिची लांबी कमी का जास्त याचा विचार न करता मी भूमिका आवडीने करीन. माझ्या भूमिकांच्याबाबत म्हणूनच मी जास्त चोखंदळ आहे. त्यामुळे आपण आपल्या मताशी ठाम राहिल्यावर व्यावसायिक चित्रपटांना का घाबरायचं असं वाटतं. सध्या मी देश दीपक यांच्या 'जहाँ तुम ले चलो' या व्यावसायिक चित्रपटांमध्ये काम करत आहे. बघू या त्याला कसं यश मिळतंय!

चित्रपट व्यवसायाबद्दल अनेक गैरसमज असतात. पण खरं तर तसं नाहीये. तुम्ही चांगले असाल आणि तुमचा सच्चेपणा जर तुम्हाला टिकवायचा असेल तर कुठल्याही व्यवसायात तुम्ही ते टिकवून ठेऊ शकता. तुमच्या मतांशी तुम्ही जर ठाम असाल तर तुम्हाला सगळं जमू शकते. या व्यवसायातही अनेक चांगले लोक आहेत. या व्यवसायात मला तर भेटलेले सर्वच जण दिग्दर्शक, सहकलाकार, तंत्रज्ञ हे आपापल्या क्षेत्रातील कुशल व जाणकार होते. त्यांचा माझा चांगला संवाद जमला. त्यामुळे मला भूमिकाही चांगल्या मिळाल्या व त्या भूमिका प्रेक्षकांनीही उचलून धरल्या. त्यामुळे या व्यवसायाने आत्तापर्यंत तरी चांगलंच मला दिलं आहे, असं मी म्हणीन. सध्या मी 'डॉ. आंबेडकर' या जब्बार पटेल दिग्दर्शित व बहुचर्चित अशा चित्रपटात रमाबाईंचे मी मामुट्टी, मोहन गोखले यांच्यासारख्या श्रेष्ठ कलाकारांबरोबर काम करीत आहे. हा चित्रपट मूळ इंग्रजीत असला तरी इतर सर्व भाषांमध्ये डब केला जाणार आहे.

घरून मला स्टेजवर किंवा चित्रपटात काम करायला कधीही विरोध झालेला नाही. पण शिक्षण पूर्ण करून पदवी घेतलीच पाहिजे असा मात्र घरच्यांचा आग्रह होता व त्याप्रमाणे मी राज्यशास्त्र हा विषय घेऊन बी.ए. झाले आहे. घरच्यांबरोबर चर्चा करून मी भूमिका निवडते. सध्या मी जाहिरातींमध्येही काम करत आहे. नाटकांमध्ये काम करायलाही मला खूप आवडतं. प्रेक्षक समोरच असतात. त्यामुळे तुमच्या अभिनयाचा खरा कस इथेच लागतो आणि प्रेक्षकांचा प्रतिसादही तिथल्या तिथेच मिळतो. त्यामुळे काम करायला उत्साह येतो. माझे 'चाहूल' हे नाटक सध्या गाजते आहे. चित्रपटांप्रमाणे नाटकांमध्येही मी भूमिकांचे वैविध्य टिकवून ठेवले आहे. दूरदर्शनवर प्रसिद्ध कवींच्या कवितांच्या वाचनाचेही मी कार्यक्रम केले आहेत.

एवढ्या लहान वयात इतके अनुभव घेताना, विविध विषयांची, भूमिकांची आव्हाने पेलताना अनेकांचे सहकार्य, सल्ले मला मिळाले. माझे शिक्षक, मित्र-मैत्रिणी नेहमीच माझ्या पाठीशी उभे राहिले. माझं घर आणि घरचे हे तर माझे पहिले मार्गदर्शक. या सगळ्यांच्या भरवशावर, विश्वासावर तर मी सर्व गोष्टी निश्चिंतपणे करू शकते आणि सगळ्यात महत्त्वाचे तुमचे प्रेम. त्या प्रेमाच्या मदतीवरच तर मी इथपर्यंत पोहोचू शकले. हा प्रवास असाच चालत राहो, त्याच उत्साहात त्याच जोशात, त्याच प्रेमाच्या आधारे!

●●

**सोनाली कुलकर्णी**
बी-४०३, वांद्रे अरुणोदय सोसा.,
४ था मजला, वांद्रे (पू.), मुंबई ५१.

**कधी कधी शब्द देखील घन भरले आकाश होतात कधी कधी प्राण देखील नि:शब्दांचे दास होतात.**

कर्तृत्वाशी जडले नाते!

***मागच्याच वर्षी 'यंग सायंटिस्ट ॲवॉर्ड' मिळविलेले डॉ. आशिष लेले आज एन.सी.एल.मध्ये 'पॉलिमर'या विषयात विशेष संशोधन करीत आहेत. बारावीनंतर केमिकल इंजिनिअरिंगकडे प्रवेश घेतला तरी व्यवसायाच्या मागे न लागता संशोधनासारखे आव्हानात्मक क्षेत्र त्यांनी निवडले. आज ते आपल्याला त्यांची शास्त्रज्ञ म्हणून झालेली घडण सांगताहेत...***

# विज्ञानाला व्यवहारात आणायचंय!

**आशिष लेले**

**का**ही महिन्यांपूर्वीचीच गोष्ट! रेल्वेतून मी आणि माझा एक विद्यार्थी कुठल्याशा सेमिनारला चाललो होतो. प्रवासात दोन अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांबरोबर ओळख झाली. आवडी समान असल्याने गप्पा रंगल्या आणि कधी 'अरे-तुरे'वर आलो ते कळलेही नाही. रात्री त्या तिघांच्या गप्पा झाल्या असाव्यात. पण सकाळी त्यांच्या नजरेत एकदम आदर दिसत होता. 'तुम्ही शास्त्रज्ञ असाल असे वाटले नाही'... खूप मजा वाटली. आपण इतक्या शास्त्रज्ञांचे किस्से ऐकतो की शास्त्रज्ञ म्हटलं की दाढी वाढलेला, जाड भिंगाचा चष्मा असलेला, विक्षिप्त, एकलकोंडा अशी व्यक्ती उभी राहते. पण आजच्या शास्त्रज्ञाला असे राहून चालत नाही. अमेरिकेतून संशोधनाची सुरुवात म्हणजे Ph.D. मिळवून आलो आणि NCL मध्ये रूजू झाल्यावर केवळ त्या विषयातील तज्ज्ञता आणि कल्पकता म्हणजे शास्त्रज्ञ नव्हे हे लवकरच कळून चुकले. एखादया प्रश्नाचा सखोल विचार, त्याची चिकित्सा आणि प्रतिभाशक्ती यातून एखादे तंत्रज्ञान जन्म घेऊ शकेल. पण त्याचे उपयोजनही तितक्याच महत्त्वाचे असते, म्हणून 'हे तंत्रज्ञान उद्योगक्षेत्रात असे वापरता येईल' - हे उद्योजकांना पटवणे हेही आपल्याला करायला लागणार आहे याची जाणीव झाली. अमेरिकेत विषयाच्या गाभ्यात कसं शिरायचं, हे शिकलो पण इथे प्रत्यक्ष काम करताना आपल्याला Salesmanship जमली पाहिजे,



Managerial Skills आली पाहिजेत, हे तीव्रतेने जाणवलं आणि तशी स्वत:ची घडण करीत गेलो.

आज शास्त्रज्ञ-संशोधक म्हणून मोठ्या पदावर काम करत असताना थोडं मागं वळून पाहावंसं वाटतं. बारावी पर्यंतचे माझे शिक्षण हे सर्वसामान्य मुलांप्रमाणे झाले आणि सर्वसामान्य मुलांप्रमाणेच बारावी पर्यंत 'पुढे कोण व्हायचे?' हा गोंधळ संपत नव्हता. हा एकंदरच आपल्या शिक्षणपद्धतीतला दोष आहे असं मला वाटतं. पण माझ्या स्वत:साठी तो एकंदर सर्वच काळ नैराश्यपूर्ण होता. माझ्या बुद्धिमत्तेचा मला अंदाज होता, पण तिचा वापर आपण कोणत्या क्षेत्रात पूर्ण क्षमतेने करू शकू हे कळत नव्हतं. बारावीला PCM ग्रुपसाठी ९७% गुण मिळाले आणि अभियांत्रिकीकडे ओढ आहे असं स्वत:ची आवड आणि क्षमतांचा अंदाज घेतल्यावर वाटलं आणि UDCT मध्ये प्रवेश घेतला. इंजिनीयर झालो. पण माझा स्वत:चा कल मला कळला तो अमेरिकेच्या युनिव्हर्सिटी ऑफ डेलावेअरला Ph.D. करताना. आपण एखाद्या गोष्टीचा चिकाटीने पाठपुरावा करू शकतो, एखाद्या गोष्टीसंदर्भात अनेक प्रश्न निर्माण करू शकतो, चिकित्सक विचार करू शकतो - थोडक्यात शास्त्रज्ञ होऊ शकतो हा विश्वास दिला डेलावेअरने. डेलावेअरने मला उत्तुंग स्वप्न पाहायला शिकवलं - स्वप्नांना कसं खरं करून दाखवायचं हे शिकवलं. तिथेच मला माझी

**विज्ञानाच्या नभोप्रांगणी तूचि प्रकाशत शुक्रतारा प्रतिभेप्रज्ञेसह जिंकून घेशी ज्ञानाच्या तू उज्ज्वल शिखरा।**

ओळख पटली. तिकडे शिक्षण घेत असताना कळत नकळत दोन्ही शिक्षणपद्धतींमधला फरक तीव्रतेने जाणवत होता. तिकडे मुलांसाठी मोठ्या प्रमाणावर समुपदेशन (Counselling) कार्यक्रम आयोजले जातात. प्रकल्पांद्वारा मुलांना विषय समजावला जातो. शालेय वयापासूनच मुलांना गटात काम करण्याची सवय लागावी, Team Spirit वाढीला लागावे याचा विचार जाणीवपूर्वक केला जातो आणि मुख्य म्हणजे मुलांना भव्य–अत्युच्च ध्येयाची स्वप्ने पाहायला शिकवलं जातं (अशा गोष्टींचे शिक्षण ज्ञान प्रबोधिनी मध्येही दिलं जातं हे माझ्या पत्नीकडून कळलं कारण ती त्याच शाळेत शिकलीय.) या सगळ्याचा उद्देश आपला कमीपणा दाखवणं तर मुळीच नाही. पण ३ वर्षात माझ्यात जो अंतर्बाह्य बदल घडून आला, त्याची कारणे शोधली तर ती तिथल्या शिक्षणपद्धतीत आढळली. माझ्या एकंदर व्यक्तिमत्त्वात तर फरक पडलाच पण डेलावेअरमध्ये जे सैद्धांतिक (Theoretical) ज्ञान मिळालं, त्याचा आपल्या विषयाच्या संदर्भात कसा उपयोग करता येईल या दिशेने मी विचार करू लागलो.

आज I.I.T. त व UDCT मध्ये हे नवे प्रवाह दिसू लागले आहेत ही खूपच चांगली गोष्ट वाटते.

परदेशात शिक्षण घेत असताना सुरुवातीलाच परत यायचं हे नक्की केलेलं होतं. पण परतणं – न परतणं याबाबत कोणताच दुराग्रह नव्हता. पण छान वाटलं की, डॉ. माशेलकरांना तीन वर्षानंतरही हाच निर्णय ठामपणे ऐकवू शकलो. तिथली पदोपदी भुलवणारी आकर्षणं, ती स्वप्नभूमी... काहीच भुरळ पाडू शकलं नाही आणि ४ वर्षांनंतर नवा आत्मविश्वास आणि भरपूर उत्साहानिशी परतलो आणि NCL मध्ये डॉ. माशेलकरांच्या हाताखाली रूजू झालो.

NCL च्या 'केमिकल इंजिनीअरिंग' विभागात सध्या Polymer Processing Centre मधील प्रकल्पांची जबाबदारी मी सांभाळत आहे. पॉलिमर म्हणजेच प्लॅस्टिक. आपण रोज इतक्या प्रचंड मोठ्या प्रमाणावर प्लॅस्टिकच्या वस्तू वापरत असतो. तर पॉलिमर पासून या वस्तू तयार करण्याची यंत्रे या Centre मध्ये आहेत. याशिवाय आम्ही प्लॅस्टिक उद्योगांना उपयुक्त असे संशोधन करीत आहोत. आम्ही अशी तीन उद्दिष्टे ठरवली आहेत. प्लॅस्टिक पदार्थांमध्ये मुलभूत सुधारणा करणे, ही उत्पादने करण्याच्या प्रक्रियेत सुधारणा करणे आणि भारतात तयार होणारे प्लॅस्टिकचे पदार्थ आंतरराष्ट्रीय किंवा त्यापेक्षाही वरच्या दर्जाचे बनवणे. याशिवाय एक मुख्य स्वप्न आम्ही पाहात आहोत. NCL ला जगातील पहिल्या तीन क्रमांकांमधील एक अत्याधुनिक प्रयोगशाळा आज आम्हाला बनवायचीय.

मी इथे आलो तेव्हा एक नवा पदार्थ प्रचंड प्रसिद्धी मिळवत होता. तो म्हणजे Smart gel - ज्याच्यातीलच मुलभूत संशोधनासाठी मला Young Scinetist award मिळाले. आता हे Smart gel काय प्रकार आहे? तर तो एक पॉलिमरचाच पदार्थ आहे. या gels चं वैशिष्ट्य असं आहे की 1 ग्रॅम Smart gel 100 ते 1000 ग्रॅम पाणी शोषून घेऊ शकतं आणि पुढचं वैशिष्ट्य असं की तापमान कमी केल्यात ते पाणी शोषतात आणि तापमान वाढवलं की ते पाणी सोडतात. त्यांच्या या वैशिष्ट्यपूर्ण स्वभावामुळे शेती तसेच personal hygine products मध्ये हे मोठ्या प्रमाणावर वापरले जातात. ह्या gel ला gel ला smart का म्हणतात? तर आपल्या शरीरातही प्रोटीन, D.N.A. वगैरे biopolymers असतात. आगीला हात लागला असता तो तात्काळ मागे येतो – ही प्रतिक्षिप्त क्रिया तर तुम्ही अनुभवताच. तर ही क्रिया या polymers च्या smart nature मुळे घडते. तर मी संशोधनाला सुरुवात केल्यावर असे अनेक प्रश्न विचारत गेलो की असं smart nature कृत्रिमरित्या तयार करता येईल का? पाणी शोषून घेतल्यावर याचे जे आकारमान असते ते तापमानात बदल केल्यावर का बदलते? तापमानाशिवाय अन्य

**विज्ञानाने पंख दिले, झेपावण्या आकाश दिले अज्ञानाच्या अंधारात प्रकाशाचे किरण दिले।**

कशाने हा बदल घडून येईल का?... डेलावेअरमध्ये जे शिक्षण घेतले त्याचे उपयोजन यशस्वीरित्या करून या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळवली. आमच्या गटाने या संबंधात बरेच मुलभूत संशोधन केले आहे.

आता आम्ही संशोधनाचा प्रवाह थोडा बदलला आहे. ही जी polymers असतात त्यांचे पाण्यात मिश्रण केले असता आणि दाब दिला असता काय निष्कर्ष निघतील? कोळ्याचं जाळं तुम्ही हजारदा पाहिलंय. तो ते कसं तयार करतो? तर आपल्या शरीरातून तो प्रोटीनचं पाण्यातलं मिश्रण सोडतो, आणि त्या मिश्रणाच्या थेंबावरच तो लोंबकळतो. त्यामुळे तो थेंब ताणला जातो. त्याची एक साखळी तयार होते. त्यातील पाण्याचे रेणू उडून जातात आणि जाळे तयार होते. हे जाळे नंतर पुन्हा पाण्याशी एकरूप होत नाही. अर्थात हे निसर्गत: घडून येतं. पण ह्या polymers च्या बाबतीतही असेच रंजक निष्कर्ष आढळत आहेत.

हे सगळं संशोधन 'मुलभूत' प्रकारचं म्हणता येईल. पण उद्योग आणि संशोधन यांची सांगड घालणे ही आजच्या काळाची गरज आहे. हे जाणवल्यावर मी आणखी एक जबाबदारीचे काम आनंदाने स्वीकारले. त्यासंदर्भात उद्योजकांना जाऊन भेटणे, ह्या संशोधनाचं उपयोजन समजावणे, त्याचे उत्पादन फायदेशीर ठरेल हे पटवणे असं कसोटीचं काम सध्या करत आहे. खूपच मजा येते ही दुसरी आघाडी सांभाळताना. परदेशात अशा मुलभूत



संशोधनासाठी विद्यापीठला तिथले उद्योगधंदे निधी देत असतात. पण अशी कुठलीही व्यवस्था आपल्याकडे अजून नसल्याने पैसा मिळवणे आणि तो संशोधनात गुंतवणे, अशी दुहेरी कसरत चालू आहे.

नव्या जबाबदाऱ्या, आव्हाने घेणे – यशस्वी करणे – या सगळ्यात खूप समाधान – आनंद मिळतो. हा आनंद young scientist award च्या आनंदापेक्षाही खूप जास्त आहे. त्याला मर्यादा आहेत. पण या संशोधनातून मिळणारं समाधान अनंत आहे.

माझं क्षेत्र हे असं पडतं की प्रत्यक्ष टेबलावरचं काम किती असतं, प्रश्नच आहे. कारण दिवस–रात्र–झोपेत–जेवताना–आंघोळ करताना डोक्यात विचारचक्र सतत फिरत असतं. घरी मग बऱ्याच गमती होतात. एखादी दहादा सांगितलेली गोष्ट विसरली जाते – कुणी बोलत असताना डोक्यात तिसरीच गोष्ट असल्याने – ही गोष्ट डोक्यात शिरतच नाही – पण घरच्यांनी हे सगळं इतकं गृहीत धरलंय – अर्थात असं असलं तरी सुरुवातीला जेव्हा आमचा चांगला गट तयार झाला नव्हता तेव्हा रात्र–रात्र ऑफिसमध्ये प्रयोगशाळेत काम करावंच लागायचं.

हा जो न थकता काम करण्याचा गुण माझ्यात आलाय तो माझ्या वडिलांचा वारसा. ते 'सिडको'त चीफ इंजिनीयर आहेत आणि अखंड तासन्‌तास ते आजही काम करतात. त्यामुळे त्यांच्याकडे पाहिलं की थकवा कुठल्याकडे पळून जातो.

अजूनही खूप अनुभव सांगावेसे वाटतायंत. पण उरलेल्या गप्पा आता अप्रत्यक्ष नाहीत, तर प्रत्यक्ष भेटीत. मग कधी येताच NCL मध्ये माझ्या बरोबर इतरही शास्त्रज्ञांना भेटायला?

●●

**डॉ. आशिष लेले**
Scientist, Chemical Engg. Division polymer processing center.
एन.सी.एल. पुणे ८.

**भेदण्यास आकाशाला, मग नित्य कल्पना नव्या देहाला अन् पंखांना नित नव्या भराऱ्या हव्या ॥**

# मनोली – एक पाडस

मारुती चितमपल्ली




*'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' असं जरी तुकाराममहाराजांनी म्हटलं असलं तरी निसर्गाशी असं मैत्र असणाऱ्या व्यक्ती थोड्याच! त्यांपैकीच एक म्हणजे श्री. मारुती चितमपल्ली. रानवाटांवरून विहार करताना रानातील झाडे, पाने, पशु, पक्षी यांचे विश्व त्यांनी खूप जवळून पाहिले. त्यातील जिवंत काव्य शब्दांत पकडले आणि मराठी वाङ्‌मयात वनजीवनाचे चित्रण करणाऱ्या अनेक सुंदर शब्दचित्रांची भर घातली. छोटे पाडस म्हणून लेखकाच्या घरी वाढलेल्या मनोलीचा मातृत्वापर्यंतचा प्रवास त्यांच्या या कथेत वाचायला मिळेल.*

**मृग** नक्षत्राला सुरुवात झाली. उन्हाचा ताप कमी झाला. आकाश ढगांनी भरलेले. सूर्याची किरणे दिसू लागली की ढगांच्या सावल्या जंगलाच्या छतावरून सरसर जाताना दिसत. झाडांची कोवळी पालवी आता हिरवीगार दिसू लागली. हिरव्या रंगाच्या अनेक छटांचे जणू संमेलनच भरले होते. यंदा झाडे किती वाढली हे त्या नवीन पालवीमुळे सहज लक्षात येई.

वनविश्रामगृहासमोरील नदी आटलेली. पात्रातील कातळ उघडे पडलेले. कुठे कुठे डोहात पाणी होते. सकाळची वेळ. मी एका नदीकाठी असलेल्या रोपवाटिकेचे निरीक्षण करीत होतो. बरोबर वनकर्मचारी होते. नदीकाठावरील झाडाझाडांतून – पक्ष्यांचा सतत चढत्या स्वरात आवाज येत होता.

इतक्यात जंगलातल्या वाटेने धावत आलेली सांबरी (सांबराची मादी) आम्हाला न भिता समोर येऊन उभी राहिली. इतक्या जवळ मी जंगलातल्या सांबरीला कधी पाहिले नव्हते. फिकट तांबड्या पिवळट रंगाची सांबरी आमच्या पुढे थरथर कापत उभी होती. तेव्हा माझ्या लक्षात आले की हिच्यामागे रान-कुत्र्यांचा कळप लागला असावा. एरवी माणसाच्या सावलीलादेखील उभी न राहणारी हरिणे आपला जीव वाचविण्याकरिता शेवटी माणसाच्या आश्रयाला येतात. तिची नजर चंचल होती. ती पुन्हा पुन्हा मागे वळून पाही. बहुतेक ती आपल्या नवजात पाडसाला सोडू आली असावी.

आम्ही सारेजण तिच्याकडे आश्चर्याने पाहात होतो. पुढे काय करावयाचे या विचारात असताना, जंगलातील पाचोळ्याचा आवाज आला. धापा टाकीत रानकुत्र्यांचा कळप रोपवाटिकेच्या कुंपणापर्यंत येऊन पोहोचला. उघड्या जबड्यातून जिभा बाहेर आलेल्या. मोजली तर ती रानकुत्री चौदा भरली. सारी एकजात तांबड्या रंगाची. तोंडे काळी. उत्तेजित झाल्यामुळे झुपकेदार शेपट्या गोंड्याप्रमाणे वर आलेल्या, कान टवकारून आमच्याकडे पाहत होती. एका वनरक्षकाने जवळचा बांबू उचलून जमिनीवर आपटून आवाज करताच नाईलाजाने ती जंगलात परतली. परंतु दूर गेल्यावर त्या सांबरीकडे पाहू लागली. नंतर ती जंगलात दिसेनाशी झाली.

सांबरीवरील प्राणसंकट टळले होते. ती जशी भानावर आली, तशी आल्या वाटेने धावत सुटली. मी लगेच जीप काढली अन् वनमार्गाने तिचा मागोवा घेत जात होतो. रानकुत्री जंगलातल्या एका ओढ्याकाठी विसावा घेत बसली होती. जंगलातून धावणाऱ्या सांबरीची त्यांना चाहूल लागली. कळपातील म्होरक्याने तिचा पाठलाग सुरू केला. इतर रानकुत्र्यांनी मोर्चा बांधला. तशी सांबरी डोंगरावर चढत धावत होती. शेवटी पळता पळता थकली. तसे म्होरक्याने तिच्या मानेवर उडी घेऊन रानकुत्र्याने तिचे मुस्कट जबड्यात धरले. इतरांनी तिच्या पायाच्या

कोंब कोंब चैतन्याचा उजळतो मातीचे आकाश ! हिरव्या हिरव्या रानाच्या दर्शनाने पाजळते मनाचे आकाश

टोंगड्यांना धरले. तशी ती हतबल होऊन धाडकन् जमिनीवर कोसळली. ही सारी घटना घडत असताना मी उंचावर जाऊन दुर्बिणीने पाहात होतो.

त्या बुभुक्षित रानकुत्र्यांनी तिचे लचके काढायला सुरुवात केली. काही तासांत तिथे फक्त तिच्या पायाचे खूर आणि रक्ताचा चिखल दिसत होता. जी काही मोठी हाडे ती ती तरसाच्या जोडीने तोंडात धरून नेली. इथे काही तासांपूर्वी जीवन-मरणाचे नाट्य घडले याचा मागमूस देखील तेथे दिसत नव्हता.

सायंकाळी आम्ही त्याच मार्गाने परत जात असताना रस्त्याकडेला उंच गवताची पाती हलताना दिसली. इथे नक्की एखादे जनावर असणार म्हणून मी दबल्या पावलांनी सावधगिरीने तिथे डोकावलो. तो तिथे सांबरीचे पाडस दिसले. एखाद्या रानकेळीच्या मोठ्या पानाप्रमाणे ते जमिनीवर मान ताणून सपाट पडले होते. कान खाली पडलेले. मी इतक्या नजीक जाऊनही त्या पाडसाने अजिबात हालचाल केली नाही. आईने दिलेल्या सूचनांचे पाडसाने तंतोतंत पालन केले होते. धोका दिसला की जमिनीवर पडून राहायचे आणि अजिबात आवाज करायचा नाही. रानकुत्र्यांचे भक्ष्य झालेल्या सांबरीचे ते पाडस होते. त्याच्या संरक्षणासाठी तिने स्वत:चा प्राण दिला होता.

आता या पाडसाला इथे सोडून देणे म्हणजे एखाद्या जनावराच्या तोंडी देण्यासारखे होते. बहुतेक आज सकाळीच ह्या पाडसाला सांबरीने जन्म दिला असणार. मी त्याला अलगद उचलून कॅन्व्हासच्या पिशवीत घातले. जंगली जनावराचे मरण कधीकधी अवचितपणे पाहायला मिळते. त्यांचा जन्म क्वचितच पाहायला मिळतो.

आमचे घर ह्यावेळी जंगलातच होते. मी ह्या पाडसाला घरी नेले आणि आमची मुलगी छाया हिच्या ताब्यात दिले. त्या वेळी ती नुकतीच प्राथमिक शाळेत जाऊ लागली होती. तोल सांभाळत, अडखळत पाडस स्वत:च्या पायावर उभे राहू लागले. त्याचा रंग फिक्कट तांबूस-पिवळा होता. पाठीवर मधोमध गडद रंगाची लेखा होती. लंब गोलाकार मोठे कान. कोमल लुसलुशीत शरीर. चिमुकले मुख. डोळे मात्र मोठे आणि पाणीदार होते. तांबड्या मनोली पाखराप्रमाणे ती नाजूक आणि सुंदर दिसे. म्हणून आम्ही तिला मनोली म्हणून हाक मारीत असू. त्याला ती प्रतिसाद देई. छायाने लगेच तिला दूध पाजण्यासाठी ग्लुकोज आणि शेळीचे दूध एकत्रित केले. बाटलीच्या बोंडाला जीभ लावून पाहिली. मग मात्र ते तोंडात घट्ट धरले. हे दूध पिण्याचे कौशल्य तिने काही तासांत मिळवले. मग एकदा का बोंड तोंडात धरले की सारी बाटली रिकामी करून सोडी.

ती अंगणात बागडत असता छाया बाटली धुऊ लागली की तिच्याकडे धाव घेई आणि आपल्या टपोऱ्या नेत्रांनी छायाकडे पाहात राही. रात्री ती छायाच्या कॉटखाली यथेच्छ पडून राही, परंतु तिथे लेंड्या न टाकण्याची आणि न मुतण्याची सवय तिला प्रयत्नाने शिकवावी लागली. सकाळ होताच घराबाहेर पडून समोरच्या बागेत हिंडू-फिरू-चरू लागे. कुंपणाच्या कडेला एका झुडुपाखाली ती रोज लेंड्या टाकी. मूत्रविसर्जन करी. या सवयीत कधी बदल झाला नाही.

आम्ही तिच्या गळ्यात घुंगरू बांधला. ह्या घुंगराच्या आवाजावरून आम्हाला तिचे आजूबाजूचे अस्तित्व कळे. छाया आणि तिची आई - आजी पाडसाला रोज खाऊ-पिऊ घालीत असल्याने त्यांना मनोली अधिक ओळखी. शाळेची वेळ होईपर्यंत ती छायाबाहेर बागेत फिरायची. छाया जिकडे जाई तिकडे मनोली तिच्या मागोमाग जाई. शाळेत जाण्यासाठी रस्त्यावरची बस पकडण्याकरिता छायाला घरापासून अर्धा किलोमीटर जंगलातल्या पायवाटेने बसथांब्यापर्यंत जावे लागे. तेथपर्यंत मनोली तिला सोबत करी. बसमध्ये छाया चढली की बस पुन्हा सुरू होईपर्यंत दारात उभ्या असलेल्या छायाकडे पाहात मनोली उभी राही. एकदा का घर्रर करीत बस चालू झाली की मनोली दुडक्या चालीने परत घराकडे येई. घरी परत आल्यावर मनोली आजीच्या मागेमागे सावलीसारखी फिरे. तेव्हा मनोलीची भोजनाची वेळ झालेली असे. पाण्यात भिजवलेले कोदो, कुटकी, सावा आणि राजगिरा या धान्याचे मिश्रण दुधात घालून आजी दुपारच्या वेळी मनोलीला देई. कधी परसातील पालेभाजीची लहान जुडी

**झाडंचीही उमगे भाषा सुमनांचे बोलणे, अनायास मी टिपीत जातो उन्हातले चांदणे.**

तिच्यापुढे ठेवताच ती आवडीने खाई. नंतर दिवसभर ती घरातून बागेत व व बागेतून घरात अशा चकरा मारीत आजीच्या भोवती घोटाळत असे. मी फिरतीवर गेलो की मनोलीसाठी, रानकामुन्ना, रायमुनियाची बारीक फळे आणि येरुण्या घेऊन यायचो. टेबलावर ठेवलेल्या बशीतील ही फळे ती पुढले दोन पाय टेबलावर ठेवून आवडीने खाई. मी घरी असलो की आरामखुर्चीवर बसून वाचत असायचो, तेव्हा मांडीवरून एका बाजूने दुसरीकडे उडी मारत, पुन्हा पुन्हा तेच करण्याचा चाळा चालू असे. नंतर माझ्या पायांना आपले शरीर घाशी. मी तिच्याकडे लक्ष देत नाही हे ध्यानी आले की थोड्या अंतरावर समोर उभी राही. पुढचा आपला डावा किंवा उजवा पाय जमिनीवर आपटून खुराचा आवाज करी व माझे लक्ष वेधी. मी तिला जवळ बोलावून पाठीवर हात फिरवताच निघून जाई.

आजी बसली असता तिच्या वेणीचे टोक कुरतडण्याचा चाळा करी. आजी तेव्हा तिला धमकावे. तेव्हा मनोली आश्चर्यचकित होऊन मोठ्या नेत्राने तिच्या चेहऱ्याकडे पाहत राही. त्यावेळी आम्हा सर्वांनाच मनोलीचे हसू येई.

सायंकाळी छाया बसने परत येण्याची वेळ झाली किंवा बस थांबल्याचा आवाज आला की मनोली बसथांब्याकडे सुसाट धावत सुटे. आणि छायाचे स्वागत करी. तिच्या अंगाला ढुसण्या देई. तिच्या पाठीवरून हात फिरवले की ती शांत होई. हे आमचे स्नेहाचे संबंध आम्ही तिला खाऊ-पिऊ घालतो म्हणून नव्हते. त्या सर्वापलीकडचे न उमजणारे होते.



मी जंगलातल्या दौऱ्यावरून घरी परतताना दुरून एक दृश्य दिसे. आंबा, जांभूळ आणि फणसाच्या राईतून आमचे दगडी घर दुरून दिसू लागे आणि त्या राईत हरिण-पाडसाबरोबर खेळत असलेल्या छायाला पाहताच, आपण एखाद्या परिकथेतील दृश्य तर पाहत नाही ना असे वाटे. मनोली आम्हा परिवारातील एक झाली. तिने आम्हाला स्नेह दिला. तिच्या नेत्रपल्लवीची भाषा आम्हाला कळे. तिच्या सहवासामुळे जंगलातील शांततेत आम्हाला सहजपणे एकरूप होता आले.

आजूबाजूच्या खेड्यांत राहणाऱ्या छायाच्या वर्गमैत्रिणी एखाद्या सुट्टीच्या दिवशी आमच्या घरी जमायच्या, दिवसभर नाचायच्या, हुंदडायच्या, लपंडाव खेळायच्या, लपलेल्या छायाला मनोली बरोबर शोधून काढायची. आंधळी कोशिंबीर खेळताना देखील मनोलीमुळे छाया अडचणीत यायची. ह्या हुंदडणाऱ्या मैत्रिणी मनोलीला आवडत नसत. मैत्रिणींच्या घोळक्यात असताना छायाला मनोलीकडे लक्ष द्यायला फुरसत मिळत नसे, म्हणून की काय ती तिच्या मैत्रिणींना अंगाला स्पर्श करू देत नसे.

म्हणून छाया मध्येच मनोली बरोबर जंगलाकडे धावत सुटायची ते डोंगराच्या शिखरावरील महादेवाच्या देवळापर्यंत जायची. ती जागा शांत होती. इथे देवळाजवळ उभे राहून चोहोकडे पाहिले की डोंगराच्या सात रांगा निळ्यानिळ्या होत

**उन्ह भरते चराचराचा सोन्याचा कलश, उन्ह सकाळ-संध्याकाळ फुललेला पळस.**

क्षितिजापर्यंत गेलेल्या दिसायच्या. निमुळत्या खोऱ्यांतून हिरवीगार शेते दिसायची. त्यातून वाहणाऱ्या ओढ्यातील पाणी चांदीच्या घाटासारखे दिसे. चोहोकडे जंगलातून विखुरलेली छोटी छोटी गावे दिसायची. खोऱ्यातून पार डोंगराच्या माथ्यापर्यंत गेलेले नागमोडी रस्ते दिसायचे. साऱ्या डोंगरावर सागवान आणि इतर झाडे उभी दिसायची. पन्नास–साठ फुटांपर्यंत एकही फांदी नसलेली हळदूची महाकाय झाडे नजरेत भरायची. फांद्या आणि पाने असलेल्या शेंड्यामुळे त्या झाडांची उंची दुप्पट वाटायची. जमिनीलगत वारा नसला तरी ह्या झाडांचे शेंडे हवेत दिमाखाने डोलताना दिसायचे. त्यातून वाहणाऱ्या वाऱ्याचा आवाज येई. देवळाजवळ उभ्या राहून त्या दोघी कितीतरी वेळ या दृश्याकडे पाहत असायच्या. तिन्हीसांजा झालेल्या असत. इतक्यात कानावर कोल्हेकुई पडताच ह्या दोघी भानावर यायच्या. मनोली पार भीतीने छायाच्या अंगाला भिडे. मग त्या दोघी धावत पळत घराकडे परतायच्या. नंतर मैत्रिणी आपापल्या घरी निघून जायच्या. उन्हाळ्याच्या सुट्टीत छायाच्या कोणी ना कोणी मैत्रिणी तिला भेटायला यायच्या. आल्या की त्या समोरच्या तळ्यात पोहायला जायच्या. मनोलीही त्यांच्या सोबतीला असायची. छाया आपल्या मैत्रिणींबरोबर पोहू लागली की मनोली पोहत पोहत दूर निघून जायची. त्या साऱ्याजणी पोहून बाहेर यायच्या. कपडे अंगावर चढवू लागल्या की, मनोली पाण्यातच मोठी गंमत करायची. तिच्याकडे पाहून त्या हसायच्या. ती उथळ पाण्यातील खडकावर धाव घेई आणि तेथून कधीकधी छाया पोहून पोहून थकली की मनोलीच्या आधाराने किनाऱ्यावर यायची.

मनोलीला हे तळे, तळ्याकाठची वाळू, झुडपाच्या शेंगांचा खुळखुळणारा आवाज आवडे. लवलवणारे हिरवेगार, मोरपिसी नेचे पाण्याला स्पर्श करीत. हे पाणी ती ज्या पहाडातून आली तिथल्या झऱ्याचे होते.

मनोली आता वयात येऊ लागली. कधीकधी आम्हा साऱ्यांचा डोळा चुकवून चरत चरत जंगलात गेलेली मनोली सायंकाळी अंधार पडल्यावर घरी येऊ लागली. ती एखाद्या वाघ–बिबट्याचे भक्ष्य बनेल म्हणून आम्ही तिच्या गळ्यातील घुंगरू काढून घेतले व गळ्याभोवती पिवळ्या रेशमाचा पट्टा बांधला. उत्तरोत्तर तिचे घराकडे परतणे अनियमित झाले. पूर्वी घराकडे येताना घुंगरूच्या आवाजाने तिची चाहूल लागे. घुंगरू काढल्यामुळे तिची चाहूल लागेनाशी झाली. छाया तिची वाट पाहत पाहत झोपी जाई. छायाची अस्वस्थता पाहून मी तिला एकदा म्हणालो, ''बेटा, मनोली म्हणजे एखाद्या रानपाखराप्रमाणे आहे. तिला पंख फुटले आहेत. आता एक दिवस ती उडून जाईल.''

तिचे घर असलेल्या जंगलाबद्दल मनोलीला इतके प्रेम होते की क्वचित तसे प्रेम एखाद्या वन्यप्राण्यात असेल. एके दिवशी जंगलात चरायला गेलेली मनोली पुन्हा परत आलीच नाही. त्यानंतर अनेक महिने लोटले. आम्हाला तिचा विसर पडला. परंतु छाया तिला विसरू शकली नाही.

त्या रात्री एक–दोनदा सांबराचा पोंकऽ पोंकऽऽ असा आवाज तिच्या खिडकीजवळ ऐकू आल्यासारखा वाटला. मध्यरात्र झाल्यामुळे आम्हीही त्याकडे दुर्लक्ष केले. पहाटेच्या वेळी बागेतील आंब्याखालून सांबराचा पुढच्या पायाच्या खुरांचा टप् टप् आवाज येत होता. छायाने लगेच दार उघडले. पहाटेच्या अंधुक प्रकाशात तिला एक मोठी सांबरी समोर उभी असलेली दिसली. तिच्या गळ्यात रेशमी पट्टा होता. डोंगरातले वारे प्यालेल्या मनोलीचे रंगरूप पार पालटून गेले होते. ती हरिणशावक राहिली नव्हती. तिच्या तांबड्या वर्णावर पिवळी झाक दिसत होती. सुडौल पायांचे काळे खूर चमकत होते. मानेत मनोहर बाक येऊन ती लवचिक बनली होती. अंगाने सुदृढ दिसत होती. तिचे टपोरे डोळे एखाद्या नीलमणिप्रमाणे चमकत होते.

आता उजाडू लागले होते. ती एकटी आली नव्हती. कुंपणाबाहेर सुंदर शिंगांचा एक उमदा सांबर दिसत होता. मनोलीने आपले कान उंच करून एकदा वळून त्याच्याकडे पाहिले आणि दुसऱ्या क्षणी एकदा छायाकडे पाहत दुडक्या चालीत त्या सांबराजवळ उभी राहिली.

मनोलीला आमचा विसर पडला

**शुभ्र दवाच्या श्वासात एक उमलेल फूल, एका चांदण पाऊली उभे आकाश झुलेल !**



नव्हता तर! तिचे आवडते निवासस्थान असलेल्या दूरच्या पहाडी जंगलातून ती छायाला भेटायला आली होती. ती एकटी आली नव्हती. तर बरोबर प्रियकरालाही आणले होते.

छाया तिच्याजवळ जाईपर्यंत एकदा आवाज देऊन निघूनही गेली. मला वाटले, आता मनोली परत कधी यायची नाही.

रोजच्या कामात मी मनोलीला पार विसरून गेलो. त्या मायलेकी मात्र कधीकधी तिन्हीसांजा मनोलीची आठवण करीत. काही दिवसांनी बागेत सांबरीच्या टापांचा आवाज ऐकू येऊ लागला. नुकतेच उजाडले होते. मी ओळखले की मनोली पुन्हा आली आहे. छाया लगेच बागेत गेली. मी खिडकीतून पाहात होतो. तिच्या गळ्यातला पट्टा आता जुना झाला होता. ती एकटी आली नव्हती. बरोबर गोजिरवाणे पाडस होते. छाया तिच्याकडे जात होती. मोठ्या डोळ्यांनी ती छायाकडे पाहत होती. जवळ जाताच पाडस आईला बिलगले. मनोलीने त्याला हळुवार ढुसण्या देऊन छायाच्या पुढे केले. छायाने त्या पाडसाला उचलून घेतले आणि लगेच जमिनीवर सोडून दिले. काही मिनिटांतच आपल्या पाडसाबरोबर मनोली जंगलात निघून गेली. खिडकीतून आम्ही छायाकडे आणि त्या पाडसाबरोबर जाणाऱ्या मनोलीकडे कितीतरी वेळ पाहत होतो. नंतर ती जंगलात दिसेनाशी झाली.

●●


**मारुती चितमपल्ली**

आर १, अभिरिका अपार्टमेंट्स,
आठ रस्ता चौक, लक्ष्मीनगर,
नागपूर २२


## सत्याची कसोटी

एका बेटावर दोन भिन्न जमातीचे लोक राहतात. एका जमातीचे लोक गुहेत राहतात व सत्य बोलतात. दुसऱ्या जमातीचे लोक झोपड्यांमध्ये राहतात व नेहमीच असत्य बोलतात. एकदा एक अनोळखी माणूस त्या बेटावर आला. त्याला बेटावरील अ, ब, क या तीन व्यक्ती भेटल्या. त्याने 'अ'ला विचारले, 'तुझी जमात कोणती?' 'अ'ने दिलेल्या उत्तराचा अर्थ न कळल्यामुळे त्याने 'ब' आणि 'क'ला 'अ'च्या बोलण्याचा अर्थ विचारला. त्यावेळी 'ब' म्हणाला. ''अच्या म्हणण्यानुसार तो झोपडीत राहणारा आहे.'' 'क' म्हणाला ''अ च्या म्हणण्यानुसार तो गुहेत राहणारा आहे.'' या उत्तरांवरून असे शोधून काढा की, 'ब' आणि 'क' यांची अनुक्रमे कोणती जमात होती?

**स्वर हिरव्या बोलीचे माझ्या अंगणात गातात, रूप-रस-गंध - स्पर्श, लाखमोलाचे देतात.**


# काबुलीवाला

अनु. मृणालिनी गडकरी

*'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' असं जरी तुकाराममहाराजांनी म्हटलं असलं तरी निसर्गाशी असं मैत्र असणाऱ्या व्यक्ती थोड्याच! त्यांपैकीच एक म्हणजे श्री. मारुती चितमपल्ली. रानवाटांवरून विहार करताना रानातील झाडे, पाने, पशु, पक्षी यांचे विश्व त्यांनी खूप जवळून पाहिले. त्यातील जिवंत काव्य शब्दांत पकडले आणि मराठी वाङ्मयात वनजीवनाचे चित्रण करणाऱ्या अनेक सुंदर शब्दचित्रांची भर घातली. छोटे पाडस म्हणून लेखकाच्या घरी वाढलेल्या मनोलीचा मातृत्वापर्यंतचा प्रवास त्यांच्या या कथेत वाचायला मिळेल.*

**आ**मची पाच वर्षांची मिनी फार बडबडी आहे. तिला बोलता यायला लागल्यापासून तिची अखंड बडबड चालू असते, असं म्हणणं फारसं अतिशयोक्ती होणार नाही. तिची ही बडबड तिच्या आईला कधीकधी अगदी सहन होत नाही. मग ती तिला रागावून गप्प बसायला भाग पाडते. पण मिनीचं गप्प राहणं मला मात्र अजिबात सहन होत नाही. ती माझ्या लिहिण्याच्या खोलीत येऊन बडबडत असते. मी तिला कधीच गप्प बसायला सांगत नाही, म्हणून मिनी माझ्यावर एकदम खूष असते. तिची बडबड न कुरकुरता ऐकणारा एकमेव श्रोता म्हणजे मी.

माझ्या टेबलाच्या मागची खिडकी ही मिनीची आवडती जागा. मी लिहायला बसलो की, मिनी तिथं बसते आणि नाना प्रश्न विचारून मला बेजार करते. माझ्या कादंबरीतील नायक-नायिकांवर भले कितीही मोठी संकटे येवोत, मी मोठ्या धैर्यानं त्यातून त्यांची सुटका करतो, पण मिनीच्या प्रश्नांना उत्तर देताना माझी अगदी त्रेधा-तिरपीट उडते. अर्थात, मिनी माझ्या उत्तराची



काहीच बनता आलं नाही तर राहीन साधा माणूस, प्रेम, दया, सौजन्याचा जाईन तेथे होईन पाऊस.

फारशी पर्वा करत नाही, हे माझ्या दृष्टीनं बरंच म्हणायचं!

त्या दिवशी नेहमीसारखाच मी सकाळी लिहायला बसलो होतो. माझ्या नव्या कादंबरीच्या सातव्या प्रकरणाला उत्साहानं सुरुवात केली नाही तोच मिनी तिथं आली. 'बाबा, काय लिहिताय आज?' मिनीच्या प्रश्नांना सुरुवात झाली. आता तिला काय सांगावं असा विचार करत होतो तेवढ्यात मिनी म्हणाली; 'बाबा, आपला रामदयाळ दरवान आहे ना, तो कावळ्याला कौवा म्हणतो. त्याला नीट काही येत नाही. हो ना?' तिला भाषेविषयी काही सांगावं असा विचार करत होतो तेवढ्यात तिची बडबड पुन्हा सुरू झाली, 'बाबा, आपला भोला म्हणतो की, आकाशात एक मोठ्ठा हत्ती असतो. तो त्याच्या सोंडेतून पाणी उडवतो ना ते पाणी म्हणजेच पाऊस. हॅं! भोला काहीतरीच सांगतो. हो ना बाबा?' माझ्या उत्तराची अपेक्षा न करताच मिनीनं पुढचा प्रश्न विचारला, 'बाबा, आई तुमची कोण हो?' आता आली का पंचाईत! मी तिला म्हणालो, 'जा, भोला तुला खेळायला बोलावतोय वाटतं.' पण मिनी काही तिथून उठली नाही. तिनं बसल्या जागीच एकटीनं आपडी थापडी खेळायला सुरुवात केली. मी सुटकेचा श्वास सोडला.

इतक्यात मिनीचं लक्ष बाहेर रस्त्याकडं गेलं. 'काबुलीवाला! ओ काबुलीवाला! अशा हाका मारून मिनी खिडकीतून उतरून घरात पळून गेली. मिनीच्या वागण्याचं मला नवलच वाटलं. कारण तिला काबुलीवाल्याची फार भीती वाटायची. त्याच्या मोठ्या झोळीत तिच्यासारखी दोन-तीन तरी लहान मुलं कोंबलेली असतात, अशी तिची समजूत होती.

मिनीनं हाक मारल्यामुळं काबुलीवाला आमच्या घराकडं वळला. ढिला-ढगळ मळका पोशाख, डोक्याला पागोटं, खांद्याला एक मोठी झोळी अडकवलेली आणि हातात द्राक्षांच्या पेट्या असा दाढीवाला, उंचापुरा अफगाण पठाण हसत हसत सलाम करून दाराशी येऊन उभा राहिला. मिनीनं त्याला बोलावलं होतं. तेव्हा त्याच्याकडून काहीतरी विकत घेणं भागच होतं. मी थोडा सुकामेवा घेतला. मग काबुलीवाल्यानं इकडच्या-तिकडच्या गप्पा मारायला सुरुवात केली. रहेमत हे त्याचं नाव. सुकामेवा, द्राक्षं ह्यांचा व्यापार आणि थोडीफार सावकारी हा त्याचा व्यवसाय. अफगाणिस्तानसारख्या दूरच्या देशातून इथं आला होता तो पोटापाण्यासाठी. शेवटी जाताना त्यानं विचारलं, 'बाबू, तुमची लडकी कुठं गेली?'

मिनीच्या मनातली भीती काढून टाकावी म्हणून मी मिनीला हाक मारली. पण ती आली नाही. मग मीच आत जाऊन तिला शोधलं. ती कपाटामागं लपून बसली होती. तिला मी उचलूनच बाहेर आणलं. माझ्या कमरेला मिठी मारून माझ्या मागे ती लपली. काबुलीवाला तिच्याकडे पाहून हसला. त्यानं मिनीला देण्यासाठी आपल्या झोळीतून मूठभर बदाम, बेदाणे काढले, पण मिनी हा खाऊ न घेताच घरात पळाली. हीच मिनीची आणि काबुलीवाल्याची पहिली भेट.

ह्यानंतर काही दिवस कामात कसे गेले कळलेच नाही. एक दिवस सकाळी मी काही कामासाठी घराबाहेर पडत होतो. आमच्या फाटकाजवळच्या बाकावर मिनी बसली होती. आपले चिमुकले हात हलवून ती काहीतरी सांगत होती आणि तिच्या पायाशी बसून काबुलीवाला तिचं बोलणं मन लावून मोठ्या कौतुकानं ऐकत होता. म्हणजे मिनीला माझ्याशिवाय आणखी एक श्रोता मिळाला तर! मी जवळ जाताच त्या दोघांचं माझ्याकडं लक्ष गेलं. मिनी माझ्याजवळ येऊन काहीतरी सांगू लागली, तेव्हा तिच्या फ्रॉकचे खिसे बदाम-बेदाण्यांनी टम्म फुगल्याचं माझ्या लक्षात आलं. 'अरे रहेमत, हे एवढं कशाला दिलंस तिला? पुन्हा असं देऊ नकोस' असं म्हणून मी काबुलीवाल्याला अधेली दिली. त्यानं ती न बोलता घेतली. ती घेताना त्याला जड वाटतंय असं जाणवत होतं.

मी बाहेरून परत येऊन पाहातो तर त्या अधेलीवरून घरात रामायण घडलं होतं. भोलाला कपडे धुताना मिनीच्या खिशात अधेली सापडली होती. त्यानं ती मिनीच्या आईला दिली आणि मिनीची आई हातात छडी घेऊन मिनीची उलट तपासणी घेत होती. मिनी अगदी रडकुंडीला

**कुठले कुठले गतजन्मांचे लख्ख कवडसे हृदयात, नकळे कुठल्या सुख दुःखानी तुडुंब डोळे भरतात.**

आली होती. ती आईला पुन्हा पुन्हा सांगत होती, ''अगं, मी नको म्हणत होते तरी काबुलीवाल्यानं तो पैसा माझ्या खिशात टाकला. मी खरंच नाही त्याच्याकडे मागितला. अगदी खर्‌ऽऽगं!''

अधेलीची खरी हकीगत आता माझ्या लक्षात आली. मी मिनीला तिच्या आईच्या तावडीतून सोडवलं. आता मला कळून चुकलं होतं की, मिनी आणि काबुलीवाला ह्यांची चांगलीच गट्टी जमली होती. बदाम-बेदाण्याची लालूच दाखवून त्यानं मिनीशी मैत्री केली होती. त्या दोघांत वयाचं अंतर खूप होतं, पण दोस्तीला वयाची काय पर्वा! त्या दोघांत ठराविक हास्य-विनोदही चाले. काबुलीवाल्याला पाहाताच मिनी विचारी, ''काबुलीवाला, तुझ्या झोळीत काय आहे?''

''हात्ती.'' काबुलीवाला उत्तर देई. तो 'हत्ती'तल्या 'ह'चा उच्चार आकारान्त का करी ठाऊक नाही. पण त्याच्या ह्या उत्तराची मिनीला खूपच गंमत वाटे. ती खदखदून हसे. तिला हसताना पाहून रहेमतही खूष होऊन हसू लागे. मग काबुलीवाला मिनीला म्हणे, ''खोकी, (बंगाली शब्द, अर्थ पोरी) आम्हाला सोडून तू सासरी जायचं नाही हं!'' बंगाल्यात आमच्या वेळी मुलींची लग्नं लहानपणीच होत. त्यामुळं मुलींची 'सासर' या शब्दाशी फार लहान वयातच ओळखी व्हायची. पण आमच्या घरचे संस्कार वेगळे होते. 'सासर'ची भीती दाखवून मी मिनीच्या बालपणीच्या आनंदात बिब्बा घातला नव्हता. मिनीला 'सासर' ह्या शब्दाचा अर्थ कळत नसे. पण निरुत्तर होऊन गप्प बसणं तिच्या स्वभावात नव्हतं. ती उलट प्रश्न विचारी, ''काबुलीवाला, तू जाणार का सासरी?'' ''हो. जाणार ना!'' काबुलीवाला उत्तर देई, ''आणि सासऱ्याला असं मारणार.'' काल्पनिक सासऱ्याला मारताना काबुलीवाला जो हावभाव करी तो पाहून मिनीला खूप गंमत वाटे. कधी मिनी काबुलीवाल्याला गाणं म्हणून दाखवी तर कधी नाच करून. मिनीची प्रत्येक गोष्ट रहेमत अतिशय कौतुकानं पाही.

त्या दोघांची ही निरपेक्ष मैत्री मलाही फार आवडे. मग मीही त्यांच्यात सामील होई. लेखक असल्यामुळं काबुलीवाल्याचा देश, तेथील लोक, त्यांचं जीवन, त्यांची सुख-दुःखं हे रहेमतच्या मोडक्या तेथील लोक, त्यांचं जीवन, त्यांची सुखं-दुःखं रहेमतच्या मोडक्या तोडक्या बंगालीत ऐकताना मी रमून जाई. मी कधी कलकत्त्याच्या बाहेर जात नसे. पण रहेमतशी गप्पा मारता मारता मी मनानं अफगाणिस्तानची सफर करून येई.

मिनीच्या आईला मात्र आमची काबुलीवाल्याशी असलेली मैत्री अजिबात आवडत नसे. तिला रहेमतबद्दल कधीच विश्वास वाटत नसे. त्याची मिनीवरची माया तिला अतिशय संशयास्पद वाटे. तो गोड गोड बोलून एखाद्या दिवशी मिनीला पळवून नेईल, अशी भीती तिला सारखी वाटे. तिनं अनेकदा मला तसं बोलूनही दाखवलं होतं. तिचं म्हणणं अगदी चूक नव्हतं, पण रहेमतबद्दल मला तसा अविश्वास कधीच वाटत नसे. म्हणून तिचं म्हणणं मी हसून उडवून लावी. रहेमत आणि मिनी ह्या दोघांचं निर्व्याज हसणं पाहून मला फार प्रसन्न वाटे. त्यामुळंच मी रहेमतला आमच्या घरी येण्यास कधीच मना करू शकलो नाही.

दरवर्षी माघ महिन्यात रहेमत आपल्या देशाला परत जाई. त्या सुमारास उधारी वसूल करण्यात, पैसा गोळा करण्यात तो पार गुंतून गेलेला असे. असं असूनसुद्धा मिनीला भेटायला तो वेळात वेळ काढून येई. सकाळी जमलं नाही तरी संध्याकाळी तरी येईच.

असाच एक दिवस... मी माझ्या कादंबरीची मुद्रितं तपासत होतो. हवेत चांगलाच गारवा होता. खिडकीतून आलेलं सकाळचं कोवळं ऊन फार सुखावह वाटत होतं. तेवढ्यात रस्त्यावर गलका ऐकू आला. मी खिडकीतून डोकावून पाहिलं. रहेमतला दोन पोलिस बेड्या घालून घेऊन चालले होते. रहेमतच्या कपड्यावर रक्ताचे डाग होते. एका पोलिसाच्या हातात रक्तानं माखलेला एक सुरा होता. गल्लीतली टारगट पोरं आरडाओरड करत त्यांच्यामागून चालली होती. ही काय भानगड आहे हे पाहण्यासाठी मी बाहेर आलो.

चौकशी केल्यावर कळलं की पैशाच्या देण्याघेण्यावरून रहेमत व त्याचा एक कर्जदार ह्यांच्यात प्रथम बोलाचाली झाली होती आणि नंतर चक्क मारामारी. रहेमतनं कर्जदारावर

**विरलेल्या पाऊलखुणा, तरी का जुना उमाळे घाव? व्रण दुखवी हृदयापास, जागवी आस कोवळे भाव.**



केलेला सुऱ्याचा वार प्राणघातक ठरला होता. आम्ही बोलत असताना मिनी कुठून तरी धावत तिथं आली. काबुलीवाल्याला असं पाहून तिला आश्चर्य वाटलं. आज त्याच्याजवळ त्याची ती झोळी नव्हती. मिनीला पाहताच काबुलीवाल्याच्या चेहऱ्यावर प्रसन्न हसू उमटलं. मिनीनं नेहमीप्रमाणंच विचारलं,
''काबुलीवाला, सासरी चाललास?''

''हो. खोकी, आज खरोखरच सासरी चाललोय. पण माझे हात बांधलेत ना म्हणून आज मला सासऱ्याला मारता येणार नाही.''

खुनाच्या आरोपाखाली काबुलीवाल्याला बऱ्याच वर्षांची शिक्षा झाली.

इकडं आमचं आयुष्य मात्र सुरळीत चालू होतं. माझं लेखन, घर, मित्र, काम ह्या सर्व व्यापात मी काबुलीवाल्याला लवकरच विसरून गेलो. आता मात्र ह्या गोष्टीची लाज वाटते.

शाळा, मैत्रिणी, रुसवे-फुगवे, खेळ, अभ्यास ह्या सर्व गोष्टींत मिनीही लवकरच रमून गेली आणि आपल्या दोस्ताला पार विसरून गेली. मिनीचं जग आता झपाट्यानं बदलत होतं आणि विस्तारतही होतं. मिनी आता पूर्वीसारखी माझ्या खोलीत येऊन बडबड करून मला भंडावून सोडत नव्हती. मिनी मोठी होत होती.

पण मिनीच्या गोड आठवणीवर रहेमत काबुलीवाला तुरुंगात दिवस कंठत होता, हे मात्र कुणाच्याच लक्षात आलं नाही.

अशीच वर्षांमागून वर्षं गेली. मिनी आता लग्नाला आली. मला जरी ती लहानच वाटत होती, तरी मिनीच्या आईला मिनीच्या लग्नाची काळजी लागली होती. शेवटी मिनीला एक उत्तम वर मिळाला. मिनीचं लग्न ठरलं. आता मिनी आम्हाला सोडून तिच्या हक्काच्या घरी जाणार होती. म्हणून माझं पित्याचं मन आतल्या आत रडत होतं. मिनी आमच्या घराची शोभा होती. तिच्यामुळं घर कसं प्रसन्न वाटत होतं. ती इथून गेल्यावर घर उदास होणार होतं! मिनीच्या लग्नाची तयारी करताना आनंद वाटत होता आणि ती दूर जाणार म्हणून वाईटही वाटत होतं.

शेवटी मिनीच्या लग्नाचा दिवस उजाडला. फटफटतंय ना फटफटतंय, तोच आमच्या दारात सनई वाजायला लागली. सनईचे ते मंगल सूर एका पित्याच्या हृदयाला टोचत होते. घरात गडबड सुरू होती. निरनिराळे आवाज, वेगवेगळे सुगंध, धावपळ. मी माझ्या खोलीत हिशेब तपासत बसलो होतो. इतक्यात 'सलाम बाबू' असं कुणीतरी म्हटलं. आवाजाच्या दिशेनं चमकून पाहिलं. दाराशी एक उंचापुरा माणूस उभा होता. त्याच्या तोंडावर हसू होतं. प्रथम मी त्याला ओळखलंच नाही. मग एकदम लक्षात आलं. हा तर मिनीचा काबुलीवाला! ''कधी आलास, रहेमत?'' मी विचारलं.

''हा आताच येतोय तुरुंगातून.'' त्यानं सरळ उत्तर दिलं. मी त्याला ओळखलं म्हणून त्याला खूप बरं वाटल्याचं त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होतं. काबुलीवाला पार बदलून गेला होता. त्याच्याजवळ त्याची ती झोळीही नव्हती.

मिनीच्या लग्नाच्या मंगल दिवशी काबुलीवाल्याचं येणं, नाही म्हटलं तरी, मला खटकलंच होतं. मी माझ्या आयुष्यात एका खुन्याला इतक्या जवळून प्रथमच पाहात होतो. त्यानं आज तरी इथून लवकरात लवकर जावं असं मला वाटत होतं. म्हणून मी म्हणालो, ''रहेमत, आज मी फार कामात आहे.''

माझ्या बोलण्यामागचा अर्थ समजून तो जाण्यासाठी वळला. त्याला

**कल्पवृक्ष तो तुझ्या पाठीशी, कडुनिंब दे मज छाया, अमृतघट गे, तुझ्या उशाशी, घोट अश्रूंचे मज प्याया.**

वाईट वाटल्याचं त्याच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसत होतं. मलाही त्याला असं घालवून द्यावंसं वाटत नव्हतं, पण काही इलाज नव्हता. काबुलीवाला काही पावलं पुढं जाऊन पुन्हा माघारी वळला. माझ्याजवळ येऊन अजीजीच्या स्वरात विचारू लागला, ''बाबू, खोकीला एकदा भेटता येणार नाही का?''

बंगाली घरातली नववधू बाहेर येऊन कुणापुढं उभी राहात नाही. तशी बंगाल्यात पद्धतच आहे. म्हणून मी म्हटलं, 'अरे, आज मिनीचं लग्न आहे. ती अशी बाहेर कशी येईल?''

''लग्न? खोकीचं?''

काबुलीवाल्याला आश्चर्यच वाटलं. त्याच्या दृष्टीनं खोकी त्यानं तुरुंगात जाताना पाहिली तेवढीच होती. ''काबुलीवाला, ओ काबुलीवाला'' असं ओरडत धावत येऊन त्याला ती नेहमीचे ठरलेले प्रश्न विचारणार होती, पण त्याची खोकी आज चक्क सासरी निघाली होती. आता ती त्याला भेटणं शक्य नव्हतं. त्या खुनी पठाणाचे डोळे पाण्यानं डबडबले. भरल्या गळ्यानं तो मला म्हणाला, ''बाबूजी, माझी भेट म्हणून हे खोकीला द्याल का?'' त्यानं आपल्या खिशातून एक द्राक्षाची आणि एक बदाम-बेदाण्याची पुडी काढली. हे त्यानं त्याच्या मित्राकडून खोकीसाठी मागून आणलं होतं हे उघडं होतं.

मी दोन्ही पुड्या घेतल्या आणि त्याला पैसे देऊ लागलो. ते पैसे नाकारत माझे हात धरून तो काकुळतीनं म्हणाला, ''नका बाबूजी मला पैसे देऊ नका. तुम्ही माझी ओळख ठेवली हेच खूप. खोकीच्या आठवणीवर तर मी इतके दिवस काढले. आज खोकी सासरी निघाली. बाबू, खोकीच्या वयाचीच माझीही एक लडकी आहे. तिकडे देशाला. आता तीही मोठी झाली असेल ना?''

रडतरडत त्यानं खिशातून एका जुन्या कागदाची घडी बाहेर काढली. अगदी हलक्या हातानं ती उलगडली आणि कागद माझ्या टेबलावर पसरला. त्या कागदावर एका चिमुकल्या हाताचा ठसा होता. त्याच्या मुलीची आठवण. आता मलाही गलबलून आलं. रहेमत खुनी, अशिक्षित असला तरी माझ्यासारखाच एक पिता होता.

मी मिनीला बाहेर बोलावलं. घरातील स्त्रियांनी ह्या गोष्टीला कसून विरोध केला. पण मी कुणाचंही ऐकलं नाही. मिनी वधुवेशात माझ्याजवळ येऊन उभी राहिली. तिनं तिच्या काबुलीवाल्याला अजिबात ओळखलं नाही. तिला डोळे भरून पाहात काबुलीवाल्यानं विचारलं, ''खोकी, सासरी निघालीस?''

मिनीला आता सासरचा अर्थ चांगलाच कळत होता. ती लाजून आत निघून गेली. रहेमत मटकन् खालीच बसला. त्याच्या खोकीनं त्याला ओळखलं नव्हतं. मग त्याची मुलगी तरी त्याला कशी ओळखणार?

एका पित्याचं हृदय दुसरा पिताच जाणून घेऊ शकतो. मी टेबलावरचे काही पैसे उचलून रहेमतच्या हातात कोंबले आणि त्याला म्हणालो, ''आत्ताच्या आत्ता तुझ्या मुलीकडं परत जा, रहेमत तुझी अन् तुझ्या मुलीची भेट झाली की, माझ्या मिनीला आपोआप खूप आशीर्वाद मिळतील. ह्यातच आपल्या सर्वांचं भलं आहे.''

रहेमतला पैसे दिल्यामुळं मला घरावर करण्यात येणाऱ्या रोषणाईला फाटा द्यावा लागला. ह्यामुळं घरातील पुष्कळजण नाराज झाले. पण मी मात्र समाधानी होतो, खूष होतो.

●●

*रवींद्रनाथ टागोरांच्या 'काबुलीवाला' ह्या सुप्रसिद्ध कथेचा स्वैर अनुवाद.*

**अनु. – मृणालिनी गडकरी**
कांचनबन, अ, सेनापती बापटपथ,
९६७/२, शिवाजीनगर, पुणे ४.

## प्रतिभावंतांचे किस्से

आचार्य अत्रे एकदा महाविद्यालयात व्याख्याला गेले होते. सभा संपण्यापूर्वी अध्यक्षांनी कुणाला काही प्रश्न विचारावयाचे असल्यास विचारावेत म्हणून सांगितले. एक दोन मिनिटे गेली तरी कुणी काही विचारेना. अध्यक्ष व वक्ते उठणार एवढ्यात एका कोपऱ्यात उभा असलेल्या, एका गंभीर चेहऱ्याच्या, उंच, किडकिडीत, डोळ्यावर जाड चष्मा असलेल्या विद्यार्थ्याने अत्र्यांना एक प्रश्न विचारला, ''देशाची परिस्थिती फार गंभीर आहे असं तुम्हाला वाटत नाही का?'' अत्र्यांनी गंभीरपणे उत्तर दिले, 'वाटतं तर - पण तुम्ही इतकं मनाला लावून घेऊ नका, जेवा - खा' सर्व मुले पोट धरून हसायला लागली.

**समाधान ते चित्त असावे, ध्येयसाधनी मन रमवावे, आर्तांची पुसण्यात आसवे, मम जीवन हे व्यतीत व्हावे.**


# गुरुत्वीय भिंगे

**डॉ. जयंत नारळीकर**

१९१९ मधली गोष्ट. रॉयल सोसायटी, लंडनचे प्रमुख सभागृह उत्सुक श्रोत्यांनी गच्च भरले होते. इंग्लंडचे अॅस्ट्रॉनॉमर रॉयल - शाही खगोलशास्त्रज्ञ सर फ्रँक डायसन आणि केंब्रिज विद्यापीठातले आर्थर स्टॅनूले एडिंग्टन हे दोन वक्ते बोलणार होते. आणि त्यांच्या वक्तव्यावरून न्यूटनच्या सतराव्या शतकापासून चालत आलेल्या आणि आइन्स्टाइनच्या जेमतेम चार वर्षे वयाच्या नव्या सिद्धांताचे भवितव्य ठरणार होते. दोन्ही सिद्धांत गुरुत्वाकर्षणाचे - एक पूर्व प्रस्थापित तर दुसरा नवोदित. कुठला सिद्धांत बरोबर? हे ठरवायला एक प्रयोग जरूरी होता.


आइन्स्टाइनच्या सिद्धांताचे भाकीत होते की गुरुत्वाकर्षणामुळे प्रकाशकिरणांची दिशा बदलते. चित्र क्र. १ मध्ये M वस्तुमानाच्या एका वस्तू जवळून AB ह्या दिशेने एक प्रकाश किरण येतो. जर त्यावर गुरुत्वाकर्षणाचा प्रभाव पडत नसेल तर तो सरळ BC ह्या मार्गाने गेला असता. न्यूटनचा सिद्धांत हेच सांगत होता. त्या उलट आइन्स्टाइनच्या मते किरण दिशा बदलून BD ह्या मार्गाने गेला असता. वास्तवात काय घडते?

हे पाहायला एडिंग्टन यांचा प्रयोग असा होता... समजा ह्या ठिकाणी एक तारा आहे, तर इथे पृथ्वीवरचा निरीक्षक. मध्ये M वस्तुमानाचा सूर्य. आइन्स्टाइनच्या मते प्रकाशकिरण चित्र क्र. २ मधील ABO मार्गाने येईल आणि O ला



चित्र क्र. २

तारा A पासून R कडे सरकलेला दिसेल. पण सूर्य आकाशात तळपत असताना आपण तारा पाहणार कसा?



चित्र क्र. १

यावर एडिंग्टनचा तोडगा असा! खग्रास सूर्यग्रहणाच्या वेळी हे निरीक्षण करावे. १९१९ मध्ये खग्रास सूर्यग्रहण दक्षिण गोलार्धातून दिसणार होते. डायसन यांनी दोन वेगवेगळ्या निरीक्षकांच्या तुकड्या ब्राझील येथील सोब्राल येथे आणि गिनीच्या खाडीतील प्रिंसिपे बेटावर पाठवल्या. तेथील निरीक्षकांचे अहवाल एडिंग्यन रॉयल सोसायटीत सांगणार होते... कारण ते ह्या तुकड्यांचे संयोजक होते.

एकंदरीत अपेक्षित फरक- न्यूटन आइन्स्टाइन मधला- सूक्ष्म होता. ताऱ्याची दिशा १.७५ आर्क-सेकंद (कोन मोजायचे एकक १ अंश = ३६०० आर्क सेकंद) इतक्याने बदलायला हवी, असे आईन्स्टाईनचे भाकीत होते.

एडिंग्टन आणि त्यांच्या निरीक्षकांचा कौल आइन्स्टाइनच्या बाजूने होता. प्रकाशकिरणे गुरुत्वाकर्षणाच्या प्रभावाने 'वळतात' असे सिद्ध झाले. आणि या यशामुळे आइन्स्टाइनची कीर्ती दिगन्तात पसरली. न्यूटनच्या सिद्धान्तापेक्षा श्रेष्ठ म्हणून आइन्स्टाइनचा सापेक्षतावादाचा सिद्धांत प्रस्थापित झाला.

प्रकाशकिरणे एका माध्यमातून दुसऱ्या माध्यमात शिरताना दिशा बदलतात. ह्या वक्रीभवनाचा फायदा घेऊन भिंगे बनवली जातात. जर गुरुत्वाकर्षणामुळे देखील प्रकाश दिशा बदलत असेल तर त्याचा फायदा घेऊन आपण गुरुत्वीय भिंगे बनवू शकतो का?

**विज्ञानाची आज उजाडे पहाट, माणसाची सुरू होई नवी पायवाट**

पृथ्वीवरील वस्तुमाने फारच कमी असल्याने ही शक्यता नाही. सापेक्षतावादाच्या नियमाप्रमाणे चित्र क्र. २ मधील दिशेतला बदल

—— रेडियन

रेडियन म्हणजे १८०/π अंश. किरण वस्तुमानापासून किती जवळून गेले ते अंतर. G = गुरुत्वाकर्षणाचा स्थिरांक c = प्रकाशवेग. हिशेब लावून पाहा. एक टनाच्या स्टीलच्या गोळ्यामुळे प्रकाश किती वळेल. फारच कमी!

पण अंतराळात अशी वस्तुमाने सापडतात. १९३७ मध्ये कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या फ्रिट्झ झ्विकी ह्या शास्त्रज्ञाने असा तर्क केला होता की गुरुत्वीय भिंगाची प्रात्यक्षिके आकाशगंगेसारख्या प्रचंड तारकाविश्वांच्या समूहांच्या रूपात पाहायला मिळतील.

परंतु ४ दशकांहून जास्त काळ असे प्रात्यक्षिक मिळाले नाही. आणि लोक झ्विकींची कल्पना विसरून गेले. १९६५ मध्ये बार्नोथी आणि त्याच सुमारास रेफ्डाल यांनी अशाच कल्पना मांडल्या. त्यावेळी 'क्वेसार' नावाने ओळखले जाणारे प्रचंड प्रकाशस्रोत नुकतेच सापडू लागले होते. तेव्हा अशा स्रोतांची गुरुत्वीय भिंगातून वेगवेगळी बिंबे दिसतील का असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

पण... त्याही कल्पना विस्मृतीत गडप झाल्या... १९७९ पर्यंत. कारण त्या वर्षी गुरुत्वीय भिंगाचे पहिले प्रात्यक्षिक दिसले. तेही अनपेक्षित रूपात.

***

चित्र क्रमांक ३ मध्ये एकाच स्रोताची (S) दोन बिंबे (A, B) ही O ह्या निरीक्षकाला दिसतात. कारण वाटेतल्या M वस्तुमानाच्या भिंगामुळे S पासून O कडे प्रकाश वळून दोन वेगवेगळ्या मार्गाने येतो. SPO आणि SPQ त्या पर्यायी मार्गांनी.

0957+561 A, B ह्या दोन कॅटलॉग नंबरांनी ओळखले जाणारे क्वेसार खगोलशास्त्रज्ञांना माहीत होते. परस्परांजवळ आणि सारखे वर्णपट असलेले हे दोघे 'जुळे क्वेसार' म्हणून ओळखले जात, परंतु त्यांचे अत्यंत बारकाईने निरीक्षण केल्यावर इतके एकासारखे एक क्वेसार असणे असंभाव्य वाटू लागले. आणि हे दोन वेगळे स्रोत नसून चित्र क्र. ३ प्रमाणे एकाच स्रोताची दोन बिंबे असावीत, असे वाटू लागले.

आणखी शोध घेऊन निरीक्षकांना भिंगाचे काम करणारे तारकाविश्वही सापडले. फार काय, हे भिंग केवळ एका तारकाविश्वाशिवाय एका संपूर्ण तारकाविश्वसमूहाने बनले आहे, असे जाणवले. एका तारकाविश्वात सुमारे १०० अब्ज तारे असू शकतात! झ्विकीचा तर्क खरा ठरला.

अशी प्रचंड भिंगे अंतराळात असल्याची आणखी उदाहरणे सापडत आहेत. दुहेरीच नव्हे, तीन, चार बिंबे निर्माण करणारी भिंगे देखील सापडली आहेत. म्हणजे प्रकाशस्रोत S पासून दोन, तीन, चार... मार्गाने प्रकाश O कडे येत असल्याची उदाहरणे सापडली आहेत.

असाही प्रयोग चालू आहे. दोन मार्ग असले तरी ते सारख्या लांबीचे नसतात. त्यामुळे बिंब A आणि B हे S ची स्थिती एकाच वेळची दाखवत नाहीत. समजा SPO आणि SQO ह्या मार्गातले अंतर एक प्रकाशमास आहे. तर A मध्ये आज जे घडते B ते मध्ये महिन्यापूर्वी घडले असणार. A आणि B बिंबांतले प्रकाशाचे फेरबदल तपासून असे काही उघडकीला येते का ते पाहण्याचे काम चालू आहे.

पण प्रकाश अशा सरळ मार्गाने येत नाही म्हणून 'दिसते तसेच असते' (किंवा 'दिसते तेच खरे') असे म्हणायला जागा राहिली नाही!

●●




चित्र क्र. ३


**डॉ. जयंत नारळीकर**
'आयुका', विद्यापीठ आवार,
पुणे – ७


**विकसले अध्यात्म येथे वेदही व्यवहार होती । बहरले विज्ञान येथे देऊनी सारी कसोटी।**

# ‘सबब’वीरांशी सामना!

**प्रा. पुरुषोत्तम पाटील**

‘‘**स**र, तुम्ही काहीतरीच सांगता!’’

‘‘असं तर कोणत्याच कॉलेजमधील प्राचार्य, शाळेतील मुख्याध्यापक करीत नाहीत.’’

‘‘हा अन्याय आहे. ही बंदी म्हणजे भलताच जुलूम आहे. तो आम्ही मानणार नाही.’’

कॉलेजच्या प्रथमवर्षाच्या वर्गातील विद्यार्थ्यांचे नाराजीचे, संतप्त भावनांचे शब्द फुटाण्यासारखे वर्गात फटाफट निनादत होते.

मी सगळे गंमतीने पाहात होतो, ऐकत होतो. या सगळ्या उद्रेकाला मीच कारणीभूत होतो. मीच विद्यार्थ्यांना ही विशिष्ट प्रकारची बंदी घालण्याचे, एका विशिष्ट प्रकारच्या अपप्रवृत्तीला मनाई करण्याचे आवाहन केले होते.

या मनाईची थोडी पार्श्वभूमी सांगितली पाहिजे. बऱ्याच वर्षांपूर्वी एका लहानशा तालुकावजा गावात निघालेल्या कॉलेजच्या प्राचार्यपदी माझी नेमणूक झाली होती. तिथल्या शिक्षणक्षेत्रात अंदाधुंदीच होती. बहुसंख्य मुले ‘कॉपी’ या साधनाचा बिनधास्त उपयोग करून शालान्त परीक्षा पास होत. या वर्गात प्रवेश घेतलेले विद्यार्थी तसेच होते, हे मला त्यांच्या सहामाही परीक्षेत त्यांच्या सहामाही परीक्षेत त्यांनी अवलंब केलेल्या प्रकारांवरून लक्षात आले होते. भरमसाठ प्रमाणात कॉपी झालेली होती. कॉपी केलेल्या चिटोऱ्यांच्या कागदांचा सर्वात जास्त खच पडलेला दिसत होता तो स्वच्छतागृहामध्ये. मुलं करंगळी



दर्शवून लघुशंकेसाठी ब्लॉक सुपरव्हायझरची सहज परवानगी घेत. (तेही काय करतील बिचारे) ते गुंड विद्यार्थ्यांच्या वांडपणाला घाबरत आणि मुले उत्तरांच्या कॉपीच्या देवाणघेवाणीसाठी त्या एका कोपऱ्यातल्या दुर्गंधीयुक्त कॉपीकेंद्राचा स्वच्छतागृहाचा उपयोग करीत. कॉपीचे काम झाले की ते कागद तेथेच फेकून देत ह्याबद्दल मला अतिशय राग होता. हे सगळे थांबवले पाहिजे, असे मला वाटे.

पण एकतर्फी सक्ती केल्याने काही उपयोग होत नाही हा माझा पूर्वानुभव. म्हणून या मुलांशीच मनमोकळेपणाने चर्चा करून काही मार्ग काढावा या हेतूनेच मी त्या मनाईच्या सूचनेचा ॲटमबॉम्ब टाकला होता! खळबळ होणार हा अंदाज होताच. मनाईची सूचना करताना मी म्हणालो, ‘‘परवापासून तुमची पूर्वपरीक्षा सुरू होते आहे. परीक्षा सुरू होण्यापूर्वी १५ मिनिटे अगोदर तुम्ही वर्गात आले पाहिजे. पहिल्या पाच मिनिटांत सुपरव्हायझर यांना मी तुम्हाला सूचना देण्याला सांगितलं आहे – ‘‘कोणाला लघुशंकेसाठी बाहेर जाऊन यायचं असेल तर आताच ५-७ मिनिटांत जाऊन या. परीक्षा सुरू झाल्यानंतर कुणालाही त्या तीन तासांत बाहेर सोडण्यात येणार नाही.’’

लघुशंकेसाठी ही खोटी सबब, बाहेर पडण्यासाठी त्यांना आतापर्यंत उपयोगी पडत आली होती. तीच मोडीत काढण्याचे मी ठरवल्यावर साहजिकच त्यांच्या असंतोषाचा वरीलप्रमाणे स्फोट झाला. हा प्रकार गैर आहे हे त्यांना पटवून देणे, या सबबीचा खोटेपणा त्यांच्या लक्षात आणून देणे अगत्याचे होते.

मी त्यांना प्रथमच सांगून टाकले की मी त्यांच्या मर्जीविरूद्ध ही सक्ती अंमलात आणणार नाही. एवढे बोलताच मुलांना भलताच आनंद झालेला दिसला! पण नंतर हळूच म्हटलं, ‘‘पण आता मी जे काही सांगणार आहे ते तुम्हाला पटलं तर त्याप्रमाणं वागण्याचं आश्वासन तुम्ही मला प्रथम द्या.’’

मुलं उत्साहात ‘‘हो सर, हो सर!’’ म्हणू लागली. ‘सत्य’ पटविण्यासाठी थोडा विनोदाचा आधार परिणामकारक ठरतो, म्हणून मी जरा गमतीने त्यांच्याशी संवाद सुरू केला.–

‘शिक्षण पूर्ण झाल्यानंतर तुम्ही

**थांबला तो संपला, धावे त्याला शक्ति येई आणि रस्ता सापडे ।**

पहिल्यांदा दोन गोष्टींच्या मागं लागणार, एक नोकरी आणि दुसरी गोष्ट म्हणजे लग्न.''

लग्नाचा उल्लेख होताच मुलं फिसऽऽकन् हसायला लागली.

''पण लग्नातले विधी तुम्हाला माहीत आहेत का? विशेषत: लग्नाच्या वेळचे?''

''होय सर,'' एक मुलगा म्हणाला. ''त्या दिवशी प्रथम सीमन्तपूजन असतं. गावाबाहेर देवळाच्या पारावर. नवरदेवाला नवा पोषाख तिथं चढवला जातो. तो रुसला अंगठी वगैरे देऊन रुसवा काढला जातो. उपाध्याय, भटजी काही धार्मिक विधी करतात...''

''किती वेळ लागतो त्या सगळ्या कार्यक्रमाला?'' माझा प्रश्न.

''तासभर तरी वेळ लागतो सर.'' तोच मुलगा म्हणाला.

''मग पुढं?'' मी दुसऱ्या मुलाला विचारलं.

''लग्नमंडपात जाण्यासाठी घोड्यावरून वराची वाजत गाजत मिरवणूक. वराच्या घोड्यापुढं मित्रमंडळींचा नाच. फटाके फोडणं. नुसता जल्लोष असतो.'' त्यानं उत्तर दिलं.

''किती वेळ लागतो, वरातीला? खरं खरं सांगा हं.'' एका प्रामाणिक विद्यार्थ्यानं सांगितलं, ''सगळ्यात जास्त वेळ लागतो या वरातीला. लग्नस्थळ लांब अंतरावर असेल तर विचारायलाच नको. त्यात पुन्हा वराच्या घोड्यापुढं चौकाचौकांत वाद्यांच्या तालावर बेभानपणे नाचणारे नवरदेवाचे मित्र. मुहुर्ताची वेळ जवळ येत चालली तरी वरात पुढं सरकत नाही. एक दीड तास सहज लागतो. या नवरदेवाच्या मिरवणुकीला.''

''आणि त्यानंतर मुख्य लग्नविधी.'' मीच त्या मुख्य विधीच्या चित्रणाचं सूत्र हाती घेत म्हणालो – ''प्रथम मंडपात प्रवेश करताना आरती. फुलांच्या पायघड्यावरून नवरदेव महाशय अगदी हळूहळू पावलांनी सजवलेल्या व्यासपीठावर येतात. मधून मधून वधूकडे चोरून पाहत! मग अंतरपाट आणि मंगलाष्टकं सुरू किती विश्वं ...१५...१६...१७...१८... करत करत आगगाडी शेवटच्या विश्वापर्यंत 'ताराबलं' पर्यंत येताना या दीर्घ प्रवासात मंगलाष्टक म्हणणाऱ्या भटजींनाही दम लागतो. नंतर अंतरपाट दूर होऊन वधू-वरांचं परस्परांच्या गळ्यात माळा घालणं, नंतर त्यांनी सुशोभित आसनांवर स्थानापन्न होणं. लग्नाला आलेल्या शेकडो मित्र, नातेवाईक यांची लग्नभेट देण्यासाठी लागलेली मोठी रांग. फोटोग्राफरने अनेकांचे वधू-वरासह फोटो काढणं – लग्न लावणारा भटजी व त्याचे वधू-वरांना करायला लावण्याचे विविध पूजाविधी हे सारं दीर्घ, नव्हे प्रदीर्घ काळापर्यंत चालत असत. कमीत कमी चार-दोन तास तरी यात जातातच. खरं ना?''

विद्यार्थ्यांनी माना डोलावल्या. माझा युक्तिवाद बिनतोड होता. संमती देण्याखेरीज त्यांच्यापुढे पर्याय नव्हता आणि मी अखेरचं शरसंधान सुरू केलं – ''म्हणजे सीमन्त पूजनाला एक तास, मिरवणुकीला दीड तास आणि प्रत्यक्ष लग्नविधीला दोन तास म्हणजे ४।।-५ तासांचा हा विवाह-विधी-प्रवास असतो.'' मी थोडा थांबलो आणि विद्यार्थ्यांच्या अंत:स्थ मानसिक खळबळीचा अंदाज घेत शेवटचा बाण टाकला. –

''या ४-५ तासांच्या अवधीत नवरदेव कधी एकदासुद्धा भटजींना करंगळी दाखवीत 'महाराज, जरा...' असं विनवीत नाही...!''

आणि वर्गभर मनमोकळ्या हास्याचा स्फोट झाला.

त्यांना पटलं होतं. त्यांच्यातले अगदी उनाड म्हणविले जाणारे विद्यार्थीही नंतर येऊन भेटले म्हणाले, ''मान लिया सर!''

कॉपीला प्रतिबंध करण्याच्या प्रयत्नातला हा माझा मनाईहुकूम त्या माझ्या कॉलेजमध्ये नंतरनंतर स्वेच्छेने पाळला गेला. शिस्त लागली.


इतरही वादविवाद – चर्चांच्या प्रसंगी त्यांना सबबींचा घातकपणा पटवून देत राहिलो.

या बाबतीतलं पोपचं वचन मनाला अंतर्मुख करणारं, सर्वांनी लक्षात ठेवावं असं आहे – "An excuse is worse and more terrible than a lie : for, an excuse is lie guarded!" याचा अर्थ खोटेपणापेक्षाही 'सबब' ही अधिक वाईट आणि भयंकर आहे. सबब म्हणजे संरक्षित खोटेपणाच!''

●●

**प्रा. पुरुषोत्तम पाटील**
संपादक 'कविता-रती', विजय
पोलीस वसाहत, देवपूर,
धुळे – ४२४००२

**लक्ष लक्ष नवलाख पसरली ही तेजाची माला. अवनीच्या कटी विलसते ही दिप्तींची मेखला.**




***१८ मे. १–३० वाजले. दुसरी पायरी समोर आली. प्रचंड दमछाक होत होती. तरी जिद्दीने ती शिडी चढून आम्ही दुसरी पायरीही पार केली. तेवढ्यात ढग जमा झाले. काहीही दिसेना. हातातोंडाशी आलेलं यश हुलकावणी देतं की काय... क्षणभर प्रचंड नैराश्य दाटून आलं. शेरपांनी नेपाळी प्रार्थना म्हणायला सुरुवात केली आणि आश्चर्य म्हणजे पाच मिनिटात हवा अगदी स्वच्छ झाली. प्रत्येक पाऊल आत्मविश्वास वाढवत होते... दुपारी १२.१५ वाजता बिनतारी यंत्रातून आवाज आला, ''मी एस्.ए. एव्हरेस्ट शिखरावरून बोलतोय.'' टाटा एव्हरेस्ट मोहिम १९९८ फत्ते करणाऱ्या सुरेन्द्र चव्हाण आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे हे चित्तथरारक अनुभव.***

१८ मे १९९८. वेळ – दुपारी १२.१५ जगातील सर्वोच्च शिखरावर भारताचा तिरंगा झेंडा पुन्हा एकदा फडकला. स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात गिर्यारोहक खेळाडूंनी भारताला दिलेली ती एक अनुपम, अभिनव भेट होती. ज्या ज्या ठिकाणी म्हणून या मोहिमेचे पाठीराखे, हितचिंतक कान टवकारून आतुरतेने वाट बघत होते. त्यांच्या डोळ्यांत त्या क्षणी पाणी तरळलं हृषिकेश यादव – मोहिमेचा नेता सांगत होता. ''बिनतारी यंत्रातून आवाज आला – मी एस. ए. एव्हरेस्ट शिखरावरून बोलतोय – कोणालाच भावना आवरता येईना. अश्रुधारांनी आम्ही सर्वच सदस्य चिंब भिजलो.''

आणि प्रत्यक्ष शिखरावर त्या वेळी एस.ए. अर्थात सुरेन्द्र अनंत चव्हाण यांचाही बांध फुटला होता. तोंडावर ऑक्सिजन मास्क, आनंदातिरेक, दमणूक यामुळे शब्दही फुटत नव्हता. तरीही मी पुटपुटलो– ''सगळे दृश्य खूप सुंदर दिसत आहे. येथे आज मी तिरंगा फडकावला आहे. सर्वांचे आभार'' सुरेन्द्र सांगत होते.

बरोबरचे शेरपा, आंतरराष्ट्रीय मोहिमांचे सदस्य यांना कळेना की यांच्या डोळ्यांत अश्रू कसले? त्यांना या क्षणामागचे कष्ट, धडपड माहिती असणारच नव्हती. शिवाय दानशूरांचा ओघ या खेळाकडेही जिथे भरपूर वाहतो, अशा देशांचे प्रतिनिधित्व ते करत होते. याउलट ही भारतीय एव्हरेस्ट मोहीम आर्थिक ओढग्रस्तीमुळे अनेक तडजोडी करून इथवर पोहोचली होती.

हृषिकेश यादव सांगतात, ''एव्हरेस्टची उंची ८८४८ मीटर. इतक्या उंचीच्या पर्वतशिखरावर मोहीम न्यायची म्हणजे सोपी गोष्ट नव्हती. भरपूर वेळ देऊ शकणारे कार्यकर्ते, कुशल गिर्यारोहक, उत्कृष्ट साधनसामुग्री आणि प्रचंड म्हणजे एक कोटीचे आर्थिक पाठबळ हवे होते. आठ हजार मीटर उंचीवरची कांचनगंगा मोहीम आणि १९९२ ची दुर्दैवी एव्हरेस्ट मोहीम यांच्या अनुभवानंतर १९९५ मध्ये आम्ही अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघाच्या वतीने एव्हरेस्ट मोहिमेसाठी तयारी सुरू केली. पण १९९७ पर्यंत आर्थिक लक्ष्य न गाठता आल्यामुळे मोहीम बारगळली. पण भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात ही संधी साधायची, असे ठरवून, निराशा झटकून, आम्ही पुन्हा आयोजन सुरू केले. एव्हरेस्ट समितीचे अध्यक्ष शरद ओवळेकर आणि त्यांचा आदर राखणारे जवळजवळ शंभरावर कार्यकर्ते यामुळे दुर्दम्य इच्छाशक्ती जागृत झाली. टाटा उद्योगसमूहाने शीर्षक प्रायोजित केलं आणि मार्च – मे १९९८ हा काळ निश्चित झाला.''

१९६६ ही महाराष्ट्रातील गिर्यारोहणाची सुरुवात (गिरिविहार – हनुमान मोहीम) धरली तर ३२ वर्षे हा, सर्वोच्च ध्येय गाठण्यासाठीचा कालखंड कदाचित जास्तच वाटेल. पण आपल्या समाजातील धाडसी वृत्तीचा अभाव, खेळांकडे पाहण्याचा दृष्टिकोन यामुळे हा काळही ठीकच म्हणावा लागेल. मात्र प्रोत्साहन कमी असतानाही आपल्या गिर्यारोहकांनी सह्याद्री पिंजून काढलाच पण हिमालयातही उत्तम ठसा उमटवला.

**हिमशुभ्र जलाचा चहुंकडे संचार स्वर्गीय सुधेची वळली येथे धार**

आनंद चांदेकर, हरिष कपाडिया, अरुण सावंत, डॉ. जी. आर. पटवर्धन, उष:प्रभा पागे, सरस्वती विजया गद्रे, वसंत लिमये, प्रदीप केळकर, हिरा पंडित, प्रसाद ढमाळ अशा कितीतरी जणांनी या खेळास आपलं जीवनकार्य समजलं आणि त्यामुळेच या वर्षी 'मराठा गडी यशाचा धनी' होऊ शकला हे निश्चित.

हृषिकेश यादव सांगतात, ''महाराष्ट्रीय गिर्यारोहक एव्हरेस्टवर चढला पाहिजे हे मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट होतेच पण ही भारतीय मोहीमही होती. दिल्लीचे लवराज धर्मसुक्त, मनालीचे गुरुदयालसिंह यांची निवड यांच्या गुणवत्तेचा लाभ घेण्यासाठी केली गेली. भारतीय जनतेचा पाठिंबा मिळवण्यासाठी टाटा एव्हरेस्ट रॅली संपूर्ण भारतात फिरवली गेली आणि तिला उत्स्फूर्तपणे पाठिंबाही मिळाला.''

मागे उभे राहिले.

पण एवढेच पुरेसे नव्हते. प्रत्यक्ष आरोहणात भाग घेणाऱ्यांची पण कसून तयारी चालू होती. याबद्दल राजेश पाताडे सांगतो, ''मी, मोरेश्वर कुलकर्णी, सुरेन्द्र चव्हाण आमच्याकडे प्रत्यक्ष शिखर चढाईच्या आयोजनाची जबाबदारी होती. त्यामुळे भरपूर वजन पाठीवर घेून आमची डोंगर-दऱ्यातील खडतर पायपीट, डोंगरयात्रा सुरू झाली. कातळारोहणातील विविध कौशल्ये आम्ही पुन्हा पुन्हा सराव करून अंगवळणी पाडू लागलो. आम्ही आजवर पन्वालीद्वार, सतोपंथ, कामेत, शिवलिंग अशा अवघड हिमपर्वतारोहणाच्या मोहिमेत भाग घेतला होता. त्याचा फायदा आम्हाला झालाच पण गंगोत्री हिमनदीमधील एक सराव कार्यशाळा तर फारच उपयुक्त ठरली.''



एकीकडे आर्थिक लढाई चालू झाली होती. अनेक कंपन्या, उद्योजक, व्यक्ती पुढे येत होत्या, माघार घेत होत्या. महाराष्ट्र शासनाचे आश्वासन मिळाले होते. माननीय मुख्यमंत्री मनोहर जोशी, माननीय शरद पवार हेही

मोरेश्वर सांगतात ''दिवसातले किमान अडीच तास विविध कसरती करून आम्ही आमची शारीरिक क्षमता वाढवली. भीष्मराज बाम यांनी मनोधैर्याच्या बळकटीसाठी विविध प्रकारचे मार्गदर्शन केले. डॉ. युवराज चव्हाण, डॉ. मिलिंद चितळे यांचा सल्लाही आम्ही नियमित घेत होतो.''

२१ जणांची तुकडी सक्षम झाली. पण आर्थिक अडचणीतून मार्ग काढण्यासाठी ती १३ जणांची करण्यात आली. मुंबई-दिल्लीतील कामे अनेकजण करणार होते. कर्जाऊ रकमा गोळा करून अखेर १२ मार्चला मोहिमेने प्रस्थान केले. दिल्लीत राष्ट्रपतींनी ध्वज प्रदान केला.

मार्चअखेर सर्व काठमांडूत जमले. ३० मार्चला नेपाळ-तिबेट सीमेकडे जाण्यासाठी सर्व सज्ज झाले.

एव्हरेस्ट चढण्यासाठी एकूण १६ मार्ग आहेत. पण दोन अधिक रुळलेले आणि लोकप्रिय. ते आहेत दक्षिण व उत्तर खिंडीचे.

राजेश पाताडे सांगतात, ''१९५३ मध्ये हिलरी व तेनसिंग यांच्या चढाईमुळे विख्यात मार्ग दक्षिण खिंडीचा. यात ६००० मीटर उंचीवरील पण पायथ्याचे खुंबू हिमनदीचे कोडे सुटले व दक्षिण खिंड गाठली की यशाची शक्यता खूप असते. याउलट उत्तर खिंडीच्या बाजूला ७५०० मीटर उंचीवरचा भाग अधिक आव्हानात्मक आहे. दक्षिण खिंड मार्गाच्या आधारतळापर्यंत जाण्यासाठी एक महिन्याचा ट्रेक करावा लागतो. पण उत्तर बाजूच्या आधारतळावर वाहने पोहोचत असल्यामुळे वेळ अन् श्रम या दृष्टीने प्रवास सुकर होतो.''

चीन-तिबेट माऊंटेनियरिंग असोसिएशनच्या सहकार्याने ११ एप्रिलला सर्व तुकडी आधारतळावर पोहोचली. उंची ५००० मीटर. वादळी वारा त्यांच्या स्वागताला होता. दोन दिवस साधने, खाद्यसामग्री, यांच्या नियोजनात गेले. थकावट दूर झाली.

**हा उभा हिमालय शैलश्रेष्ठ झुंजार. जणु घेइ शिरावर आकाशाचा भार.**



या बाजूने एव्हरेस्ट काहीसे बुटकेच दिसते. पण ३८०० मीटर उंची तीही ५००० मीटरच्या वरची ही आव्हानात्मक असते. शिखरावर हिम उडताना सुंदर दिसते. ईशान्येला पसरलेली एक धार दिसते. तिच्यापासून निघालेली एक सोंड चांगसे शिखरावरून चढून आधारतळाजवळ उतरते. या सोंडेच्या पूर्वेला पूर्व रोंगबुक हिमनदी तर पश्चिमेला पश्चिम रोंगबुक हिमनदी आहे. सोंडेवर एक खिंड आहे. तिला उत्तर खिंड म्हणतात.

हृषिकेश यादव सांगतात, ''सर्व सदस्यांनी वातावरणाशी समरस होण्यासाठी सामग्रीच्या फेऱ्या करण्यास सुरुवात केली. मुख्य भार शेरपा व हमाल उचलतात कारण ते या हवेला अनेक वर्षे सरावलेले असतात. पूर्व रोंगबुक हिमनदीच्या काठाने २ तळ लावून झाल्यावर तिसरा तळ आणि त्यावरून उत्तर खिंड दिसू लागली. २१ एप्रिलपर्यंत आम्ही तिसरा तळ सुसज्ज केला.

अन्य देशांच्या सदस्यांनी उत्तर खिंडीपर्यंत दोर लावून मार्ग खुला केला होता. पण तिसऱ्या तळापासून उत्तर खिंड गाठणे तरीही सोपी गोष्ट नाही.

सुरेन्द्र सांगतात, ''समोर बर्फाची उभी भिंत. त्यात आडव्या क्रिव्हास. (म्हणजे भेगा) त्यामुळे वाटचाल धोकादायक. त्यामुळे बांधलेल्या दोरांना विशिष्ट पद्धतीने अँकर झाल्याशिवाय हालचाल करायची नाही असाच तिथे दंडक होता. कधी उन्हामुळे आम्ही भाजून निघत होतो तर कधी गार वाऱ्यांमुळे गारठायचो. हिमवृष्टी सुरू झाली तर वाऱ्यामुळे नाकातोंडात हिम जायचे आणि नाकी नऊ यायचे.''

२६ एप्रिलला उत्तर खिंडीत भारतीय मोहिमेचे तंबू अन्य मोहिमांशेजारी जागा मिळवून उभे राहिले. उत्तर खिंड चांगसे व एव्हरेस्ट उत्तर धार यामध्ये आहे. इथून पुढे आणखी दोन तळ उभारल्यावर शिखर चढाईचा शेवटचा टप्पा सुरू होणार होता.

मोरेश्वर सांगतात, ''हिमालयातील मोहिमेत उंची गाठताना काटेकोर नियोजन करावे लागते. सावकाश चढावे लागते. यासाठी सामग्रीच्या फेऱ्या करणे हा सर्वोत्तम उपाय. आणि एव्हरेस्टच्या पाचव्या-सहाव्या तळापर्यंत जर योग्य खाद्यपदार्थ, सामग्री पोहोचली तरच शिखर आरोहण करणाऱ्या तुकडीला रसद मिळू शकते.

अर्थातच आळीपाळीने सदस्य तर जात होते. पराग सहस्रबुद्धे, लवराज, सुरेन्द्र हे पाचव्या तळापर्यंत जाऊन विश्रांतीला परत आले. कधी नरेन्द्र केणी, मुकेश, हृषिकेश, राजेश वरच्या तळावर सामग्री ठेऊन परत खाली येत. चौथ्या तळाची उंची ७००० मीटर होती. अशा उंचीवर शरीर अधिक काळ तग धरत नाही, खंगत जाते; यासाठीही पायथ्याकडे येणे आवश्यक ठरते.

पण मग विविध तळांमध्ये संपर्क यंत्रणा काय होती असा प्रश्न पडतो. हृषिकेश यादव सांगतात, ''महाराष्ट्र पोलिसांनी वॉकी-टॉकी सेट उपलब्ध करून दिले होते. त्याद्वारे तळांमध्ये संपर्क ठेवता येत होता. विदेशसंचार निगम, दिल्ली यांनी इमरसॅट-B चे टर्मिनल दिले होते. जयवंत तहसीलदार आणि उदय कोळवणकर या दोघांनी आपलं सर्व कसब या दोन्ही यंत्रणा कार्यरत ठेवण्यात वापरलं होतं.''

या सॅटेलाईट फोनद्वारे दिल्लीतील मौसम भवनचे गोयलसाहेब यांच्याशी मोहिमेने संपर्क ठेवला होता. ८ मे ते १२ मे तुफान हिमवृष्टी झाली, त्याचा अंदाज त्यांनी योग्य प्रकारे दिला होता. साधारण १८ ते २० मे दरम्यान स्वच्छ हवा मिळेल असा संदेश त्यांनी दिल्यावर शिखर चढाईची जय्यत तयारी सुरू झाली.

सुरेन्द्र सांगतात, ''१४ मेला नेते हृषिकेश यादव यांनी मला पहिल्या प्रयत्नासाठी नियुक्त केले, असे सांगून

**नग श्रेष्ठ उत्तुंग नभाचा सहवासी साचार. तोच आमुचा अविचल साथी अमुचा रक्षकार.**

ध्वज दिला. त्या क्षणाला एक जबाबदारीचे ओझे अंगावर घेतल्यासारखे वाटले. कारण मोहिमेला यशस्वी करण्याचा पहिला मान मला मिळाला असला तरी ते तितकेच कठीण कामही होते. या वेळी तिसऱ्या तळावरून निघून मी एकाच दिवशी चौथा तळ पार करून पाचव्या तळावर पोहोचलो. उंची ७५०० मीटर. १५ मेला पुन्हा हिमवृष्टी सुरू झाली. त्यामुळे तळ सोडला नाही. वादळी वारे जबरदस्त होते आणि १६ मेच्या सकाळीही वारे चालूच राहिले.''

हिमालयात अशा वेळी योग्य निर्णय घेणे खरोखरच कठीण असते. गिर्यारोहक कातळारोहण करून अवघड कातळ पार करतात. गगनभेदी हिमउतार लीलया ओलांडतात. बर्फाची भिंत, क्रिव्हासचे भाग दोराचा कुशल वापर करून सहज मागे टाकतात. सुसज्ज सामग्री वापरून थंडीपासून बचाव करतात. पण खराब हवामानापुढे कोणाचे काही चालत नाही.

सह्याद्री आणि अगदी प्राथमिक शिक्षणक्रमातून शिकलेली सर्व कौशल्ये त्यांना याही मोहिमांत उपयोगी पडलेली होती. पण एव्हरेस्टवरचे खराब हवामान धडकी भरवणारे होते. अर्थात यासाठी सुसज्जता होतीच. हृषिकेश यादव सांगतात, ''शेर्पा सरदार दावा, ताशी, टामटिंग, निमा व ग्यालझम असे या मार्गांनी पूर्वी चढाई केलेले उत्तम शेरपा आम्ही सोबत घेतले होते. रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट, दिघी या संस्थेने विकसित केलेली उत्तम सामग्री दिली होती. परदेशातून आयात केलेली उत्कृष्ट सामग्री आम्ही खरेदी केली होती. R & D दिघी यांनी ॲव्हलांच व्हिक्टिम डिटेक्टर आणि हायपरबेरिक चेंबर दिले होते. आधारतळावर एक वाहन सदैव तयार होते. डॉ. चव्हाण बारकाईने सर्वत्र लक्ष ठेवून होते. कोणत्याही आपत्कालासाठी सिद्धता ठेवली होती.''

पण वादळ, खराब हवामान हे एव्हरेस्टसारख्या ठिकाणी खरी परीक्षा घेते. १६ मेला सुरेन्द्र तळ पाचवरच राहिले. आणखी फारतर एकच दिवस तिथे राहता येणार होते. अन्यथा माघार व पुन्हा वर जाणे शक्य नव्हते. पण १७ मेस वादळ शमलं.

सुरेन्द्र सांगतात, ''पाचव्या तळावरून निघालो. चार शेर्पाही मला सामील झाले. हिम, बर्फ अन दगडांचे भाग अशा विचित्र भूरचनेतून चढाई करीत सहाव्या तळावर पोहोचलो, तेव्हा खूप दमलो होतो. त्यातच तिथल्या तंबूची म्हणजेच आमच्या निवाऱ्याची पार वाताहत झाली होती. अखेर आम्ही पाचजणांनी त्या एका मोडक्या तंबूतच रात्र बसून काढायची ठरवली. ऑक्सिजन मास्क लावून कृत्रिम ऑक्सिजनच्या मदतीने आम्ही झोपेचा प्रयत्न करू लागलो.''

कॅम्प ६ म्हणजे समुद्रसपाटीपासून ८३०० मीटर उंच. अर्थातच वैज्ञानिकदृष्ट्या मृत्यू विभाग. हवेचा दाब समुद्रसपाटीस १०१.३ किलोपास्कल असतो तर एव्हरेस्टच्या उंचीवर तो ३०.८ किलोपास्कल होतो. मुळात २१% असलेला ऑक्सिजन इतक्या कमी दाबामुळे ८००० मीटर उंचीवर मानवी शरीराला जवळजवळ मिळेनासाच होतो आणि त्यामुळे शरीर कार्यक्षमता गमावते. अर्थात ज्याचा मनोनिग्रह उत्तम व प्रबळ तोच तिथे कार्य करू शकतो. (कृत्रिम ऑक्सिजन हुंगूनही)

मोरेश्वर सांगतात, ''रशियन बनावटीचे 'स्वेझदा' सिलिंडर आम्ही वापरले. एकाचे वजन ४ ते ८ किलो, तर नळ्या, फुगा, मास्क असे धरून वजन ५.५ किलो एवढे होते. पाचव्या तळापासून ऑक्सिजन वापरण्यास सुरुवात केली होती. झोपताना एका मिनिटात २ लिटर असा वापर असे. तर चढाई करताना ४ लिटर/मिनिट वापर असे. या वापराप्रमाणे अनुक्रमे १० व ५ तास एक सिलिंडर चालतो.''

१८ मे १९९८ पहाटेचे ३ ।। वाजले.

सुरेन्द्र सांगतात, ''मी मुख्य तळाला, शिखर प्रयत्नाला निघत असल्याचे कळवले. चढ चांगला उभा होता. अतिशय मंदगतीने एक एक पाऊल निर्धाराने वर ढकलत आम्ही चढू लागलो. ईशान्य धारेवर पोहोचून आम्ही शिखराच्या दिशेला तोंड केले. आणि पहिली पायरी जवळ आली तेव्हा ५.३० वाजले होते. साध्या चढावरून चढतानाही दमछाक होते तर इथे कातळातून खडे चढायचे काम असते. म्हणून याला बगल देऊन नेहमी चढाई केली जाते. पण बगलेवर खूप निसरडे बर्फ होते. त्यामुळे आम्ही कातळातल्या



**अंगावरती नद्या खेळती सहस्त्र त्या श्रीमान समुद्धीचे नंदन फुलते स्वर्गाचे प्रतिमान**

शिडी चढून दुसरी पायरीही आम्ही पार केली. ही पायरी पार करायला आम्हाला १ ।। तास लागला. मी पुन्हा संदेश पाठवला. त्यांनी दुर्बिणीतून आम्हाला बघत असल्याचे कळवले, त्यामुळे माझा उत्साह वाढला.

तेवढ्यात ढग जमा झाले. काही दिसेना. आम्ही चिंताग्रस्त झालो. शेरपा दावा व अन्य शेरपांनी नेपाळी प्रार्थना म्हणायला सुरुवात केली. आणि आश्चर्य म्हणजे पाच मिनिटांत हवा स्वच्छ झाली. शिखराजवळचे खडक दिसू लागले. प्रत्येक पाऊल आत्मविश्वास वाढवत होते. आईस ॲक्सला लावलेला तिरंगा अन् त्याखाली भगवा ध्वज लावून मी एक विलक्षण अनुभूती घेत होतो.



पायऱ्यांवरून चढाई केली. अर्थात इथेही खाचाखळग्यात हिम व बर्फ अडचणी निर्माण करत होतेच. अडीच तासांनी पहिली पायरी चढून झाल्यावर मुख्य तळावर वॉकीटॉकीतून संदेश दिला. सगळ्यांनी आनंद व्यक्त केला व काळजी घेण्यास सांगितले.

खिळ्यांचा वापर करून आम्ही आवश्यक तिथे दोर लावत होतो. शेरपांची ताकद मोठी अफाट. ते नसताना चढाई करणे फारच कष्टदायी होईल. डावीकडे कांगशुंग छातीचा भाग येतो. इथे घसरले तर सरळ दोन हजार मीटर खोल गर्तेत पडावे लागेल. एव्हरेस्टच्या दक्षिणेचे ल्होत्से शिखर डोकावत होते. चांगसे पार तळात दिसत होते. मकाळू हे आठ हजारी शिखर दूरवर दिसत होते.

९.३० वाजले दुसरी पायरी समोर आली. कातळाच्या वरच्या भागात एक शिडी दिसत होती. १९७५ मध्ये चिनी तुकडीने ती लावली आहे. प्रचंड दमछाक होत होती. तरी जिद्दीने ती

दुपारी १२.१५ वाजता मी संदेश पाठवला ''– मी एस. ए. बोलतोय एव्हरेस्ट शिखरावरून'' सर्व तळांवर आनंदाला उधाण आलं. मोहीम फत्ते झाली होती. मुंबई–दिल्लीशी थेट संपर्क साधून सुरेन्द्र चव्हाणांचे मनोगत ऐकवण्यात आले.

हृषिकेश यादव सांगतात, ''शिखरावर पोहोचण्यापेक्षा उतरणे अधिक अवघड असते. शिवाय लवराज जर शिखर चढू शकता अधिक सोनं

**मराठी एव्हरेस्टवीरांनो!**

घुमविलीत लाडकी मराठी
एव्हरेस्टच्या हिमशिखरावर
चिपळ्या घेऊन नाचु लागले
प्रसन्न चित्ते गौरीशंकर

भगवा झेंडा फडफडला हो
एव्हरेस्टच्या वाऱ्यावरती
गर्वाने तटतटू लागली
मराठमोळी भोळी छाती

कसे करावे तुमचे कौतुक
उचंबले मनि माय मराठी
लाख लाख गीतांचे औक्षण
नवे पराक्रम करण्यासाठी!

●●

**सरिता पदकी**
दशभुजा गणपतीजवळ,
कर्वे रस्ता, पुणे ४.



**गिरीदरीतुनि झरे-नव्हे हे हिरे उसळती निळे ढगाढगातुनि अन् पाऱ्यापरि, ऊन गळे कोवळे**

लुटल्यासारखं होणार होतं. हवेचा अंदाज येताच लवराज धर्मसक्तुंना तळ ६ वर जाण्यास सांगण्यात आलं. सुरेन्द्र पाचव्या तळावर सुखरूप मुक्कामाला आले.

लवराज व शेरपा यांनी १९ मे रोजी पहाटे ३ वाजता तळ सोडला आणि सकाळी ९.४५ वाजता शिखर गाठून, दुधात साखर घातली.

मोरेश्वर सांगतात, ''लवराज म्हणजे अतिशय शिस्तबद्ध गिर्यारोहक. स्वच्छता प्रिय, कितीही थंडीवाऱ्यात तंबूच्या बाहेर जास्तीत जास्त राहात होते. कणखर शरीर व न थकणारे असे ते आहेत. आणि सुरेन्द्र चव्हाण हे स्वत:च्या सक्षमतेवर पूर्ण विश्वास असणारे आणि पुढाकार घेणारे कसलेले गिर्यारोहक होते.''

२४ मे ला नेपाळमध्ये मिरवणूक काढून जोराचे स्वागत झाले. मुंबई-पुण्यातही सर्व सदस्यांचे अभूतपूर्व स्वागत झाले. मुख्यमंत्री मनोहर जोशी, माननीय शरद पवार, पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी, राष्ट्रपती के. आर. नारायणन या सर्वांनीच यांचे कौतुक केले. १५ ऑगस्ट १९९८ च्या संचलनात सहभागी होण्याचा मान या सर्वांना मिळाला. या परते अन्य भाग्य कोणते!

तेनसिंग व हिलरी १९५३ ला एव्हरेस्ट शिखरावर सर्वप्रथम पोहोचले. मग या लोकांनी इतका खर्च, परिश्रम करून यावर चढून काय मिळवलं असा प्रश्न विचारला असता मोरेश्वर कुलकर्णी सांगतात, ''आषाढीला जसे हजारो वारकरी पंढरपूरला जमतात, तसे दरवर्षी जगभरातून गिर्यारोहक एव्हरेस्टला जमतात. एक खेळ करून दाखवण्यासाठी. निसर्ग व नियती अनेक वेळा त्यांच्याशीच क्रूर खेळी करते. पण या जगन्मातेच्या उदरात विसावून जाण्यात कोणालाच खंत वाटत नसते. असंच हे शिखर आहे - चोमोलुंगमा अर्थात सागरमाथा.''

राजेश पाताडे म्हणतात.

''गिर्यारोहक हा सांघिक खेळ आहे. मला शिखरावर जाण्याची संधी मिळाली नाही याचं वाईट वाटतं, पण खंत नाही. कारण सुरेन्द्र, लवराज आणि शेरपांनी शिखर गाठलं म्हणजे आम्हीही गाठलंच की. त्यांच्या यशाचा सन्मान झाला म्हणजेच आमचाही झालाच यात शंका नाही.''

''आकांक्षापुढती जिथे गगन ठेंगणे' ही महाराष्ट्र गीतातील उक्ती आम्ही महाराष्ट्रीयांनी खरोखरच सार्थ केली.'', असे सांगून हृषिकेश यादव पुढे म्हणतात, ''भारताच्या स्वातंत्र्य सुवर्ण महोत्सवासाठी आम्ही मराठ्यांनी भारताला दिलेली ही एक सुंदर भेट आहे.

एव्हरेस्टसारखी ८००० मीटर उंचीची शिखरे चढणे गिर्यारोहण खेळातील उत्तुंग धाडस आहे, पण ते तितकेच खर्चिक आहे. आर्थिक व्यवस्थापन व इतर व्याप जमले तर जरूर अशा मोहिमा योजाव्यात, पण मूठ भरली नाही तरी लहान उद्दिष्टे अनेक आहेत. कमी उंचीच्या शिखर मोहिमा अतिशय कमी खर्चात योजता येतात आणि एव्हरेस्टइतकाच आनंद कोणत्याही शिखरावर लुटता येतो.

पण खरं म्हणजे सुरेन्द्र चव्हाण म्हणतात त्याप्रमाणे, ''शिखरावर खरा आनंद घेता येत नाही. त्याचा उपभोग आपल्या माणसात येऊन तो आनंद वाटल्यावरच घेता येतो. युवा पिढीला आपलं संपूर्ण व्यक्तिमत्त्व घडवायला गिर्यारोहणासारखा उत्तम खेळ नाही. माझाही हा खेळ पुढे चालूच राहील. मला जे काही या खेळातून शिकायला मिळालं ते धन मी वाटत राहणार आहे. आणि आता मिळणाऱ्या मान-सन्मान धनाचे वाटेकरी माझे सर्व सहकारी सदस्य, त्यांच्या संस्था आणि हितचिंतक, गिर्यारोहण खेळाचे प्रेमीच आहेत. गिर्यारोहण खेळासाठी एक निधी जमवण्याचा मानस आहे. ज्यायोगे या खेळात धडपडणाऱ्या युवकमित्रांना त्याचा लाभ गेता येईल.''

●●

---

*(हृषिकेश यादव (नेता), सुरेन्द्र चव्हाण (शिखरारोहक) मोरेश्वर कुलकर्णी आणि राजेश पाताडे यांच्या मुलाखती साईप्रकाश बेलसरे, श्रीपाद सपकाळ, आनंद पाळंदे यांनी घेतल्या.)*

**शब्दांकन - आनंद पाळंदे**

२/३ एरंडवन, कर्वे मार्ग, पुणे - ४

## साबणाची अदलाबदल

शामराव आणि त्यांची पत्नी १७ दिवसांसाठी अभयारण्यात प्रवासासाठी गेले. त्यांच्याबरोबर शेजारचा अमितही होता. सामानामध्ये अमित साबण नेण्यास विसरला. शामरावांजवळ साबणाच्या दोन वड्या होत्या. त्या जंगलात साबण मिळणे अशक्य असल्याने त्यांनी त्या साबणाच्या वड्या पुरवून वापरण्याचे ठरविले. शामरावांनी आपल्या जवळची एक वडी अमितला दिली व दुसरी वडी त्या दोघा पतीपत्नींनी एकत्र वापरली. काही दिवसानंतर त्यांनी वडीची अदलाबदल केली आणि संपूर्ण प्रवासभर तो साबण पुरवला. प्रवासाच्या शेवटी शामरावांकडे एक चतुर्थांश वडी आणि अमितकडे एक तृतीयांश वडी शिल्लक होती. सर्वांनी सर्व दिवस सारखाच साबण वापरला हे गृहीत धरून, त्यांनी साबणाची अदलाबदल कितव्या दिवशी केली?

●●

**धवल सृष्टि, धवल गगन, दशदिशाहि धवल वदन, प्रगट मूर्त रूप की धवलता जाहली?**

# हसा आणि हसवा

**बाळ गाडगीळ**

**हा**स्य आणि विनोद यांना आपल्या माणसांच्या जीवनात एक फार महत्त्वाचं स्थान आहे. पण दुर्दैवाची गोष्ट अशी की ही गोष्ट मोठमोठ्या समजल्या जाणाऱ्या लोकांना समजलेली नाही. इतरांचं तर सोडाच, पण स्वत: विनोदी लेखन करणाऱ्या अनेक लेखकांनाही त्याची जाणीव नाही. विनोद आणि त्यामुळे निर्माण होणारं हास्य हा एक फार तर तोंडी लावण्याचा प्रकार आहे, असं त्यांना वाटत असावं. पण ते बरोबर नाही.

हास्य-विनोदांमुळं आपलं जीवन समृद्ध करणारं, आपलं मन आणि शरीर यांना सुदृढ करणारं जीवनसत्व मिळतं. आपलं मानसिकच नव्हे, तर शारीरिक आरोग्यसुद्धा त्यामुळं सुधारतं. महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही गोष्ट आता पुस्तकी ज्ञानापुरतीच राहिलेली नाही. विशेषत: अमेरिकन डॉक्टरांनी ती सिद्ध केली आहे. एवढंच नव्हे, तर एकट्या अमेरिकेतच दोन मोठे हास्य-प्रकल्प आहेत. साध्या भाषेत हसण्याच्या शाळा आहेत. डॉ. गुडमन नावाचे सद्‌गृहस्थ अशी एक मोठी शाळा किंवा महाविद्यालय न्यूयॉर्क शहरात चालवितात. कॅथरिन फेरारी नावाच्या बाई असे महाविद्यालय कॅलिफोर्नियात चालवितात. १९३६ मध्ये लिहिल्या गेलेल्या एका ग्रंथात प्रो. स्टीव्हन लीकॉक या सुप्रसिद्ध विनोदकारानं तर विनोद हा विषय महाविद्यालयातून शिकवला जावा, असा आग्रह धरला आणि स्वत: त्याचा अभ्यासक्रमसुद्धा तयार केला. आपल्या मराठी भाषेपुरतं पाहायचं तर आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांना जीवनातील हास्यविनोदाची महती कळली होती. त्यांच्याच शब्दांत



सांगायचं तर, 'विनोद हा काही नुसता शब्दांचा खेळ नाही. ती जीवनाकडे पाहण्याची एक विशाल दृष्टी आहे. माणसाला लाभलेले विनोद हे एक महान तत्त्वज्ञान आहे, यात मुळीच शंका नाही. जीवनातल्या जंजाळाकडे खेळकर वृत्तीनो पाहणे याचंच नाव विनोद...' विनोदी लेखक हा समाजाचा एक मित्र आणि उपकारकर्ता आहे. अशा आपलेपणाच्या आणि कृतज्ञतेच्या भावनेने समाज ज्या दिवसापासून विनोदाकडे पाहायला लागेल तो सुदिन.

मी तुम्हाला एक गोष्ट सांगतो :

*एका माणसानं सूर्यदेवाला सांगितलं - 'देवा, पृथ्वीवर मला अशी एक जागा सापडली की जिथं कायम अंधारच असतो.'*

*'अशक्य, केवळ अशक्य' सूर्यदेव म्हणाला, मग त्यानं त्याला सांगितलेल्या जागी जाऊन तिथला कानाकोपरा धुंडाळला. परंतु छायेचा, अंधाराचा एक लहानसा कोपराही त्याला कुठं आढळला नाही.*

या गोष्टीचा अर्थ सरळ आहे. तो असा की तुम्ही जिथं जाल तिथं आपला सूर्यप्रकाश बरोबर घेऊन जा. म्हणजे तुमच्या जीवनातल्या अंधाऱ्या जागा नाहीशा होतील. थोडक्यात, म्हणजे हास्याचं छत्र डोक्यावर धरा...

कोणी कोणाला उपदेश करू नये असं म्हणतात. कारण दोन. पहिलं : उपदेश फुकट मिळतो. दुसरं : तो कोणी घेत नाही. हे खरे आहे. म्हणून केवळ माझ्या वयाचा फायदा घेऊन मी तुम्हाला उपदेश करीत नाही. पण मनापासून सांगतो. तुम्ही स्वत: हसा आणि इतरांना हसवा. स्वत:च्या आणि इतरांच्या जीवनातल्या दु:खांचा, चिंतांचा भार हास्यविनोदामुळं हलका होईल. चित्तवृत्ती उमलतील, फुलतील. जीवनात जगण्यासारखं काही आहे, असं वाटायला लागेल.

हास्यकथा हा एक थोर वाङ्मयप्रकार आहे. 'हास्यकथा ही एक केवळ हसण्यावारी नेण्याची गोष्ट नव्हे. 'प्रत्येक चांगल्या हास्यकथेत जीवनाविषयी एक महत्त्वाचं सत्य दडलेलं असतं' असं एका तज्ज्ञानं म्हटलं आहे.

या निमित्तानं मी तुम्हाला काही निवडक हास्यकथा सांगणार आहे.

ज्यू लोकांच्या हास्यकथा या जगप्रसिद्ध आहेत. त्यातली एक तुम्हाला सांगतो :

**१. ज्यूंची हुशारी**

*आगगाडीच्या एका डब्यातून एक रशियन आणि एक ज्यू असे दोघे प्रवास*

**सुहास्य कलिका करी उमलुनी लता बावरी जगी दरवळे तिच्या परिमलांतली माधुरी.**

*करीत होते.*

*बोलता बोलता तो रशियन अधिकारी त्या ज्यू माणसाला म्हणाला,*

*'काय हो, तुम्ही ज्यू लोक, इतके हुशार समजले जाता त्याचं कारण काय?*

*'अर्थातच माझ्याजवळ असलेली ही हेरिंग माशाची डोकी.' तो ज्यू म्हणाला.*

*'अच्छा!' असं म्हणत त्या रशियन अधिकाऱ्यानं हेरिंग माशाच्या डोक्यांची ती जोडी दोन रूबल्सना विकत घेतली.*

*थोड्या वेळानंतर तो रशियन अधिकारी म्हणाला, 'काय रे सद्‌गृहस्था, एका सबंध हेरिंग माशाला फक्त ५० कोपेक म्हणजे अर्धा रूबल पडतो. तू तर त्याच्या नुसत्या डोक्याचे पैसे घेतलेस!'*

*यावर बिलकुल न डगमगता तो ज्यू म्हणाला.*

*'बघा, मी तुम्हाला सांगितलं नव्हतं! या माशाच्या डोक्यांचा गुण दिसायला लागला की नाही लगेचच्या लगेच.'*

**२. शहाणपण**

*एक सिंह, एक लांडगा आणि एक कोल्हा असे तिघेजण शिकारीला निघाले. प्रत्येकाने एकेका हरणाला मारले. मग तिघे एकत्र जमले. शिकारीची वाटणी कशी करायची याबद्दल त्यांची चर्चा सुरू झाली.*

*'तुला काय पाहिजे रे बुवा?' सिंहानं लांडग्याला विचारलं.*

*'सरळ आहे. प्रत्येकाला एक हरिण मिळालं पाहिजे.'*

*लांडगा असं म्हणायचा अवकाश सिंहानं त्यालाच मटकावून टाकलं.*

*मग सिंहमहाराज कोल्ह्याकडे वळले.*

*'तू काय म्हणतोस बाबा?' सिंहानं कोल्ह्याला विचारलं.*

*कोल्ह्यानं अतिनम्रपणे आपण स्वत: मारलेलं हरिण सिंहाला दिलंच. शिवाय लांडग्यानं मारलेलं हरिणही आपणच घ्यावं, असं तो सिंहाला म्हणाला.*

*'काय रे, हे शहाणपण तुला कुठून आलं बरं?' सिंहाने पुसले.*

*'लांडग्याकडून' कोल्हा उत्तरला.*

**३. नातेवाईक**

*आचार्य अत्र्यांच्या 'शिवशक्ती' इमारतीच्या बाहेरील रस्त्यावर एक गाढव मरून पडले होते. त्याची दुर्गंधी सुटली आणि येणाऱ्या जाणाऱ्यांना त्याचा उपद्रव होत होता.*

*ही गोष्ट अत्र्यांच्या लक्षात येताच त्यांनी मंत्रालयात फोन जोडावयास सांगितले. थेट आरोग्यमंत्र्यांच्या टेबलावरचाच फोन.*

*आचार्यांचाच फोन म्हटल्यामुळं मंत्रीमहोदयांनी तो लगेच घेतला.*

*'नमस्कार साहेब... काय हुकुम?'*

*'हुकुम कसला देणार आम्ही तुम्हाला? पण एक बातमी देणार होतो. आमच्या शिवशक्तीच्या बाहेर एक गाढव मरून पडलं आहे. फार उपद्रव होतोय त्याचा सर्वांना. काहीतरी व्यवस्था करायला पाहिजे ताबडतोब.' आचार्यांनी सांगितले.*

*त्याबरोबर मंत्रीमहोदयांचा पारा एकदम चढला. पण आपली कोणाशी गाठ आहे हे माहीत असल्यामुळं ते त्यातल्या त्यात सौम्यपणानं म्हणाले,*

*'ठीक आहे. पण गाढव मेलं म्हणून मला फोन करण्याचं कारण काय? महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याला का नाही कळवीत?'*

*'त्याचं काय आहे साहेब, की मी रिवाजाप्रमाणं काम केलं.' अत्रे मिष्किलपणे म्हणाले.*

*'रिवाज? कसला रिवाज? मंत्र्यांचा स्वर चढला.*

*'रिवाज आपल्याला माहीत नाही? आश्चर्य आहे. अहो, कोणीही असं मेलं की त्याच्या अगदी जवळच्या नातलगाला प्रथम कळवायचं असा रिवाजच आहे.' आचार्यांनी हसतहसत सांगितले.*

**४. किटलीतील राक्षस**

*एका तरुण पाकिस्तानी सरकारी अधिकाऱ्याची नुकतीच शादी झाली होती. आणि राहण्याची जागा मिळविण्यासाठी त्याची जोरदार खटपट चालली होती.*

*अखेरचा उपाय म्हणून त्याची आई त्याला म्हणाली, 'बेटा त्या फकिराकडे जा. तो तुला काही मार्ग दाखवील.'*

*त्याप्रमाणे तो तरुण त्या फकिराकडे गेला.*

*'मला एक छोटसं घर हवं आहे. फार महागडं वगैरे नको. फक्त तीन खोल्या, एक स्वयंपाकघर, एक न्हाणीघर, लहानशी गच्ची आणि शक्य तर टेलिफोन आणि...'*

*'ठीक आहे' फकीर म्हणाला, 'हा धूप घे, तो निळ्या रंगाच्या एका किटलीत पेटव. पेटवलास की किटलीतून एक छोटा राक्षस बाहेर येईल, तो तुझी ईच्छा पूर्ण करील.*

*फकिराच्या सांगण्याप्रमाणे त्या*



हासुनी सदा सोसावे। शुभ बोल मुखे बोलावे। इतरां न कधी सांगणे । जरी घरात काही उणे।।

*तरुणाने तो धूप एका छोट्या निळ्या किटलीत पेटवला. तो पेटवताच फकिराने सांगितल्याप्रमाणे झाले. तो छोटा राक्षस त्या धुरातून दिसायला लागला. मग तो त्या तरुणाला सलाम करून म्हणाला.*

*'तू इच्छा सांगायची आणि मी ती पूर्ण करायची... बोल काय पाहिजे?'*

*'तसं काही फार नको. एक छोटा फ्लॅट. फार महागडा नव्हे. तीन खोल्या, एक स्वयंपाकघर, न्हाणीघर, छोटीशी गच्ची आणि शक्य तर एक टेलिफोन...' तरुण अधिकारी म्हणाला.*

*'एवढं पुरे' म्हणतोस अरे दीडशहाण्या, माझ्याजवळ जर तीन खोल्यांचा फ्लॅट असता तर मी त्या चहाच्या किटलीत कशाला अडमडायला गेलो असतो?' राक्षस वैतागून म्हणाला.*

**५. राक्षसाचे हृदय**

*चिंतोपंत एकदा एका राक्षसाच्या तावडीत सापडले.*

*केवढा प्रचंड राक्षस तो! ताडमाड, उंच अक्राळविक्राळ, त्याचे ते प्रचंड सुळे, लांब लांब अणकुचीदार नखे, त्याचा प्रचंड देह. त्याची गर्जना तर विचारूच नका. त्याच्या गर्जनेने सारे रान हादरून निघे, वृक्ष गदागदा हलत, तलावाच्या पाण्यावर मोठ्या लाटा उसळत, शिवाय त्याचे मोठमोठाले डोळे, लालीलाल प्रचंड कपाळ, लांब लांब केस.*

*सगळंच भयानक!*

*अशा भयानक राक्षसाच्या तावडीत चिंतोपंत सापडले. राक्षसानं चिंतोपंतांना पाहिलं मात्र तो त्याच्या नित्याच्या सवयीप्रमाणे खदाखदा हसला. बखोटीला धरून त्यानं चिंतोपंतना वर उचलले आणि आपल्या डाव्या हाताच्या पंजावर ठेवले.*

*त्याच्या हसण्यानं तर चिंतोपंतांची पाचावर धारणच बसली. पंतांना घाबरलेलं पाहून राक्षस भलताच खूष झाला. तो आणखीनच हसायला लागला.*

*चिंतोपंतांना वाटलं की हा आता आपल्याला खाणार. मग आपलं काय? त्यापेक्षाही आपल्या घरच्यांचं काय? शेवटी आपले दोन्ही हात कोपरापासून जोडून ते राक्षसाला म्हणाले,*

*'राक्षसराव, मला खाऊ नका हो. मी गेलो तर माझी बायका-मुलं उघड्यावर पडतील. त्यांचं कोण पाहणार हो? कुत्रासुद्धश नाही हो त्यांचे हाल खाणार...' आणि याशिवायही वेगवेगळ्या शब्दांत चिंतोपंतांनी राक्षसापुढं अगदी गयावया केली.*

*मग गंमतच झाली. राक्षस एकाएकी हसायचा थांबला आणि चिंतोपंतांकडे निरखून पाहात तो म्हणाला,*

*'अरे क्षुद्र माणसा, तुला खाऊन मला काय मिळणार आहे? तू माझ्या दाढेलासुद्धा लागणार नाहीस. शिवाय तुझे विचारसुद्धा किती क्षुद्र आहेत? माझा अक्राळविक्राळ देह, माझा रानदांडगेपणा पाहून तुला वाटलं की मी तुला ठारच मारणार. अरे मूर्ख माणसा, मी राक्षस असल्यामुळंच इतका प्रचंड झालो आहे आणि माझे सगळेच मोठे आहे. पणे अरे अडाण्या, तुझ्या हे कसं लक्षात आलं नाही की माझ्या शरीराइतकंच माझं हृदयही मोठं आहे. निदान असू शकेल?'*

*...अशा प्रकारे चिंतोपंतांची कान-उघाडणी करून त्या राक्षसाने चिंतोपंतांना आपल्या तावडीतून मोकळे केलेच. पण शिवाय बरीच धनसंपत्ती, खाद्यपदार्थ,*



*वस्त्रप्रावरणे देऊन त्याने चिंतोपंतांची बोळवण केली.*

'मित्रहो, मी हास्यकथांची शेकडो पुस्तके वाचली आहेत आणि हजारो हास्यकथा मी तुम्हाला सांगू शकेन. पण ती साधी गोष्ट आहे. मनात आणलेत तर तुम्हीही ते करू शकाल.

ते काहीही असो. आपण हसणे आणि इतरांना हसविणे हे महत्त्वाचे आहे.

एक गोष्ट मात्र अति महत्त्वाची. हसायचे ते स्वत:ला इतरांना नव्हे. कॅथरिन फेरारी म्हणतात त्याप्रमाणे 'हास्याचे सर्वोच्च स्वरूप म्हणजे स्वत:ला हसणे. त्याची अगदी नीच पातळी म्हणजे दुसऱ्याला हसणे.'

चिमणरावांच्या कथा तुम्ही वाचल्या असतील तर तुम्हाला आठवेल की ते स्वत:ला अधिक वेळा हसत असतात. हास्याने दुसऱ्याला दुखापत होऊ नये हे महत्त्वाचे आहे. स्वत:ला हसणे हे खरे निरागस हसणे, सुंदर हसणे.

मला वाटतं की हे आपल्याला साधलं पाहिजे.


●●

**बाळ गाडगीळ**
इ १ भारतनगर १०४/१/१,
एरंडवन, पुणे ३८

**हासत हासत जीवन जगावे, इतरांसही सदा हासवावे, राग, दु:खावर पांघरावे, असे हसणे दुर्मिळ नसावे.**

# देवाची लिपी वाचणारे अनुभवसंपन्न लेखक – गो. नी. दाण्डेकर

शैलजा देशमुख



*'आईची देणगी', 'तुडवलेले घरकुल' इ. पुस्तकांचे लेखक म्हणून प्रसिद्ध कादंबरीकार गो. नी. दाण्डेकर यांच्या साहित्याशी तुमचा परिचय झालेला असेलच. साहित्याच्या विविध प्रांतांत वैशिष्ट्यपूर्ण लेखन करणारा, अस्सल प्रादेशिकता कादंबरीत आणणारा, निसर्ग आणि इतिहास यांच्यावर प्रेम करणारा, संतपरंपरेवर गाढ श्रद्धा असणारा आणि भ्रमंतीतून समृद्ध झालेला मराठीतील सिद्धहस्त कादंबरीकार म्हणजे गो.नी.दाण्डेकर! १ जून १९९८ रोजी त्यांचे दु:खद निधन झाले. त्यांचे साहित्य येणाऱ्या पुढील पिढ्यांवर संस्कार करीत राहील. त्यांच्या मनस्वी व्यक्तिमत्त्वाचा आणि अमर साहित्यकृतींचा परिचय करून देत आहेत शैलजा देशमुख. गो. नी. दां. चे विपुल साहित्य मुळातून वाचण्याची प्रेरणा या लेखातून नक्कीच मिळेल.*

अशीच एक पौर्णिमेची चांदणी रात्र! आमच्या शाळेच्या आठवीच्या वर्गाची सहल रायगडावर गेली होती. चांदण्या रात्री गड चढण्याच्या रोमांचकारी अनुभवाचा आम्हा मुलांना कैफ चढला होता. सर्वांच्या उत्साहाला उधाण आलं होतं. फिरताफिरता गडावरील महाराजांच्या कुत्र्याच्या समाधीपाशी आम्ही पोहोचलो होतो. कुणी गप्पा मारीत होतं; कुणी गात होतं; तर कुणी निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेण्यात मग्न... त्याचवेळी गडावरती आलेल्या एका व्यक्तीने आम्हाला हटकलं. 'तुम्ही जिथे हुंदडता आहात त्या जागेचं ऐतिहासिक महत्त्व तुम्हाला माहीत आहे ना? त्याची आठवण ठेवून जरा गांभीर्याने वागा!' आम्ही चपापलो. बघताबघता आमची दोस्ती झाली आणि त्यांनी गप्पांच्या ओघात साक्षात् शिवकाल आमच्या नजरेसमोर उभा केला. ऐकताना जाणवत होतं, त्या व्यक्तीचं इतिहासाचे साक्षी किल्ल्यांवरील प्रेम, तिथल्या निसर्गाची त्यांच्या संवेदनाक्षम मनाला पडलेली भुरळ! थोड्यावेळाने आम्हाला समजलं की आमच्याशी गप्पा मारणारी ती व्यक्ती म्हणजे थोर साहित्यिक गो.नी.दाण्डेकर आहेत. आज जवळजवळ ३५ वर्ष झाली तरी शिवाजीमहाराजांविषयी, किल्ल्यांविषयी, तिथल्या निसर्गाविषयी भरभरून बोलणारं त्यांचं रूप जसंच्या तसं स्मरणात आहे. त्यानंतर वय वाढत गेलं. त्यांच्या वेगवेगळ्या पुस्तकांनी वेगवेगळ्या वयात वेड लावलं. त्यांच्या लेखनातून त्यांची विविध रूपे भेटत राहिली.

अतिशय सात्विक, भावनाशील लेखक म्हणून लहानपणापासून मराठी वाचकाची त्यांच्याशी ओळख होते. गतकालीन जीवनाचा वेध घेण्यात ते रमून गेलेले दिसतात. शितू, पडघवली, पवनाकाठचा धोंडी, जैत रे जैत सारख्या उत्तम प्रादेशिक कादंबऱ्या त्यांनी सुरुवातीच्या काळात लिहिल्या. शिवकाल कादंबऱ्यांतून रेखाटला, ज्ञानेश्वरांच्या जीवनावरील 'मोगरा फुलला' आणि तुकारामांची थोरवी वर्णन करणारी 'तुका आकाशाएवढा' यासारख्या चरित्रात्मक कादंबऱ्याही त्यांनी लिहिल्या. एक कलावंत लेखक याशिवाय गड, किल्ले यांच्या प्रेमापायी सतत भ्रमंती करणारा कुणी एक इतिहास व निसर्गप्रेमी, निसर्गाच्या रूपावर लोभावून ते रूप प्रकाशचित्रात बंदिस्त करायचा ध्यास असणारा वेडा कलावंत; फुले, माती, दगड, खडे जिथेजिथे सौंदर्य दिसेल ते आरपार पाहण्याचा नाद असलेला एक छंदिष्ट अशी गो.नी.दां.ची अनेकविध रूपं त्यांच्या लेखनातून भेटत गेली. हा अवलिया जीवनाचा आस्वाद सर्वांगांनी घेत राहिला.

वृक्षलतामुळे झाला सारा जन्म रसमय। त्यांच्या संगतीत सुख आणि विरहात सय।

नर्मदा परिक्रमा करताना, गाडगेबाबांच्या समवेत काम करताना, संघकार्यात स्वत:ला झोकून देताना तितकाच नि:संगही झाला. ही सगळी रूपं इतकी मोहक होती की इतक्या उत्कटतेने आपल्यालाही जीवन जगता आलं असतं तर... असा सात्विक हेवा वाटत राहिला.

बाराव्या, तेराव्या वर्षी घरातून पळून गेल्यानंतर वयाच्या तिशीपर्यंत घेतलेले अगदी जगावेगळे जीवनानुभव त्यांच्या 'स्मरणगाथा' या आत्मचरित्रात आलेले आहेत, ज्या वयात माणूस घरात राहतो, शाळेत जातो, वडिलधाऱ्या माणसाचे छत्र काही काळ तरी त्याच्यावर असते; त्या काळात दाण्डेकरांना आकाश आणि धरती यावेगळा दुसरा आधार नव्हता. या काळातील त्यांचा प्रवास म्हणजे 'दाहीदिशा मोकळ्या असलेला एकुटवाणा प्रवास!' एक वर्षात स्वराज्य' या घोषणेने भारावून जाऊन तेरा वर्षाचे हे हडकुळे पोर, देश स्वतंत्र करायला घराबाहेर पडून मुंबईला जाते. मात्र वास्तवतेचे दर्शन भ्रमनिरास करते पण त्यापूर्वीच परतीचे दोर स्वत:च छाटलेले असतात. मग सुरू होते ती अविरत भ्रमंती! गाडगेबाबा भेटल्यानंतरच्या भ्रमंतीला एक अर्थ येतो; आधार मिळतो, दिशा मिळते. त्यानंतर मुक्तपणे नर्मदा परिक्रमा करणाऱ्या दाण्डेकरांची व्यक्तिरेखा कमालीची संवेदनक्षम आहे. या अनुभवानंतर काळी काळ रा. स्व. संघाच्या कार्यासही ते वाहून घेतात. तेथील भले-बुरे अनुभव त्यांनी प्रामाणिकपणे रेखाटले आहेत. या सर्व काळात आजार पिच्छा सोडत नाही म्हणून तेही काम सोडावे लागते.


'स्मरणगाथे'च्या शेवटी ते म्हणतात, 'जीवनाविषयी मी अतिशय कृतज्ञ आहे.' हा सर्व प्रवास आहे एका मनस्वी तरुणाचा. स्मरणगाथेच्या पानापानांतून असंख्य व्यक्तिरेखा जिवंत झाल्या आहेत. अनेक वेदनामय जीवनानुभव – त्यातून सत् प्रवृत्तीकडे चाललेला प्रवास येथे दिसतो. अनेक प्रादेशिक बोलींचा वापर ते करताना दिसतात. त्यांच्या कादंबऱ्यांतून असलेल्या बऱ्याच व्यक्तिरेखा, घटना, प्रसंग यांचे मूळ रूप स्मरणगाथेत पाहायला मिळते. त्यांच्या सर्वच कादंबऱ्या वाचल्या तर निसर्गाचं त्यांना असणारं अपरंपार वेड जाणवतं. निसर्गाची अशी ओढ फारच कमी ठिकाणी जाणवते, कारण ही ओढ केवळ नेत्रसुखापुरती मर्यादित नाही. निसर्गातल्या प्रत्येक वृक्षाचं, पानाचं, प्राण्याचं वेगळं वेगळं व्यक्तिमत्त्व त्यांना जाणवत असतं. या निसर्गप्रेमाचं प्रत्ययकारी दर्शन म्हणजे 'माचीवरला बुधा!'

हा बुधा म्हणजे निसर्गाची हाक ऐकल्यावर शहरी जीवनात अस्वस्थ झालेला माणूस. म्हातारपणी सर्व परिस्थिती अनुकूल असूनही त्याला अस्वस्थ करणारी मातीची हालक जबरदस्त आहे. त्या भावनेने विद्ध झालेला बुधा आपल्या गावी परततो. निसर्गाचं गोजिरं रूप पुन्हा पाहताना तो हरवून जातो. त्याचे वृद्धपण हरवते, नव्या जोमाने तो जमिनीची सेवा करू लागतो. तिथली पाखरं, झाडं, म्हशी, कुत्रा या सगळ्यांशी तो तन्मयतेने बोलतो. एका पुनवेच्या रात्री निसर्गाच्या साक्षात्काराचा जिवंत अनुभव घेणारा बुधा निसर्गाच्या कुशीतच सुंदर मरण स्वीकारतो. अशिक्षित बुधाचं हे अनुभवविश्व विलक्षण ताजंतवानं आहे. 'रानभुली'मध्ये गडावर लोभावलेली मनू भेटते, तर 'वाघरू' मध्ये वाघराच्या प्रेमात पडलेला बाबुदा भेटतो. या कथा जशा निसर्गवेड्या माणसांच्या आहेत तशा निसर्गाच्याही आहेत. या कथांमध्ये डोंगर, टेकड्या, नदी, तळी, वृक्ष, लता, वेली यांची रेखीव वर्णने येतात. उदा. ''आवळी चवऱ्या ढाळीत होत्या, वाघाट्या वेलींनी आपले कोवळे हात बाहेर पसरलेले होते. गुंजांच्या शेंगा आपले तांबडे डोळे उघडून रानाकडे टकाटका बघत होत्या.''

'पवनाकाठचा धोंडी' बदलत्या परिस्थितीच्या पुराबरोबर वाहात



**उत्स्फूर्त प्रतिभा उदयास येत क्षणी शब्द सारे जगतात तेथ**



जाणे नाकारतो. तो स्वाभिमानी, विलक्षण जिद्दी आहे; त्याचा पीळ दांडगा आहे. तो जुन्या पद्धतीचा व मूल्यांचा आग्रह धरतो. तो काही वेळा खूप एकांगी वाटतो.

'जैत रे जैत' ही देखील अशीच एका जिद्दी ठाकराची कथा. लहानपणापासून लिंगोबाच्या कड्याला लटकलेल्या मधमाश्यांच्या असंख्य पोळ्यांबद्दल त्याला जिवंत कुतुहल. सुंदर ढोल वाजवणारा नाग्या, पुण्यवंत होण्यासाठी हवे ते करतो. तरीही त्याचा धक्का लागलेला नसताना, मोहोळातून उठलेल्या मधमाश्या त्याला फोडून काढतात. त्यात त्याचा एक डोळा जातो. मग निष्पाप नाग्या माश्यांच्या विरोधात पेटून उठतो. त्याच्यावर जीव टाकणारी चिंधी त्याच्या साथीला येते. अखेर हे अघटित कर्म दोघे पार पाडतात. त्यात चिंधी माश्या चावून बेशुद्ध होते. पण शुद्ध हरपण्यापूर्वी 'राणीमाशी निघून गेल्याचे मी डोळ्याने पाहिले' असे सांगून नाग्याला तू जिंकलास' असे समाधान देते. अत्यंत विलक्षण काव्यमय अशी ही कादंबरी. तिचे वातावरण, ठाकर संस्कृतीच्या आदिम रूपाचे दर्शन, चिंधीची मनस्वी व्यक्तिरेखा यामुळे स्मरणीय ठरते. 'आम्ही भगीरथाचे पुत्र' हीही एका वेगळ्याच जिद्दीची कथा. पंजाब, दिल्ली, राजस्थान या प्रदेशांना नवीन जीवन देण्यासाठी भाक्रा धारण बांधण्याच्या कामात प्राणखुर्ची घालणाऱ्या असंख्य भगीरथपुत्रांचं अमर असं स्मृतिचित्र या कादंबरीच्या रूपाने गो.नी.दाण्डेकरांनी साकार केलंय.

अगदी सुरुवातीच्या काळात लिहिलेली 'शितू' म्हणजे उत्कट तरीही संयत प्रेमाचा आविष्कार. 'पडघवली' ही कादंबरी म्हणजे एका नष्ट होऊ घातलेल्या खेड्याची कथा आहे. 'कुणा एकाची भ्रमणगाथा' ही अगदी वेगळ्याच विषयावरची कादंबरी. 'भ्रमणगाथे'त 'कुणी एक' हा नर्मदा परिक्रमा करतो आहे. त्याच्या भ्रमंतीतील अनुभव विलक्षण दुःखद, भीषण तरीही रसरशीत! भ्रमणगाथेतील 'यशोदा', मृण्मयीतील 'मनोरमा', 'शितू' या नायिका म्हणजे स्त्री जीवनातील दुःखाचा आणि वेदनेचा आविष्कार! शरश्चंद्रांच्या साहित्याचा प्रभाव या सर्व व्यक्तिरेखांवर दिसतो.

१९६७ ते १९७४ या सात वर्षांच्या काळात दाण्डेकरांनी पाच कादंबऱ्या लिहून कादंबरीमय शिवकाल उभा केला. शिवाजी महाराजांवरील उत्कट प्रेम आणि भक्ती या लेखनामागील मुख्य प्रेरणा. 'बया दार उघड' या कादंबरीत शिवाजीपूर्वकालीन समाजस्थितीचे चित्रण आढळते. 'हरहर महादेव' या दुसऱ्या कादंबरीत मावळातील मावळ्यांच्या मनात शिवाजी महाराजांनी पेटवलेल्या स्वराज्य स्थापनेच्या ज्योतीचे आणि लोकजीवनाचे चित्रण दाण्डेकरांनी केले आहे. शिवाजीसारखा दूरदृष्टी असलेला राजा, परकीय आक्रमणापासून देश दूर ठेवायचा असेल तर 'आरमार' उभे करणे महत्त्वाचे आहे हे लक्षात घेऊन, त्या दृष्टीने कसा प्रयत्न करतो याचे चित्रण 'दर्याभवानी'त येते. तर 'झुंजारमाची'मध्ये गड-किल्ले हे स्वराज्य निर्मितीत कसे महत्त्वाचे होते हे जाणून ते उभारण्यासाठी महाराजांनी केलेली धडपड येते. 'हे तो श्रींची इच्छा' या शेवटच्या कादंबरीत शिवराज्याभिषेक व राज्यकारभार यांचे वर्णन आहे. 'शिवकाल' उभा करण्यासाठी काही पात्रे व घटना निर्मून त्यांच्या जीवनात घडलेल्या घटनांतून तत्कालीन लोकजीवनाचे दर्शन दाण्डेकर घडवतात. लेखकाची अमाप बहुश्रुतता, व्युत्पन्नता यांच्या जोडीला इतिहास व निसर्गावरचे प्रेम, बोलीभाषेचा सहज वापर यामुळे या ऐतिहासिक कादंबऱ्यांतून 'शिवकाल' साक्षात् उभा राहतो.

शिवकालावरील ऐतिहासिक कादंबरी लेखनानंतर दाण्डेकर संतचरित्रांकडे वळलेले दिसतात. 'मोगरा फुलला' ही ज्ञानेश्वरांच्या



जीवनचरित्रावरील कादंबरी असली तरी स्वत: लेखकानेच म्हटलंय, ''ही कथा एकट्या ज्ञानोबांची नव्हे तर विठ्ठलपंत, माय रुक्मिणी आणि त्यांची लेकुरे यांची ही कथा आहे.'' या कादंबरीची कथा पात्रांच्या तोंडून आत्मकथन पद्धतीने सांगितली आहे. वास्तव आणि कल्पित यांचा सुंदर समन्वय व्यक्तिरेखांमध्ये आहे. ज्ञानेश्वर व अन्य व्यक्तिरेखा यांच्या भावजीवनाचे उत्कट चित्रण येथे दिसते.

'तुका आकाशाएवढा' या कादंबरीत तुकारामांच्या जीवनातील विविध अवस्थांचे प्रभावी चित्रण आहे. बाल तुकाराम, साक्षात्कारासाठी तळमळणारा तुकाराम, साक्षात्कार झाल्यानंतर शेवटी अज्ञाताची ओढ लागलेला तुकाराम ही तुकारामांच्या व्यक्तिमत्त्वाची विविध रूपे अतिशय देखण्या शब्दकळेत लेखकाने पकडली आहेत. 'दास डोंगरी राहातो' ही रामदासस्वामींच्या जीवनावरील कादंबरी.

दासबोधातील रचनांचा, अतिरिक्त वापर करून लिहिण्याचा प्रयोग लेखकाने केलेला आहे. याशिवाय 'पद्मा' आणि जगन्नाथ पंडित या मध्ययुगीन काळातील कवी जयदेव व जगन्नाथ पंडित यांच्या कथा सांगणाऱ्या कादंबऱ्या!

एकूण गो.नी. दाण्डेकरांच्या साहित्याचा विचार करताना त्यांनी वेगवेगळ्या प्रादेशिक वातावरणाचे चित्रण केलेले आढळते. कोकण, देश, सह्याद्रीतील गडकिल्ले, वऱ्हाड, पंजाब, सिंध, नर्मदाकाठ अशा विविध प्रांतांच्या पार्श्वभूमीवर या वेगवेगळ्या कथा फुलतात. तेथील बोलीभाषांचा अतिशय समर्पक वापर लेखक करताना दिसतो. लहान लहान वाक्ये व संवादात्मकता यामुळे त्यांची भाषा ओघवती झाली आहे. ती केव्हा अचानक काव्यात्म पातळीवर जाते; हे वाचकाच्या लक्षातही येत नाही. उदा. पुरंदरचा किल्ला लढवत असतानाचे वर्णन पाहा–

***''दारूगोळा***
***तो तेवढा पाठवा धनी! तिथं***
***आम्ही उणे पडतो आहोत.***
***वाट बघतोयत काळ्या दारूच्या***
***बाचक्यांची!***
***दारू नव्हे; ती संजीवनी आहे,***
***अमृत आहे.***
***तेवढं लाभू द्या!''***

'झुंजारमाची'मधील दारूगोळा मागणीचे हे निवेदन खूप बोलके आहे. तसेच गडांचे महत्त्व विशद करणारे पुढील वर्णन पाहा –

***''तेव्हा गडकोट हेच राज्य***
***गडकोट म्हणजे राज्याचं बळ***
***गडकोट म्हणजे आपली***
***वसतीस्थळं***
***आपल्या प्रजेचं प्राणरक्षण!''***

प्रतिपाद्य विषय मांडताना दाण्डेकरांच्या भाषेला नकळत एक आंतरिक ताल प्राप्त होतो. तरुण वयात गाडगेबाबांचे शिष्य असताना बाबांनी त्याला मंत्र दिला. **''ही सृष्टी देवाची लिपी आहे, ती वाचावी''** आप्पांनी हा मंत्र शब्दश: अंमलात आणला आणि देवाच्या लिपीतील अक्षरं देवनागरी लिपीतील मराठी भाषेत शब्दबद्ध करण्याचा प्रयोग केला.



**उतरणीची चढण, झुडुपातलं वळण राजगडाच्या मातीला सोन्यामोत्याचं उधाण**

माणसामाणसांतील नातेसंबंधात चढउतार कसे होतात? दु:खाच्या वेगवेगळ्या अवस्थांतून त्याला कसे जावे लागते? माणसाची जिद्द, स्त्रीची सोशिकता यात कोणते सामर्थ्य असते? माणूस आणि निसर्ग यांचं नातं काय? इ. प्रश्नांची उत्तरं शोधण्याचा प्रयत्न गो.नी.दां.नी आपल्या वाङ्मयातून केला. भारतीय परंपरेतील शक्तिस्थानांचा वेध आपल्या कादंबऱ्यांतून घेतला. त्यामुळे संस्कार करण्याचे सामर्थ्य त्यांच्या वाङ्मयाला लाभते. संतांची चरित्रे लिहिताना, इतिहासाला–शब्दरूप देताना विलक्षण हळवी संस्कारक्षमता त्यांच्या शब्दांना प्राप्त होते, हे त्यांच्या वाङ्मयाचं मोठेपण! गो.नी.दां.च्या व्यक्तिमत्त्वाला लाभलेल्या समृद्धीचं मूळ पाहायचं असेल तर त्यांचे 'छंद माझे वेगळे' हे पुस्तक वाचायला हवं. सुरुवातीलाच



लेखकाचे निवेदन यते. ते विलक्षण बोलके आहे.

***''जन्मभर नाना छंदांमागे धावत राहिलो. पायाखाली काय तेही पाहिलं नाही. एक मात्र झालं, आयुष्य बहुश: कधीच उबगवाणं वाटलं नाही. हा छंद, तो छंद असं स्वत:चं कौतुक पुरवीत राहिलो.''***

त्या छंदांसवे वाटचाल करीत असतानाचे काही मोहोरलेले क्षण गो.नी.दां.नी या पुस्तकांत पकडले आहेत. छाया–प्रकाशाचा खेळ कॅमेऱ्यात पकडण्यासाठी धडपडणारा कलावंत, सह्याद्रीच्या कुशीत सापडणाऱ्या पाषाणांतील सौंदर्य पारखणारा रत्नपारखी, झाड–झाडुल्यांचे मैत्र जपत; बनफुलांच्या संगतीत रमणारा निसर्गप्रेमी, पुराणवस्तू जमवणारा नादिष्ट अशी एक ना अनेक रूपे आपल्याला येथे दिसतात. सुंदरसा स्फटिक मिळाल्यावर झालेला आनंद 'मी अगदी स्फटिकवंत, श्रीमंत झालो!' अशा अर्थवाही शब्दांत ते मांडताना शब्दकळेचं हे आगळं सौंदर्य मराठी भाषेलाही 'श्रीमंत' करून सोडतं. या भटक्या अवलियाच्या मनात एक अति संवेदनक्षम रसिक दडलेला होता. या छंदिष्टपणाचा सुगंध त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला लाभला होता. भटकंतीतून आलेले जिवंत अनुभव त्यांच्या वाङ्मयात आले. बहुश्रुतता, व्यासंगी वृत्ती, बोलीभाषांचा अभ्यास, वेगवेगळ्या प्रदेशातील निसर्ग व तेथील माणसे, त्यांचे भावविश्व लेखकाला स्वस्थ




गोनीदांनी स्वत: काढलेला फोटो – 'मैत्र झाडझाडुल्यांचे'

बसून देत नसावे. त्यातूनच त्यांच्या विविध कादंबऱ्यांचा जन्म झाला असावा! आज गो.नी.दां. आपल्यात नाहीत, पण त्यांचं स्वत:चा खास ठसा उमटलेलं साहित्य येणाऱ्या पुढील पिढ्यांवरही संस्कार करीत राहील याबद्दल तीळमात्र शंका नाही. सामान्य वाचकांवर भावनात्मक परिणाम करणारा साहित्यिक म्हणून त्यांचं मराठी वाङ्मयातील स्थान अढळ राहील!

●●

**शैलजा देशमुख**
बी/७, गुरुराज हौसिंग सोसायटी,
पद्मावती, पुणे ३७

**मौनाच्या संध्याकाळी, एकांत बहरुनी फुलला हृदयाच्या झाला थेंब, आभाळ होऊनी झरला.**




झाड झाडून झावळ्या गोड शहारे उधळी बीजगाभ्यातून उठे शीळ हिरवी कोवळी.


**आज** विद्यालयाच्या आवारात आंतरशालेय समूहांच्या क्रीडास्पर्धा होत्या. कोरजाईच्या नामू सारंगाची एकोशी अनेक स्पर्धांत पहिली आली होती. आज तिनं आपल्या खो-खोच्या टीमला फायनलमध्ये विजय मिळवून दिला होता. स्पर्धा जरी पाच वाजता संपल्या तरी विजेत्यांचं कौतुक होतं तोवर अर्धा तास सहज गेला. शेजारची महानंदा तिच्याच टीममध्ये होती आणि प्रेमा पवार त्यांच्या सोबतीसाठी थांबली होती. तिघी घरच्या वाटेला लागल्या तेव्हा साडेपाच होऊन गेले होते.

तिघींनी बाजारातून चटकन पाय काढला आणि घाटी चढू लागल्या. त्या घाटी चढून कातळावर जातात तोवर सूर्य मावळणार होता. संधी-प्रकाशातच त्यांना तीन किलोमीटर कातळ तुडवून घरची घाटी उतरावी लागणार होती. आता या रस्त्याला आणखी कोणीसुद्धा भेटणार नव्हतं. त्या अर्धीशी घाटी चढल्या आणि घाटीच्या वरच्या अंगाला कोणीतरी खाकरलं. मग दोघे चौघे मोठ्यानं हसू लागले.

'मेले...' महानंदा पुटपुटली आणि मोठ्यानं म्हणाली, 'येकू आपण परत बाजारात जाऊ या.'

''कशाला?''

''ती बघ, ती चौकडी बघ.''



सह्याद्रीच्या तळी शोभते, हिरवे तळकोकण राष्ट्रदेवीची निसर्गनिर्मित केवळ नंदनवन.

वरच्या माथ्याच्या खडकावर नरेशची टोळी बसली होती. चौघेही धन-दांडग्यांची अवलाद होती. हल्ली त्यांचे उपद्व्याप वाढल्याची बोलवा होती. चौघेही दोन वर्षांपूर्वी बरोबरच दहावीच्या परीक्षेला बसले होते आणि ठरल्यासारखे चौघेही नापास झाले होते. पुन्हा दोन वाऱ्या करून नापास झाले तेव्हा त्यांनी परीक्षेचा नाद सोडला आणि हे सगळे उद्योग सुरू केले होते. कोणाच्याही बागात शिरून शहाळी काढून खा, खाडी किनाऱ्यानं भटक, शहरात पैसे नेऊन उडव आणि मौज म्हणून कर्ली गावाच्या कुशा भाटकराच्या भट्टीला उदार आश्रय दे, असं चाललं होतं. आता ते बहुधा तिकडूनच आले असावेत. मनातून तिघीही धास्तावल्या. पण एकोशी धीट होती. त्या टोळक्याचं घाटी चढणाऱ्या मुलींकडे लक्ष गेलं.

''कोण रे ती शेलाटी शिंगरी?'' नरूनं विचारलं.

''नामल्या सारंगाचो चेडू.'' राजू हादगे म्हणाला.

''मोठी आखडू दिसतेय. जरा मजा करू या.-''

''बघ, तेच्या कळीक, तू जांव नको. तां प्वार जबरां आसा-'

'हं हं! म्हणून तो उठला तसे बाकीचेही उठले. महानंदा परत जायला वळणार तर एकोशीनं दोन बाजूंनी दोघींचे हात धरले आणि म्हणाली.

''भेदरटांना कसली भितेस? चला-''

जसं अगदी काहीच नाही असं भासवीत त्यांना ओढतच ती पुढं आली. तिचं साहस बघून त्याही दोघी सावरल्या. तिच्यामागून चालू लागल्या.

एकोशीची चाल अगदी ठेक्यात असायची. तिला पंधरावं वर्ष चालू होतं, पण उंच-निंच आणि अंगापिंडानं ती काटक होती. जरा सावळीच पण शाळेतील सगळ्या मुलींत ती उठून दिसे. तरतरीतपणामुळं ती खेळात तर मुळीच मागं नव्हती. शाळेला तिनं फिरत्या ढाली मिळवून दिल्या होत्या. अभ्यासात ती खूप नव्हे पण साठ टक्क्यांच्या आसपास असायची. कोरजाईची वस्ती काही जवळ नव्हती. पाच किलोमीटर चालून यावं लागे. घरची कामं करून ती शाळा करीत होती.

चालता चालता एकोशीनं मनाशी काही निश्चय पक्का केला. ती कोरेजाईकडे जाणाऱ्या पाऊलवाटेशी आली आणि जरा थबकली. कच्ची सडक जरा वळण घेऊन गेली होती. दमछाक करणारा चढाव होता. खडकंही खूप होती. कातरवेळेला जनावरंही त्या वाटेनं पाण्यासाठी उतरत. हसत-खिदळत टारगटपणानं बोलत ती चौकडी शंभर एक पावलांवर आली तशी ती त्या पाऊलवाटेनं वर चढली. त्याही तिच्यामागून गेल्या.

''ते बघ -'' वीसेक पावलं त्या वर गेल्या तसं एका झाळीकडे बोट दाखवीत म्हणाली, 'ते आमची कळ काढायला आले तर दाखवतेच त्यांना शिंगरीचा इंगा.'

मोठ्याने हसत तिघीही आणखी वर चढल्या आणि एका झुडुपाआड थांबल्या. तोवर चारीजण त्या वाटेकडे पोहोचले. नरेश तिथं थबकला तसा राजू म्हणाला,

''आता कशाक तेंच्या वाटेक जातस? सावजां पळाली.''

''जाणाराहेत कुठं? आम्हाला भेदरट म्हटलं त्या शिगरीनं, ते ऐकलं नाहीस? बघंच आता मजा'', असं म्हणत नरेशनं शीळ घालीत त्या पाऊलवाटेवर पाऊल टाकलं.

''मी आपलो वाटेक लागतंय. तुमी मरा तडे -'' म्हणत तो खरोखरच वाटेनं चालू लागला.

''मेल्या बायलमानसांक भितस?'' म्हणत त्याची टर उडवीत दुसरे दोघे नरेशच्या मागून वर चढले. तो बोलणारा देसायांचा प्रकाश होता. त्याच्या बापाचा मोठा ट्रकचा व्यवसाय होता. आणि चंदूचा बाप बापू सावकारासारखाच मोठा भाटकार होता. तिघांच्याही अंगात श्रीमंतीची मस्ती होती.

नरेश एकोशीनं बोट दाखवलेल्या झाळीकडे पोचला. एका खडकाला लगटून, ती करवंदीची गच्च० झाळ होती. चंदूचं लक्ष त्या झाळीवर गेलं आणि तेवढ्यात वरून एक दगड आला तो नेमका त्या झाळीत खसखसला.

''नरू पळ पळ-'' तो म्हणतोय तेवढ्यात दुसरा दगड झाळीत असलेल्या पांढऱ्या शंक्वाकृती घरट्यावर आदळला. चंद्याच्याही ते लक्षात आलं आणि 'पळा पळा' करीत तोही मागं फिरला.

''दगड मारता काय? आम्हाला हात नाहीत काय?'' म्हणत नरेश दगड उचलायला वाकला नाही तोच त्या शंक्वाकृती घरट्यातून 'घूंऽऽ घूंऽऽ करीत तुमसडांचा थवा बाहेर पडला.

तुमसड, मधमाशा का गांधीलमाशा असोत, त्या चवताळल्या की त्यांचा

**दूर सभोती स्ववळे सागर तुफान लाटा चढती वरवर. उडी घ्यावया मी अति आतुर कोठवरी मन रोधायचे?**

पहिला शत्रू जवळ मिळणारा प्राणी, आणि मग पळणारा. पळणाऱ्यावर त्या तुटूनच पडतात.

राजू आधीच सुटला होता. पक्या आणि चंदू रस्त्यात पोहोचले खरे पण त्यांना तुमसडांनी गाठलंच. नरेशच्या हातात दगड यायच्या पूर्वीच तुमसडांनी गाठलंच. नरेशच्या हातात दगड यायच्या पूर्वीच तुमसडांनी त्याच्यावर एकदम हल्ला केला होता. 'ओय ओय' करीत ओरडत ओरडत तो कसाबसा सडकेवर पोहोचला आणि कोसळला.

चुकारू चार-दोन तुमसड पळणाऱ्या मुलींच्या मागंही गेले, पण विशेष काही झालं नाही. एखाद-दुसरी माशी त्यांना चावली तेवढीच. अशा माशीचं कूस काढण्याचं तंत्र एकोशीला माहीत होतं.

त्या पथवीरांची मात्र चांगलीच गाळण उडाली. चंदूनं कसाबसा बाजार गाठला. बाजारात कळलं तशी माणसं धावली. तोवर काळोख घट्ट होऊ लागला होता. माशांनी आपलं घरटं पकडलं होतं. नरेशला आणि पक्याला उचलूनच घरी न्यावं लागलं होतं. त्याला उठायला चांगला दीड महिना लागला.

नरेशचे हे दोस्त फक्त टवाळीपुरते आणि त्याच्या बरोबर मौजमजा करण्यापुरतेच होते. त्यांनीच शिंगरीची गोष्ट खुलवून खुलवून गावभर केली. नरेश बरा झाला तरी गावात उजळ माथ्यानं हिंडणं त्याला कठीण झालं. लोक त्याची शिंगरीवरून थट्टा करून नकोसं करीत.

तेव्हापासून एकोशीचं नाव शिंगरी हेच पक्कं झालं. तरी कोरजाईत ती एकोशीच होती.

एकोशी ही बाबल्या सारंगाची नात आणि नामदेवाची तीन मुलींवर झालेली मुलगी. बाबल्याच्या घरात चार पिढ्यांत मुलगी जन्मली नव्हती. नामदेवाला झाल्या त्या चारी मुलीच. बाबल्या सारंगाचं एक तारू होतं. तिकडे कोचीनपासून मुंबई कराचीपर्यंत त्याच्या सफरी होत. नामदेव सातवी पास झाला होता. बापाबरोबर धंद्यात पडला. एकोशीचा जन्म होईपर्यंत ते एकच तारू होतं. एकोशीचा जन्म झाला आणि बरकत वाढू लागली. बापलेक दोघेही नुसती मालाची ने-आण करीत. त्यातून पुढं त्यानं मंगळूर कौलांचा व्यापार सुरू केला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर बरकत वाढली. जुनं तारू विकलं आणि नामदेवानं नवीन इंजिन बसवलेलं गलबत घेतलं. एक कोठ्या बांधून घेतला. जवळपासच्या बंदरातून माल पोहोचविता येई. खाडीतल्या बंदरांतूनही भरतीचं तानमान बघून कोठ्यानं वाहतूक करता येई.

एकोशी सगळ्यांचीच लाडकी होती. खाडीत पोहणं, होडी पगार वल्हवणं यात तर ती तरबेज होतीच पण एकदम धीट होती. डोलकाठीवर चढून शीड लावायला ती घाबरत नव्हती. एकोशीच्या मोठ्या बहिणी कर्लीच्या शाळेत सातवीपर्यंतच शिकल्या. नामदेवानं हिला हायस्कुलात पाठवायचं ठरवलं तेव्हाच तिच्या आईनं म्हटलं होतं-

'तां एकलां कसां जायत?'

'वाडीतून एवढे मुलगे आहेत आणि तिच्याबरोबर जाणाऱ्या मुली पण आहेत. हिला पाठवली तर त्या जातील.' नामदेवानं म्हटलं, 'शिवाय एकू आमची भित्री नाही आहे; धीट आहे.'

एकोशीनं ते खरं करून दाखवलं होतंच. टवाळांना धडा शिकवल्यामुळं सगळ्या परिसरात तिचं नाव झालं होतं. तिची दहावीची परीक्षा झाली आणि आता ती अभ्यासातून मोकळीच होती. या वर्षी नामदेवानं कोचऱ्याच्या जुवा बेटावर गोडं पाणी आणि जिन्नस पोहोचवायाचा मक्ता घेतला होता.

जुवा बेटावर फिरतं दीपगृह होतं. संरक्षण खात्याचं टेहळणी केंद्रही होते. समुद्रातलं ते लहानसं बेट म्हणजे प्रचंड खडक होता. कस्टमची माणसं तिथल्या व्यवस्थेसाठी राहात. पावसाळ्यात तीन महिने तिथल्या माणसांना फक्त दुरूनच किनाऱ्याचं दर्शन घडे. समुद्र खवळेला असे. होडी किंवा लाँच सोडाच, पण मोठ्या बोटीसुद्धा वादळात टिकाव धरणं कठीण. बेटावर कोणी आजारी पडलं तर काही धडगत नव्हती. समुद्र शांत झाला की मात्र तिथल्या माणसांना किनाऱ्याला नेता येई. आता पावसाळा जवळ येत चालला होता. हळूहळू बेगमीचा माल तिकडे पोहोचवायला हवा होता. आठवड्यातून दोनदा टाक्या भरून गोडं पाणी पोहोचवावं लागे. पावसात पावसाचं पाणी साठवून वापरावं लागे त्या माणसांना. हल्ली रिकामी असल्यामुळं एकोशी पण कधीतरी जाई.

कोठ्याला काही इंजिन नव्हतं. दहा खलाशी आणि एक तांडेल जाई. कधी स्वत: नामदेव जाई; कधी पास देऊन तो दुसऱ्या तांडेलाला पाठवी. वारा

नसला तर खलाशांना वल्हवूनच तिकडे पोहोचावं लागे. ते बेट डोळ्यांना जवळ दिसत असलं तरी कोरजाईतून ते पंधरा सागरी (१८५२ मीटर असावे) मैल अंतरावर होतं. नीट वारा मिळाला तर दोन तासांत पोहोचता येई. नाहीतर पाच-सहा तास लागत.

शिवाय कोरजाईतून कोठ्या न्यायच्या म्हणजे मोठं कसबाचं काम होतं. ओहोटीला बरीच खडकं वर आलेली दिसत. शिवाय पाण्याखाली दडलेली खडकं होती. ती फक्त नित्य वावर करणाऱ्या माणसांनाच कळत. एखाद्या पाण्यात लपलेल्या खडकावर गलबत आदळलं तर सगळंच खलास! तांडेलाला खूप सावध राहावं लागे.

आता सगळीकडेच फोनची सोय झाली होती. पूर्वी बिनतारी संदेशानं बेटाशी दळणवळण ठेवलं जाई. आता तिच्याबरोबर समुद्रात केबल टाकून फोनवरूनही संपर्क होतो. नामदेवाला मुद्दाम मक्ता मंजूर करताना अधिकाऱ्यांनी फोन घ्यायला लावला आणि लगेच नामूला फोन जोडून पण मिळाला होता. कालच नामदेव नित्याची वर्दी पोहोचवून आला होता. पुन्हा शुक्रवारी जायचं होतं.

दुपारी जेवणं झाली आणि लगेच फोन खणखणला. मागच्या दारानं एकोशी धावत आली. नामदेव वाऱ्यावर पडला होता. तोही उठून आला. एकोशी तिथंच उभी राहिली.

''हॅलो. मी नामदेव बोलतोय.''

''बरं झालं भेटलास घरी. मी गुप्ते बोलतोय.''

'होय साहेब.'

''कोठ्या कुठं पावलास?''

पलीकडचा आवाज अगदी स्पष्ट एकोशीलासुद्धा ऐकू येत होता.

''साहेब कोठ्या बंदरातच आहे.''

'तर परवाची ट्रिप तू जरा उद्याच कर. मग एकदम सोमवारी ये. काय?'

नामदेव जरा विचारात पडला. मग म्हणाला, 'साहेब मला उद्या वेंगुर्ल्याला जायलाच हवं. 'माऊली' गलबत येणार आहे. माल पटवून घ्यायचाय.'

''तू कशाला? एकनाथ आहे ना?''

'साहेब, त्याला गावी पाठवलाय. पुतणीचं लग्न आहे त्याच्या.'

''काहीतरी कर. उद्या बघ बेंगुर्ल्यांचे कस्टम ऑफिसर नेव्हीच्या माणसांना घेऊन येणार आहेत. पाणी तर लागलेच आणि काही खास जिनसा लागतील...''

''बाबा होय म्हणा.'' एकोशी म्हणाली.

''अगं पण-?'' नामदेव फोनवर हात ठेवत म्हणाला.

''काय झालं? मी आणि आजोबा जाऊ. मी आजोबांना मदत करीन...''

''आणखी कोण बोलतंय हे तिचं? मला नीट ऐकू येतंय.''

''माझी मुलगी एकोशी, साहेब.''

''इकडे कधी आली होती काय रे?''

''धक्क्यापर्यंत कोठ्यातून आली होती. वर नाही आणली कधी. हल्ली दहावीला बसलीय. रिकामी आहे म्हणून म्हणतेय.''

''मग मी म्हणतेय तसं कर ना. येऊ दे तिला.''

गुप्तेसाहेबांनी प्रश्न सोडवला होता. दीपगृहाच्या केंद्रात कस्टमच्या परवानगीशिवाय कोणाला प्रवेश नव्हता. नामदेवाला पास होता. तो म्हणाला, ''मग बाबांना पाठवतो. तिला पण केंद्र दाखवा.''

गुप्त्यांनी जिनसांची यादी सांगितली आणि फोन ठेवला. उद्या जुवा बेटावर पोहोचायचं म्हणजे आतापासून कामाला लागायला हवं होतं. पन्हाळीच्या पाण्यानं कोठ्यावरच्या टाक्यांत गोडं पाणी घेणं पावसाळी बेगमीसाठी थोडं सरपण, शिवाय पाहुण्यांच्या सरबराईसाठी सांगितलेल्या जिनसा आणि खलाशांना निरोप पाठवून जमवायला हवं होतं. आताशा वाऱ्याचं काही खरं नव्हतं. अर्धा एप्रिल मागं गेला होता. वारा कधी आपलं तोंड कुठं फिरवील सांगता येत नव्हतं. खलाशांना सांगायला एकोशी निघाली आणि जिन्नस जमा करायला नामदेवनं बाजार गाठला.

खलाशांनी संध्याकाळी कोठ्या किनाऱ्यावरून पाण्यात लोटला. पन्हाळीला पाईप जोडून डोंगराच्या झरीचं पाणी टाक्यांत सोडलं. नामदेवाकडे मक्ता आल्यापासून गुप्तेसाहेब पाण्यावर खुश होते. थोडं साठ्याचं सरपण आणि न्यायचे जिन्नसपान्नस भरून कोठ्या तयार झाल्या. पहाटे चार वाजता जरा मतलय सुटली आणि नांगर उचलला. बाबल्या सारंगाचं वय पंचाहत्तरी ओलांडून गेलं होतं, पण कामाची टूक होती. उमेदही होती. स्वेटर कानटोपी घालून त्यानं सुकाणू हातात घेतलं, तशी एकोशी म्हणाली,

''आजोबा सरका जरा. साटीवर आराम करा. मी धरते सुकाणू.''

'म्हणतंस काय चेडवा!' म्हातारा

**विपत्तींना जो न भीत, धैर्ये सदा राही उभा ताठ प्रयत्नांचा खरा वाली, प्रभुजी राखितो पाठ.**

चकित होऊन म्हणाला, ''सगळ्यांक खंय घालंवचं ठरयलहस-?''

''बरोबर ठिकाणाला पोहोचाल. उजाडताना मोबार आलं (मुखाकडला भाग) की तुम्ही बसा.''

एकोशी बऱ्याच वेळा नामदेवाबरोबर या मार्गानं गेली होती. कुठं भाट पडते, कुठं रेतीचे दंड आहेत आणि कुठं किती पाणी खोल आहे हे तिनं नुसतं पाहिलं नव्हतं तर नीट लक्षात घेतलं होतं. भरतीचं पाणी अजुनी कमी झालं नव्हतं. तिनं अंदाज घेतला आणि सरळ पोहदाच्या दिशेनं नाळ केली.

''चेडवा, तारु रूपलां तर-?''

''मी ढकलून देईन मग झालं? पडा तुम्ही.''

मघाच्या पोइदातून कोठ्या बिनतक्रार बाहेर पडला होता. रुंद पात्रात कोठ्या पोहोचला तशी ती म्हणाली, 'ज्ञानू शिडं सोड बघू.'

'मतलय' आता ताठ झाली होती. पूर्वेकडे येणारा वारा शिडात भरला तसं तिनं सुकाणूच्या हात्याला मांडी लावून 'दमान' (शिडाची खालची दोरी) खेचली आणि हुकाला बांधली. शीड आता फुगारा घेऊन कोठ्याला गती आली. तासाभरातच मोबारातून कोठ्या दर्यात पोहोचला. पुढं मात्र धोका होता. तिनं आजोबांना उठवलं आणि त्यांच्या हाती सुकाणू दिलं.

खडकाळीतून बाहेर पडेपर्यंत शिडांचा उपयोग नव्हता. तीन-चार वळणं घेऊन खडकांच्या पलीकडे जावं लागे. पण आता ओहोटीचा खळाळ जोर करीत होता. धीमेपणानं वल्हवून पलीकडे जाता येत होतं. कोठ्या मोकळ्या समुद्रात गेला आणि मतलय एकदम ताठ झाली. त्रिकोणी आणि चौकोनी दोन्ही शिडं जोडली तसा कोठ्या वेगानं चालू लागला. पूर्व दिशा फाकली. खलाशांना जरा उसंत मिळाली. आता त्यांनी वल्हे आवरून ठेवले. कोणी विडी शिलगावली; कोणी चंची काढली. लाटांवरून हिंदोळे घेत ते लहानसं जहाज आता संथ लयीत आपसूक चाललं होतं. बाबल्या मनातल्या मनात चकित झाला होता. नाही म्हटलं तरी त्याच्या मनात आपल्या वंशात मुलगा नाही अशी खंत होती. जेमतेम ती चार खडकं वाटवण्यापुरतंच एकोशीनं त्याच्या हाती सुकाणू राहू दिलं होतं. बाकी तिनंच सांभाळलं होतं. खलाशांना सूचना तीच करीत होती. दोनदा बलावी लागलेली शिखहं तिनं दमान हाती घेऊन ठीक केली होती. त्याच्या मनात आलं; 'झील आसतो झिलाक तर दुसरां काय करतलो होतो? ह्यां झिला फुडलां काम जालां!'

ठीक सूर्योदयाला कोठ्या जुवा बेटालगत पोहोचला. एकोशीनं शिडांची दमानं सोडून ज्ञानूकडे सोपवली आणि खलाशांना वल्हे घ्यायची सूचना केली. तिनं सुकाणू अशा हिकमतीनं फिरवलं आणि लाटांना चुकवीत नाळ त्या खडकाळीत असलेल्या छोट्याशा दिशेनं केली. खलाशांना पुन्हा दोरांची भेंडोळी टायर बाहेर सोडायची आज्ञा केली. ज्यामुळं कोठ्याला दगडी धक्क्याचा दणका बसू नये. त्या मोठ्या खडकाच्या आसऱ्यानं तिथं नैसर्गिक धक्का तयार झाला होता. तिथूनच वर जायच्या पायऱ्या कोरल्या होत्या.

ज्ञानूनं मोठा वाला (दोर) नाळीवरून असा फेकला की त्याचं टोक पुन्हा आपल्या हाती यावं. ते हाती आलं तसे वल्हे थांबले. दोन-तीन खलाशांनी दोर ओढून अलगद कोठ्या धक्क्याला टेकवला, तेव्हा एकोशी सुकाणू सोडून उभी राहिली. फार दूर नाही पण खोल समुद्रात एक मोठं जहाज धूर ओकत उभं असलेलं दिसलं आणि तिचे डोळे विस्फारले. अजूनही त्या जहाजावरचे दिवे मालवले नव्हते. पण ते आता निस्तेज दिसत होते. तिनं इंग्रजीतलं नाव वाचलं. 'जलप्रताप'. वर शुभ्र गणवेशातले सैनिक वावरताना दिसत होते.

कधी नव्हे ते आज गुप्तेसाहेब पायऱ्या उतरून खाली आले होते. बराच वेळ सुकाणू धरून बसलेल्या एकोशीला पाहात होते. तिची जहाजावरची नजर धक्क्यावर गेली तसं ते हात उंचावून म्हणाले,

''हॅलो, गुडमॉर्निंग एकोशी.''

'गुडमॉर्निंग सर!'' तीही तेवढ्याच तत्परतेनं हसत उत्तरली. तेही गडगडून हसले आणि म्हणाले,

''तुला ते जहाज पाहायचंय ना? दाखवू या. चल वर ये. आज तू पण आमची पाहुणी.''

''काय सांगां सायबानूं! आज हे मोरीन कोठवो हाडल्यान. झिलापरीस काम जालं!''

गुप्तेसाहेब पुन्हा गडगडून हसले.


●●

**हरिहर आठलेकर**
२९३ सी, भटवाडी, सावंतवाडी,
जि. सिंधुदुर्ग

**उंच नारळी, उंच पोकळी, बघाल तिकडे दिसती केळी, मातित इथल्या माणिक पिकते, पाचूचीही डोलत शेते.**

# ढगांचा खेळ

मल्हार अरणकल्ले



आकाशात डाव्या बाजूनं ढगांचा एक पुंजका हळूहळू सरकत आला. फिकट काळा-पांढरा. पिंजून ठेवलेल्या कापसासारखा. कमालीचा अवखळ. तो संपूर्णपणे तर हलत होताच; पण त्यातील लहान-लहान पुंजकेही एकमेकांशी शिवाशिवीचा मस्त खेळ खेळत होते. एकानं दुसऱ्याला पकडलं असं वाटत असतानाच त्यातला एक पुंजका हुलकावणी देऊन पुढं पसार झालेला दिसायचा; आणि गंमत म्हणजे, दुसरीकडून कुठून तरी आलेला तिसराच पुंजका त्याच्या तावडीत सापडायचा. इतका सुंदर खेळ रंगलेलं हे अख्खं मैदानच काही वेळात तिथून अदृश्य व्हायचं.

माळरान तसं शांत होतं. जवळच्या रस्त्यावरून क्वचित एखादी मोटर निघून जाई. घुंगरांच्या आवाजाचा ठोका धरीत एखादी बैलगाडी नागमोडी वळणं घेत धावत जाई. तिथल्या शांततेचा भंग करणाऱ्या या दोनच गोष्टी होत्या. बाकी सारं माळरान भरारणाऱ्या वाऱ्यानं भरून गेलं होतं. माळरानावर वारा स्वत:चा वारा प्यायल्यासारखा धावत होता. लहरत होता. पाण्याच्या लाटा दिसतात, तशा वाऱ्याच्या लाटा दिसल्या नाहीत तरी जाणवतात. अशा एकेक लाटा अंगावर आदळत होत्या. काही थोड्या अंतरावरून भोवरे निर्माण करीत पळत होत्या. सगळीकडं असं वाऱ्याचं मनसोक्त नर्तन आणि वर आकाशाच्या गाभाऱ्यात ढगांचा खेळ!

सहज वर नजर गेली. ढगांच्या खेळाच्या मैदानावर दुसरेच खेळाडू सज्ज झालेले दिसले. त्यांच्या दोन स्वतंत्र पार्ट्याही पडलेल्या होत्या. काही खेळाडू एका बाजूला, तर काही दुसऱ्या बाजूला. पाहता पाहता त्यांचा कबड्डीचा खेळ सुरू झाला. वाऱ्यानं शिटी घातली आणि एक खेळाडू कबड्डी-कबड्डी करीत निघाला. वारा भरारला. खेळाडू पकडला गेला आणि बाद झाला. मग दुसरा खेळाडू निघाला... एकेक करीत हा खेळ तर झकास रंगला. पार्ट्या बदलल्या. पुन्हा डाव झाला. जिंकलेल्या गटानं विजयोत्सव कसा साजरा केला असावा? अरे, आपण तो उत्साह, तो आनंद पाहायला हवा. तो सांगून कळायचा नाही. कारण तो सांगण्याच्या पलीकडं गेलेला होता.

त्या विजयात एक शुद्ध आनंद होता. तो साजरा करण्यात तोरा नव्हता. दुसऱ्याला हरवल्याचा उन्मादही नव्हता. श्रेष्ठत्वाचा लवलेशही त्यात नव्हता. तो एक निखळ आनंदाचा सोहळा होता. त्यात विजयाची निशाणं होती. गुढ्या-तोरणं होती. वाऱ्याची मंजूळ सनई होती. ढगांच्या आवाजाचा चौघडा होता. त्यातल्या फिरत्या पुंजक्याच्या दर क्षणी बदलणाऱ्या सुबक - नक्षीदार रांगोळ्या होत्या. निशाणं, गुढ्या नाचत होत्या. इकडून तिकडं फिरत होत्या. निशाणांचे ध्वज डौलानं फडकत होते. या सोहळ्यात केवळ विजयश्री मिळविलेलेच सहभागी झालेले नव्हते; तर जे हरले तेही त्यात मिसळून गेलेले होते. इतकं की, कळूच नये की, कोण जिंकलं नि कोण हरलं!

आकाशाच्या पडद्यावरला हा अंकही संपला आणि आता तिथं एक सुवर्णरथ, त्याचे चौखूर उधळलेले अश्व, रथात विराजमान झालेला नृपती, त्याच्या डोक्यावरला लखलखता मुकुट, चेहऱ्यावरली ऐट. दीपवून टाकणारं ऐश्वर्य... काय पाहावं नि काय नको असं होऊन गेलं. रथ उधळलेला, मागं धुळीचा लोट आणि त्याची सोबत करणारे घोडेस्वार. घोड्यांच्या टापांचा आवाज एकसारखा... तबल्यावर, डफावर

कधी फिरावे खडकामधुनी शोधित हिरवळीच्या वाटा थकवा येता होऊन अडवे उशास घ्यावा डोंगरमाथा.

ताल धरल्यासारखा.

ही शाही मिरवणूक पार झाली आणि तिची जागा युद्धभूमीत परावर्तित झाली. धनुर्विद्येत परस्परांचा विक्रम मोडणारे एकेक धनुर्धर प्रत्यंचा खेचून उभे होते. भात्यांतून बाण उपसले जात होते. वाऱ्याचा वेग पकडून धावत होते. आक्रोश-किंकाळ्या, विजयाच्या ललकाऱ्या, 'झिंदाबाद'च्या गर्जना उठत होत्या. युद्ध निकराला आले होते. दुंदुभी-रणभेरी वाजत होत्या.

हे काय? युद्धभूमी अदृश्य झाली? आणि तिथं हे उंच कळस कसले बरं दिसताहेत? अरे, ही तर मंदिरं, अनेक मंदिरं. सामूहिक स्वरांतल्या प्रार्थनांचा धीरगंभीर आवाज. घंटांची किणकिण टाळ्यांचा मंगल ताल...

काय गंमत म्हणायची! युद्धभूमीचं रूपांतर मंदिरांत झालं!

होय, तेच वास्तव असतं. आपलीच चूकभूल होते, म्हणूनच ते जाणता येत नसतं.

आकाशाच्या निळाईवर रंगलेलं हे जिवंत नाट्य अनुभवत असतानाच जाणवलं की, ढगांचा हा खेळ तर आपण नित्यच अनुभवत असतो. आपलं मन केवढं आहे? सांगा पाहू. नाही ना सांगता येत? मनाची खोली, उंची, लांबी-रूंदी, आकार काही-काही सांगता येत नाही. मनात आकाश मावतं, समुद्र सामावतो, उत्तुंग पर्वतही त्यात बुडून जातो. असल्या मनातही दर क्षणी ढगांचा खेळ सुरू असतो. ढग कसे तयार होतात, हे आपल्याला ठाऊकच आहे. पाण्याची वाफ वर जाते. धूलिकणांवर जाऊन बसते. हे कण एकत्र येऊन ढग बनतात. आपल्या मनात देखील अनेक 'वाफाळलेले' प्रसंग येतात. त्यांची धग आपल्यालाही जाणवते. मनात धूलिकण तर कितीतरी असतात. कितीही साफ करा, ते काही निघून जात नाहीत. जेवढं आयुष्य मोठं तेवढे धूलिकण जास्त, अशीच अवस्था असते. कुणाशी किरकोळ वाद झाला, कुणाचं काही वर्तन खटकलं, कुणाचा राग आला की या धूलिकणांच्या संख्येत वाढ झालीच म्हणून समजा. वर्षानुवर्षे त्यांत भर पडते आणि ढगांचा काळेपणा गडत होत जातो. हे ढग परस्परांशी खेळ खेळतात. ते कधी चांगले असतात, तर कधी वाईट असतात. चांगले त्या मानाने कमीच.

मनातल्या ढगांचा हा खेळ कसा असतो, ते बहुधा त्या त्या व्यक्तीवरच अवलंबून असतं. काहींच्या मनात केवळ विध्वंसाचाच खेळ रंगतो, तर काहींच्या मनात विधायकतेचा आनंदसोहळा बहरतो. कुणाच्या मनात वजाबाकीच होते, तर कुणाच्या मनात बेरजेचे सकारात्मक चित्र होते. एखाद्याविषयी अभिमान वाटत असतानाच, त्याची जागा कधीकधी मत्सराने वेढून जाते. एखाद्याला मदत करायला धावलेलं मन कधी त्याच्या घाताची तयारी करण्यात गुंतून जातं. एक ढग आला. खेळ झाला नि संपला. मग दुसरा ढग. त्याचा खेळ आणखी वेगळा. असाच तिसरा, चौथा... आणि पुढं असंख्य...

मनातल्या ढगांचा खेळ अहोरात्र सुरूच असतो. आकाशातले ढग समंजस, शहाणे असतात. आपण खऱ्या खेळालाही संघर्षाचं रूप देतो. म्हणूनच अनेक वेळा क्रीडांगणावरही युद्धभूमी अवतरते. आकाशातल्या ढगांना एक चांगलं वरदान लाभलं आहे. ते वरदना आहे बरसण्याचं. मनसोक्त, धुवांधार मुसळधार बरसून जाण्याचं. मनातल्या ढगांना हे वरदान नाही. त्यांना शाप आहे तो गच्च होण्याचा. आपलं मन तपासा. तिथं असं गच्च बसलेलं किती तरी मळभ दिसेल. त्याला समजुतीचं पोक्तपणाचं, तडजोडीचं, माघारीचं आणि प्रसंगी पराभव स्वीकारण्याचं भान कधीतरी यायला नको?

आकाशाकडं पाहिलं. ते निरभ्र होतं. निळ्याभोर गाभाऱ्यात मावळतीची सूर्यकिरणं चमकत होती. ढगांचा खेळ संपला होता. माझ्या मनात मात्र अंधारून आलं होतं. झडझडून बरसात व्हावी, असं वाटत होतं; पण मनातले मळभ गच्च होते.

सारखं वाटत होतं की, आकाशाच्या पडद्यावर पुन्हा एकदा ढगांचा खेळ सुरू व्हावा आणि नंतर मस्त पाऊस यावा...

त्यात न्हाऊन जावं. मनातल्या मळभांना त्याची थोडी झड लागावी... आणि मग मनातल्या ढगांच्या खेळांत दंग व्हावं.

●●

**मल्हार अरणकल्ले**
१०/२ गुरुजन सोसायटी,
शास्त्रीनगर, कोथरूड, पुणे २१.

**गडद निळे, जलद भरून आले शीतल तनु चपलचरण अनिलगण निघाले.**

# 230V विद्युत् दाबावर चालणारी मोटर तयार करा

हरिहर आठलेकर


**मुलांनो**, घराघरांत आता वीजपुरवठा होत असतो. आपल्याला हा वीजपुरवठा महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळामार्फत (म.रा.वि.मं.) होत असतो. प्रत्येक राज्याचे एक विद्युत्मंडळ असते. देशांतर्गत उद्योगधंद्यांच्या सोईसाठी राज्याराज्यांची विद्युत्मंडळे एका मोठ्या मंडळाला जोडली आहेत. त्यामुळे आपत्काळात एका राज्यातून दुसऱ्या राज्याला वीजपुरवठा होऊ शकतो. त्यामुळे जनजीवन, विशेषत: उद्योगधंदे व्यवस्थित चालू राहून मोठे नुकसान टाळता येते. ही विद्युत्मंडळे एकमेकांना जोडता यावीत यासाठी सर्व विद्युत् उत्पादन केन्द्रात एकाच दाबाने आणि एकाच वारंवारतेने विद्युत् उत्पादन केले जाते. आपल्या देशात २३० V.(a.c.) इतक्या विद्युत्दाबाने व ५० Hz इतक्या वारंवारतेने विजेचे उत्पादन होते व या दाबाने व वारंवारतेने ग्राहकांना म्हणजेच आपल्याला वीजपुरवठा होत असतो. २३० V.(a.c.) आणि ५०Hz ही आपली विद्युत्पुरवठ्याची राष्ट्रीय मानके आहेत. याला (A.C. Mains) अे.सी.मेन्स असे संबोधतात.

घराघरांत आता पंखे, मिक्सर ही उपकरणे सामान्य झाली आहेत. तसेच विजेवर चालणारी पाण्याची मोटर व पंप खेड्यातच नव्हे तर शहरातही दैनंदिन गरजेची बाब झाली आहे. या सर्व विजेच्या फिरणाऱ्या उपकरणांमध्ये (A.C.Motor) अे.सी. मोटर असते. **अशी ए.सी.मोटर आपण स्वत:च बनवू या.**

घराघरांत आता विजेच्या नळ्या (ट्यूबलाईट) असतात. या नळ्यांच्या मागे एक पट्टी असते. या पट्टीच्या मध्यभागी एक धातूचा आयताकृती पेटीसारखा भाग दिसतो. आयताकृती पेटीसारखा भाग दिसतो. याला चोक असे म्हणतात. चोक जर खूप जुना झालेला असेल तर त्यातून चर्रर्र् असा सतत आवाज येत असतो. असा आवाज येणारा चोक 'गेला' असे म्हणतात. नळीच्या दृष्टीने हा चोक निकामी झालेला असतो. तसेच कधीकधी चोकमधील तांब्याची तार तुटल्याने अथवा जळाल्याने चोक निकामी झालेला असतो. असा **'निकामी झालेला चोक मिळवा.**




आकृती-१





आकृती-२

त्यावरचे लोखंडी आवरण उघडा. आतील विद्युत् दुर्वाहक आवरणे (इन्सुलेशन) काढून टाका व नंतर निकामी झालेली तांब्याची तार काढून टाका. ही तार एका विशिष्ट आकाराच्या लोखंडी पट्ट्यांच्या गठ्ठ्यांवर गुंडाळलेली असते. यातील दोन्ही गठ्ठे अलग करा. चोकमध्ये हे खालील पद्धतीने ठेवलेले असतात. **(आकृती १)**

यातील ब हा गठ्ठा उचलून उलटा ठेवला तर दोन्ही लांब बाजू एका रेषेत व दोन्ही लांब बाजू एका रेषेत व दोन्ही आखूड बाजू एका रेषेत येतील. यामुळे दोन्ही आखूह बाजूत एक चौकोनी पोकळी तयार होते.

काड्याच्या पेटीतील सरकती पेटी काढून टाकली तर एक चौकोनी पोकळ आवरण राहाते. आपल्याला असे पोकळ चौकोनी पुठ्ठ्याचे आवरण तयार करावयाचे आहे. यासाठी चपला-बूट यासाठी जी पुठ्ठ्याची खोकी वापरतात. त्या पुठ्ठ्याचा वापर करता येईल. यासाठी





आकृती-३

७५ मि.मी. उभी बाजू व २७ मि.मी. आडवी बाजू (आतून) व १२ मि.मी. जाडीची बाजू (आतून) अशी पोकळ पेटी तयार करा. प्रत्यक्षात आकृती २


**अशी आव्हाने हवी आहेत तेजाळ क्षितिजांची... क्षितिजांचे वेध घेणाऱ्या विज्ञान पंखांची...**

मधील आतल्या बाजूला जाईल अशी पुठ्ठ्याची लांब पट्टी कापून घ्या. हा आयताकृती आकार लांब भागावर गुंडाळा. पुठ्ठ्याचा एक वेढा पूर्ण होताच कापून टेपने चिकटवून टाका. आता अ आणि ब हे लोखंडी पठ्ठ्यांचे गठ्ठे वरून व खालून काढून घ्या की अशी पोकळ पेटी तयार होते.



**आकृती ४**

या पेटीवर आपल्याला इन्शुलेटेड तांब्याच्या तारेचे, सुमारे एक हजार वेढे द्यावयाचे आहेत. तांब्याचे वेढे तर घट्ट बसायला हवेत आणि मूळ



**आकृती ५**

पेटीचा आकारही बिघडता उपयोगी नाही. कारण तार गुंडाळल्यावर आपल्याला अ व ब हे लोखंडी पठ्ठ्यांचे गठ्ठे त्या पोकळीत परत घालायचे आहेत. यासाठी ६ मि.मी. जाडीच्या प्लायवूडच्या रुंदी २६ मि.मी. व लांबी २०० मि.मी. (सुमारे) अशा दोन पट्ट्या कापून घ्या. त्या एकावर एक ठेवा व त्यावर ही पेटी अगदी चपखल बसते असे दिसून येईल.

या पोकळ पेटीवर आपणाला तांब्याची तार गुंडाळायची आहे. बाजारात ''इन्शुलेटेड कॉपर वायर'' काही विशिष्ट दुकानात मिळते. ३० रोज जाडीची फक्त ५० ग्रॅम तार आणावी. ३० गेज जाडीच्या तारेचा व्यास ० ३२ मि मी असतो म्हणजे




**आकृती ६**

जर तारेला तार चिकटवून या तारेचे वेढे दिले तर ६४ मि.मी. लांबीत दोनशे वेढे बसतात. या पोकळ पेटीची लांबी ७५ मि.मी. आहे. पैकी ७० मि.मी. मध्ये २१० ते २१५ वेढे बसतील.

तारेचा असा एक थर पूर्ण झाला की, वहीच्या पातळ पांढऱ्या कागदाचा एक थर द्या आणि त्या दिशेने वेढे मारत उलट्या म्हणजे मागे येत राहात दुसरा थर द्या. दुसरा थर पूर्ण झाला की परत कागदाचा थर द्या. असे करत करत ती ५० ग्रॅम तार पूर्ण करा. ५० ग्रॅम तारेपासून पाच थर पूर्ण होतात. म्हणजेच तारेचे १००० ते १०७५ वेढे पूर्ण होतात. शेवटी जरा जाड कागदाचा थर देऊन टेपने व्यवस्थित चिकटवून टाका. म्हणजे गुंडाळलेली तार सुटणार नाही. आता या तारेच्या वेटोळ्यातून प्लायवूडच्या पट्ट्या काढून टाका. त्याच्या जागेवर आकृती २ मध्ये दाखवलेले लोखंडी पट्ट्यांचे गठ्ठे आकृती २ प्रमाणे बसवा. म्हणजे मुख्य विद्युत्-चुंबक तयार झाला.

**फिरकी तयार करणे –** हल्ली



बाजारात फेराईट–नावाच्या पदार्थापासून तयार केलेले लोहचुंबक खूप स्वस्त तयार मिळतात. २सें.मी.ह्न१सें.मी. या आकाराचा आणि १/२ सें.मी. जाडीचा लोहचुंबक दोन ते तीन रुपयांपर्यंत मिळेल. असे दोन लोहचुंबक विकत आणा.

सायकलचा एक आरा घ्या. त्याचा ७ इंचाचा एक सरळ तुकडा काढा. त्याला मधोमध दोन्ही चुंबक चिकटवा. आऱ्याला थोडी जाडी असल्याने ते तिरके बसतील. एका बाजूला थोडे कागद घालून त्याला सरळ करा आणि साध्या शिवणाच्या दोऱ्याने त्याला घट्ट बांधून टाका.

जोडणी – ६'' ह्न १२'' ते १५'' अशा लाकडाच्या फळीवर मध्ये आपला विद्युत् चुंबक सरळ उभा ठेवा. (आकृती ७) एका टोकाला कोपऱ्यात विजेचा दिवा भिंतीवर लावतात ते होल्डर लावा. एक विद्युत् पिन घ्या. तिला सुमारे एक मीटर वायर लावा. विद्युत् पिनच्या वायरला दोन टोके असतात. त्यातील एक टोक विद्युत् चुंबकाला तर एक टोक विजेच्या दिव्याला लावा. विजेच्या दिव्याचे दुसरे टोक विद्युत्चुंबकाच्या रिकाम्या टोकाला जोडा. आता विद्युत् मंडल तयार झाले.

सुमारे ३'' ते ४'' उंचीच्या दोन ॲल्युमिनिअम पट्ट्या घ्या. त्यांना वरच्या बाजूला फिरकीचा आरा जाईल असे छिद्र पाडा आणि ही फिरकी विद्युत्चुंबकाच्या चौकोनी पोकळीत येईल अशा रीतीने ॲल्युमिनियमच्या पट्ट्या उभ्या लावा.

आता आकृती ७ प्रमाणे उपकरण तयार झालेले दिसेल. एखादी तार किंवा ॲल्युमिनियमच्या पट्टीने विद्युत्चुंबक लाकडाच्या फळीला बांधून टाका.

**चाचणी –** विजेची पिन प्लगला लावा व विद्युतप्रवाह सुरू करा. एकदम दिवा लागेल आणि थर्रर्रऽऽ असा आवाज सुरू होईल.

तुम्ही दचकून जाल. आता फिरकीला चिमटीत पकडून थोडी गती द्या. ती फिरत राहील.

विद्युत्प्रवाह बंद केल्यास दिवा बंद होईल तसेच फिरकी फिरणेही बंद होईल.

पुन्हा विद्युतप्रवाह सुरू केल्यास पुन्हा फिरकीला थोडी गती द्यावी लागेल. ही फिरकी उलट फिरवल्यास उलट फिरत राहील.

अशी मोटर आणि खालील प्रश्नांची उत्तरे शोधायचा प्रयत्न करा.

**प्रश्न –**

* विद्युतप्रवाह सुरू होऊन दिवा लागताच फिरकीला थरथर का जाणवते?

* फिरकी सुरुवातीला का फिरवावी लागते?

* फिरकी कोणत्या तत्त्वाने फिरते?

* फिरकी उलट व सुलट दिशेने कशी फिरू शकते?

* या प्रयोगात दिव्याचे काय काम आहे?

* या मोटरचा उपयोग कसा करायचा?

प्रबोधनचा पुढचा अंक प्रसिद्ध होण्यापूर्वी जो कुणी अशी मोटर बनवील आणि या प्रश्नांची योग्य उत्तरे शोधील किंवा उत्तरे शोधायचा प्रयत्न करील त्याला योग्य पारितोषिक व प्रबोधनमधून प्रसिद्धी देण्यात येईल.

अशी विद्यार्थ्यांनी बनवलेली मोटर विज्ञानशोधिका, भारतीय विद्या भवन, पुणे १६ येथे तुम्हाला पाहता येईल.

●●

**प्रा. चं. कृ. देसाई**
संचालक, विज्ञानशोधिका,
भारतीय विद्या भवन, पुणे १६

**हवेची गरजच काय?**

शंतनू रात्रीच्या वेळी दिव्या शिवाय सायकल चालवीत होता, त्याला पोलिसाने हटकले.

'सायकलीला दिवा का नाही?' शंतनू म्हणाला, 'हवालदार साहेब, रस्त्यावर एवढे दिवे असताना सायकलला दिवा कशाला हवा?' त्याबरोबर हवालदाराने सायकलमधली हवा काढून टाकली. सायकलमधली हवा कां म्हणून काढलीत?'

त्यावर हवालदार म्हणाला, 'इथं एवढी हवा असताना तुझ्या सायकलीला हवेची तरी काय गरज आहे?'

**सूर्य आला दाराशी आपल्या, किरण वेचुनी घ्या रे दिशादिशांचे पहाट गाणे; अवघे सारे वाचा रे**

# चुकला काळीज ठोका

**किरण पुरंदरे**

***अचानक माझ्या उजव्या हाताला अंधारात मिटून गेलेल्या झाडांमधून एक भयानक हंबरणं ऐकू आलं. या पातळीचं हंबरणं मी जन्मात ऐकलं नव्हतं. माझ्या छातीत धक्कन हललं... जंगलात आलेल्या आपल्या अनुभवांचं वर्णन करताहेत, किरण पुरंदरे 'चुकला काळीज ठोका' या लेखातून...***


पूर्णपणे अपरिचित अशा त्या जंगलात भटकायला जायचं, असं मी ठरवलं तेव्हा संध्याकाळचे सहा वाजले होते. निघण्यापूर्वी थोडी चौकशी केली, तेव्हा कळलं की डोंगराचं एक नाकाड खोल दरीच्या बाजूला झुकलेलं होतं. नाकाडावर उभं राहिलं की सूर्यास्ताचा देखावा बघायला मिळतो. केवळ यासाठीच सुमारे अडीच किलोमीटरचा डांबरी रस्ता बांधून काढला होता. अर्थातच वाटेतला झाडझाडोरा साफ करूनच. म्हणजे गंमत बघा, निसर्गाचा आस्वाद घेता यावा म्हणून त्याच्यावरच कुऱ्हाड! मूळ रस्त्याला हा रस्ता जिथे फुटत होता, तिथे गणवेषातले दोन पोलिस काठ्या घेऊन उभे होते. त्यांच्या सराईत नजरा माझ्याकडे वळल्या. मी रस्त्याला लागलो.

दोन्ही बाजूंना लक्षपूर्वक पाहात, मन जास्तीत जास्त एकाग्र करत चालू लागलो. एकटाच असल्यामुळे कुणाशी काही बोलण्याचा प्रसंग येणार नव्हता. मी असा कोल्ह्यासारखा एकटाच फिरण्याची वेळ येण्यासाठी मला खूप दिवस वाट पाहावी लागली होती. एक किरकोळ असा चढ लागला. छातीचे ठोके किंचित वाढले. डावीकडे एक हलकंसं वळण घेऊन रस्ता पुन्हा सुतासारखा सरळ झाला. एक पठारासारखा भाग आला. आजूबाजूला, ओळखीची माणसं भेटावीत, तशी झाडं-झुडपं दिसायला लागली. दातपाडी, गेळा, अंजनी, हिरडा, तोरण, आंबुशी, डिंगळा, जांभूळ यांची आणि माझी सह्याद्रीच्या डोंगरात कुठे कुठे भेट झालेली होती. जिथे झाडं-झुडपं नव्हती, तिथे वाळून कडकडीत झालेलं गवत पसरलेलं होतं. पिवळसर-खाकी गवतामधून काळ्या खडकांनी पाठी बाहेर काढल्या होत्या. निर्मळ वारा सुटला होता. मन प्रसन्न करणाऱ्या झुळकांवर झुळका. उंच आभाळात भिरभिरणाऱ्या पाकोळ्यांची उच्च स्वरांमधली किलबिल कानांवर आली. घरपाकोळ्यांचं हे वर्तन मी काही नव्यानं पाहत नव्हतो. जसा डोंगरधारेवर सूर्य मावळतो, तसा रात्रीची नीज घेण्यापूर्वीचा त्यांचा हा संकेत सुरू होतो. पोटापाण्यासाठी दिवसभर पांगलेल्या पाकोळ्या इकडून तिकडून गोळा होतात. त्यांचा एक दाट थवा तयार होतो आणि आभाळात चढतो. शेकडो पंखांची टोकं थरथरू लागतात. मधूनच एखादा पक्षी थव्यातून अलग होतो आणि एक मजेशीर गिरकी घेऊन पुन्हा थव्यात सामील होतो. सोबतीला चिर्रर्र! असा उच्च रवातला सामुदायिक चिल्लट ऐकू येतो. या पक्ष्यांना आभाळात सूर्य असणं आणि नसणं यातला फरक समजतो. डोंगरसुळक्यामागे सूर्य बुडाला, की चिमुकल्या पाकोळ्या आभाळझुल्यावरून खाली झेपावतात आणि जुनीपुराणी घरं जवळ करतात. वळचणीला बांधलेल्या छपरासारख्या घरट्यांमध्ये शिरतात.

जिथे सौंदर्य दिसेल, तिथे माझी नजर जात होती. सुकलेल्या शेवाळामध्ये गुरफटलेल्या एका जाडसर काठीवर मूर्तिमंत सौंदर्य अवतरलं होतं. पांढऱ्या फुलांची आमरी. पाहात रहावं आणि भान हरपावं. शेवाळ्यामुळे पकड घेण्यासाठी भरपूर वाव मिळालेल्या एका छोट्याशा गाठीसारख्या खोडाला एक नाजूकशी फांदी आणि त्या फांदीच्या टोकाला अतिनाजूक फुलांचा पांढराशुभ्र फुलोरा. बरं, ही फुलं इतक्या ठिकाणी फुललेली होती, की हवा तो गुच्छ निवडावा आणि जवळ जाऊन डोळे भरून पाहावा. एकदा नजर बसली आणि सगळीकडे ही ऑर्किड्स दिसायला लागली. एकही पान नसलेली आणि गुलबस-पांढऱ्या फुलांनी डवरलेली.

ऑर्किड्सच्या जगातून मी भानावर आलो, तो दिलखुलास दाद द्यावी अशा शिट्टीनं. पानझडी किंवा सदाहरित जंगलात दिसणारा ठिपक्यांचा सातभाई लाजवाब शीळ घालत होता. दुसरा कुठलाच आवाज येत नसल्यामुळे ती खणखणीत पण अवीट गोडी असलेली शीळ अगदी स्पष्ट ऐकू येत होती. या सातभाईंची सुरावट माझ्या कानांना थोडी वेगळी वाटली. त्या सुरावटीची अनेक आवर्तनं त्याच्या इवल्याशा कंठातून बरसत होती. मधूनच शंकित झाल्यासारखा तो क्षणभर थांबत होता आणि क्षणभरातच पुन्हा सुरुवात करत होता. या अस्सल रानसंगतीच्या पार्श्वभूमीवर अत्यंत घाणेरडा आवाज करत एक मोटार माझ्या शेजारून गेली. मी मनगटाकडे पाहिलं. घड्याळावरचे आकडे वाचता येत होते तरीही मला उगीचच वाटलं की जरा भरभर पावलं उचलायला हवीत. अर्ध्या ते पाऊण

**सोनं काळ्या मातीतलं, सोनं कसास लागतं, सोनं कोवळ्या सरीत डवरून रान येतं.**



तासाच्या वाटचालीत चक्क एकच वाहन रस्त्यावरून गेलं होतं. आता पाखरांची गडबडही जरा कमी झाली होती. अचानक माझ्या डावीकडे एकसारखी झाडं दिसायला लागली. तऱ्हेतऱ्हेच्या वनस्पतींनी गच्च भरलेल्या त्या रानात लावलेली ती ऑस्ट्रेलियन बाभळ डोळ्यांना बोचत होती. जिथे हे झाड नैसर्गिकरित्या कधीच उगवत नाही तिथे ते लावायचा अट्टाहास कशासाठी? अपेक्षेप्रमाणे बाभळीच्या या एकसुरी पट्ट्यातून पक्ष्याचा आवाज तर दूरच राहिला, पण साधी किड्याची किरकिरसुद्धा ऐकू आली नाही. आपली झाडं असली की आपले प्राणी, आपले पक्षी, आपले कीटक अशी साखळी दिसते.

परदेशी बाभळीच्या वनीकरणापासून दहा मिनिटांत मी सूर्यास्त पाहण्यासाठी तयार केलेल्या जागेपाशी आलो. मावळत्या क्षितिजावर अलगद टेकलेला तो भगवा गोळा! झुकलेल्या अवस्थेत होता, तरीही साध्या डोळ्यांनी फार वेळ पाहवत नव्हता. या जागेपासून खूप विस्तारित असा डोंगरमुलुख नजरेच्या टप्प्यात येत होता. दूरवर एक नदी सोन्याची होऊन वहात होती. फक्त पाहात राहावं असं ते निसर्गदृश्य कॅमेऱ्याच्या चौकटीत अडकविण्याचा केविलवाणा प्रयत्न मी केलाच. डोंगराच्या खाली उतरत गेलेल्या त्या सोंडेवर उभं राहून मी काहीशा घाई–गडबडीत ती संध्याकाळ अनुभवली. कॅमेरा बॅगेत गुंडाळून झपझप पावलं टाकत एका दमात वर आलो. पुन्हा एकदा डांबरी रस्ता धरला. उजेडाकडून अंधाराकडे असा माझा प्रवास सुरू झाला. कपाळावर घामाची ओळ जमली होती.

मी साधलेली चालण्याची लय बिघडली तेव्हा माझ्या उजव्या पावलापासून फूटभर अंतरावर करंगळीएवढ्या जाडीची, चटकन हातात घ्यावीशी वाटणारी एक रंगीबेरंगी दोरी पडलेली दिसली. किती लांब असेल? दिड वीत. जागेवरच थांबून कमरेत वाकून मी त्या दोरीकडे जरा निरखून पाहिलं. सिनेमात दाखवतात तसं त्या दोरीत अचानक चैतन्य आलं. माझी चाहूल लागल्यामुळे दचकलेला तो एक साप होता! अचानक तोंड फिरवून त्यानं उसळी घेतली आणि बघत राहावी अशी सळसळ केली. रस्ता ओलांडून तो गवतात शिरला आणि दिसेनासा झाला. आता घड्याळ नाकाशी लावलं तरच समजेल एवढा उजेड होता. पुन्हा एकदा माझ्या पाठीमागून वाहनाचा आवाज यायला लागला. तो आवाज जसा जवळ येऊ लागला. तसा मी चटकन् निर्णय घेतला. रस्ता सोडून डावीकडे रानात शिरलो. एखाद्या पुराण्या बोनसायूसारख्या दिसणाऱ्या हिरड्यामागे चुपचाप उभा राहिलो. मला ते वाहन पाहण्याची किंवा त्या वाहनातल्या लोकांनी मला पाहून, थांबून माझी विचारपूस करण्याचा प्रसंग अनुभवण्याची माझी अजिबात इच्छा नव्हती. अपेक्षेप्रमाणे पाच मिनिटांत एक अवाढव्य 'पांढरा हत्ती' गरगरत्या चाकांवरून धडधडत निघून गेला. मी पुन्हा डांबरी रस्त्यावर आलो. आता सगळं जंगल हे वेगवेगळ्या झाडांनी बनलेलं नसून ती एकच वस्तू आहे, असं वाटू लागलं. रिकाम्या सर्व जागेत अंधार भरू लागला. साधारण साडेसातचा सुमार झाला होता. माझे चालणारे पाय आणि हलणारे हात यांनी एक लयबद्ध ठेका धरला होता.

अचानक माझ्या उजव्या हाताला, अंधारात मिटून गेलेल्या झाडांमधून एक भयानक हंबरणं ऐकू आलं. या पातळीचं हंबरणं ऐकू आलं. या पातळीचं हंबरणं मी जन्मात ऐकलं नव्हतं. माझ्या छातीत लक्कन हललं. हंबरणं लांबलचक तान घेतल्यासारखं. मग 'ठाक्! ठाक्! ठाक्!' असा दोन प्रचंड गोटे एकमेकांवर आपटावेत तसा आवाज. त्या पाठोपाठ दणकट टापांची


**आभाळाची गर्द निळाई कधी मनाला मोहून घेते कधी गुलाबी अरुण कांतीने अंबर अवघे फुलून येते.**

धप धप, झाडाझुडपांमधला खसफसाट आणि ओलं झाड भुईवर पडावं तसा सळाळ. हे सगळं घड्याळ लावून काही सेकंदांमध्ये घडलं. मला काही कळायच्या आतच माझ्या उजव्या कल्ल्यावरून घामचा एक टपोरा थेंब टपकला. पुन्हा ते ऐकल्यावर थरकाप उडावा, असं हंबरणं सुरू झालं. माझ्या मनात पहिला कोणता विचार आला असेल, तर आपण संपलो. हंबरणं माझ्यावर येऊन आदळत होतं. क्षणभर त्या हंबरण्याच्या आवाजामागचे भक्कम जबडे, भरलेल्या माना आणि वळलेल्या स्नायूंनी बनलेले काळेशार गवे माझ्या डोळ्यांपुढे आले. मणक्यातून भितीची लहर सळसळत गेली, ओठ कोरडे पडले. मनात एकच विचार सारखा येत होता, 'आपण त्या गव्यांच्या वाटेत आहोत आणि आज आपल्याला ते चिरडणार.' मी आजूबाजूच्या, अगदी जवळच्या झाडांकडे आशेनं पाहू लागलो. मला आईऽग! आईऽगऽऽ! असं जोरात ओरडावंसं वाटत होतं. पण ते होत नव्हतं. आता मी चक्क अर्धवट पळत होतो. क्षणभर टिपेला गेलेला तो आवाज बटण दाबावं तसा बंद झाला. पण तरीही त्या क्षणी साधं रानमांजर जरी आडवं पळालं असतं तरी मी प्रचंड घाबरलो असतो. विचार करा, काळोखात मिटून गेलेल्या त्या जंगलात दोन जिवंत 'रणगाडे' एकमेकांशी टकरा घेत होते आणि कवळ्या दाबून फेंदारलेल्या नाकांमधून काळीजठोका चुकवणारे आवाज काढत होते. मी एकटा होतो, एकटा. अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे अंधाराच्याच रंगाचे ते गवे माझ्यापासून सुमारे १०० मीटर अंतरावर होते. एव्हाना मी घामात भिजलो होतो. झाडावर चढून बसण्याचा विचार मागे पडला. गव्यांचे आवाज थांबले. अत्यंत आनंदित होऊन मी जीव खाऊन पळत सुटलो. उतार असल्यामुळे माझ्या दोन ढांगांमधलं अंतर वाढलं होतं. तेवढ्यात दूरवर लखलखणाऱ्या दिव्यांचा एक पुंजका दिसला. तो पाहिल्यावर मला किती बरं वाटलं असेल, मलाच माहीत. मी जसजसा पुढे जाऊ लागलो, तसतसे नजरेच्या टप्प्यात आणखी दिवे येऊ लागले. परिचयाचं वळण लागलं. मूळ रस्त्याला जिथे हा फाटा फुटत होता, त्या बेचक्यात येऊन मी उभा राहिलो. एखादा डोंगरउतार पळत पळत उतरल्यावर हलकेच जमिनीवर ठेवलेला पाय जसा थरथरतो, तसे माझे दोन्ही पाय कापत होते. कापणारे पाय ही केवळ शारीरिक प्रतिक्रिया नव्हती, तर तो एक मानसिक प्रतिसाद होता. बेचक्यावरून चालत पुढे आलो. तेवढ्यात गावातले दिवे गेले. माझी पावलं यांत्रिकपणे एका हॉटेलाकडे वळली. मेजावर ठेवलेल्या चिमणीच्या फडफडत्या ज्योतीकडे एकसारखं पाहात गरमगरम चहा प्यायलो. पिशवीतून रूमाल काढून पहिल्यांदाच घाम पुसला. क्षणभर वाटलं, जंगलापेक्षा विकास बरा! ●●

**प्रा. चं. कृ. देसाई**
संचालक, विज्ञानशोधिका,
भारतीय विद्या भवन, पुणे १६

---

## करून तर पाहा : **चिमणाळं**



**साहित्य** – चिंध्यांचे मोठे तुकडे, छोटे तुकडे, मणी, सुई-दोरा, लोकर.

**कृती** – चिंध्यांच्या मोठ्या तुकड्यांमधून योग्य रंगसंगतीचा वापर करून मोठ्या, मध्यम आणि छोट्या आकाराचे प्रत्येकी, दोन त्रिकोणी तुकडे कापून घ्यावे. चिंध्या भरण्यासाठी थोड्या जागा ठेवून इतर बाजू बटण होल टाका घालून शिवून टाकाव्या. त्यानंतर तीनही त्रिकोणांमध्ये छोट्या चिंध्या व्यवस्थित भरून चिंध्या भरण्यासाठी ठेवलेली जागा शिवून घ्यावी. मोठ्या सुईमध्ये लोकर ओवून चित्रात दाखवल्याप्रमाणे रंगीत मणी मध्ये ओवून तीनही त्रिकोण ओवून घ्यावे. त्रिकोणाच्या बाजूच्या दोन टोकांना लोंबते मणी ओवावे. चिमणावळ्याच्या वरील बाजूस चिमणाळं अडकविण्यासाठी गोफ गोल वळवून घेऊन हूक करावा. भिंतीवर लावण्यासाठी किंवा बाळाच्या पाळण्यावर लावण्यासाठी छान दिसतं. आपल्या घरी कोणी शिवणकाम करत असेल तर आपल्याला वेगवेगळ्या रंगांचे आणि चित्राचे-नक्षीचे तुकडे घरातच मिळतात. नाहीतर वापरून जुने झालेले कपडे किंवा त्याच्यातील चांगला भाग वापरात आणून आपण अनेक चांगल्या गोष्टी बनवू शकतो.

●●


**विद्या नारळकर**, एच ३+४ हिमाली सोसायटी, मेहेंदळे गॅरेजजवळ, एरंडवन, पुणे ४

**हवेत फिरते कुणी पाखरू घुमत भिंगरी परी वर्ख रूपेरी लावुनि झुलती सुमने दर्भांकुरी.**

## चला करू या!

**कागदी मण्यांची माळ !**

**साहित्य –** खराट्याच्या काडीचे पुढचे वितभर टोक, पट्टी, पेन्सिल, कात्री, डिंक, दोरा, मासिकाच्या मुखपृष्ठाचा कागद अथवा रंगीबेरंगी गुळगुळीत कागद.




**कृती –** आपल्या मासिकाचा कागद उभा धरावा. तो रंगीबेरंगी असल्याने, ज्या बाजूस जास्त रंग आहेत ती बाजू समोर ठेवावी. आकृती १ मध्ये दाखविल्याप्रमाणे मासिकाच्या कागदावर आकृती आखून, अखंड रेषांवर कापावे. लांबट पताकेसारखा त्रिकोण तयार होईल. यापासून मणी बनवायचे आहेत. त्यासाठी पुरेशा त्रिकोणी पट्ट्या कापाव्यात. नंतर आपण घेतलेल्या खराट्याच्या काडीवर कागदी त्रिकोणाची 'अ' बाजू (आकृती दोन प्रमाणे) ठेवावी. तेव्हा जास्त रंगाची बाजू आपल्याकडे असावी. नंतर ती पट्टी काडी भोवती गुंडाळण्यास सुरुवात करा. तेव्हा दोन गोष्टी ध्यानात ठेवल्या पाहिजेत, एक म्हणजे मोठा भाग वर व छोटा खाली असेल व आपण गुंडाळण्यासाठी फिरवण्यास सुरुवात करू तेव्हा पट्टी तिरकी होता कामा नये. त्याचा खालचा शेवटचा बिंदू हा वरच्या मोठ्या भागाच्या मध्येच राहिला पाहिजे. तसेच पट्टी ढिली सोडू नये. ती ओढून गुंडाळावी. त्यास गुंडाळताना काही शेवटचा भाग राहिल्यावर त्यास डिंक लावून तो भाग चिकटवा. हा झाला मणी तयार! तो काडीवरून काढताना जाड बाजूकडून बारीक बाजूकडे (काडीच्या) ढकलावा, त्यामुळे तो सहज निघेल. या मण्यांची एक छानशी माळ तयार करा! तुम्ही या मण्यांचे इतरही अनेक उपयोग करू शकता.

●●

**चि. अमोल मुकुंद भिडे**, सांगली

एक सहाळ उन्हे माळून माझ्या दारी आली, हातावरती आभाळ ठेवून हसत हसत गेली !


# हलाहल

**मुकुंद पुरंदरे**

''...**आणि** मग अमृत मिळविण्यासाठी देव आणि दानव या दोघांनीही समुद्रमंथन करण्याचं ठरवलं. एरवी एकमेकांशी हाडवैर असलेले, एकमेकांशी सतत भांडणारे हे देव आणि दानव आता मात्र एकच आले होते

लहानगा समीर बिछान्यात पालथा पडून आपल्या हातांच्या लहानशा ओंजळीत हनुवटी टेकवून आजी सांगत असलेली समुद्रमंथनाची गोष्ट मोठ्या तन्मयतेने ऐकत होता. त्याला ही गोष्ट भारी आवडे. गोष्टी सांगण्याची

***...आणि एका बेसावध क्षणी युद्धाचा भडका उडाला. डॉ. पुनर्वसुंच्या कामाला आता वेग आला होता. अण्वस्त्रांचा वापर झालेल्या ठिकाणी जाऊन निर्माण झालेल्या किरणोत्सर्गाचा बंदोबस्त करण्यासाठी त्यांची धावपळ सुरू झाली. जगातील सर्व शक्ती डॉ. पुनर्वसुंच्या असामान्य क्षमतेपुढे नतमस्तक झाली. युद्धात झालेल्या अपिरिमित नुकसानाने सर्व प्रगत राष्ट्रांचे डोळे उघडले. वाहवंटातील सुरक्षित ठिकाणी स्फोट केले गेले. पण किरणोत्सर्गाचा त्रास कुणालाही झाला नाही. हे कसे घडले? डॉ. पुनर्वसुंनी हे 'हलाहल' कसे पचवले?त्यासाठी त्यांना ग्रॅण्डची मदत झाली ते मि. ग्रॅण्ड कोण होते? इहलोकीचा प्रवास संपवून ते कुठे निघून गेले? या गूढ प्रश्नांची उत्तरे वाचा 'हलाहल' या विज्ञानकथेत !***



पण बरं का समीर, सत्प्रवृत्तीच्या देवांना अमृत पिऊन अमर व्हायचं होतं ते जगाचं कल्याण करण्याकरिता मात्र दुष्ट प्रवृत्तीचे दानव अमृत प्राशन करून अमरत्व मिळाल्याने अधिकच उन्मत्त होणार होते...''

आजीची पद्धत थोडी पाल्हाळिक असली तरी तिच्या गोष्टींमध्ये लहान मुलांना खिळवून ठेवण्याची जादू असे. समीर तर झोपण्याआधी आजीकडून गोष्ट ऐकण्यासाठी नेहमी हटून बसे. त्याशिवाय त्याला झोप लागत नसे.

आजही समुद्रमंथनाच्या गोष्टीसाठी त्याने आजीच्या मागे लकडा लावला होता आणि यावेळी पुन्हा जणू काही नव्याने सांगत असल्यासारखी त्याची आजी ती गोष्ट त्याला रंगवून रंगवून सांगत होती.

**समुद्रवीणा छेडित चंद्रा उधळ निळ्या लहरी, अमृत खेचुनि आणू भूवर दडले जे जहरी.**

''...आता एवढा मोठा समुद्र घुसळायचा म्हणजे रवी केवढी तरी मोठी लागणार! आणि दोरही तेवढाच लांबलचक हवा! सगळेजण विचारात पडले. पण देवांना युक्त्यांना काय तोटा? त्यांनी मेरू पर्वताची केली रवी आणि वासुकी नावाचा प्रचंड लांब नाग दोरी म्हणून वापरला. देव तसे भारी हुशार! त्यांनी शेपटाकडील बाजू निवडली. राक्षस शक्तिमान असले तरी जात्याच बावळट! ते वासुकीच्या तोंडाकडे धावले आणि मग सुरू रस्सीखेच. अनेक दिवस त्यांचे समुद्र घुसळणे सुरू होते. देवाची एक टोळी थकली की दुसरी पुढे येई. पहिले देव मग विश्रांती घेत. त्यांचं काम मोठ्या शिस्तीत सुरू होतं. राक्षसांच्या गोटात मात्र सगळा सावळा गोंधळ होता. वासुकीने सोडलेल्या विषारी फुत्कारामुळे अनेक राक्षस मरून पडले. समुद्रमंथनाच्या या खेळामध्ये, अमृत मिळविण्याच्या हट्टापायी, लढाई न करताच दुष्ट राक्षसांचा नायनाट होऊ लागला. देवांचे काम सोपे झाले. पण समुद्रातून अमृत काही बाहेर येईना. देव आणि दानवांचे प्रयत्न मात्र सुरूच होते. मग समुद्र घुसळताना हळूहळू एकेक गोष्ट बाहेर पडू लागली...''

आजी समुद्रमंथनातून बाहेर पडणाऱ्या लक्ष्मी, कौस्तुभ, पारिजात, कामधेनु, ऐरावत अशा निरनिराळ्या रत्नांचं रसभरीत वर्णन करीत असे. समीर मोठ्या उत्कंठेने वाट पाहात असे 'क्लायमेक्स'ची ! 'हलाहल' नावाचे जहाल विष समुद्रमंथनातून बाहेर येई त्याबद्दल जेव्हा आजी सांगू आजी खूपच रंगवून सांगे. समुद्रातून हलाहल बाहेर येऊ लागण्याआधी पासूनच पृथ्वीवरील लहानसहान प्राणी, पक्षी कसे पटापट मरून पडू लागले आणि मोठ्या प्राण्यांनासुद्धा कसा त्रास जाणवू लागला त्याचे मोठे चित्तथरारक चित्र गोष्ट सांगताना आजी डोळ्यांपुढे उभे करीत असे.

''बरं का समीर, देवांना काही अडचण आली की ते सृष्टीचा निर्माता ब्रह्मदेवाकडे धाव घेत. आतासुद्धा सृष्टीवर ओढवणाऱ्या हलाहलाच्या भयंकर संकटाबद्दलची माहिती सांगून ब्रह्मदेवांनी सगळ्यांना सावध केलं. या जहाल विषाच्या प्रभावानं देव, दानवांसकट तिन्ही लोकांमधील म्हणजे स्वर्ग, मृत्यू आणि पाताळातील सर्व सजीव सृष्टीचा नाश होईल हे समजताच सगळे घाबरले आणि या संकटातून केवळ भगवान शंकर तुम्हाला वाचवू शकतील असे ब्रह्मदेवाने सांगताच सगळ्यांनी कैलास पर्वताकडे धाव घेतली...'' यापुढचा भाग समीर अतिशय तन्मयतेने ऐकत असे. जगाचा सर्वनाश टाळण्यासाठी भगवान शंकरांनी हलाहल पिऊन ते कंठात कसे साठवून ठेवले ते वर्णन ऐकताना समीर भारावून जाई.

''...आणि तेव्हापासून भगवान शंकरांना नीळकंठ असेही लोक म्हणू लागले...''

आजी समुद्रमंथनाची गोष्ट पुढे सांगत राही. पण पुढच्या कथेत समीरला रस नसे. त्याच्या दृष्टीने शंकरांनी हलाहल पिऊन जगाचे संरक्षण केले हाच गोष्टीचा 'क्लायमेक्स' होता. त्यानंतर पुढची गोष्ट ऐकता ऐकता कधीतरी त्याला झोप लागे.

सृष्टीच्या, मानवजातीच्या रक्षणासाठी एवढे मोठे धाडस इतर कोणी केल्याचे समीरने दुसऱ्या कुठल्या गोष्टीत ऐकले नव्हते. भगवान शंकर हे समीरचे त्याच्या लहानपणचे आराध्यदैवत बनले होते. पुढे जसजसा तो मोठा होऊ लागला तसे देव, धर्म या संकल्पनांबद्दलचे त्याचे विचार बरेचसे वास्तव आणि डोळस होऊ लागले.

चांगले वागण्याचा मार्ग दाखविणारी संकल्पना म्हणजे धर्म आणि चांगले वागण्याची बुद्धी व्हावी आणि शिस्त लावण्यासाठी धाक वाटावा म्हणून निर्मिलेली संकल्पना म्हणजे देव! तसेच चांगल्या-वाईट प्रवृत्तींशी निगडित असलेल्या पापपुण्याच्या कल्पना आपल्या शहाण्या पूर्वजांनी समाजाच्या स्वास्थ्यासाठी मांडल्या होत्या; याबाबत समीरची खात्री पटू लागली होती. पुराणातील सर्व कथा या प्रतिकात्मक असून त्यांचा हेतू करमणुकीबरोबरच समाजकल्याणाचा बोधसंदेश लोकांना देणे हा होता ही गोष्ट समीरला समजू लागली.

***

११ मे १९९८ हा दिवस एक मोठी खळबळजनक बातमी देऊन उगवला. भारताने अणुबॉंबच्या स्फोटाची यशस्वी चाचणी पोखरण येथे केल्याची ती बातमी होती. या घटनेचे

**अणू अणूस आले उधाण वातावरणार, जणु विराट खंडिल फुलवी वादळवात.**

पडसाद जगभर उमटले. उलटसुलट चर्चा होऊ लागल्या. समीरच्या घरीदेखील दुसरा विषय नव्हता. या घटनेचा मोठा धक्का समीरच्या वडिलांना श्रीयुत भार्गव पुनर्वसुंना बसला होता. त्यांच्या मते अण्वस्त्रनिर्मितीचे दूरगामी परिणाम अत्यंत भयानक स्वरूपाचे आणि जगाला सर्वनाशाकडे नेणारे होते; आणि आता भारतसुद्धा अण्वस्त्रधारी देशांच्या पंक्तीत जाऊन बसला होता.

समीरला आपल्या वडिलांचे विचार मनापासून पटत होते. आज विज्ञानाच्या क्षेत्रात प्रगतीची अनेक दालने खुली असताना विध्वंसक संशोधनात वैज्ञानिक आपली सगळी हुशारी, शक्ती आणि ज्ञान का खर्च करतात? असा त्याला नेहमी प्रश्न पडत असे. अणुबाँबच्या स्फोटामुळे निर्माण होणाऱ्या किरणोत्सर्गाच्या दुष्परिणांमाबद्दल त्याने वाचले होते. किरणोत्सर्गामुळे पुढील अनेक पिढ्यांमध्ये विविध प्रकारच्या शारीरिक विकृती निर्माण होऊ शकतात हे त्याला माहीत होते. त्यामुळे आज सकाळीच मिळालेल्या त्या बातमीने घरातील इतर मंडळींप्रमाणे तो देखील दुःखी झाला होता. खरं तर आज त्याचा बारावा वाढदिवस होता. नेहमीसारखा वाढदिवस साजरा न करता लोककल्याणासाठी विज्ञानाचा अभ्यास करऱ्याचा त्याने मनोमन निश्चय केला.

***

डॉक्टर समीर पुनर्वसु आपल्या आलिशान केबीनमधील प्रशस्त टेबलामागील खुर्चीत विचार करीत बसले होते. आज त्यांच्या वयाला पन्नास वर्षे पूर्ण झाली होती. आजचा दिवस खूप धामधुमीचा गेला होता. खरे तर डॉक्टर पुनर्वसुंना या सगळ्या सोपस्कारांमध्ये रस नव्हता; परंतु मोठेपणाबरोबर येणारे मानसन्मान औपचारिकतेचा एक भाग म्हणून स्वीकारणे हा देखील त्यांच्या रोजच्या कामाचाच एक भाग झाला होता. या सगळ्या कोलाहलातून बाहेर पडून आता कोठे त्यांना जरा निवांतपणे बसायला वेळ मिळाला होता. डॉक्टर पुनर्वसुंना अडतीस वर्षांपूर्वीचा तो दिवस आठवला. तो दिवस त्यांच्या मनात कायम घर करून बसला होता. त्याही दिवशी त्यांनी मनाशी एक संकल्प केला होता. गेली अडतीस वर्षे तो संकल्प सिद्ध करण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले होते. कॉलेजमध्ये आपल्या अभ्यासासाठी त्यांनी न्युक्लिअर फिजिक्स हा विषय निवडला होता. अणुबाँबचा स्फोट झाल्यानंतर निर्माण होणारा किरणोत्सर्ग शोषून घेण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण रचना असलेले एक संयंत्र विकसित करण्याच्या प्रयत्नात सध्या डॉक्टर समीर पुनर्वसु गुंतले होते. या यंत्रात किरणोत्सर्गरोधक कॅडमियम आणि बोरॉन या धातूंच्या दुहेरी आवरणाचा त्यांनी वापर केला होता. यामुळे शोषून घेतलेला किरणोत्सर्ग या यंत्राद्वारे सुरक्षितपणे वाहून नेण्याची सोय करता येणार होती. हा प्रयोग यशस्वी झाल्यास अग्निशामक यंत्राप्रमाणे छोट्या आकाराची किरणोत्सर्गशामक संयंत्रे विकसित करता आली असती. युद्ध टाळणे अशक्यच झाल्यास या यंत्राचा वापर करून अणुयुद्धाचे भयावह परिणाम बऱ्याच प्रमाणात आटोक्यात ठेवता येणार होते. डॉक्टर पुनर्वसुंचे संशोधन अद्याप पूर्णावस्थेला पोचले नव्हते. या संयंत्राची रचना अत्यंत गुंतागुंतीची असून हा प्रकल्प आत्यंतिक गोपनीय स्वरूपाचा होता.

या आधी अणुऊर्जेचा वापर विधायक कामांसाठी करण्याकरिता योग्य वातावरण तयार करण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. गेले तीन दिवस काही विचित्र स्वरूपाच्या बातम्यांची उच्चस्तरीय वैज्ञानिक वर्तुळात मोठी चर्चा होत होती. जगभरातील अनेक ठिकाणच्या अणुभट्ट्यांमध्ये काहीतरी अपघात होऊन त्या अणुभट्ट्या संपूर्णपणे नष्ट झाल्या होत्या. त्या अणुभट्ट्यांच्या आसपासचा संपूर्ण परिसर उद्ध्वस्त होऊन मोठ्या प्रमाणात मनुष्यहानी आणि वित्तहानी झाली होती. सुरुवातीला शत्रुराष्ट्रांकडून होणारा घातपाताचा हा प्रकार असावा असा निष्कर्ष काढला गेला. परंतु एका अनाकलनीय बाबीमुळे जगातील शास्त्रज्ञांना बुचकळ्यात टाकले होते. या सर्व स्फोटांमधून किरणोत्सर्गाचा एक कणदेखील वातावरणात पसरला नव्हता. किंबहुना या स्फोटांमधून जणू काही किरणोत्सर्ग झालाच नव्हता. पण हे कसे शक्य होते?

या विषयावर आंतरराष्ट्रीय

**विशुद्ध बुद्धी, रसाळ मनानी, चिंतन जनहिताचे करू, सर्व सुरक्षित, सर्व सुखी, भविष्याची कामना करू.**

पातळीवर बराच ऊहापोह झाल्यानंतर शास्त्रज्ञांची एक उच्चस्तरीय आंतरराष्ट्रीय समिती तयार करण्यात आली. या क्षेत्रातील असामान्य योगदानामुळे डॉक्टर समीर पुनर्वसुंना या समितीचे अध्यक्ष म्हणून नेमण्यात आले होते. आज सकाळी या समितीच्या झालेल्या महत्त्वपूर्ण मिटींगमध्ये सध्याच्या स्फोटक परिस्थितीच्या संदर्भात परस्पर सामंजस्याचा आणि वैज्ञानिक देवाण-घेवाणीचा एक ऐतिहासिक महत्त्वाचा करार करण्यात आला होता. या करारानुसार राष्ट्राराष्ट्रांमध्ये अणुविषयक धोरण आखून माहितीची देवाणघेवाण करण्याचे ठरले होते. डॉक्टर पुनर्वसुंच्या अथक प्रयत्नांना थोडे फार यश येऊ लागले होते. त्यांनी समाधानाने डोळे मिटून घेतले. त्यांच्या डोक्यातील विचारचक्र अव्याहत सुरूच होते.

अखिल विश्वातील एकुलती एक ज्ञात सजीव सृष्टी नष्ट व्हावी अशी या सृष्टीच्या निर्मात्याची कदाचित इच्छा नसावी! आजपर्यंत अनेकवेळा पृथ्वीवासीय विनाशाच्या उंबरठ्यावर उभे असताना कोणीतरी येऊन त्यांचा उद्धार केल्याची उदाहरणे इतिहासात तसेच जगातील अनेकविध संस्कृतींच्या पुरातन धर्मग्रंथात आढळतात. त्यांना आजी लहानपणी सांगत असलेली समुद्रमंथनाची गोष्ट आठवली.

खरोखर आज कोणीतरी शंकराची भूमिका बजावण्याची फार मोठी गरज निर्माण झाली होती! पण शंकराला-



देवाला जमणारी गोष्ट इतरांना कशी काय करता येणार? देव ही मानवनिर्मित संकल्पना असल्याची ठाम धारणा असलेल्या डॉक्टर पुनर्वसुंच्या मनात 'देव खरेच असायला हवे होते' अशी तीव्र इच्छा क्षणभराकरता निर्माण झाली. पुन्हा एकदा स्वत:च्या विचारांचे त्यांना हसू आले. त्यांनी हसतच डोळे उघडले. आणि त्यांना आश्चर्याचा धक्का बसला.

त्यांच्या पुढ्यातील सोफ्यावर एक विचित्र आकाराचा प्राणी बसला (!) होता. त्याला प्राणी एवढ्याचसाठी म्हणायचं कारण ती निर्जीव वस्तु नक्कीच वाटत नव्हती आणि बसलेला एवढ्यासाठी की तो सोफ्यावर होता. चकचकीत पांढऱ्या रंगाचा तो प्राणी डॉक्टर समीरच्या दिशेने पाहात असावा. त्याला हात पाय वगैरे अवयव दिसत नसले तरी अशासारख्या अवयवांच्या सर्व क्रिया करण्याची क्षमता त्या प्राण्यात असावी असे त्याच्याकडे पाहून जाणवत होते. डॉक्टर समीर त्याचे बारकाईने निरीक्षण करू लागले. साधारण तीन फूट उंचीच्या आणि दीड फूट व्यासाचा घेर असलेल्या त्या प्राण्याच्या शरीरात सातत्याने काहीतरी अंतर्गत जलद हालचाली, घडामोडी होत असाव्यात असा विचार डॉक्टर समीरच्या मनात पटकन आला. आपल्या मेंदूत सतत विचार चालतात तसा काहीतरी तो प्रकार असावा असा त्यांच्या मनाने निष्कर्ष काढला.

''डॉक्टर समीर पुनर्वसु, मी तुमचं अभिनंदन करायला आलोय. तुमच्या

प्रयोगशाळेत तुम्ही तयार केलेले कृत्रिम हृदय मोठे विस्मयकारक आहे. त्यात त्रुटी अनेक आहेत. त्याची क्षमतादेखील तशी नगण्य आहे. पण ते बनविण्याची तुमची पद्धत मात्र अत्यंत चोख आहे. मी आताच ते तपासून आलोय. हे आम्हालाही जमलं नव्हतं. पण ते बनवण्याचा तुमचा उद्देश माझ्या लक्षात आला नाही. इथे पृथ्वीग्रहावर आल्यापासून तुमच्यासारखा दुसरा बुद्धिमान सजीव मला आढळला नाही. म्हणून मुद्दाम तुमच्याशी बातचीत करण्याचं मी ठरवलं.''

डॉक्टर समीरना काहीएक आवाज किंवा शब्द ऐकायला आले नाहीत. परंतु वरीलप्रमाणे बोलल्याचे (!), कदाचित ते विचार असतील, त्यांना थेट त्यांच्या मनामध्ये जाणवले आणि ते विचार अर्थातच त्या प्राण्याकडून प्रक्षेपित झाले होते याची त्यांना खात्री होती.

''तू... तुम्ही कोण आहात? कोठून आलात? आणि कसल्या हृदयाबद्दल तुम्ही बोलत आहात मला काही कळत नाहीय. तुम्हाला माझं बोलणं समजतंय का? आणि तुम्ही माझ्याशी संभाषण कशा पद्धतीने करू शकताहात?'' डॉक्टर समीर त्या प्राण्याकडे पाहात मोठ्याने म्हणाले.

''होय, तुमचे बोलणे मला समजते आहे. मी पृथ्वीग्रहावरून खूप लांबच्या ग्रहावरून आलोय. खरं म्हणजे आम्हाला नाव असं काही नसतंच. परंतु तुमच्या सोयीसाठी तुम्ही मला तुमच्या पद्धतीप्रमाणे 'मिस्टर ग्रँड' म्हणा हवं तर. 'ग्रँड' म्हणजे सर्वोत्कृष्ट! आम्ही या सृष्टीतील सर्वोत्कृष्ट सजीव आहोत. अरे हो, मी तुमच्यातील शिष्टाचाराप्रमाणे व्यवस्थित बोलतोय ना? तशी आमची शिकण्याची प्रक्रिया फार जलद असते. ह्यापूर्वी तुमच्या मानवी संस्कृतीविषयी बरीच माहिती गोळा केलीय. आम्ही कोणतयही सजीवाशी त्याच्या भाषेत थेट त्याच्या मेंदूशी संपर्क साधून संवाद करू शकतो. तुम्ही तुमच्या प्रयोगशाळेत जे उपकरण करताय ते म्हणजे आमच्या शरीरातील एका महत्त्वाच्या अवयवाची ज्याला तुम्ही तुमच्या भाषेत हृदय म्हणता त्याची छोटी प्रतिकृती आहे. अर्थात मघाशी म्हटल्याप्रमाणे त्यात अनेक त्रुटी आहेत. शिवाय खऱ्या हृदयाच्या तुलनेत त्याची कार्यक्षमता अगदी नगण्यच आहे. पण असे काही प्रयोगशाळेत तयार करता येई असा विचारही आमच्या मनात कधी आला नव्हता. तुमचे पुन्हा एकदा मी अभिनंदन करतो पण हे हृदय तयार करण्याचा उद्देश मला कळला नाही?''

''मिस्टर ग्रँड, तुमचं मी स्वागत करतो. मलाही तुमच्या ग्रहाविषयी, तुमच्या संस्कृतीविषयी खूप जिज्ञासा वाटतेय. अभिनंदनबद्दल आभारी आहे. तुमच्या प्रश्नाचं उत्तर आधी देतो...'' आपल्या संशोधनाबद्दल डॉक्टर समीर सांगू लागले.

''मिस्टर ग्रँड, एकीकडे आम्ही वैज्ञानिक प्रगतीची नवनवीन शिखरं गाठीत असलो तरी, दुसरीकडे आम्हा मानवांमध्ये आपसातील स्पर्धा, परस्परातील द्वेष, मत्सर, उच्च-नीच भाव, सत्तासंघर्ष अशासारख्या दुष्ट प्रवृत्तींमुळे एकमेकांवर कुरघोडी करण्याची आमची सतत धडपड सुरू असते. मानवी संस्कृतीच्या आरंभापासून सुष्ट आणि दुष्ट प्रवृत्ती आम्हा मानवांमध्ये कायम वास्तव्य करून आहेत. या दोन प्रवृत्तींमधील संघर्ष, झगडा या सृष्टीच्या सुरुवातीपासून सुरू आहे. या झगड्यापायी आज आमची मानवी संस्कृती सर्वनाशाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे.

एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या खटाटोपात अत्यंत संहारक अशी शस्त्रास्त्रे, अण्वस्त्रे करण्यात आमची सर्व शक्ती, बुद्धी आणि ज्ञान आजपर्यंत आम्ही राबविले आहे. मानवी संस्कृतीला सगळ्यात जास्त धोका आज आहे तो जगातील सर्व देशांकडे प्रचंड प्रमाणात उपलब्ध असलेल्या अण्वस्त्रांचा. यातील फारच थोडी अण्वस्त्रे पृथ्वीवरील सजीवसृष्टीचा नाश करण्यासाठी पुरेशी आहेत. अणुबाँबच्या स्फोटामधून निर्माण होणारा किरणोत्सर्ग पुढील हजारो वर्षे सजीवसृष्टीला पुन्हा या ग्रहावर पाय रोवू देणार नाही. या किरणोत्सर्गाला थोडाफार आळा घालून काही प्रमाणात तरी मानवी संस्कृतीचा समूळ नाश होण्यापासून बचाव करण्याचा माझा प्रयत्न गेली अनेक वर्षे सुरू आहे. मी तयार केलेल्या उपकरणाचा वापर करून किरणोत्सर्गाच्या संकटावर आम्ही

**आभाळाची पायवाट थिटी व्हावी पाया, कुठेतरी असे बळ हवे वादळाया.**

मात करू शकलो तर आमच्या पुढील पिढ्यांना आम्ही सर्वनाशापासून वाचवू शकू. आता तर परिस्थिती अधिकच चिघळली आहे. गेले तीन दिवस अनेक देशांमधील अणुभट्ट्यांमध्ये गूढ पद्धतीने अणुस्फोट घडून येत आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या स्फोटांमधून किरणोत्सर्गाचा कणदेखील निर्माण होत नाही. पण कुठल्याही क्षणी अणुयुद्धाला सुरुवात होऊ शकेल अशी परिस्थिती अणुभट्ट्यांमधील या स्फोटांमुळे निर्माण झाली आहे. अर्थात या परिस्थितीतून मार्ग काढण्याचे आमचे प्रयत्न सुरू आहेत. आम्हा मानवांमध्ये असलेले दुर्दम्य आशावाद, श्रद्धा आणि प्रयत्नवाद हे गुणविशेष आजपर्यंत आमचे तारण करीत आले आहेत. या परिस्थितीतूनदेखील आम्ही मार्ग काढू याची आम्हाला पूर्ण खात्री आहे.

''मिस्टर ग्रँड, एक गोष्ट माझ्या लक्षात आली नाही. मी तयार केलेले उपकरण किरणोत्सर्ग शोषून घेण्याचे एक साधन आहे. ते तुमच्या हृदयाची प्रतिकृती कसे काय असू शकेल?

''तुमची परिस्थिती माझ्या लक्षात आलीय. मला खेद वाटतोय की काही प्रमाणात मी देखील येथील उद्‌भवलेल्या गंभीर परिस्थितीला कारणीभूत झालोय. पण आपण यातून काहीतरी मार्ग काढू या. आमचं एक वेगळंच जग आहे. तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण तुम्हाला ज्याप्रमाणे जगण्यासाठी प्राणवायूची गरज असते तसा आमचा प्राणवायू आहे 'किरणोत्सर्ग!' किरणोत्सर्गाच्या योग्य प्रमाणात पुरवठा न झाल्यास आमचे अस्तित्व संपुष्टात येते. आमची संस्कृती अतिशय पुरातन आहे आणि प्रगत आहे. आमची सर्व कामे आम्ही अंतस्थ प्रेरणांद्वारे करीत असतो. या प्रेरणा कार्यक्षम करण्यासाठी आम्हाला किरणोत्सर्गाची गरज असते. तुमच्या हृदयाच्या तुलनेत अत्यंत गुंतागुंतीची रचना असलेला आमचा एक अवयव असतो. त्याला आपण हृदयच म्हणूया. आमचे हे हृदय किरणोत्सर्गाचा मोठ्या प्रमाणात साठा करीत असते. त्याची तुम्ही कल्पनादेखील करू शकणार नाही. तुमच्या पृथ्वीवरील उपलब्ध अणुभट्ट्यांमधील सर्व अण्वस्त्रांचा स्फोट करून निर्माण झालेला किरणोत्सर्ग आमच्यातील एकजण आपल्या हृदयात ग्रहण करू शकतो. आम्ही तसे संख्येने जास्त नाही. तुमच्या भाषेत आम्ही काही हजाराच्या संख्येत असू. आमच्या लेखी त्याला काही महत्त्व नाही. मात्र तुमच्याप्रमाणे आमच्यामध्ये अस्तित्वासाठी आम्हाला एकमेकांशी संघर्ष करावा लागत नाही. उलट, आम्ही प्रसंगी आत्मसमर्पण करून इतरांना संजीवनी देण्यासाठी प्रयत्नशील असतो. याचे एक कारण म्हणजे एका विशिष्ट कालमर्यादेनंतर आमचे अस्तित्व आपोआप संपुष्टात येते. यावेळी आमचे हृदय निष्क्रिय बनते. निष्क्रीय अवस्थेत काही काळ राहिल्यानंतर, तुमच्या शरीराचे मृत्यूनंतर विघटन होऊन जशी त्याची माती होते, त्याचप्रमाणे आमच्या हृदयाचे विघटन होऊन आजपर्यंत आम्ही शोषून घेतलेला किरणोत्सर्ग पुन्हा एकदा वातावरणात सोडला जातो आणि त्यामुळे इतर बांधवांची सोय होते. तुमच्याकडे पर्यावरणाचे संतुलन बिघडल्यामुळे ज्याप्रमाणे तुम्हाला आवश्यक असलेल्या प्राणवायूचे प्रमाण कमी होऊन इतर अपायकारक घटकांचे प्रमाण वाढीस लागले आहे आणि पर्यावरणाची गंभीर समस्या तुमच्यापुढे निर्माण झाली आहे, साधारण त्याच धर्तीवर आमच्याकडे देखील किरणोत्सर्गाचे प्रमाण कमी कमी होत चालले आहे. एकीकडे त्याची कारणमीमांसा करण्यात आमचे शास्त्रज्ञ गुंतले असतानाच आमच्यापैकी काहीजण किरणोत्सर्गाच्या शोधात इतर ग्रहमाला पालथ्या घालण्याचे काम करीत आहेत. मी त्याच शोधात तुमच्या ह्या पृथ्वीग्रहावर आलो आहे. पण येथे तुम्ही लोकच एकमेकांचा नाश करण्याकरिता ही अण्वस्त्रे तयार करता आहात हे पाहून मात्र मला फार आश्चर्य वाटते आहे. तर दुसरीकडे तुमचे प्रयोग पाहून माझ्या मनात नवीन कुतूहल निर्माण झाले आहे.''

''मिस्टर ग्रँड, तुम्ही तुमच्या ग्रहावरून येथे कसे आलात आणि तुमचा पुढचा बेत काय आहे? किरणोत्सर्गाचा साठा जमा करून तुम्ही पुन्हा तुमच्या ग्रहावर कसे जाणार? मुख्य महत्त्वाचा प्रश्न म्हणजे किरणोत्सर्ग मिळविण्यासाठी तुम्ही

**भक्ति, चिकाटी कसा लागली, देवाजीला करुणा आली इच्छित ठायी नाव पोचली, प्रभा फाकली चोहीकडे.**

यापुढेही अणुभट्ट्यांमध्ये स्फोट घडवून आणणार काय? आता तुमच्या लक्षात आले असेल की तसे करण्याने तुम्ही एका प्रगत सजीव सृष्टीच्या नाशास कारणीभूत ठरणार आहात.''

''होय डॉक्टर समीर पुनर्वसु, मला त्या गोष्टीची जाणीव आहे. त्यामुळे मी देखील विचारात पडलो आहे. तुमच्या इतर प्रश्नांचे उत्तर म्हणजे आम्ही आमच्या प्रवासासाठी सुपर हायपर स्पेस शटल्स विकसित केली आहेत. हे अभेद्य असे स्पेससूट्स असतात. त्यांच्यात लहान आकाराची पण अत्यंत शक्तिमान रॉकेट्स बसविलेली असतात. ह्या स्पेससूटसमध्ये बसून आम्ही त्या रॉकेटच्या आज्ञावलीमध्ये विशिष्ट दिशा, वेग आणि अंतराची नोंद करून त्या रॉकेटचा स्फोट घडवून आणतो. या स्फोटामुळे तुमच्यासारखा आम्हाला काही त्रास होत नाही. मात्र दिलेल्या सूचनांप्रमाणे आम्ही इच्छित जागी जाऊन पोचतो. या स्पेससूटमधील रॉकेटच्या आज्ञावलीत परतीची दिशा, वेग आणि अंतर मी आधीच नोंदवून ठेवले आहे. रॉकेटवरचे बटन दाबल्याबरोबर काही वेळातच मी माझ्या ग्रहावर जाऊन पोहोचेन. परंतु आता मुख्य समस्या निर्माण झाली आहे ती म्हणजे किरणोत्सर्गाचा साठा करण्याची.''

''ते तसे सोपे आहे मिस्टर ग्रँड...'' डॉक्टर समीर उत्तेजित स्वरात बोलू लागले,

''सध्या अण्वस्त्रांचा साठा मोठ्या प्रमाणात नष्ट करण्याचे आमचे जागतिक पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. या प्रयत्नांमध्ये पुन्हा आमची समस्या किरणोत्सर्गाची आहे. ही अण्वस्त्रे वाळवंटामध्ये नष्ट केल्यानंतर निर्माण होणारा किरणोत्सर्ग झपाट्याने पसरून सजीव सृष्टीस घातक ठरेल. पण आता या किरणोत्सर्गाचा तुम्ही बंदोबस्त करू शकाल.

''दुसरी एक शक्यता म्हणजे दुर्दैवाने सध्याच्या स्फोटक परिस्थितीत अणुयुद्ध सुरू झाले तरी त्यातून निर्माण होणारा किरणोत्सर्ग तुम्ही शोषून घ्याल. कमीत कमी पुढच्या पिढ्यांचे आपण संरक्षण करू शकू.''

''मजजवळ जास्त वेळ नाहीय.'' मी आधी सांगितल्याप्रमाणे माझ्या अस्तित्वाची कालमर्यादा संपत आलेली आहे. याच कारणामुळे किरणोत्सर्ग गोळा करण्यासाठी दुसऱ्या ग्रहमालेत जाण्याकरिता माझी निवड झाली आहे. आधी ठरल्याप्रमाणे मी आजच जगात सर्व ठिकाणी अणुभट्ट्यांमध्ये स्फोट घडवून किरणोत्सर्गाचा साठा घेऊन माझ्या ग्रहावर परतणार होतो. उद्या माझ्या अस्तित्वाचा शेवटचा दिवस आहे.''

''येथील सजीव सृष्टीचा नाश होण्याने मला काही फरक पडणार नव्हता. परंतु येथील यच्चयावत सजीव केवळ विध्वंसक प्रवृत्तीचेच नसून मानवाच्या कल्याणासाठी धडपडणारे तुमच्यासारखे मानव पाहून मला माझा बेत बदलावा असे वाटू लागले आहे. शिवाय आम्हाला न साधलेली किमया तुम्ही करून दाखविली आहे. त्याचा आम्ही आदर करणे आवश्यक आहे.''

''पण मग तुम्ही आता काय करायचे ठरविले आहे मिस्टर ग्रँड?''

''यातून मला एकच मार्ग दिसतोय. पण त्यासाठी तुम्ही सहकार्य करणे आवश्यक आहे.''

''मी काहीही करायला तयार आहे.'' डॉक्टर समीर अधीरपणे म्हणाले.

''ठीक आहे. त्या आधी आमच्या शारीरिक कार्यपद्धतीबद्दल थोडे सांगतो. आमच्या अस्तित्वाची कालमर्यादा संपते याचा अर्थ आमच्या मेंदूचे बौद्धिक कार्य संपते. आमचा मेंदू कार्यान्वित असताना तो आमच्या हृदयाची क्रिया सुरू ठेवतो आणि आमच्यामध्ये अनेक शक्तिमान प्रेरणांची निर्मिती करतो. या प्रेरणा, म्हणजेच आमचे विविध अवयव, त्यांना नेमून दिलेली कार्ये करतात. आमची कालमर्यादा संपली की आमच्या मेंदूचे कार्य बंद पडते. त्यामुळे इतर सर्व प्रेरणा संपून आमच्या अस्तित्वाचा शेवट होतो. त्याचबरोबर हृदय निष्क्रिय झाल्याने त्याचे विघटन होऊन आधी सांगितल्याप्रमाणे किरणोत्सर्ग पुन्हा वातावरणात पसरतो. माझ्या हृदयाची विघटन प्रक्रिया सुरू होईल. परंतु त्याआधी या हृदयाचे रोपण दुसऱ्या सक्षम मेंदूच्या सजीवामध्ये केल्यास त्याची क्रिया अधिक काळपर्यंत, म्हणजे तो दुसरा सजीव, त्याचा मेंदू कार्यक्षम असेपर्यंत सुरू राहू शकेल.

''मिस्टर समीर पुनर्वसु, माझ्या मते तुमचा मेंदू या कामासाठी पुरेसा

**हात हवे असे मज शुभंकर अन् प्रलयंकर, शांतीरूप जे ज्यात जळे परि विराट संगर.**

कार्यक्षम आहे. जो मेंदू आमच्या हृदयाची प्रतिकृती तयार करू शकतो तो निश्चितपणे हृदयाची क्रिया सुरू ठेवण्यासाठी सक्षम असणार. माझ्या हृदयाचे रोपण मी तुमच्या शरीरात करू शकेन. त्यापुढचा निर्णय घेणे तुमच्या इच्छेवर अवलंबून असेल. तुम्ही योग्य निर्णय घ्याल याची मला खात्री आहे.''

डॉक्टर समीर पुनर्वसु थोडा वेळ विचारात बुडून गेले. अचानक त्यांना आपल्या लहानपणाची आठवण झाली. त्यांची आजी त्यांना गोष्ट सांगत होती. ''बरं का समीर, जगाच्या कल्याणाकरता भगवान शंकरांनी हलाहल पचवलं...''

आपल्या आराध्यदैवत वेगळ्या परिस्थितीत अनुकरण करण्याची संधी समीरला मिळाली होती. आपला संकल्प सिद्धीला नेण्याची वेळ आली होती.

''मी तयार आहे.'' डॉक्टर समीर पुनर्वसु निश्चयी स्वरात म्हणाले. त्यांच्या चेहऱ्यावर कृतकृत्य झाल्याचे भाव दिसत होते.

***

मिस्टर ग्रँडच्या भेटीनंतर पुढील घडामोडी फार थोड्या अवधीत घडून आल्या. परग्रहावरील त्या प्राण्याने, मिस्टर ग्रँडने हृदयरोपणाचे काम मोठ्या कुशलपणे केले. त्यानंतर लगेचच त्याच्या प्रेरणा क्षीण होत, त्याच्या शरीराचे सूक्ष्म कण बनून वातावरणात विरघळून गेले. डॉक्टर समीर शुद्धीवर आले तेव्हा मिस्टर ग्रँडचं अस्तित्व लोप पावलं होतं. त्याचं हृदय मात्र डॉक्टर समीर पुनर्वसुंच्या शरीरात सामावलेलं होतं.

आतापर्यंतच्या घडामोडींची माहिती जगाला देणं डॉक्टर समीर पुनर्वसुंना फार कठीण गेलं. अनेकांनी, विशेषत: प्रगत राष्ट्रांनी त्यांच्या सांगण्यावर विश्वास ठेवला नाही. अणवस्त्रांचा साठा नष्ट करण्याच्या डॉक्टर पुनर्वसुंच्या प्रस्तावाला या प्रमुख राष्ट्रांकडून प्रखर विरोध झाला. अणुभट्ट्यांमधील स्फोटांमुळे बिघडलेली परिस्थिती अधिकच चिघळली आणि एका बेसावध क्षणी युद्धाचा भडका उडाला.

डॉक्टर पुनर्वसुंच्या कामाला आता वेग आला होता. अण्वस्त्रांचा वापर झालेल्या ठिकाणी जाऊन निर्माण झालेल्या किरणोत्सर्गाचा बंदोबस्त करण्यासाठी त्यांची धावपळ सुरू झाली. दहा दिवसांच्या युद्धकाळात झालेला विध्वंस आणि डॉक्टर समीर पुनर्वसुंच्या विधानामधील सत्यता या दोन्हींबद्दल जगाची खात्री पटली. जगातील सर्व शक्ती डॉक्टर पुनर्वसुंच्या असामान्य क्षमतेपुढे नतमस्तक झाली. अण्वस्त्र निर्मूलनाची सारी सूत्रे डॉक्टर पुनर्वसुंच्या हाती आली. आतापर्यंत झालेले नुकसान डोळे उघडण्यास पुरेसे होते. आपल्याजवळील अण्वस्त्रे नष्ट करण्यामागे प्रगत राष्ट्रांनी आता पुढाकार घेतला होता.

डॉक्टर पुनर्वसुंनी वाळवंटात एका सुरक्षित जागी तळ ठोकला होता. आज शेवटचा स्फोट आटोपला होता. नुकत्याच होऊन गेलेल्या युद्धात मोठी हानी झाली असली, तरी आता पृथ्वीवर उरलेल्या मानव व इतर सजीवांना निर्धोकपणे जगता येणार होते. येणाऱ्या पिढ्यांचे भविष्य उज्ज्वल होते. डॉक्टर समीर पुनर्वसुंचे काम आता आटोपले होते. किरणोत्सर्ग शोषून घेताना त्यांच्या शरीरावर त्याचे दुष्परिणाम झालेले दिसत होते.

डॉक्टर पुनर्वसुंनी शांतपणे समोरचा शेवटचा अहवाल लिहून पूर्ण केला. भूमिगत सुरक्षित बंकरमधून ते बाहेर आले. बाहेर वाळवंटातील रात्रीचा सुखद गारवा त्यांना मोहवून गेला. आकाशातील चांदण्यांचा मंद प्रकाश विस्तीर्ण वाळवंटात पसरला होता. डॉक्टर पुनर्वसुंनी सोबत आणलेल्या स्पेससूटमध्ये शिरकाव केला. स्पेससूटमधील रॉकेटच्या आज्ञावलीमध्ये दिशा, वेग आणि अंतराची नोंद केलेली होती.

''बरं का समीर, जगाच्या मानवजातीच्या कल्याणासाठी...'' डॉक्टर समीरच्या कानात आजीचा स्वर घुमत होता. त्यांनी रॉकेटचे बटन दाबले. दुसऱ्याच क्षणी त्यांचा इहलोकीचा प्रवास संपला. त्यांच्या शरीराची राख आणि मिस्टर ग्रँडचे हृदय घेऊन स्पेससूट त्याच्या प्रवासाला निघाला होता. त्या दूरच्या ग्रहावरील सजीवांना संजीवनी देण्यासाठी!

●●

**श्री. मुकुंद जोगळेकर**
२७, अनंत विजय अपार्टमेंट,
हिरा विद्यालयाजवळ, विरार
(पश्चिम), जि. ठाणे.


**परिस्थितीचे बंध तोडुनी, आपत्तीशी झुंज खेळुनी, जाई सुखाच्या वातावरणी, जगा हासवी स्वत:हसुनी.**

***१८ मे १४९८! व्हाश्कू-द-गामा अनेक संकटांना तोंड देत भारताच्या किनाऱ्यावर पोहोचला. त्या रोमहर्षक क्षणी तो आणि त्याचे नावाडी 'आला किनारा'... या भावनेने आनंदाने वेडावून गेले असतील. त्यांच्या भारताच्या पहिल्या यशस्वी सागर पर्यटनाला यंदा ५०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने या सागरी प्रवासाची रोमहर्षक कहाणी आपल्यासाठी सांगितली आहे निनाद बेडेकर यांनी!***

## भारताच्या सागरी मार्गाचा शोध लावणारा

# व्हाश्कू-द-गामा

**निनाद बेडेकर**



**१८** मे १९४८! व्हाश्कू द गाम भारताचा किनारा पाहात होता. त्याच्या अनुभवी नावाड्याने ते कालिकत नावाचे बंदर असल्याचे त्याला सांगितले. हे ऐकल्यावर आणि हिंदुस्थानचा किनारा पाहिल्यावर आपण आपल्या उद्दिष्टांपाशी पोहोचल्याची व्हाश्कूची खात्री झाली! हिन्दुस्थानशी थेट व्यापार आता पोर्तुगाल करणार अशी आशा द्विगुणित झाली. गेल्या दीडशे वर्षांत अशी संधी प्रथमच प्राप्त होणार होती. पोर्तुगालच्या नावाड्यांनी अथक परिश्रमानंतर हिन्दुस्थानचा सागरी मार्ग शोधून काढला होता.

गेली पाच-सहा वर्षे, नजीकच्या स्पेनचा राजा फर्दिनंद हा त्यांचा शोधक ख्रिस्तोफर कोलंबस याने पाठवलेली पत्रे दाखवून पोर्तुगालच्या राजाला खजील करत होता. व्यापारात स्पेन हा पोर्तुगालच्या पुढे गेला आहे असे भासवत होता. परंतु खरे तर कोलंबसाला हिन्दुस्थानचा मार्ग मिळाला नव्हता. मसाल्याचे पदार्थही मिळाले नव्हते. थोडे फार सोने, चांदी काय ती त्याच्या हाताला लागली होती. भारताला जाण्यासाठी सागरी मार्ग शोधण्याचा प्रयत्न युरोपातील अनेक देश करत होते. स्पेन आणि पोर्तुगाल त्यात अग्रेसर होते. शंभर दीडशे वर्षांच्या अथक प्रयत्नानंतर भारताला जाण्याचा सागरी मार्ग पोर्तुगालच्या साहसी नावाड्यांनी शोधून काढला होता. युरोपमध्ये या शोधाला विलक्षण महत्त्व प्राप्त झाले. सर्व जगच आता आपल्या ताब्यात आल्यासारखे पोर्तुगालच्या राजाला वाटले. या आनंदाच्या भरात त्याने स्पेनच्या राजाला पत्र लिहिले,

''मोस्ट हाय अ‍ॅण्ड एक्सलंट प्रिन्स अ‍ॅण्ड प्रिन्सेस, मोस्ट इम्पोर्टंट लॉर्ड अ‍ॅण्ड लेडी...

आपल्याला माहीत आहेच की, आमच्या दरबारातील व्हाश्कू द गाम आणि त्याचा भाऊ पावलू द गाम यांना चार जहाजे घेऊन व्यापारासाठी नवीन जागा शोधण्याचा हुकूम दिला होता. त्यांच्या मोहिमेला दोन वर्षे उलटून गेली... त्यांच्या एका कप्तानाने आमच्या हातात नुकत्याच आणून दिलेल्या संदेशानुसार आमच्या हस्तकांनी भारताच्या सागरी व्यापारी मार्गाचा शोध लावला आहे... एवढेच नव्हे तर अत्यंत मौलिक रत्ने आणि मसाल्याच्या पदार्थांचे नमुनेही व्यापारासाठी बरोबर आणले आहेत... आपल्याला हे कळल्यावर विशेष आनंद होईल असे वाटते.''


युरोपमध्ये ह्या बातमीचा फार गाजावाजा झाला. मूळच्या इटलीतील फ्लॉरेन्सचा असणाऱ्या पण सध्या पोर्तुगालमधील लिस्बाँ येथे राहणाऱ्या एका व्यापाऱ्याने इटलीतील मित्राला लिहिले,



'जगातील सर्व संपत्ती आपल्या हातात आली असेच वातावरण इथे आहे. पोर्तुगालला जगाच्या सर्वश्रेष्ठ खजिन्याची किल्ली मिळाल्यातच जमा आहे.'

पोर्तुगालच्या या यशात मेहनत, साहस, अविश्रांत परिश्रम यांचा वाटा फार मोठा होता. शंभर दीडशे वर्षे पोर्तुगीज जहाजे आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर घिरट्या घालीत होती. आफ्रिकेच्या दक्षिणेचे टोक शोधण्याचा अविरत प्रयत्न करीत होती.

तुझी राजहंसा भारी उंच ही भरारी, तुझ्याविण कैसी कोणी कधी साधणारी?




इ.स. १४८८ मध्ये बार्थेलेमी दिएशने 'केप ऑफ गुडहोप' चा शोध लावला. पण त्याला मग तेथूनच परत यावे लागले होते.

दिएशनंतर व्हाश्कू द गामला ही संधी मिळाली. व्हाश्कूच्या लहानपणाबद्दल काहीच माहिती उपलब्ध नाही. दक्षिण पोर्तुगालमधील 'साईन्स' मध्ये त्याचा जन्म झाला. ते साल बहुधा १४६० असावे! पोर्तुगालचा राजा दुसरा जॉन याने व्हाश्कूच्या वडिलांवर भारताचा दर्यामार्ग शोधण्याची जबाबदारी सोपवली होती. पण हे होण्याआधीच जॉन आणि व्हाश्कूचे वडील अशा दोघांचाही मृत्यू झाला. नवीन राजा पहिला मानुएल याने व्हाश्कूवर ही जबाबदारी सोपवली. व्हाश्कू नौकानयनात प्रवीण झाला होता. वडिलांबरोबर दर्याद राहिल्याने सागराचा त्याला पूर्ण परिचय झाला होता. मोठा अनुभव त्याच्या पाठीशी होता. त्याचा स्वभाव जिद्दी होता. कष्टांची त्याला फिकीर नव्हती. तो अतिशय तापट होता. पण टाकलेली जबाबदारी पूर्णत्वाला नेणारा होता. पोर्तुगालच्या राजाने भारताच्या शोधासाठी अतिशय अचूक माणूस हुडकला होता!!

८ जुलै १४९७ रोजी चार जहाजे बरोबर घेऊन व्हाश्कूने पोर्तुगाल सोडले. ही जहाजे त्यावेळच्या दृष्टिकोनातून अगदी अद्ययावत होती. लांब पल्ल्याच्या नौकानयनासाठी उत्कृष्ट होती. दोन जहाजे तर खास या मोहिमेसाठीच बांधण्यात आली होती. भरपूर सामानसुमान, तोफा, दारुगोळा, त्यावेळचे नौकानयन तख्ते, तसेच उत्तम साधनसामग्री या जहाजांवर होती. गोन्सालो अल्वारिस या कप्तानाच्या ताब्यात असलेले 'सांव गॉब्रिएल' हे जहाज त्यांचे 'फ्लॅगशिप' होते. व्हाश्कूचा भाऊ पावलो हा 'सांव राफायल'या जहाजाचा मुख्य होता. 'बेरिओ' हे जहाज निकलाव कोएल्होच्या ताब्यात होते. चौथे जहाज गोन्सालो नूनेसच्या आधिपत्याखाली डोलत होते. या चौथ्या जहाजात खच्चून सामान भरण्यात येत होते. वाईन आणि पाणी, बिस्किटे, सुके मासे, खारवलेले डुकरांचे मांस आणि बीफ, मध, साखर वगैरे भरपूर सामान बरोबर घेतले होते. या मोहिमेला तीन वर्षे पुरेल एवढा एकूण पुरवठा होता! असताना व्हाश्कू हा खलाशी भरण्याच्या मोहिमेत गुंतला होता. दीड-दोनशे खलाशी तरी लागणार होते. बार्थेलेमी दिएशच्या मोहिमेतील लोक त्याने घेतलेच. शिपाई, सुतार, भाषातज्ज्ञ, धर्मोपदेशक, ट्रंपेट वाजवणारे असे अनेक लोक बरोबर घेण्यात आले. शिक्षा झालेले गुन्हेगारही व्हाश्कूने बरोबर घेतले होते. ही मोहीम यशस्वी झाली तर त्यांच्या शिक्षेत कपात करण्यात येणार होती.

८ जुलै १४९७ हा पर्यटनाचा दिवस ठरला! व्हाश्कू द गाम, चार जहाजे घेऊन हिन्दुस्थानच्या सागरी मार्गाच्या शोधार्थ निघाला. अटलांटिक महासागरात हा काफिला आला. मोरोक्कोच्या किनाऱ्याने ते केपव्हर्दे या बेटांवर जाणार होते. तेथे पिण्याचे होते. विषुववृत्ताच्या किंचित उत्तरेला असणाऱ्या सिएरा लिआँ येथे व्हाश्कूने आपला मार्ग बदलून जहाजे नैऋत्येकडे वळवली! या बदलाचे सगळ्यांना आश्चर्य वाटले.

अथांग अटलांटिक महासागरात एकूण ९० दिवस या काफिल्याने काढले. या दिवसात जमिनीचे दर्शन न झाल्याने व्हाश्कूच्या खलाशांत नैराश्य पसरले. ते बंडाची भाषाही करू लागले. पण व्हाश्कू अतिशय कडवा होता. त्याने परिस्थिती आटोक्यात आणली. तीन महिन्यानंतर जहाजे आग्नेयेकडे वळवण्यात आली. या वेळेस ते ब्राझीलच्या किनाऱ्यापासून अवघे ६०० मैल दूर होते. पण ही चाल अतिशय अचूक ठरली. दिएशने दिलेल्या सल्ल्यानेच व्हाश्कूने ही कृती ठरवली होती. सध्या जहाजे हाच मार्ग अवलंबतात! २२ ऑक्टोबरला जहाजावरील खलाशांना काही देवमासे आणि सील दिसले. किनाऱ्याकडे वेगाने उडणारे पक्षीही त्यांनी पाहिले. किनारा जवळ आल्याची ती नांदी होती! शेवटी ४ नोव्हेंबरला आफ्रिकेचा किनारा दृष्टोत्पत्तीस आला. व्हाश्कूच्या जहाजावरील लोकांनी आरोळ्या ठोकल्या. त्यांना अतिशय आनंद झाला. त्यांनी जे होते त्यांतले उत्तम कपडे चढवले. जहाजावर निशाणे लावली. जहाजे सजवली. तोफांचे बारही काढले. व्हाश्कूच्या नौकानयन कौशल्याला त्यांनी दिलेली ती सलामी होती. केप ऑफ गुडहोपच्या पासून उत्तरेस १२५ मैल अंतरावर असलेल्या सेंट हेलेना बे येथे जहाजांनी नांगर टाकले. दक्षिण आफ्रिकेतील माणसांबरोबर त्यांची येथे प्रथम मुलाखत झाली. किनाऱ्यावरून एक माणूस जहाजावर आला. त्याच्या समोर ठेवलेले सर्व खाणे त्याने बकासुराप्रमाणे फस्त केले! या आफ्रिकी माणसाला एक दिवस जहाजावर ठेवून, दुसऱ्या दिवशी कपडे घालून त्याला परत किनाऱ्यावर पाठवण्यात आले. त्याचा पोशाख किनाऱ्यावरच्या विवस्त्र माणसांना आवडलेला दिसला. पुढचे तीन दिवस वस्तूंच्या अदलाबदलीसाठी किनाऱ्यावर गर्दी झाली. तेथील लोकांची भीतीही गेली. मग त्या लोकांनी जहाजावरच्या काही लोकांना जहाजावरच्या काही लोकांना किनाऱ्यावर मेजवानीस बोलावले. त्यावेळी काहीतरी बिनसले. स्थानिक लोकांनी एकदम मारामारीच सुरू केली. त्या

**नैराश्य हे सदा गळावे, दीप्तीच्या तेजाने, सुख, कीर्ती, यश लक्ष्मीच्या पूजेने.**


आफ्रिकी लोकांनी फेकलेल्या भाल्यांमुळे व्हाश्कूसकट अनेक खलाशीही जखमी झाले. पण मग नेहमीचाच खेळ झाला. पुढील प्रवासात प्रथम दोस्ती मग मेजवानी आणि नंतर लगेच मारामारी असेच सुरू राहिले! भारतापर्यंतच्या प्रवासात जवळजवळ हाच प्रकार कायम होता.

'केप ऑफ गुडहोप' पाशी एकदम वादळ झाले. जहाजे किनाऱ्यावर लावणे अशक्य झाले. त्यासाठी चार दिवस वाट पाहावी लागली. २५ नोव्हेंबरला व्हाश्कू केपच्या पूर्वेला ३०० मैल अंतरावरील 'मोसेल बे'ला आला. उपयुक्त वस्तूंचा भरणा जहाजांवर करण्यात आला. काही खलाशी 'स्कर्व्ही' ने आजारी होते. त्यांच्यावर उपचार करण्यात आले. चौथे जहाज येथे 'स्कटल' करण्यात आले. एक स्मृतिस्तंभही तेथे उभारण्यात आला. पण व्हाश्कू या बंदरातून बाहेर पडत असताना स्थानिक लोकांनी केलेला या स्तंभाचा नाशही त्यांना पाहावा लागला.


आता आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्याने त्यांचा प्रवास सुरू होता. १६ डिसेंबरला बार्थेलेमी दिएश याने १४८८ मध्ये उभा केलेला स्मृतिस्तंभ त्यांना दिसला. दिएश परत फिरला ते ग्रेट फिश रिव्हरचे मुखही आले. आता पुढचा प्रवास अज्ञाताचा होता. कोणत्याही युरोपीय जहाजाने यापुढचा प्रवास केल्याची नोंद नव्हती. व्हाश्कूचा रोजनिशीकार अल्व्होर व्हेल्हो याने ही सर्व हकीकत व्यवस्थित लिहून ठेवली आहे. ख्रिसमसला तो लिहितो.

''आम्ही सत्तर लीग (२५० मैल) नव्या किनाऱ्यापासून चाललो. याचे नाव व्हाश्कूने 'नेताल' असे ठेवले आहे. सध्या गोडे पाणी जहाजावर नाही. भोजन खाऱ्या पाण्यातच करावे लागत आहे. प्रत्येक खलाशाला दर दिवशी पिण्यासाठी म्हणून फक्त एक पिंट पाणी दिले जात आहे.''


पुढे परिस्थिती निवळली. 'डेलागोअ बे' येथे व्हाश्कूला पाणी, निवारा मिळाला. जहाजांची दुरुस्ती करण्यात आली आणि त्यावर सामानसुमानही चढविण्यात आले. पुढचा मुक्काम 'केलिमन'चा होता. येथे सागरास मिळणाऱ्या नदीचे नाव त्याने 'शुभशकुनी' ठेवले. येथून पुढे गेल्यावर त्यांना अरबी बोलणारे कृष्णवर्णी लोक भेटले. त्यांच्या जवळची अद्ययावत



नौकानयनाची साधने पाहून व्हाश्कूला आश्चर्य वाटले. त्यांची जहाजे मसाल्याच्या पदार्थांनी शिगोशिग भरली होती. लवंगा, आले, मिरी, दालचिनी यांच्यासोबत सोने, चांदी, रत्ने-माणके या जहाजांवर होती. या कृष्णवर्णी लोकांनी व्हाश्कूला सांगितले की, भारतात या गोष्टींची खरेदी करण्याची गरजच नाही. तेथे त्या मुबलक मिळतात. फक्त तेथे जाण्याचीच खोटी आहे. व्हाश्कूला अतिशय आनंद झाला. आपले स्वप्न पुरे होणार असे त्याला वाटू लागले. खरे तर त्याचे खलाशी कंटाळले होते. मध्ये त्यांनी बंडाची भाषा सुरू केली तेव्हा व्हाश्कूने




**आम्ही अंधाराचा सदा करू धिक्कार, अन् स्वप्न कालचे करू आज साकार.**



त्यांच्या नेत्यालाच ठार मारल्यामुळे ते नमले होते. 'स्कर्व्ही' ने खलाशी बेजार झाले होते. व्हाश्कूची जिद्द मात्र प्रखर होती. त्यामुळेच तो प्रवास रेटत होता. मोझांबिकच्या सुलतानाने व्हाश्कूचे स्वागत केले पण ते फार काळ टिकले नाही. व्हाश्कू मुसलमान नाही असे कळल्यावर सुलतानाने व्हाश्कूबरोबर संबंध जोडण्याचे नाकारले तरी त्याने अनुभवी नावाडी देण्याचे कबूल केले.

व्हाश्कू मालिन्दीला आला. पण स्थानिक लोकांशी तो जपूनच वागत होता. त्याच्या या संशयामुळेच लुटले जाण्याच्या प्रकारातून त्यांची सुटका झाली. मालिन्दीच्या सुलतानाने व्हाश्कूला मदत केली. तेथेच व्हाश्कूला भारतातील हिंदू व्यापारी भेटले. त्या हिंदू लोकांना व्हाश्कूची पोर्तुगीज मंडळी हिंदू वाटली तर व्हाश्कूला ते हिंदू व्यापारी ख्रिस्ती वाटले! मालिन्दीला मोठी मेजवानी झाली! फटाक्यांची आतशबाजीही झाली!! तोफांची सरबत्तीही झाली! व्हाश्कूच्या खलाशांचा हुरूप वाढला. मालिन्दीच्या सुलतानाने अनुभवी नावाडी दिला. ह्या नावाड्यामुळे व्हाश्कूच्या यशाची नांदी झाली. हा अतिशय कर्तबगार होता. 'सांव गॅब्रिएल' या जहाजावर तो आला आणि त्याने मोठ्या विश्वासाने व्हाश्कूचा काफिला हिन्दुस्थानकडे हाकारला. मध्ये अरबी सागरात खूप पाऊस लागला पण शेवटचा २५०० मैलांचा टप्पा पार करून व्हाश्कूला १८ मे १४९८ रोजी भारताचा किनारा दिसू लागला. मालिन्दीच्या नावाड्याने दिसणारा किनारा हे भारतातील कालिकत बंदर असल्याचे सांगितले. सध्या याला 'कोळिकोड' म्हणतात. त्यावेळचे कालिकत हे संपत्ती, सुबत्तेने बहरून, मोहरून घमघमणारे बंदर होते. मलबार किनाऱ्यावरचे ते एक मोठे बंदर होते. व्हाश्कूला अतिशय आनंद झाला. हिन्दुस्थानशी थेट व्यापारी संबंध जोडण्याच्या पोर्तुगीज स्वप्नाच्या पूर्तीचा क्षण आता आला आहे हे त्याला कळून आले.

कालिकत बंदरात अनेक जहाजे भारतीय मालाने तुडुंब भरली होती. रेशमी कापड, चिनी मातीच्या वस्तू, मोती, नीळ, माणके, सोने, चांदी या व्यतिरिक्त लवंगा, दालचिनी, मिरी वगैरे मसाल्याच्या पदार्थांनी ती जहाजे भरली होती. व्हाश्कू कालिकत बंदरात आला. त्या दिवशी तारीख होती २० मे १९४८!

व्हाश्कूच्या ताफ्यापैकी एका गुन्हेगाराने या किनाऱ्यावर प्रथम पाऊल टाकले. त्याचे मोठे स्वागत झाले. कालिकतचा राजा 'झामोरिन' यालाही व्हाश्कूच्या आगमनाची खबर मिळाली. व्हाश्कूने झामोरिनला निरोप पाठविला,

''मी पोर्तुगालच्या राजाचा दूत असून माझ्याबरोबर आपल्यासाठी पत्रे आणली आहेत. आम्ही आपल्याशी व्यापारी संबंध जोडू इच्छितो.'' काही दिवसांनी व्हाश्कूला त्या राजाला भेटण्याची परवानगी मिळाली. उत्कृष्ट पेहराव केलेल्या तेरा संरक्षकांसह व्हाश्कू झामोरिनला भेटावयास निघाला. त्या संरक्षकांच्या हातात ध्वज आणि तुताऱ्याही होत्या.

व्हाश्कूला झामोरिनने एक पत्र दिले. भूर्जपत्रावर लिहिलेले हे पत्र होते. पोर्तुगालचा राजा मानुएल याला लिहिलेल्या या पत्रात झामोरिनने लिहिले होते,

'...तुमच्या दरबारातील एक गृहस्थ...व्हाश्कू द गाम हे आमच्या देशात आले आहेत. मला त्याचा आनंद वाटत आहे. मसाल्याच्या पदार्थांनी आणि रत्नांनी आमचा देश परिपूर्ण आहे. त्यांच्या बदल्यात तुम्ही आम्हाला सोने, प्रवाळ आणि विशिष्ट प्रकारचे कापड दिले तर आम्ही व्यापारास तयार आहोत...'

व्हाश्कूने परतीचा प्रवास सुरू केला. या प्रवासात सामानाचा तुटवडा आणि रोगराई यांनी त्याच्या खलाशांना मृत्युमुखी पडले. अजून एक जहाज 'स्कटल' करावे लागले. व्हाश्कूचा भाऊ पावलू हाही मृत्युमुखी पडला. पण मोहीम सुरू केल्यावर एक अनोखे सागरी पर्यटन करून आणि स्वत:वर घेतलेली जबाबदारी पूर्ण करून व्हाश्कू द गाम पोर्तुगालला परतला. तेथे तो नॅशनल हीरो ठरला. दुर्दम्य इच्छाशक्ती आणि जबाबदारीची जाणीव यातून व्हाश्कूने ही मोहीम यशस्वी केली. पोर्तुगालमधून भारतात जाण्यासाठी सागरी मार्ग उपलब्ध असल्याची कल्पना त्याने युरोपला दिली. प्रतिकूल हवामान आणि इतर संकटे यावर पोर्तुगीज नाविक मात करतात हेही त्याने दाखवून दिले. लिस्बाँ हे मग फार मोठे बंदर झाले.

व्हाश्कू द गामाचे फ्लॅगशिप 'सांव गॅब्रियल' हे जहाज लांबीला शंभर फुटाहूनही लहान होते! १३००० मैलांच्या प्रवासात ते जहाज ताशी ८ मैल या वेगापेक्षा कधीही जास्त वेगाने जाऊ शकले नाही. व्हाश्कू इ. सन १५२४ मध्ये भारतात व्हाइसरॉय म्हणून आल्यावर कोचीन येथे मृत्यू पावला. त्याच्या भारताच्या पहिल्या यशस्वी सागरी पर्यटनाला यंदा ५०० वर्षे पूर्ण होत आहेत!

●●

**निनाद बेडेकर**
११०५/१४, स्वानंद ५,
हरिकृष्ण मंदिर पथ, पुणे १६

**दीपमाळ मी त्यावरी तुमची स्मृतिज्योत फुलू दे। कणकण झिजुनी साधनमार्गी तेवत राहू दे।**

# आकाशातील देखणे प्रकाशनाट्य

**डॉ. प्रकाश तुपे**

पुढील महिन्यात सतरा नोव्हेंबरच्या रात्री आकाशात एक देखणे प्रकाशनाट्य घडत आहे. मात्र त्याच्या स्थानाविषयी अचूक अंदाज आज तरी बांधता येत नाही. या दिवशी मध्यरात्री आकाशातून हजारो तारे गळून पडत असल्याचे अद्‌भुत दृश्य दिसेल. शास्त्रज्ञांच्या मते पूर्वोत्तर सायबेरीया, चीन, जपान, ऑस्ट्रेलिया व त्याच्या पूर्वेकडील भागात हे प्रकाशनाट्य दिसेल. भारतातसुद्धा हा आविष्कार दिसू शकेल. शास्त्रज्ञांच्या मते जर सर्व गोष्टी जुळून आल्या तर भारतात तासाला पाच हजार तारे गळल्याचे म्हणजेच उल्का पडल्याचे नक्कीच पाहावयास मिळेल. हे प्रकाशनाट्य सतरा नोव्हेंबरला मध्यरात्री घडत असल्याने प्रकाश प्रदूषणापासून दूर अशा ठिकाणावरून म्हणजेच गावापासून दूर अशा अंधाऱ्या ठिकाणावरून उल्कांचा हा नाच पाहावा. उल्कांचा हा चित्तवेधक खेळ पाहण्यासाठी दुर्बीण नको की आकाशाची माहिती देणारा नको. हवे फक्त उघडे डोळे, आकाशाकडे टक लावून पाहण्याची इच्छा व रात्री जागरण करण्याची तयारी.

तसं दररोज रात्रीसुद्धा थोड्याशा उल्का पडताना दिसतात. मात्र काही ठराविक दिवशी मोठ्या प्रमाणात उल्कावृष्टी होते. या उल्का आकाशातील अनेक भागात जरी दिसत असल्या तरी या उल्कांचे मार्ग एखाद्या खगोलावर रेखांकित केले तर त्या आकाशातील एखाद्या विशिष्ट भागातून निघाल्या असाव्यात असे दिसते. खरे पाहता उल्का पृथ्वीवर सरळ समांतर रेषेत कोसळत असतात. आपल्याला मात्र दृष्टिभ्रमामुळे त्या आकाशातून एखाद्या तारकासमूहाकडून फेकल्या जात आहेत असा भास होतो. ज्या नक्षत्राच्या पार्श्वभूमीवर हा उल्कावर्षाव दिसतो त्या नक्षत्राच्या नावाने तो उल्कावर्षाव ओळखला जातो. वर्षभरात हमखास दहा–बारा उल्कावर्षाव ठराविक तारखेला दिसतात.

सिंह राशीतून होणारा उल्कावर्षाव १८६६ नंतर १८९९ व १९३० मध्ये दिसला. मात्र १९६६ मध्ये पुन्हा एकवार या उल्कावर्षावाचा जोर वाढलेला दिसला. मध्य व पश्चिम अमेरिकेत सेकंदाला दोनशेपर्यंत उल्का पडताना दिसल्या. उल्कावर्षावाच्या मधल्या वीस मिनिटात उल्कांचा वेग वाढून तो तासाला दीड लाख उल्का एवढा प्रचंड वाढला. कीट पीक वेधशाळेच्या खगोल शास्त्रज्ञांनी देखील उल्कांची ही धुमश्चक्री अनुभवली. न्यू मेक्सिको मध्ये तर अंधाऱ्या ठिकाणाच्या निरीक्षणात तासाला दोन लाख ते दहा लाख उल्कांची नोंद करण्यात आली. उल्कांचा हा वर्षाव पाहताना अनेकांना पृथ्वी ही उल्कांच्या सागरातून वेगाने पुढे जात आहे, असा अद्‌भुत अनुभव आला. या वेळच्या रडारच्या निरीक्षणात असे दिसून आले की, अवघ्या ३५००० कि.मी. जाडीच्या उल्कांच्या कणांच्या पट्ट्यातून पृथ्वीने तासाभरात प्रवास केल्याने हा उल्कावर्षाव दिसला.

सिंह राशीच्या उल्कांना जबाबदार ठरणारा ५५ पी/टेंपेल टटल धूमकेतू १९ डिसेंबर १८६५ मध्ये टेंपेल व टटल या दोघांनी स्वतंत्ररित्या शोधला. दर तेहतीस वर्षांने सूर्यभेटीला येणाऱ्या या धूमकेतूची वाट शास्त्रज्ञांनी १८९९ व १९३२ साली पाहिली. मात्र त्यावेळी तो दिसू शकला नाही. त्यानंतरच्या तेहतीस वर्षांनी म्हणजे १९६५ मध्ये ह्या धूमकेतूचा पुन्हा शोध लावला गेला व त्यानंतरच्या वर्षांत म्हणजे १९६६ मध्ये मोठा उल्का वर्षाव दिसला. गेल्या वर्षी चार मार्च रोजी पुन्हा एकवार धूमकेतूचा वेध मोना के येथील दुर्बिणीतून घेतला गेला. हा धूमकेतू आपल्या कक्षेत छोट्या मोठ्या कणांचा नवीन सडा घालून नुकताच परत फिरला असल्याने येत्या नोव्हेंबरमध्ये मोठा उल्कावर्षाव अपेक्षित आहे. सतरा नोव्हेंबर रोजी भारतीय वेळेप्रमाणे संध्याकाळी साडेसात ते पहाटे साडे तीनच्या दरम्यान पृथ्वी धूमकेतूच्या अवशेषांच्या कक्षेत शिरेल. आपल्याकडे सिंह रास म्हणजेच उल्का जेथून फेकल्या गेल्याचे दिसते तो भाग, मध्यरात्री उगवतो. यामुळे पूर्वरात्री कमी उल्का दिसतील व जसजशी सिंह रास डोक्यावर येत जाईल तसतशा जास्त उल्का दिसू लागतील. उल्कांचे हे देखणे प्रकाशनाट्य भारतातून नक्की दिसेलच अशी ठामपणे खात्री देता येत नाही. कारण धूमकेतूंचे हे छोटे मोठे कण आकाशात नक्की कोठे आहेत हे आपल्याला ठाऊक नाही. शास्त्रज्ञांनी गेल्या काही वर्षांच्या अभ्यासानंतर असे जाहीर केले आहे की कदाचित या वर्षी किंवा पुढच्या वर्षी सतरा नोव्हेंबर रोजी सिंहेचा उल्कावर्षाव दिसण्याची मोठी शक्यता आहे. त्यामुळे आपण हा दिवस आठवणीत ठेवून आयुष्यात क्वचितच मिळणाऱ्या अशा संधीचा लाभ घ्यावा.

●●

**डॉ. प्रकाश तुपे**
८४१, सदाशिव पेठ, पुणे ३०

कुठे शोभते गगनपथावर ताऱ्यांची आरास देखणी लखलख चमकुनी उठते बिजली, काळ्या काळ्या मेघांमधुनी ।

## ‘तुडतुड्या’ उत्तरे

१) ‘सत्पालने काल सांगितलेली घटना खरी ठरली.’ सत्पालने हे विधान ज्या दिवशी केले तो वार त्याचा खरे बोलण्याचा असला पाहिजे आणि प्रत्यक्ष घटना सांगितली तो दिवसही खरे बोलण्याचा असला पाहिले. लागोपाठ दोन दिवस खरे बोलण्याचे शनिवार व रविवार हे दोन दिवस आहेत. **सत्पालने केलेले विधान ‘रविवारी’ होते.**

२) **षटकोनाकृती करून गोळ्यांची मांडणी करावयाची.** प्रत्येक रेषेवर ७ गोळ्या आहेत. रेषा ६ आहेत. गोळ्यांची संख्या ३६ आहे.

३) **या साखळीतील फक्त क्र. ३ चा दुवा कापावा** म्हणजे साखळीचे तीन भाग होतील.
पहिल्या दिवशी क्र. ३ चा दुवा दिला. दुसऱ्या दिवशी हा दुवा परत घेऊन क्र. १ व २ या दुव्यांचा तुकडा दिला. तिसऱ्या दिवशी क्र. ३ चा दुवा दिला. चौथ्या दिवशी क्र. १, २ व ३ हे दुवे परत घेऊन शेवटची चार दुव्यांचा तुकडा दिला. त्यानंतर पाचव्या, सहाव्या व सातव्या दिवशी पहिल्या तीन दिवसांप्रमाणेच देवाणघेवाण केली. अशाप्रकारे रोज १ दुवा देण्याची अट पूर्ण होते.

४) शेवटच्या फेरीपासून देवाण-घेवाणीचा विचार करूया. तिसऱ्या फेरीच्या शेवटी मनजितजवळ १६ रु. जमले; म्हणजे या फेरीच्या सुरुवातीला त्याच्याजवळ ४ रु. असले पाहिजेत; ४ रु. त्याला मनजितकडून मिळाले. म्हणजे मनजितजवळ ८ रु. + ४ रु. = १२ रु. दुसऱ्या फेरीच्या सुरुवातीला असले पाहिजेत = पहिल्या फेरीच्या शेवटची रक्कम.
पहिल्या फेरीच्या शेवटी मनजितजवळ १२ रु. होते. यातील निम्मे त्याला सुरजितकडून मिळालेले आहेत. म्हणजेच पहिल्या फेरीच्या सुरुवातीला मनजितजवळ ६ रु. असणार आणि सुरजितजवळ ६+४ = १० रु. असणार **(मनजितजवळ ६ रु. सुरजितजवळ १० रु.)**

५) चोरी कोणी केली? १) समजा छोटूने चोरी केली आहे; तर छोटूचे विधान खोटे ठरते; इतर दोघांची विधानेही खोटी ठरतात. हे शक्य नाही. कारण किमान एकजण तरी खरं बोलत आहे. २) समजा पिंटूने अंगठी चोरली तर तिघांचीही विधाने खरी ठरतात. हेही शक्य नाही. ३) यावरून गोटूने अंगठी चोरली असली पाहिजे हे दिसू येते. आता तीनपैकी एक विधान खरे ठरते व दोन विधाने खोटी ठरतात. **(उत्तर : गोटू)**

६) गुंडाप्पा व आजोबा या दोघांचे वय १२४ वर्षे.
आजोबांच्या जन्मानंतर १४० वर्षांनी गुंडाप्पांचा मृत्यु; परंतु दोघांच्या वयाची बेरीज १२४ वर्षे आहे. म्हणजेच आजोबांचा मृत्यु व गुंडाप्पाचा जन्म यांमध्ये १४० - १२४ = १६ वर्षांचा फरक पडतो. याचा अर्थ आजोबांच्या मृत्यूनंतर १६ वर्षांनी गुंडाप्पांचा जन्म झाला. (१९२८+१६=१९४४ **जन्मवर्ष)**

भूगोल सारा लखलखे किती दीपमाळा लागल्या, देवांगनांनी तारकांच्या दीपराशी लाविल्या.

# एकदम गावरान

**शकुंतला फडणीस**



दिवाळीची सुट्टी जवळ आली. सुट्टीत कोणी गावाला जाणार होते, तर कुणाच्या घरी पाहुणे येणार होते. त्याबद्दल सगळी मुले आनंदाने बोलत होती. सलिल मात्र काहीच बोलत नव्हता. त्याला आनंदसुद्धा झाला नव्हता. आई आता आपल्याला कुठल्या ना कुठल्या शिबिरात अडकवून टाकणार म्हणून त्याच्या पोटात भीतीने गोळा आला होता. खरोखरच त्याची आई शिबिराच्या विचारात बुडून गेली होती!

सलिलला त्याची आई सतत कुठल्या तरी शिबिराला पाठवायची. सलिलला वाटायचं – बाकी मित्रांच्या आया पाहा. घरात नवीन खरेदी, फराळाला नवं काय करावं, मुलांचे कपडे कुठे खरेदी करावेत, असं बोलतात. अन् आपल्या आईची काळजी काय? तर सलिलची रवानगी कुठल्या शिबिरात करावी! हस्तकला–शिबिर झालं, क्रीडा–शिबिर झालं, कागदाची चित्रं, मातीची चित्रं तेही झालं. नाट्यशिबिर झालं. अलीबाबाच्या गोष्टीत रांजणात लपलेल्या चोराचं अन् कोल्ह्याच्या गोष्टीत झाडाचं काम मिळालं होतं! आता मात्र या सततच्या शिबिरांना सलिल पार कंटाळून गेला अन् या सुट्टीत कुठल्याही शिबिरात जायचं नाही, असं त्यानं ठरवलं.

त्यानं खूप ठरवलं – पण त्याच्या आईनं नव्हतं ना तसं ठरवलं! तिनं तर उलट शिबिराच्या जाहिरातींची नुसती शोधाशोध चालवली होती. तेवढ्यासाठी घरात आणखी दोन दैनिकंसुद्धा सुरू केली. मैत्रिणींकडे चौकशा, फोनाफोनी – ते चालू होतंच. आईचा हा शिबिराचा सोस बाबांना काही फारसा पसंत नव्हता. ते म्हणायचे – ''सुट्टीत काय गं काच पोराच्या मागे. त्याला जरा खेळा–बागडायला मिळू दे ना! उगीच शिबिराची शिक्षा नको त्याला.'' ''उगीच? माझ्यामागे भुणभुण लावत बसतो, त्याचं काय?'' आईला ती एक मोठी छान सबब होती.

कारण सलिल खरोखरच फार चौकस होता. त्याचे सारखे प्रश्न अन् शंका! शंकासुद्धा मजेशीर असायच्या. हिमालय पर्वत सर्वात उंच आहे तर मग तो आपल्याला इथून दिसत कसा नाही? समजा, चंद्र अन् सूर्य जवळजवळ आले, तर चंद्राच्या थंडीनं सूर्य गारठेल की सूर्याच्या उष्णतेनं चंद्र वितळेल? आपल्या इथून खूप खोलऽ खोलऽ खोल, भोक पाडून भुयार खणलं तर त्यातून आपण अमेरिकेत पोचू का? असले प्रश्न. लहानपणापासून गोष्ट ऐकतानासुद्धा त्याचे प्रश्न अन् शंका. लाकूडतोड्याची गोष्ट सांगितली तर – देवाने त्याला सोन्याची कुऱ्हाड देण्याऐवजी पोहायला का नाही शिकवलं? खव्याच्या वाटणीची गोष्ट सांगितली तर – मांजराने खवा लपवून ठेवला मग त्याला वास नाही का लागला? मुंग्या नाही का लागल्या? असं विचारायचा.

बाबा घरात असले म्हणजे त्याच्या शंकांना व्यवस्थित उत्तरं द्यायचे, पण सुट्टीत व्हायची

**वाट झुंजुमुंजू होते पीक मावेना शेतात. लक्ष पाखरांचे थवे खेळ मांडती पाण्यात.**

पंचाईत. आईला काही सलिलच्या प्रश्नांना उत्तरं देता यायची नाहीत. त्यापेक्षा शिबिरात घातलेलं बरं, असं तिला वाटायचं. अन् म्हणून ती त्याच शोधाशोधीत होती.

आणि एक दिवस तिला हव्वी तश्शी माहिती मिळाली! किती बरं वाटलं सलिलच्या आईला. ती खूप म्हणजे खुपच खुश झाली. या शिबिरात सलिलला पाठवायचं असं तिनं पक्कं ठरवून टाकलं. त्याचं नाव होतं – ग्रामजीवन शिबिर. माहितीपत्रक तरी इतकं सुंदर छापलं होतं! त्यात लिहिलं होतं – 'खरा भारत बघायचा असेल तर तो तुम्हाला खेड्यात दिसेल. आपल्या मुलांना ग्रामीण जीवनाची ओळख करून द्या. साधी राहणी, पर्यावरणाची ओळख, इतर मुलांबद्दल बंधुभावना यांचे महत्त्व त्यांना शिकवा. निसर्गाच्या परिसरात, शेतांच्या सान्निध्यात, नदीच्या काठाकाठाने त्यांना हिंडू फिरू द्या. त्यांचे व्यक्तिमत्त्व बहरू द्या!'

संध्याकाळी बाबा ऑफिसातून आल्याबरोबर आईने या ग्रामजीवन शिबिराची माहिती त्यांना उत्साहाने सांगितली. माहिती तर छानच होती. तिथे काय तर म्हणे बैलगाडीतून फिरायचं. चटईवर नाही तर घोंगडीवर बसायचं. जेवायलासुद्धा टेबल–खुर्च्या नाहीत – खाली पाटावर बसून जेवायचं! अधूनमधून खास ग्रामीण बेत. म्हणजे भाकरी, पिठलं, पालेभाजी, लसणीची चटणी, अन् त्यात तेल. रात्री नऊनंतर विजेचे दिवे बंद. कंदील अन् पणत्या लावायच्या. रात्री समईच्या उजेडात शिबिरातली आजी गोष्टी सांगणार. साधी राहणी शिकवणार वगैरे वगैरे.

''छान छान. याची फी किती?'' बाबांनी विचारलं.

''अं – हे काय इथं लिहिलंय – शिबिर शुल्क – रुपये एक हजार फक्त!'' आई म्हणाली.

''बाप रे! साधी राहणी शिकवण्यासाठी ही एवढी महागडी फी?'' बाबा एकदम ओरडलेच.

''हो, पण किती मजा येईल तिथे. आपल्या सलिलला साध्या राहणीची सगळी चैन मिळणार आहे त्या शिबिरात. किती महत्त्वाची गोष्ट आहे!'' आईने आपले घोडे पुढे दामटले.

आईला वाटलं, या शिबिराची इतकी सुंदर कल्पना ऐकून बाबा खुश होतील. मग जराशाने म्हणाले –

''बघू. जरा विचार करतो अन् मग सांगतो.'' त्यांची ती थंड प्रतिक्रिया बघून आई जराशी हिरमुसली. पण बाबा सपशेल नाहीही म्हणाले नव्हते. त्यामुळे तशी थोडी आशाही वाटत होती. पुढचे दोन–तीन दिवस खूप म्हणजे खूपच गडबडीत गेले. बाबांना ऑफिसात खूप काम होतं. त्यांना लौकर जावं लागे, अन् घरी यायलाही उशीर होई, त्यामुळे शिबिराचं वगैरे बोलायला वेळच झाला नाही.

त्यानंतर मात्र त्यांनी एक दिवस एकदम जाहीरच केलं – सलिला शिबिराला पाठवायचं! मात्र आईनं सुचवलेलं शिबिर नाही. त्याच प्रकारचं पण वेगळं शिबिर. आईला वाटलं – ठीक आहे. ते तर ते शिबिर. सलिला पाठवायचं हे तर खरं ना? उशिरा का होईना, त्याच्या बाबांना एकदाचं पटलं माझं म्हणणं. हे काय कमी आहे? मग आई उत्साहाने तयारीला लागली.

शिबिरात साधी राहणी असणार म्हणून तिने मुद्दाम लांबच्या दुकानात जाऊन सलिलसाठी साधे सुती कपडे आणले. थोडे खादीचेही आणले. आंघोळीनंतर अंग पुसायला रोजचा भारी टॉवेल नको म्हणून राजापुरी पंचा आणला. पायात घालायला संकेश्वरी वहाणाही आणल्या. असावी म्हणून एक टोपी आणली. घरात नव्या नव्या फॅशनेबल बॅगा होत्या, पण

शिबिरासाठी म्हणून तिने माळ्यावरची पत्र्याची पेटी काढून साफ करून ठेवली. एखादं गाठोडं द्यावं की काय असंसुद्धा तिच्या मनात आलं!

सलिलला शिदोरी म्हणून भाजणीची थालीपीठं, भोपळ्याचे घारगे अन् गुळपापडीचे लाडू द्यावेत असा आईचा बेत होता. पण तो बाबांनी सपशेल फेटाळून लावला. म्हणाले – ''काही नको! तिथे हेच असणार आहे!'' इतकंच काय, स्वत: दुकानात जाऊन चार–पाच प्रकारचे बिस्किटपुडे, वेफर्स, चॉकलेटं, गोळ्या, आम्रखंडाचे डबे, असला खाऊ ते घेऊन आले. आईला नवलच वाटलं. पण बाबा म्हणाले – ''असू दे गं. सलिलला याच खाण्याची सवय आहे. तिथे कंटाळा आला तर आवडता खाऊ त्याच्याजवळ असलेला बरा.'' आईलाही ते पटलं.

विशेष म्हणजे सलिल या शिबिराला जायला आनंदानं तयार झाला होता! नाही तर अगोदर शिबिराचं नुसतं नाव काढलं तरी हा मुलगा फुरंगटून बसायचा. पण बाबांनी त्याला सगळं नीट समजावून सांगितलं. अन् मग मात्र तो मनापासून 'हो' म्हणाला. करता करता निघायचा दिवस जवळ आला. योगायोग म्हणजे त्याच वेळी बाबांनाही ऑफिसचं काम निघालं – त्याच बाजूला पाच–सहा दिवसांची फिरती होती. बाबा जाताना सलिलला शिबिरात सोडणार होते. येताना आपल्याबरोबर घेऊन येणार होते. बाबांचे मित्रच शिबिराचे संचालक होते, त्यामुळेच कसलीच काळजी नव्हती.

ते पाच–सहा दिवस आईला मात्र घरात एकदम सामसूम होणार होती. मग तिने त्या दिवसांत खरेदी, सिनेमे, मैत्रिणींच्या गाठभेटी अशा कार्यक्रमांचा सपाटा चालवला. दरम्यान, बाबांचा दोन–तीन वेळा फोन आला होता. सलिल मजेत आहे, त्याला शिबिर खूप आवडले आहे, असं त्यांनी सांगितलं. त्यामुळे आपला शिबिराचा निर्णय किती अगदी योग्यच होता, असं आईला राहून राहून वाटू लागलं.

पाच–सहा दिवसांनी सलिल अन् बाबा परत आले. सलिल जाम खुश होता. आल्याबरोबर आईच्या गळ्यात पडून म्हणाला –

''आई! इतकी मजा आली मावशीआजीकडे! धमाल नुसती! अन् आई ग, तू दिलेली बिस्किटं, चॉकलेट, आम्रखंड – सगळं त्या मुलांना खूप आवडलं! तुला पण मावशीआजीनं बोलावलंय तिकडे.''

''मावशीआजी कोण? शिबिरातल्या मावशी आणि आजी का?'' आईनं सलिलला विचारलं. पण त्याच्या ऐवजी बाबांनीच उत्तर दिलं. हसत हसत ते म्हणाले –

''अगं, कसलं शिबिर अन् कसलं काय. सलिल घेऊन मी चक्क पुलगावला अनुमावशीकडे गेलो होतो.'

''काय सांगताय काय?'' आई एकदम चकित.

''अगं, लांबची का असेना, माझी मावशीच आहे ती. किती प्रेमानं, आग्रहानं बोलावित असते. तुझी ग्रामजीवन शिबिराची हौस पाहिली अन् मी संधी साधली! हजार रुपये खर्चून तुझ्या त्या शिबिरात जे मिळणार – ते तिथे फुकटातच मिळालं बघ!'' बाबांचा खुलासा.

''फुकट नाही काही!'' सलिल मावशीआजीसारख्या आवाजात बोलला. ''सूनबाईला म्हणावं आता मैत्रिणींना घेऊन घरचा हुरडा खायला यायचं. तीच आमच्या शिबिराची फी!''

ते ऐकून बाबांना अन् आईलासुद्धा एकदम हसू आलं.

●●

**सौ. शकुंतला फडणीस**
१२३३ शुक्रवार पेठ, सुभाषनगर,
रस्ता क्र. ४, पुणे २.

**निसर्गाचा बहर, पेलेना, पिकांना भार सूरभरल्या गळ्यांनी फुटे शेतांना स्वर.**

# वाढदिवस



**ज्यात्सा दवधर**

**सो**नालीचा वाढदिवस म्हणजे सान्यांच्या घरात दसरा-दिवाळीच असायची. यंदा तर तिचा खास थाट होता. सोनाली उत्तम मार्क मिळवून सातवीत गेली होती. शिवाय यंदा तिनं वक्तृत्व स्पर्धेत पण पहिला नंबर मिळविला होता. तिचा वाढदिवस नेमका उन्हाळ्याच्या सुट्टीत यायचा. त्यामुळे तिचे आई-बाबा, धाकटा भाऊ गौतम सगळे मिळून कुठेतरी ट्रिपला जाऊन सोनालीचा वाढदिवस साजरा करायचे. कधी एखादे धरण, कधी धबधबा, एखादे अभयारण्य, एखादा किल्ला, थंड हवेचं ठिकाण... खूप मजा यायची. नवे नवे पाहायला मिळायचे, शिकायला मिळायचे; बाबांचे आणि आईचे छान छान मित्र-मैत्रिणी होते. त्यातले कुणी पशूंची माहिती द्यायचे, तर कुणी पक्ष्यांच्या गंमती सांगायचे. गड चढताना कुणी इतिहासाची साक्ष द्यायचे. वर्षभर तो आनंद, त्या आठवणी पुरत असत.

'बाबा यंदा माझा वाढदिवस माझ्या पैशानं साजरा करायचा.'' सोनाली ऐटीत म्हणाली.

''तुझे पैसे? अहाहा... असे किती असणार गं?'' गौतमनं तिला चिडवलं.

''ते काही नाही. थोडे का असेना मीच तुम्हा तिघांना पार्टी देणार.''

''अगं बाई, सोने पार्टी देणारेस, कमालच आहे.'' आई म्हणाली.

''ओ के, ओ के आपण कुठल्या फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये जायचं?'' बाबांनी विचारलं.

''हे हो काय बाबा. हॉटेलात नाही हं. सगळ्यांना फक्त भेळ, पाणी-पुरी आणि उसाचा रस देणं जमेल.'' सोनाली म्हणाली.

''हे हे... ही काय पार्टी झाली?'' गौतम म्हणाला.

''असू दे रे! असं करू या. सकाळचे जेवण आईतर्फे, संध्याकाळी सोनूची पार्टी... रात्री माझी... कसे?'' बाबांनी विचारलं.

''गुड आयडिया!'' म्हणत दोघं बहिण-भाऊ नाचलेच.

सोनालीची आई सोनालीच्या आवडीचे पदार्थ करण्यात गुंतली. बाबा सोनालीला आणि गौतमला घेऊन बाजारात गेले. फुगे आणि फुलं आणायची होती. शिवाय सोनालीच्या मैत्रिणींना द्यायला काहीतरी आणायचं होतं.

''बाबा आपण माझ्या मैत्रिणींसाठी दोन-दोन रुमाल घेऊ या का?''

''हो घे की''

''बाबा माझ्या मित्रांना पण रुमाल, पण बायकी नको एवढे एवढेसे.''

''गौतम तुझ्या वाढदिवसाला आणू की.''

बाबा हसतच म्हणाले. सोनालीसाठी तिच्या आवडीचे कपडे घेतले. घरी परतले.

घरी आले तर सोनालीची मावशी आली होती.

''मावशी...'' म्हणत सोनालीनं तिला मिठीच घातली.



**नवसाच्या देठातून वाके विश्वाचा संसार मनजडीच्या उन्हाला आला बहर बहर।**

''अगं अगं, पडेन ना मी...''

सुमामावशी जवळजवळ दोन–तीन वर्षांनी आली होती. परदेशात गेली होती ना.

''आज नेमकी बरी आलीस गं सुमे. आज सोनालीचा वाढदिवस आहे'' आई म्हणाली.

''नेमकी नाही ग अक्का, अगदी लक्षात ठेवून मुद्दाम आलेय. सोने, चांगलीच उंच झाली आहेस.''

''मावशी माझ्यासाठी अमेरिकेहून काय आणलंस?

''आणलीय गंमत. संध्याकाळी म्हणे सोनालीची पार्टी आहे, तेव्हा दाखवीन.''

''मावशी माझी पार्टी कॅन्सल. अगं माझ्या मैत्रिणी स्वत:हून जमणार आहेत. आत्ताच मानसीचा फोन आला होता. शिवाय गौतमचे चित्र. एवढे पैसे नाहीत बाबा आपल्याजवळ'' सोनाली म्हणाली.

''अगं तू कशाला काळजी करतेस? आज तुझ्या मैत्रिणींना व गौतमच्या मित्रांना माझ्यातर्फे पार्टी.'' मावशी म्हणाली.

संध्याकाळी सोनालीच्या मैत्रिणी आल्या. गौतमचे मित्र पण आले. धमाल केली सर्वांनी. खूप गप्पा, हसणे, चिडवणे – खेळणे – खुश एकदम खुश झाले सगळे.

''छोट्या मित्रांनो, आता आपण दोन खेळ खेळायचे. जो जिंकेल त्याला मी बक्षीस देणार आहे.'' मावशी म्हणाली. अमेरिकेहून आलेल्या मावशीकडे सगळ्यांचं लक्ष होतंच.

''मावशी थांबा, आधी आम्ही सोनालीला प्रेझेंट देतो.'' मानसी म्हणाली.

''द्या... द्या...'' गौतम म्हणाला.

'सगळ्या मैत्रिणींनी मिळून सोनालीसाठी छान छान पुस्तकं आणली होती. त्यात योगी अरविंद, महात्मा फुले, लोकमान्य टिळक, रावसाहेब रानडे, गोपाळराव आगरकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, पंडिता रमाबाई, महर्षी कर्वे यांची लहान लहान चरित्रात्मक पुस्तकं होती.'

''अय्या एवढी पुस्तकं! उगाच खर्च केलात गं एवढा...'' सोनाली फारच संकोचून गेली होती.

''अगं आमच्या खाऊचे पैसे गोळा केले आम्ही. पण या कमलनं मात्र काही खर्च केला नाही.

मैत्रिणींचं हे बोलणं ऐकताच कमल पार संकोचून गेली. तिनं संकोचून रुमालात गुंडाळलेला सुगंधी बकुळीचा गजरा आणि सोनचाफ्याची फुलं सोनालीला दिली.

''वा वा! कमल, तुझ्या प्रेझेंटनं तर सगळं वातावरणच सुगंधी झालं. छान आहे हो.''

सोनालीची आई म्हणाली ''सोने, आता सगळ्यांना तुझं प्रेझेंट दे बरं.'' सोनालीनं सगळ्यांना रुमाल दिले.

''हं तर बच्चे लोक आता एक खेळ खेळायचा! मग मी सोनूसाठी आणलेलं बक्षीस देणार आहे.''

''मावशी, अगं केक कापायचा आहे ना?''

गौतम घाईघाईनं म्हणाला. ''मला केक फार आवडतो.''

''यंदा केक रद्द. आपल्या पद्धतीप्रमाणे सोनालीला मी ओवाळणार आहे. मग ती वडिलधाऱ्यांना आणि त्याआधी देवाला नमस्कार करील. त्यानंतर मी तुमच्यासाठी ओल्या नारळाच्या करंज्या आणि वाटली डाळ केली आहे, ती खाऊ या.''

सोनालीची आई म्हणाली. सगळ्यांनी आनंदानं उड्या मारत टाळ्या वाजवल्या.

''मावशी, तुझा खेळ?'' सोनाली म्हणाली.

''हं. या ट्रे मध्ये एकूण एकवीस वस्तू आहेत. हा ट्रे तुमच्या पुढ्यातून दोनदा फिरवला जाईल. हे कागद–पेन घ्या. यावर त्या वस्तूंची यादी करायची. ज्याची जास्त नावं येतील त्याला बक्षीस.

**कुण्या जन्मातले पुण्य त्यांच्या रुपात भेटले। माझे प्रकाशाचे घर त्यांच्या प्रकाशात न्हाले।**

तुमच्या स्मरणशक्तीची परीक्षा आहे ही. प्रत्येकानं त्या कागदावर आपलं नाव मात्र लिहायचं.''

तो ट्रे सगळ्यांच्या पुढ्यातून मावशीनं दोनदा फिरवला... मुलं पटापट यादी करू लागली. पाच मिनिटांनंतर मावशीनं शिट्टी वाजवली. सर्वांचे कागद गोळा केले. बाबांकडे दिले. त्यांनी सगळे कागद नीट तपासले आणि म्हणाले,

''अभिनंदन कमल! तुझी स्मरणशक्ती उत्तम आहे. तुझी यादी बरोबर आहे. वस्तूपण जास्त लिहिल्या आहेत.'' बच्चे लोक टाळ्या वाजवून कमलचे अभिनंदन करा.

मावशी आत गेली. एक छानसा स्वेटर आणून तिनं कमलला दिला.

कमलच्या डोळ्यांत आनंदानं पाणीच आलं.

मग मावशीनं सोनालीच्या हातात छानपैकी तयार स्कर्ट–ब्लाऊज ठेवला. परदेशी कापडाचा थाट औरच होता. मावशीनं गौतमच्या हातात निरनिराळ्या गेम्सचा बॉक्स दिला.

''जा सोनाली, कपडे घालून दाखव सगळ्यांना.'' आई म्हणाली.

सोनाली आनंदानं कपडे बदलायला गेली.

''आईऽऽऽ'' आतून एकदम रडवेली हाक आली. मावशी आणि आई आत धावल्या.

''मावशी, हे कपडे माझ्या अंगात जातच नाहीत'' सोनाली उदास होऊन म्हणाली.

''हात्तिच्या एवढंच ना. मी खूप कपडे आणलेत. माझ्याबरोबर घरी चल. हवे ते, होतील ते कपडे घे.'' मावशी म्हणाली.

''हां. हे ठीक आहे.''

तिघीजणी बाहेर आल्या.

''एका माणसाची जिरली. कपडे झालेच नाहीत.'' गौतम म्हणाला.

''खरंच पाहता पाहता मुलं मोठी होतात. अंदाजच चुकला माझा.''

''पण मावशी मला दुसरे कपडे देणार आहे.'' सोनाली म्हणाली.

मैत्रिणी आपापल्या घरी गेल्या. गौतम आपल्या मित्रांना पोहोचवायला त्यांच्याबरोबर बाहेर पडला.

''कमल थांब गं जरा'' आईनं कमलला थांबवलं. तिला करंज्या आणि वाटली डाळ दिली.

''घे, घरी भावंडांना दे.''

''बरं'' कमलनं मावशीला, आईला. बाबांना नमस्कार केला. जायला निघाली.

''अगं सोनाली आज तुझा वाढदिवस आहे ना, मग एक छानसं काम करायला हवं.'' बाबा म्हणाले.

''होऽऽ नक्की करते. तुम्ही सांगा फक्त.''

''नक्की? नाही म्हणायचं नाही.''

''नक्की. काय ते सांगा न बाबा.''

''तुझा स्कर्ट–ब्लाऊज लहान झालाय ना तो कमलला दे. तिला छान बसेल.''

''अय्या खरंच की. बाबा तुम्ही किती छान आहात.''

असं म्हणतच सोनालीनं ते कपडे कमलला दिले. तिला घालायला लावले.

स्वत:चाच वाढदिवस असल्यासारखी कमल थाटात आपल्या घरी गेली.

●●

**ज्योत्स्ना देवधर**
१२०५/१–९, शि. नगर, पुणे ४.

## प्रतिबिंबातील वेळ

एका घड्याळातील आरसा आहे. रामला त्या आरशातील घड्याळाचे प्रतिबिंब हेच खरे, घड्याळ आहे असे चुकून वाढले. त्यामुळे त्याने चार वाजून २२ मिनिटे वेळ पाहिली. तर त्यावेळी घड्यातळात प्रत्यक्ष किती वाजले● असतील.

उत्तर – ७ वाजून ३८ मिनिटे.

**दरवळला मधुगंध मानसी मोद फुले सदनी चमकत गगनी कोर विजेची आनंदे हसली.**



# ज्ञानदेवें रचिला पाया

डॉ. व. दि. कुलकर्णी

*संतकृपा झाली, इमारत फळा आली।*
*ज्ञानदेवें रचिला पाया, उभारिलें देवलया।*
*नामा तयाचा किंकर, तेणें केला हा विस्तार।।*
*जनार्दन एकनाथ, ध्वज उभारिला भागवत।*
*भजन करा सावकाश, तुला झालासे कळस।।१।।*

**सं**त बहिणाबाईचा हा अभंग. महाराष्ट्रातील भागवत-धर्म-मंदिराचं संपूर्ण दर्शन या एका अभंगात होतं. पायापासून ते कळसापर्यंत. ज्ञानेश्वर-महाराजांपासून तुकाराममहाराजांपर्यंत. या पाया आणि कळस यांमध्ये सर्व भागवत-संत येतात. संतांची समग्र 'मांदियाळी'च येते. अठरापगड जातीचे संत येतात. गोरा कुंभार, चोखा महार, सावता माळी, सेना न्हावी, नरहरी सोनार, नामा शिंपी, दासी जनी, जोगा तेली या सर्व संतांच्या कृपाप्रसादानं हे भागवतमंदिर उभारलं गेलं. संतकृपेचं हे अखंड परिपक्व फळ आहे.

ज्ञानदेव, नामदेव एकनाथ आणि तुकाराम या चार संतश्रेष्ठांनी चारी दिशांनी या भागवत-धर्ममंदिराचा पैस वाढवला. चारी दिशा कवळून घेणाऱ्या इमारतीचा पाया किती मजबूत, पक्का स्थिर असला पाहिजे? शतकामागून शतकं गेली तरी पायातला एकही चिरा निखळत नाही, की हलत नाही, अशी दृढ, घट्ट बांधणी असली पाहिजे. कोणतंही मंदिर म्हटलं की पाया, पैस-परिसर, प्राकार, भिंती, सभामंडप, शिखर, कळस आणि ध्वज-पताका या गोष्टी येतातच. ह्या सर्वांचं मिळून ते मंदिर होतं. इथं प्रत्येक गोष्टीला स्वतःचं स्वतंत्र स्थान आणि महत्त्व आहे; आणि परस्परांच्या संबंधातून त्या मंदिररूपानं एकाकार होऊन राहात-नांदत असतात. पण सर्वांमध्ये सर्वाधिक श्रेष्ठत्व कुणाला असतं? पायाला, प्राकाराला, मंडपाला, शिखराला की कळसाला? प्रत्येकाला महत्त्व आहे; सर्वांनी मिळूनच मंदिर सिद्ध होतं, हे तर खरंच; यात लहान-मोठं, कमी-अधिक, श्रेष्ठ-कनिष्ठ असा भाव नसतो; तरी आपण हा प्रश्न उद्भवतो. देहात हाता-पायाला महत्त्व आहे, छातीला, पोटाला-प्रत्येक अवयवाला त्याचं म्हणून महत्त्व आहे; एकूण देहाच्या कार्याला ह्या प्रत्येकाची आवश्यकता आहेच. हृदयाची, मेंदूची, पचनसंस्थेची, सर्वा-सर्वांची गरज आहे. तरीपण यात अत्यंतिक गरज कशाची आहे? असा विचार केला तर?

'छांदोग्योपनिषदा'तील प्रसंगकथा आठवते. एकदा देहाच्या इंद्रियांमध्ये 'तू श्रेष्ठ का मी श्रेष्ठ?' असा वाद उत्पन्न झाला. प्रत्येकजण स्वतःलाच सर्वश्रेष्ठ म्हणून भांडत होता. अखेर ते सर्व ब्रह्मदेवांकडं गेले. ब्रह्मदेव म्हणाले, ''हे पाहा, तुमच्यापैकी जो कुणी निघून गेल्यानं शरीर मातीमोल होईल तो श्रेष्ठ, असं माना!'' झालं, मग लगेच 'वाणी' शरीरातून निघून गेली अन् वर्षभरानं परत आली. पाहाते तर शरीर धडधाकट. तिनं विचारलं, ''हे कसं?'' तर इतर इंद्रियांनी सांगितलं, ''मुका माणूस कसा जगतो? तो डोळ्यांनी पाहातो; कानांनी ऐकतो; मनानं चिंतन करतो, प्राणानं जगतो. तू गेलीस म्हणून काय बिघडलं?'' वाणी मुकाट्यानं पुन्हा शरीरात परत राहायला आली. मग डोळे निघून गेले; वर्षभरानं परत आले. शरीर आपलं आहे तसं धडधाकट. आंधळा माणूस नाही का धडधाकटपणे जगत? डोळे खजील झाले. मग कान निघून गेले. शरीर बहिऱ्या माणसाप्रमाणं धडधाकट राहिलं. मग 'मना'ची पाळी आली.

**पंढरीच्या वाटेवर असं काहीतरी व्हावं, फूल पारिजातकाचं माझ्या अंगदी पडवं.**

ते निघून गेलं; तर शरीर बालकांप्रमाणं प्रसन्न-टवटवीत राहिलं. तेव्हा वाणी, डोळे, कान, मन यांना तसं मूळ शक्तित्वाचं स्थान नाही, हे समजलं. अखेर 'प्राण' शरीराबाहेर पडू लागला, तेव्हा सर्व, इंद्रियं डळमळू लागली; उचकटली जाऊ लागली... ती हात जोडून 'प्राणा'ला म्हणाली, ''बाबा, तू जाऊ नकोस. तू आहेस म्हणून आम्ही आहोत. तुझ्या आधारावर आम्ही जिवंत आहोत; उभे आहोत. आमची शक्ती ही आमची नाही; ती तुझीच आहे. तू थांब!'' 'प्राण' हा सर्वश्रेष्ठ आहे; तो सर्वांचा मूलाधार आहे, तोच सर्वांमधून कार्यकर झालेला असतो, हे सर्वेंद्रियांना अनुभवानं पटलं. वाद मिटला. कोणत्याही इमारतीच्या पायाचं स्थान हे प्राणासारखं मूलभूत, आवश्यक, अपरिहार्य असं आहे. पाया हालला-हादरला की सारी भागवत-धर्म-मंदिराचे असे पायाभूत, प्राणभूत संतश्रेष्ठ आहेत.

'छंदोग्योपनिषदा'तली ही कथा दृष्टान्त-दाखला म्हणून दिली आहे. ती फार ताणायची नसते. त्यातलं तात्पर्य तेवढं ध्यानी घ्यायचं असतं. नामदेवमहाराज 'नामदेव' म्हणून स्वतंत्र अधिकारी संतश्रेष्ठ आहेत. ते नामभक्तीचा आदर्श आहेत. 'नाम हाच देव' हे वारकरी-संप्रदायाचं प्राणसूत्र नामदेवरायांनी दिलं आणि प्रतिष्ठित केलं. वारकरी 'विठोबा-रखुमाई' असा हरिनामाचा गजर करतात. दिंड्या-पताकांची दाट गर्दी होते; टाळ-मृदंगाच्या नादानं आकाश भरून जातं आणि पंढरीची वाट पावला-पावलांनी संपत येते; ती नामभक्तीच्या भावबळानं! विठूचा गरजे-हरिनामाचा गरजे' याला प्राणाचंच महत्त्व लाभलं आहे.

एकनाथमहाराजांनी 'भाव तोचि देव' हेच भक्तीचं प्राणसूत्र सांगितलं. आदर्श प्रपंच आणि आदर्श परमार्थ यांचा कित्ता त्यांनी स्वत:च्या आचरणानं घालून दिला. दया, क्षमा, शांती त्यांच्या रूपानं प्रकटली होती. पंडितांसाठी त्यांनी 'भागवता'च्या एकादश स्कंधावर टीका लिहिली, कथेची आवड असणाऱ्या भाविकांसाठी 'रुक्मिणी-स्वयंवर' लिहिलं. अभंगगायनाची गोडी असणाऱ्या भक्तांसाठी पदं आणि गौळणी यांची रचना केली; आणि बहुजनांसाठी त्यांच्याच भाषेत, त्यांच्याच अनुभवसृष्टीतले, व्यवहारातले दृष्टान्त घेत, रूपकं घेत, भारुडं लिहिली आणि विशेष म्हणजे सरकारदरबारी उर्दूमिश्रित जी मराठी भाषा त्यांच्या काळात रूढ झाली होती, ती घेऊन तिच्यामध्ये गद्यरचना करून अध्यात्म आणि भक्ती यांची शिकवण दिली. ज्ञानदेवांनी पाया घातला, नामदेवरायांनी पैस प्राकार वाढवला आणि एकनाथांनी असं शिखर बांधून त्यावर ध्वज उभारला.

कळस उभारला की मंदिराची रचना पूर्ण होते. कळस हे पूर्णत्वाचं प्रतीक आहे. तुकाराममहाराज हे कळसाच्या स्थानी आहेत. आता भागवत-धर्म-मंदिरात काही अधिक बांधायचं राहिलेलं नाही; आणि काही अधिक झालं म्हणून कमी करायचंही कारण उरलेलं नाही. ज्ञानेश्वर-नामदेव-एकनाथ-तुकाराम यांनी 'संपूर्ण' मंदिर उभारलं. त्याचा पाया भक्कम, पैस-अमर्याद-अनंत, शिखर गगनालाही ओलांडून जाणारं सर्व दिशांत त्याचे ध्वज उभारलेले आणि कळस कोठूनही केव्हाही पाहावा असं हे अनंताला कवळून घेणारं भागवत मंदिर आहे.

तर मग 'ज्ञानदेवे रचिला पाया' म्हणजे काय? ज्ञानदेवांनी भागवत संप्रदायाला भगवंताच्या भक्तसंप्रदायाला विष्णूंचे जे दास आहेत त्यांना तत्त्वज्ञानाचं-अध्यात्माचं अधिष्ठान प्राप्त करून दिले. हे अधिष्ठान सनातन अधिष्ठान आहे. पण ते तत्त्वज्ञान संस्कृत-भाषेमध्ये मांडलेलं होतं. सामान्यजनांना ते समजत नव्हतं. ज्ञानेश्वरांनी ती अध्यात्मगंगा लोकांच्या भाषेत म्हणजे मराठीमध्ये आणली व गंगेचा प्रवाह खुला-मोकळा केला. भावभक्तीच्या विटेला अध्यात्म-तत्त्वज्ञानाचा भरभक्कम आधार दिला व त्याचवेळी तिला सोपं, सुंदर प्रवाही रूपही दिलं. भगवंताच्या तोंडून निघालेली 'ओवी' श्रीज्ञानदेवांच्या मुखातून प्रकटली आणि ती देवाणघेवाणीइतकीच मान्यता पावली. ज्ञानदेवांनी मराठी भाषेलाही नवं सामर्थ्य दिलं. तिचं जे बोली-बाळबोध रूप होतं, ते सांभाळूनही तिला काव्याचं श्रीमंत ऐश्वर्यरूप प्राप्त करून दिलं. मराठी काव्याचा पायाही श्रीज्ञानेश्वरांनी घातला.

**सुगंधमय धुपाचा परिमळ वातावरणि भरे, मृदंग झांजांतुनि झिरपती भक्तिसुधेचे झरे.**

मराठी ओवी आणि अभंग जन्माला आले आणि प्रतिष्ठा पावले. ज्ञानेश्वरांचं केवलाद्वैती तत्त्वज्ञान, त्यांची सगुणातून निर्गुणाची भक्ती पुढं वेगानं अठरापगड जातींतून प्रकट झाली आणि अठरापगड जात आपल्या मायबोलीतून अनुभूती बोलू लागली. 'ज्ञानदेवें रचिला पाया' हे एवढ्यासाठीच म्हणायचं! ज्ञानेश्वरांनी सिद्ध केलेल्या या मराठी वाणीचा पुढं विस्तार-विकास झाला, तिच्यातून 'एकनाथी भागवता'चं अमृतफळ जन्माला आलं; तुकोबांच्या 'अभंगवाणी'चा कळस झळकू लागला.

ज्ञानेश्वरांनी आणखी पायाभूत असं काय केलं? इंद्रियांना जिथं पोहोचता येत नाही, ते इंद्रियांकरवी त्यांनी भोगविलं. कविवाणीची शक्ती काय असते, ते ज्ञानेश्वरांनी दाखवून दिलं; आणि म्हणूनच पुढं जे संत इंद्रायणीकाठी, चंद्रभागेच्या आणि गोदेच्या काठी जन्माला आले तेही, असेच प्रतिज्ञेवर आपापले साक्षात्काराचे अनुभव कविवाणीनं गाऊ लागले. हा विश्वास त्यांना लाभला तो ज्ञानेश्वरांच्या कर्तृत्वानंच!

*वेदांचा तो अर्थ आम्हांसीचि ठावा।*
*येरांना वहावा भार माथां।।*

ही दर्पोक्ती वाटावी, अशी निखळ वास्तविक वाणी 'तुक्या वाणी' उद्गारतो, त्यामागं कविशक्तीचं आणि कविवाणीचं बळ तीनशे वर्षंआधी श्री ज्ञानेश्वरमाऊलींनी सिद्ध करून ठेवलं होतं.

ज्ञानदेवें आणखी कोणता पाया रचला? शुक्ल पक्षातली प्रतिपदेची चंद्रकोर इतकी बारीक असते की ती दिसतही नाही; पण झाडाची मोठी फांदी ढोबळ दिसते. ती पाहायची आणि तिच्यामागं जरा बारकाईनं न्याहाळायचं म्हणजे तिथं असलेली चंद्रकोर नजरेला दिसू लागते. शब्द हे डहाळीसारखे असतात. त्यांच्या आधारे त्यांतील अर्थप्रकाशाची कोर आपण अनुभवायची असते. ज्ञानेश्वरांनी आध्यात्मिक अनुभूतीच्या काव्याचं कसं आकलन करावं, त्याचा आस्वाद कसा घ्यावा व तो आनंद कसा अनुभवावा, याचं शास्त्रही उभं केलं आहे. या शांतरसाच्या काव्यशास्त्राचा पायाही त्यांनीच घातला. यामुळं पुढीलांनी नि:शंकपणे आपली कविवाणी लोकांच्या कानी घातली व लोकांनी ती आनंदानं अनुभवली. ही क्रिया चालूच आहे.

ज्ञानेश्वरांनी केवळ 'वाणी'चंच तेवढं कार्य केलं, असं नाही, त्यांनी भक्ती समाजामध्ये उतरविली. धर्माचं शुद्ध स्वरूप काय असतं, ते त्यांनी दाखवून दिलं आणि 'शुद्ध



**आकारावी ओळ जणू काही ओवी, फुटावी पालवी, अर्थातून**

धर्मा'चा पायाही त्यांनी घातला. शब्दपांडित्याचा बडिवार त्यांनी हटविला; धर्मकांडाचं बंड मोडलं; धर्मविधीतलं दांभिकपण नष्ट केलं, आणि आपलं प्रत्येक कर्म हेच ईश्वराचं पूजन होय, हे लोकांना पटवून दिलं. आपलं प्रत्येक कर्म शुद्ध, पवित्र, कल्याणकारक आणि परिपूर्ण असावं व ते देवाला अर्पण करावं, म्हणजे अहंकार गळून पडतो आणि फलाशा नष्ट होते. मग कर्माचा भोग आपल्या अंगाला लागत नाही. माणूस मुक्त होतो. 'कर्मे ईशु भजावा' हे जीवनसूत्र सांगून ज्ञानेश्वरांनी जीवनकर्माचीही धर्मसम्मत पायाभरणी केली. हीच धर्मशुद्धिकरणाची क्रिया पुढील संतांनीही चालविली.

*'अर्थे लोपलीं पुराणें।*
*नाश केला शब्दज्ञानें।*
*विषयलोभी मने।*
*साधने बुडविलीं।।*
*पिटू भक्तीचा डांगोरा।*
*कळिकाळासी दरारा।'*

असं तुकाराममहाराज छातीठोकपणे पुढं डांगोरा पिटत सांगू लागले.

ज्ञानेश्वरमहाराजांनी वारकरी पंथाचं प्रवर्तन केलं. पंढरीची वारी क्षीण होत आली होती, ती ज्ञानेश्वरांच्या प्रभावानं सतेज आणि बलवती झाली. विठ्ठलाचा पंथ चारी दिशांनी विस्तारला. 'विठ्ठलाचे गाढे वारे' हरिनामाची पताका आणि तीर घेऊन चंद्रभागेच्या वाळवंटी आषाढी- कार्तिकीला येऊ लागले. आज तर हा पालखीसोहळा लाखांनी जमतो. उदंड प्रचंड असा हा भक्तिसोहळा आहे. ही वारी-ही पालखी ही महाराष्ट्राची मिरासी आहे. भागवत-धर्माचं हे विराट दर्शन आहे. ज्ञानेश्वर माऊली आळंदीला आपल्या संजीवन समाधीत आहे आणि तिचं तेज सर्वत्र सर्वांना आपल्याकडं खेचून घेत आहे. पंढरीच्या विटेवरच्या विठ्ठल आणि आळंदीचा संजीवन समाधिस्थ श्रीज्ञानेश्वर यांची आपणांवर अखंड मायापाखर आहे. विठुमाऊली आणि ज्ञानेश्वरमाऊली या दोन माऊलींची म्हणजे एकाच चित्शक्तीची आपण सुखी आनंदी लेकरं आहोत. त्यांच्या प्रेमाच्या गगनावेऱ्ही गेलेल्या वेलीची फुलं आपण टिपायची व सुगंधी व्हायचं!

संत बहिणाबाईचं गुरू श्री तुकाराम महाराज यांनी श्री ज्ञानेश्वरांचं स्तवन काय केलं आहे ते पाहावं-

ज्ञानियांचा गुरु राजा महाराव।
म्हणती ज्ञानदेव तुम्हां ऐसे।।१।।
मज पामरा हे काय थोरपण।
पायींची वाहाण पायी बरी।।२।।
ब्रह्मादिक जेथें तुम्हां बोळगणें।
इतर तुळणें काय पुढे ।।३।।
तुका म्हणे नेणे युक्तीची ते खोली।
म्हणोनी ठेविली पायीं डोई।।४।।

ज्ञानदेव आणि तुकाराम ह्या कुडी दोन; पण ते चैतन्य 'केवळ एकच' दोन्हीचे आध्यात्मिक अधिकार समान; पण तुकाराम आपलं विसर्जन ज्ञानेशांच्या चरणी करतात, हे त्यांचं अनंत अमाप मोठेपण! ज्ञानेश्वर काय करतात? हेच करतात. श्री निवृत्तिनाथांच्या पायी ते डोई ठेवतात. 'म्हणे निवृत्तिदास' असं म्हणून बोलतात. त्यांची वाणी त्यांची नसते; ती त्या सद्गुरु निवृत्तिनाथांची असते.

''काय म्यां पामरें बोलावीं उत्तरे।
परी त्यां विश्वंभरे बोळविलें।।'

हे तुकारामाचे उद्गार!

हे सारं नीट ध्यानी घेतलं तर बहिणाबाईच्या अभंगाचा जो अथांग आशय आहे, त्याचं निर्मळ आणि विशुद्ध रहस्य ध्यानी येईल. ज्ञानदेवांनी अखिल विश्वरहाटीची पायाभरणी केली आहे, केवळ मराठीची-महाराष्ट्राची नव्हे, हे प्रत्ययास येईल।

ॐ तत्सत्।

●●

**डॉ. व. दि. कुलकर्णी**
द्वारा - प्र. प्र. निरगुडकर,
१५ वृंदावन, ७५९/२६,
प्रभात रोड, पुणे ४.

**साबणाची अदला बदल**

इतका साबण शिल्लक राहिला म्हणजेच इतका साबण संपला. तो ३ लोकांनी १७ दिवस वापरला याचा अर्थ प्रत्येक माणसाने प्रत्येक दिवशी साबणाचा भाग वापरला.

जर क्ष दिवसांनी साबणाची अदलाबदल केली असेल तर अमितजवळ एवढा साबण राहील त्यातील इतका साबण उरलेल्या दिवसात शामराव व त्यांच्या पत्नीने मिळून वापरला.

हे समीकरण सोडवून येणारे उत्तर क्ष = ७

७ व्या दिवशी त्यांनी साबणाची अदलाबदल केली.

**संत चरणाची माळविणे धूळ, एवढेच लाभो पावलास बळ.**

# पुस्तकांचे तहानलाडू–भूकलाडू

अनंत भावे

**म**हात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, सम्राट नेपोलियन, ब्रिटिश पंतप्रधान विन्स्टन चर्चिल, अल्बर्ट श्वाईट्झर, चार्ली चॅप्लीन हे महामानव.

चित्रविचित्र घडामोडींनी रंगलेली त्यांची चरित्रं. एकेकाची केवढी मोठी कामगिरी विशाल आणि विविध प्रकारची.

प्रत्येकाची अनुभवांची पोतडी अवाढव्य आणि अनेकानेक अद्‌भुत चिजा तिच्यात.

पण लक्षात असं येतं की तशी एक प्रकारची मर्यादा आहेच प्रत्येकाच्या आयुष्याला. असं आहे त्या महामानवांच्या आयुष्यांचं सुद्धा!

मग तुमच्या–माझ्यासारख्या सर्व सामान्यांच्या आयुष्यांचं काय?

अहो, त्यांना मर्यादाच मर्यादा!

स्वत:च्या आयुष्याचं मोजमाप घेऊन पाहा; म्हणजे कळेल आपलं आपल्याच! आपलं कार्यक्षेत्र ठराविक; कार्यक्षेत्रातलं कार्य ठराविक; कार्याची पद्धती ठराविक; जगण्याचा परिसर ठराविक; परिसरातलं सांस्कृतिक हवामान ठराविक; भेटणारी माणसं ठराविक; त्यांचं वागणं ठराविक.

ठराविकपणाचा शाप आपल्या आयुष्याला.

आणि माणूस म्हणून आपल्याला मनोमन ठाऊक असतं केवढी अद्‌भुत आणि रंगरंगिली दुनिया आपल्या अवतीभवती आहे. त्या दुनियेकडे नेणारी एखादी वाट...

त्या दुनियेला आपलीशी करायचा आहे एखादा उपाय? एखादं तंत्र? एखादा मंत्र? एखादी युक्ती? एखादी जादू?

आहे! आहे! आहे!

माणसाला जखडणाऱ्या ठराविकपणाच्या अवघड शापातून मुक्त व्हायचा अगदी सोपा उ:शाप आहे.

अगदी सोपा.

अहो, पुस्तक हा तो उ:शाप!

पुस्तकात डोळे घातले की, उघडतंच दार तुमच्यासाठी, त्या अद्‌भुत दुनियेचं!

कल्पना करा, तुमच्या हातातला 'नॅशनल जिओग्रॅफिक' मासिकाचा एखादा अंक तुम्ही वाचताय.

कुठल्या कुठे पळून जाईल ठराविकपणा.

आणि घडेल एक आरामयात्रा विश्वातल्या अनोख्या ठिकाणांची.

अपरिचित संस्कृतीची.

पुस्तकांचं केवढं प्रचंड भांडार आहे आपल्या सेवेसाठी. हव्या त्या विषयाचा धांडोळा घेऊ शकतो आपण. कथा–कादंबऱ्या वाचू शकतो; वाचू शकतो कविता. असं कल्पनारम्य नको असेल काही, तर चरित्रं–आत्मचरित्रं, इतिहासाची पुस्तकं आहेतच वाटेल तेवढी.

आपल्यातल्या काहींना असेल तहान, असेल भूक वेगवेगळ्या शास्त्रीय ज्ञानाची–

तर त्या ज्ञानविषयाच्या पुस्तकांचे तहानलाडू, भूकलाडू तयारच आहेत त्यांच्यासाठी!

पुस्तकं किती आत्मबळ देऊ शकतात एखाद्याला? अब्राहम लिंकनचं उदाहरण बोलकं आहे या बाबतीत.

अब्राहम लिंकनच्या लहानपणी घरात होती ऐसपैस गरीबी. कष्ट–कष्ट–कष्ट केले तरच भुकेच्या दोन वेळा कशा तरी निभायच्या.

लहानगा एब कष्ट तर करायचाच; पण वाट्टेल ते करून वाचायचासुद्धा.

त्याच्या आजूबाजूचे अमेरिकन वाचत नव्हते. लिंकन मात्र वाचायचा. 'वाचणारा लिंकन' अशी प्रसिद्धी होऊ लागली त्याची. 'वाचणारा' म्हणून शहाणा. लोक शहाण्या लिंकनचा सल्ला घेऊ लागले.

या वाढत गेलेल्या लोकसंपर्कातूनच एक दिवस अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष झाला तो. पुस्तकांचं महत्त्व थोडक्यात पण नेमकं सांगू?

***'हे नच पुस्तक । ही तर खिडकी***
***जग भवतीचे । पाहण्यासाठी ।।***
***हे नच पुस्तक । ही तर दुर्बिण***
***अदृष्टाला भिडण्यासाठी ।।***
***हे नच पुस्तक । हा तर परवाना***
***विश्वनागरिक होण्यासाठी ।।***
***हे नच पुस्तक । हा तर आरसा***
***स्वत:लाच ओळखण्यासाठी ।।'***

●●

**अनंत भावे**
६, राधा मंदिर, २१३ सर भालचंद्र
रस्ता, माटुंगा–मुंबई १९

## दीपावलीच्या सुट्टीचा सदुपयोग करा: छात्र प्रबोधनतर्फे नावीन्यपूर्ण स्पर्धा

१) **'तुम्हीच संपादक व्हा!' –** आपल्या प्रतिभेला वाव देण्यासाठी सुट्टीत एक सांघिक प्रयत्न करून २४ पृष्ठांचे हस्तलिखित तयार करा. शाळा सुरू झाल्यावर आपल्या अध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली ते अधिक आखीव-रेखीव व परिपूर्ण करा. अन् ३१ डिसेंबरपूर्वी आमच्याकडे पाठवा. त्यातील उत्तम हस्तलिखितांची निवड करून त्यांना पारितोषिक दिली जातील. तसेच त्यातील उत्तम साहित्याला 'छात्र प्रबोधन' मध्ये प्रसिद्धी मिळेल.

२) 'पंख सुरांचे' – ध्वनिफीत (कॅसेट) निर्मिती स्पर्धा. – विद्यार्थ्यांनी संगीत दिग्दर्शन केलेली, ३० मिनिटांची, नावीन्यपूर्ण कल्पनांनी युक्त ध्वनिफीत तयार करा व ३१ डिसेंबरपूर्वी आमच्याकडे पाठवा.

३) **मुलाखत घ्या आणि लिहा. –** या अंकातील 'कर्तृत्वाशी जडले नाते' ही लेखमाला आपण नीट अभ्यासा व आपल्या गावातील एखाद्या क्षेत्रात उत्तुंग यश मिळविणाऱ्या युवा पिढीतील व्यक्तीची (३५ वर्षांच्या आतील) मुलाखत स्वत: घ्या व त्या व्यक्तीच्या छायाचित्रांसह छात्र प्रबोधनकडे पाठवा.

**उत्कृष्ट हस्तलिखिते व ध्वनिफिती पाठविणाऱ्या शाळांना/गटांना पुढीलप्रमाणे पारितोषिके दिली जातील.**

**प्रथम क्र.** रु. ३००, **द्वितीय क्र.** रु. २००, **तृतीय क्र.** रु. १५०, **उत्तेजनार्थ** रु. ५०,

**उत्कृष्ट मुलाखतीसाठी पारितोषिके – प्रथम क्र.** रु. ५१, **द्वितीय क्र.** रु. ३१, **तृतीय क्र.** रु. २५, **उत्तेजनार्थ** रु. १५

स्पर्धेच्या नियमांच्या तपशिलासाठी खालील पत्त्यावर माहितीपत्रक मागवावे.

**छात्र प्रबोधन,** ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

२५ नोव्हेंबरपूर्वी आपली नावनोंदणी करावी. (स्पर्धांचे आवेदन पत्र व अधिक माहिती पत्र छात्र प्रबोधनच्या पुढच्या अंकात)

वार्षिक वर्गणी रु. १२५/-

## छात्र प्रबोधन - सभासद नोंदणीपत्रक

नवीन सभासद / जुना सभासद क्रमांक : दिनांक :

सभासदांचे नाव : ______

संपूर्ण पत्ता : ______

______

______

दूरभाष क्रमांक : जन्मदिनांक : / /

शाळा : ______ इयत्ता-तुकडी ______

पत्रमैत्री करायची इच्छा आहे – हो/नाही. घरी अंक केव्हापासून येतो – नव्याने/एक वर्ष/दोन वर्ष/तीन वर्ष/चार वर्ष/पाच वर्ष

### कार्यालयीन कामकाजासाठी

वर्गणीचा कालावधी : वर्ष अंक ते वर्ष अंक वर्गणी रक्कम :

पावती क्रमांक : नोंदणी क्रमांक : स्थान क्रमांक :

वर्गणी : वार्षिक/द्वैवार्षिक/त्रैवार्षिक/आजीवन, दीपावली विशेषांक रजिस्टरने पाठविणे : हो/नाही

**ही दीपावली व नूतन विक्रम संवत्सर छात्र प्रबोधनच्या सर्व कार्यकर्ते, केंद्रप्रमुख, सभासद, लेखक, चित्रकार, हितचिंतक, देणगीदार, प्रायोजक, जाहिरातदार इ. सर्वांना उत्साहाचे, पराक्रमाचे भरभराटीचे, आनंदाचे जावो, यासाठी आमच्या मन:पूर्वक शुभेच्छा! संपादक मंडळ, छात्र प्रबोधन, ज्ञान**

## छात्र प्रबोधन : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ...! तुमचाही सहभाग असायला हवा!

गेली ५ वर्षे मासिकाच्या निमित्ताने महाराष्ट्रात अनेक ठिकाणी जाणे होते. ठिकठिकाणी विद्यार्थ्यांचे मेळावे, पालकांच्या सभा होतात. या कार्यक्रमांना प्रतिसादही चांगला असतो. तथापि त्यातून पुढे कृतियुक्त प्रतिसाद, त्यातील सातत्य कमी पडते. बोरीवली, डोंबिवली, सांगली, इचलकरंजी, अलिबाग येथे कार्यकर्त्यांचा गट सातत्याने गेली २ वर्षे धडपड करत आहे. तेथे मुलामुलींसाठी साप्ताहिक कार्यक्रम, सहली आयोजित केल्या जात आहेत. पार्ले, नाशिक, किहीम, नागोठणे, रसायनी, शहादा येथे पाक्षिक कार्यक्रम तर विटा, कराड, सातारा, धुळे, रत्नागिरी, देवरूख, धाराशिव येथे प्रासंगिक कार्यक्रम चालू झाले आहेत. याठिकाणी अधिक नियमितपणे कार्यक्रम होण्यासाठी उत्साही, पुढाकार व जबाबदारी घेऊ इच्छिणाऱ्या सहकाऱ्यांची जोड मिळायला हवी आहे. उर्वरित सर्व ठिकाणी कार्यक्रम सुरू करायला नव्यानेच गट तयार व्हायला हवा आहे. आपल्या गावात पाचवी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यक्रमांचे संयोजन करण्याची तुम्हाला इच्छा आहे का? तुम्ही थोडा वेळ देऊ शकाल का? तर प्रबोधिनीच्या दीर्घ अनुभवांचा लाभ आपल्याला नक्कीच मिळू शकेल. **अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिन अधिक गौरवपूर्णरितीनं साजरा करायचा असेल तर आजपासून नव्हे आत्तापासूनच या कामास लागायला हवे.** दुसरा कोणीतरी सुरुवात करेल याची वाट न पाहता आपणच प्रारंभ करायला हवा. त्यासाठी या चळवळीत सहभागी व्हा! छात्र प्रबोधनच्या पत्त्यावर पत्रव्यवहार करून आपली इच्छा आपण व्यक्त करा. तुमच्या सर्व प्रकारच्या सहकार्याचे स्वागत आहे. अनेकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाची आम्ही वाट पाहात आहोत.

**संपादक, छात्र प्रबोधन**

### • कुटुंबासंबंधी माहिती •

| | नाते | नाव | शिक्षण | व्यवसाय/जन्मतारीख |
|---|---|---|---|---|
| १. | आई | | | |
| २. | वडील | | | |
| ३. | भाऊ | | | |
| ४. | बहीण | | | |
| ५. | | | | |
| ६. | | | | |
| ७. | | | | |

- **आपल्याकडे यापैकी काय आहे?** फ्रीज / टी.व्ही. / व्ही.सी.आर / केबल / कॉम्प्युटर / स्वत:चा फ्लॅट / बंगला/ शेती / फोन / स्कूटर / कार / जीप / टेपरेकॉर्डर / स्टिरिओ सिस्टीम / पेटी / तबला / सतार
- **तुम्ही मिळविलेली बक्षीसे / विशेष यश / तुमचे विशेष छंद**

(जागा कमी पडल्यास याच आकाराचा स्वतंत्र कागद जोडावा.)

### • कार्यालयीन कामकाजासाठी •

**अर्ज कोणाकडून आला :** पोस्टाने / केंद्राकडून / कार्यालयात समक्ष **केंद्राचे नाव :**

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक प्रा. महेन्द्र सेठिया यांनी
राष्ट्रीय सौर २२ आश्विन शके १९२०, १४ ऑक्टोबर १९९८ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, पुणे येथे छापून
ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथून प्रसिद्ध केले.

नोंदणी क्रमांक : PHM/22/VII/1997, टपाल नोंदणी क्र. छात्र प्रबोधन; PNCW/349, तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र. L128

दीपशिखांच्या
कळ्या बहरल्या
घरी, अंगणी
आकाशात...
सर्व सुखांचा
वसंत नांदो
आपुल्यासवे
नववर्षात...




दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा !!